(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी.: राज्य परिवहन महामंडळाची कार्यक्षमता वाढविणे

मु.शी.: राज्य परिवहन महामंडळाची कार्यक्षमता वाढविणे या विषयावर प्रा.सुरेश नवले, सर्वश्री संजय दत्त, चंद्रकांत रघुवंशी, गोविंदराव आदिक, एस.क्यू.जामा, सुभाष चव्हाण, राजन तेली, वि.प.स. यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव.

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्याच्या आर्थिक व सामाजिक विकासामध्ये राज्य परिवहन महामंडळाने मोलाचे योगदान दिलेले असणे, १९८८ च्या सुधारित मोटार वाहन अधिनियमानुसार पर्यटन बस परवाने मुक्तपणे देण्यात येऊ लागल्याने खाजगी बसेस, जीप, मॅटेडोअर, मिनी बसेस या वाहनांच्या संख्येतसुध्दा प्रचंड प्रमाणात वाढ झालेली असणे, या पर्यटन परवाना असलेल्या खाजगी बसेसचा वापर अवैध प्रवासी वाहतुकीसाठी होऊ लागणे, याचा विपरीत परिणाम राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नावर होणे, राज्य परिवहन महामंडळ दररोज १ कोटी प्रवाशांची वाहतूक करु शकते. परंतु अवैध प्रवासी वाहतुकीमुळे सरासरी दररोज ५८ लाख प्रवासी राज्य परिवहन सेवेचा लाभ घेणे म्हणजेच एस.टी.ची उर्वरित ४२ लाख प्रवाशांची प्रवासी क्षमता वाया जाणे, अशा प्रकारे गेल्या १० वर्षात राज्य परिवहन महामंडळास ६१ कोटी प्रवाशांचे नुकसान होणे, अवैधरित्या खाजगी प्रवासी वाहतुकीस माहे जानेवारी २००१ पासून बंदी आणण्याच्या निर्णयाची परिणामकारक अंमलबजावणी न झाल्याने राज्य परिवहन महामंडळ ५०० कोटी रुपये इतक्या उत्पन्नाला वंचित राहणे, खाजगी अवैध प्रवासी वाहतुकीमुळे राज्य परिवहन महामंडळाचे बुडणारे उत्पन्न, डिझेल व इतर सामानाच्या खरेदी मूल्यातील होणारी वाढ, सामाजिक बांधिलकीमुळे दुर्गम तसेच किफायतशीर नसलेल्या मार्गावर चालवाव्या लागणाऱ्या बंधनकारक वाहतुकीमुळे होणारा तोटा, वाहतूक करताना विविध ठिकाणी पथकर आकारण्यात येत असून पथकरापोटी सन २००५-२००६ मध्ये ३५ कोटी रुपये बोजा सोसावा लागणे, राज्य परिवहन महामंडळ राज्य शासनाचाच एक उपक्रम असल्याने सदर महामंडळास पथकर भरण्यातून सूट मिळणे आवश्यक असणे, तसेच आजच्या स्पर्धात्मक युगात

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

एस.टी.बसेस दर्जात सुधारणा करण्याची आवश्यकता असून जुन्या असलेल्या एस.टी. बसेस अजूनपर्यंत तशाच चालविण्यात येत असल्याने प्रवासी संख्येत तुट होणे, यासाठी एस.टी.च्या कामगिरीचा आढावा, सद्य:स्थिती आणि पुढील समस्या या परिस्थितीचा विचार करुन राज्य परिवहन महामंडळ सक्षम करण्याच्यादृष्टीने शासनस्तरावरुन अंमलबजावणी करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची उपाययोंजना विचारत घेण्यात यावी."

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची दिनांक 1 जून, 1948 या दिवशी स्थापना झाली. 60 वर्षापेक्षा अधिक कालावधीत या महामंडळाने महाराष्ट्राची अविरतपणे लोकसेवा केलेली आहे. एका अर्थाने ही लोकवाहिनी आहे. महाराष्ट्रातील सर्वसामान्य, गोरगरिब, दलित, पददलित यांच्या सेवेमध्ये असणारी महाराष्ट्रातील ही एकमेव लोकवाहिनी जगली पाहिजे. तिच्या कारभारात सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने महाराष्ट्र शासनाने या महामंडळाच्या पाठीमागे भक्कमपणे उभे रहावे अशी विनंती मी आपल्यामार्फत महाराष्ट्र शासनाला करणार आहे.

सभापती महोदय, आपल्याला आठवत असेल की, 25-30 वर्षापूर्वी महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात एस.टी.बस आली तर लोक त्या एस.टी.बसची पूजा करायचे.

(नंतर श्री.भारवि....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

एस.टी.च्या रूपाने गावामध्ये लक्ष्मी आली अशी लोकांची भावना होती, समज होता, श्रद्धा होती. तीच एस.टी.तेव्हापासून आजतागायत खेड्यापाड्यामध्ये, वाडी-तांड्यांमध्ये लोकसेवेचे काम करीत आहे म्हणूनच एस.टी.महाराष्ट्रामध्ये जगली पाहिजे, अशी माझी वैयक्तिक भावना आहे. 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे एस.टी.महामंडळाचे ब्रीद आहे. बहुजनाच्या हितासाठी, सुखासाठी एस.टी.महाराष्ट्रात कार्यरत आहे. त्यामुळे मधल्या काळात एस.टी.महामंडळाला तोटा झाला. पण या वर्षी 158 कोटी पेक्षा जास्त नफा एस.टी.महामंडळाला झालेला आहे. पूर्वी एस.टी.महामंडळामध्ये सौजन्य सप्ताह साजरे केले जात असत. पण एस.टी.कर्मचारी,अधिकाऱ्यांनी एक चांगला निर्णय घेतला आहे. आता सौजन्य सप्ताह करण्याची आवश्यकता नाही. आपण सौजन्याने वागलो तर एस.टी.ला स्पर्धा असणारी खाजगी व्यवस्था निश्चितपणे मोडकळीस आल्याशिवाय राहणार नाही, हे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे आज एस.टी.कर्मचाऱ्यांची, अधिकाऱ्यांची मानसिकता पूर्णपणे बदललेली आहे. आता सौजन्याने वागा असे सांगण्याची आवश्यकता एस.टी.कर्मचाऱ्यांना नाही. ते आता सौजन्याने वागतात. बसवाहक तर आस्थेने प्रवाशांची विचारपूस करतात. हा आमूलाग्र बदल एस.टी.मंडळामध्ये मधल्या काळामध्ये झालेला आहे. त्याचा परिपाक म्हणून 158 कोटी रूपयांचा नफा एस.टी महामंडळाला झालेला आहे. एस.टी.महामंडळाचे अध्यक्ष, अधिकारी, कर्मचारी या सर्वांचे माननीय मुख्यमंत्र्यांनी, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केलेले आहे. या राज्यामध्ये जे चांगले काम करतात, त्यांच्या पाठिमागे महाराष्ट्र शासन आहे, त्यांच्या पाठिमागे आम्ही खंबीरपणाने उभे आहोत अशी महाराष्ट्र शासनाची भूमिका आहे. तेव्हा एस.टी.महामंडळाच्या पाठिमागे अजूनही भक्कमपणाने महाराष्ट्र शासनाने उभे राहण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने शासन प्रयत्न करील अशी मी आशा व्यक्त करीत आहे. एस.टी.महामंडळाने उत्तरदायित्त्व, सामाजिक भान निभावलेले आहे. 433 कोटी 44 लाख 8 हजार 270 रूपये एस.टी.महामंडळाने महाराष्ट्र शासनाला आरोग्य पोषण निधी म्हणून आज पर्यंत दिलेला आहे. सामाजिक उत्तरदायित्त्वाचे हे ज्वलंत आणि जीवंत उदहारण सार्वजनिक उपक्रमामध्ये एकमेव असावे. हे एकमेव उदाहरण असल्यामुळे एस.टी.महामंडळाची प्रगती उत्तरोत्तर झाली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

त्यासाठी शासनाने स्वत:ची भूमिका जाहीर केली पाहिजे, अशी विनंती मी शासनाला करणार आहे. मध्यंतरी सुवर्ण महोत्सवी वर्ष असताना एस.टी.कर्मचाऱ्यांनी पारितोषिक किंवा रोख बक्षिस एस.टी.महामंडळाकडून स्वीकारले नाही. सर्व कर्मचाऱ्यांनी एस.टी.महामंडळाला स्वत:च्या पगारातून 22 बसगाड्या सप्रेम भेट दिल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये हे एकमेव उदाहरण आहे. सामाजिक उत्तरदायित्त्व एस.टी.महामंडळाचे कर्मचारी निभावत असतील तर एस.टी.महामंडळाच्या पाठीशी शासनाने सक्षमपणे उभे राहिले पाहिजे. महाराष्ट्र शासनाने सर्वतोपरी सहकार्य करण्याची भूमिका घ्यावी, अशी मी विनंती करणार आहे. आज एस.टी.महामंडळामध्ये 1 लाख 3 हजार कर्मचारी आहेत.

यानंतर श्री.पी.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

त्यांच्यावर अवलंबून असणारे त्यांचे कुटुंब अशा मोठ्या परिवाराला जगविण्याची जबाबदारी महाराष्ट्रातील जनतेची, पर्यायाने शासनाची आहे. महाराष्ट्र शासन निश्चितपणे आपली भूमिका पार पाडणार आहे पण जनतेने सुध्दा सुरक्षित प्रवास म्हणून एस.टी. महामंडळाकडे पहावे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रामध्ये एस.टी. ने होणारे अपघात फक्त 6 टक्के असून 94 टक्के अपघात हे विविध खाजगी वाहने व अवैध वाहतुकीमुळे होतात. म्हणून एस.टी. चा प्रवास सुरक्षित असाच म्हणता येईल. हा प्रवास समाधानकारक आहे असे मी म्हणणार नाही परंतु सुरक्षित नक्कीच आहे. आणि एस.टी.चा प्रवास प्रवाशांच्या दृष्टीने समाधानकारक व्हावा यादृष्टीने एस.टी. ने सुध्दा नियोजन करण्याची आवश्यकता आहे, तसेच भविष्याच्या दृष्टीने काही प्रयोग करण्याची आवश्यकता आहे. या महामंडळाच्या एकूण सांपत्तिक स्थितीचा आढावा घेतला तर असे दिसून येईल की, 2032 कोटीची स्थावर मालमत्ता आज एस.टी. महामंडळाकडे आहे. त्यात महाराष्ट्रामध्ये विविध ठिकाणी एस.टी. स्टँड आहेत. त्याचबरोबर माझी अशी सूचना आहे की, बीओटी तत्वावर एस.टी. स्टँड विकसित करावेत आणि त्यातून उत्पन्न मिळवावे व त्या पैशातून हे महामंडळ आणखी सक्षम करण्याच्या दृष्टीनेही महामंडळाने प्रयत्न केले पाहिजेत, अशी माझी महामंडळाच्या अध्यक्षांना तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांना विनंती आहे. आज राज्याच्या बाजुबाजूच्या राज्यांमधील प्रवासी कराबाबत विचार केला तर त्या राज्यांमध्ये प्रवासी कर फक्त 6 टक्के आहे आणि आपल्या राज्यात मात्र हा कर 17.5 टक्के एवढा आहे. ही तफावत असण्याचे कारण काय आहे ? एस.टी. महामंडळ हा महाराष्ट्र शासनाचा एक सार्वजनिक उपक्रम असल्यामुळे हा प्रवासी कर 17.5 टक्क्यावरुन 6 टक्क्यावर आणल्यास 158 कोटीचा नफा कदाचित 1500 कोटीच्याही पुढे जाऊ शकतो पण त्यासाठी शासनाचा उदार दृष्टीकोन असण्याची आवश्यकता आहे, अशी माझी शासनाकडून अपेक्षा आहे. महाराष्ट्रात आज अवैध वाहतूक मोठ्या प्रमाणावर चालू आहे. औरंगाबाद उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने असा निर्णय दिलेला आहे की, राज्यात होत असलेली अवैध वाहतूक ताबडतोब बंद झाली पाहिजे, परंतु आजतागायत ही अवैध वाहतूक बंद करणे महाराष्ट्र शासनाला म्हणावे तेवढे यश आलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. ही अवैध वाहतूक बंद केली तर एस.टी. महामंडळाला प्रत्येक वर्षी 500 कोटी रुपयाचा नफा होऊ शकतो, अशा प्रकारे अवैध वाहतुकीमुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

दरवर्षी शासनाचे 500 कोटीचे उत्पन्न बुडते, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. राज्यात प्रत्येक एस.टी. स्टँडसमोर राजरोसपणे प्रवासी पळवून नेले जातात. मोठमोठ्याने ओरडून, कोणत्या गावाला या अवैध गाड्या जातात त्या गावांची नांवे सांगून एस.टी. स्टँडसमोरील प्रवासी पळविण्याचे उद्योग अवैध वाहतूक करणारे ड्रायव्हर्स आणि त्यांचे मालक करीत असतात, याला पायबंद घालण्याची आवश्यकता आहे, अशी विनंती मी महाराष्ट्र शासनाला करणार आहे. अशा विविध माध्यमातून शासनाने एस.टी. महामंडळात सुधारणा घडवून आणण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे एस.टी. मध्ये जी आसनव्यवस्था आहे ती 3+2 अशी असून त्यात बदल करुन 2+2 अशी आसनव्यवस्था केली तर निश्चितपणे प्रवाशांना आकर्षित करण्याचे काम आपण करु शकू, असा मला विश्वास आहे. महामंडळाने एस.टी. मध्ये कॉईन टाकून फोन करण्याची सुविधा सुरु केलेली आहे परंतु एस.टी. च्या खडखडाटामुळे या फोनमधून समोरच्या व्यक्तिला, प्रवाशांच्या नातेवाईकांना आवाज ऐकू येत असेल की नाही याबद्दल मला शंका वाटते. तसेच बहुतेक लोकांकडे मोबाईल असल्यामुळे त्या फोनचा कितपत उपयोग होत असावा ही देखील शंका आहे. यात सुधारणा करता आली तर त्याचाही विचार करावा.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ....

पाश्चिमात्य राष्ट्रामध्ये जी वाहने 250 -300 कि.मी. चा प्रवास करतात त्या वाहनांमध्ये शौचालयाची व्यवस्था असते. आपल्याकडे विमानामध्ये शौचालयाची व्यवस्था आहे, रेल्वे मध्ये शौचालयाची व्यवस्था आहे परंतु एस.टी. मध्ये शौचालयाची व्यवस्था नाही. त्यामुळे एस.टी. महामंडळाच्या लांब पल्ल्याच्या गाडयामध्ये एस.टी. महामंडळ शौचालयाची व्यवस्था करु शकले तर ते एस.टी. प्रवाशांच्या दृष्टीने सोईचे होईल. त्यामुळे एस.टी.महामंडळाच्या कर्मचा-यांनी या सोईसाठी निश्चितपणे प्रयत्नशील राहिले पाहिजे. परंतु आपल्याकडील रस्ते खराब असल्यामुळे शौचालयाला गेलेली व्यक्ती सुखरुप बाहेर येईल याची शाश्वती देता येत नाही त्यादृष्टीने महाराष्ट्र शासनाने एस.टी. महामंडळाच्या व्यवस्थेकडे पाहण्याची आवश्यकता आहे. पुरोगामी महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा एस.टी.महामंडळाने रोवलेला आहे. एस.टी.महामंडळाने आता महिला कंडक्टरांची नेमणूक केलेली आहे. विधान सभा आणि विधान परिषदेमध्ये ज्या प्रमाणे महिला आमदार सक्षमपणे काम करतात तशाच प्रकारे एस.टी.महामंडळात देखील महिला कंडक्टर सक्षमपणे काम करीत आहेत. महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाचा विचार, पुरोगामी निर्णय उत्तम प्रकारे राबवण्याची जबाबदारी एस.टी.महामंडळातील कर्मचा-यांनी पार पाडलेली आहे.

सभापती महोदय, एस.टी.महामंडळाच्या बसेस सीएनजीवर चालविण्याचा प्रयत्न झाला तर प्रवाशांना कमी दराने प्रवास करता येईल व पर्यायाने एस.टी. मधून प्रवास करणा-यांची संख्या वाढेल व स.टी.महामंडळाचे उत्पन्न वाढेल अशी मला खात्री आहे.

सभासपती महोदय, महाराष्ट्रामध्ये अनेक आंदोलने होत असतात. आतापर्यंत 1600 एस.टी. बसेसे आंदोलकांनी फोडलेल्या आहेत, जाळल्या आहेत. कोणत्याही आंदोलनाचा दुष्परिणाम एस.टी.महामंडळाला भोगावा लागत असतो. आंदोलक आपला राग खाजगी वाहनावर न काढता एस.टी.महामंडळाच्या वाहनावर काढत असतात. त्यामुळे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी आंदोलनाच्या वेळेस एस.टी.महामंडळाच्या गाडयांना विशेष सुरक्षा देणे आवश्यक आहे. आंदोलनाच्या वेळेस एस.टी.ला विशेष सुरक्षा माननीय गृहमंत्री देतील अशी मला खात्री आहे, विश्वास आहे.

सभापती महोदय, एस.टी. च्या गाड्यांचे खराब झालेले टायर, भंगार या सर्वांचा पुन्हा

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ....

उपयोग करता येऊ शकेल का यादृष्टीने एस.टी.महामंडळाने निश्चितपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. एस.टी. चा आणि माझा संबंध कसा आहे हे मी येथे आपल्याला सांगतो. मी मंत्री असतांना, एस.टी. मधून प्रवास करीत असतांना अपघात झाला व त्या अपघातात माझ्या कंबरेचे हाड मोडले गेले. त्यावेळी काही नेत्यांनी मला सांगितले की, तुम्ही एवढया छोट्या लाल दिव्याच्या वाहनातून प्रवास करतात आणि एस.टी. तर संपूर्ण लाल आहे ? सभापती महोदय, अशा प्रकारे एस.टी. आणि माझा संबंध आलेला आहे. एस.टी.ने माझ्या कंबरेचे हाड मोडले असले तरी महाराष्ट्रातील लाखो प्रवाशांची हाडे तशीच रहावीत म्हणून एस.टी. महामंडळ जगले पाहिजे अशी भावना या चर्चेच्या निमित्ताने व्यक्त करतो. एस.टी. च्या संदर्भात नियम 260 अन्वये आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला मनस्वी आभारी आहे.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : आता या प्रस्तावावर इतर सन्माननीय सदस्य भाषणे करतील माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तराचे भाषण 11.30 वाजता सुरु होईल आणि दुपारी 12.00 वाजता या प्रस्तावावरील चर्चा संपेल. मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी मुद्देसूद आणि कमी शब्दात बोलावे. आता या प्रस्तावावर बोलण्यासाठी माझ्याकडे ज्या सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत ती मी वाचून दाखवतो. त्यानुसार सत्ताधारी लोकशाही आघाडी पक्षाकडून सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले, सर्वश्री संजय दत्त, एस.क्यु.जामा, श्रीमती फौजिया खान तसेच. शिवसेना पक्षातर्फे डॉ.नीलम गो-हे, डॉ.दीपक सावंत, श्री.अरविंद सावंत आणि भारतीय जनता पक्षातर्फे सर्वश्री चंद्रकांत पाटील यांची नावे देण्यात आलेली आहेत. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही सन्माननीय सदस्यांचे नाव माझ्याकडे आलेले नाही . यानंतर इतर कोणत्याही सन्माननीय सदस्यांची नावे घेतली जाणार नाहीत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहात आता जे सन्माननीय सदस्य हजर आहेत त्यांनाच बोलण्याची संधी दिली पाहिजे.

डॉ.नीलम गोऱ्हे :सभापती महोदय, जे सन्माननीय सदस्य उशिराने येतील त्यांना बोलण्याची संधी देता कामा नये.आम्ही सकाळी लवकर येथे आलो आहोत.

उपसभापती : सन्माननीय सदस्य आल्यानंतर आपण यासंबंधीचा मुद्दा मांडावा.

श्री.मंदा म्हात्रे : सभापती महोदय, शेवटी मला बोलण्याची संधी देण्यात यावी.

उपसभापती : ठीक आहे. यानंतर सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांनी भाषण सुरु करावे.

यानंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त): सभापति महोदय, मुंबई की लाईफ लाईन अगर लोकल रेलवे को कहा जाए तो निश्चित रुप से हम एस. टी.(स्टेट ट्रांसपोर्ट) को ग्रामीण महाराष्ट्र की लाईफ लाईन कह सकते हैं. 15500 गाड़ियां, 247 डेपो और हर दिन एस.टी. की गाड़ियों का 47 लाख किलोमीटर का सफर और इस व्यवस्था को देखने के लिए 1 लाख 2 हजार कर्मचारी, इतना बड़ा यातायात का व्याप सड़क पर चलाने वाली और किसी वाहतूक कंपनी का नहीं है, ऐसा मुझे लगता है. " बहुजन हिताय, बहुजन सुखाय " यह ब्रीद लेकर एस.टी. जनता की सेवा में जुटी है. इस दौरान कई उतार-चढ़ाव आए. प्राईवेट बस सड़क पर उतरी. अवैध वाहतुक शुरु हुई. फिर भी इन सारी बातों का डटकर मुकाबला करते हुए एस.टी. निरन्तर दौड़ रही है. जिस एरिया में प्राईवेट बस बिल्कुल चलाई नहीं जा रही है वहां भी एस.टी. चालू है भले ही इसमें एस.टी. को नुकसान उठाना पड़ता हो, लेकिन उसकी परवाह किए बिना एस.टी. अपने ब्रीद पर खरी उतरती आ रही है.

सभापति महोदय, सबसे ज्यादा प्रवासी कर महाराष्ट्र में है. प्राईवेट ए.सी. बस के लिए 3.5 प्रतिशत की दर कर लगाया जा रहा है जब कि एस.टी.की बसों के लिए 17.5 प्रतिशत की दर से कर लगाया जा रहा है. इतना ही नहीं ग्रामीण भाग में प्राईवेट बस चलाना प्राईवेट कंपनी वालों के लिए बंधनकारक नहीं है जब कि एस.टी. की गाड़ियां ग्रामीण भागों में भी चलाई जाती है और ग्रामीणों की सेवा करती है. एस.टी. गाड़ियां की क्षमता प्रतिदिन 1 करोड़ प्रवासियों की है लेकिन खाजगी वाहतूक के कारण केवल 58 लाख प्रवासी एस.टी. को मिल रहे हैं. इसका मतलब यह है कि हर दिन 42 लाख प्रवासी एस.टी. को गवांने पड़ रहे हैं. इस हिसाब से पिछले 10 सालों में एस.टी. ने 61 करोड़ प्रवासी गवाएं हैं. दूसरी ओर जब भी कानून और व्यवस्था का सवाल पैदा होता है तो समाज विरोधी लोगों का सबसे आसान शिकार एस.टी. की बस होती है. पिछले 5 वर्षों में 1600 एस.टी. बस जलाई गई. जिसकी वजह से एस.टी. महामंडल को 13 करोड़ रुपये का नुकसान हुआ है. इस प्रकार से और अन्य कारणों से एस.टी. महामंडल को पिछले 10 सालों से नुकसान हो रहा था. लेकिन पिछले साल एस.टी. महामंडल को मुनाफा हुआ है. मुनाफा होने की वजह से अब एस.टी. महामंडल का आत्मविश्वास बढ़ गया है, उम्मीद बढ़ गई है. हम यह मान सकते हैं कि अब नये सिरे से एस.टी. दौड़ रही है.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान ...

सभापति महोदय, जिस प्रकार से एस.टी. के संबंध में ये प्लस पाइंट हैं, उसी प्रकार से कुछ निगेटिव फेक्टर भी है. इसलिए प्लस पाइंट के साथ साथ निगेटिव पाइंट पर भी गौर करना जरुरी है. क्योंकि उसके बगैर एस.टी. अपनी मंजिल तक बिना रुकावट नहीं पहुंच सकती. आज का युग स्पर्धात्मक है. स्पर्धा के इस युग में हर कोई आगे बढ़ना चाहता है, जो कि स्वाभाविक है. इस स्पर्धात्मक युग में एस.टी. बसों के दर्जे में सुधार करना बहुत जरुरी है. इस बात से परहेज भी नहीं होना चाहिए. लेकिन आज लोगों की मानसिकता इस तरह की बन गई है कि हर आदमी माता-पिता को छोड़कर हर चीज़ खरीदने के लिए तैयार है, फिर चाहे वह उत्पाद हो या सेवा. जिसकी तरफ से अच्छी सेवा मिलेगी, उसी की तरफ लोगों का उत्स्फूर्त प्रतिसाद और आकर्षण होना स्वाभाविक है. इसलिए किसी का कद कम करने के बजाए अपना कद बढ़ाना, यही उपाय हो. जहां तक गुणवत्ता का सवाल है, एस.टी. की बस की तुलना प्राईवेट बस से की जाए तो प्राईवेट बस अपनी सुविधा और दर्जे में आगे है, इस बात से इंकार नहीं किया जा सकता है. लेकिन एस.टी. महामंडल ने ठान लिया तो वह अपने लंबे अनुभव, विश्वास और सेवा भावना की वृत्ति से प्राईवेट बस का डटकर मुकाबला कर सकता है. 5 साल पहले की रेलवे सुविधा और प्रशासन पर गौर करें तो आज हमें यह दिखाई देता है कि रेलवे प्रशासन में बहुत बदलाव आया है. इस बदलाव का एक मात्र कारण यह है कि रेल मंत्री माननीय श्री लालू प्रसाद यादव ने ठान लिया था कि रेलवे को मुनाफे में ला कर ही दिखाऊंगा और उन्होंने रेलवे को मुनाफे में लाकर दिखाया भी.

(सभापति स्थान पर तालिका सभापति श्री. अरविंद सावंत)

सभापति महोदय, मैं यह कहना चाहती हूं कि विजन हो तो कोई चीज़ मुश्किल नहीं है. एस.टी. को भी इस दिशा में नये सिरे से सोचना शुरु करना चाहिए और वह शुरुआत हो चुकी है. इसी वजह से एस.टी. को मुनाफा हुआ है. लेकिन इसके साथ ही साथ एस.टी. महामंडल को शासन के सहयोग की बेहद आवश्यकता है. जो अवैध वाहतूक हो रही है उससे दुर्घटना बढ़ती जा रही है. बढ़ती दुर्घटना की संख्या देखें तो उसका मुख्य कारण अवैध वाहतूक ही है. हम सब

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान ...

यह देखते है कि जिस वाहन की क्षमता 15-20 लोगों के बैठने की है, उस वाहन में 40 लोगों को बैठाया जाता है. ज्यादा से ज्यादा पैसा कमाने के लिए ज्यादा से ज्यादा राऊण्ड के चक्कर में स्पीड से गाडियां चलाई जाती है. जिसकी वजह से दुर्घटना बढ़ रही है. बहुत से ड्राईव्हर ऐसे होते हैं जिन्हें ठीक से गाड़ी चलाना नहीं आता, उन्हें यातायात के नियमों की जानकारी नहीं होती है, कानून से वाकिफ नहीं होते हैं, कई ड्राईव्हारों के पास गाड़ी चलाने का लाईसेंस नहीं होता हैं, ये सब चीज़े अवैध वाहतूक में हो रही है, जिसके कारण दुर्घटनाएं बढ़ रही है. इस पर शासन को गंभीरता से विचार करने की आवश्यकता है. अवैध वाहतूक को पूरी तरह बंद करना जरुरी है. अगर शासन ने इतना भी किया तो वह एस.टी. के लिए बूस्ट साबित होगा. इस दिशा में एस.टी. महामंडल का पूरा नियोजन बनेगा, तो जो एस.टी. गरीबों की सेवा कर रही है उसको पुनर्जीवन मिलेगा और एक आदर्श ट्रांसपोर्ट महाराष्ट्र में निर्माण हो सकेगा. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करती हूं.

इसके बाद श्रीमती गोऱ्हे का भाषण.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री. सुरेश नवले, संजय दत्त, चंद्रकांत रघुवंशी व अन्य माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये या सदनामध्ये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे. ज्या ज्यावेळी आपण राजकारणात किंवा समाजकारणात काम करावयास लागतो त्यावेळी प्रवासाबरोबर इतर अनेक सामाजिक प्रश्नांच्या निमित्ताने अनेक लोकांचा एस.टी. महामंडळाशी निश्चितपणे संबंध आलेला असतो. मी देखील स्वत: काही काळ आय.एन.टी.यु. च्या महिला विभागाचे काम बघत असतांना एस.टी. कामगारांच्या प्रश्नांचे अनेक मुद्दे समजून घेतले आहेत. त्यानंतरच्या काळात देखील काही लोक त्यांचे प्रश्न घेऊन आमच्याकडे सतत येत असतात.

सभापती महोदय, या प्रस्तावावर बोलत असतांना मला पहिल्यांदा हे स्पष्ट केले पाहिजे की, एस.टी. मधील जे कर्मचारी आहेत, त्यांच्या अधिकारांचे संरक्षण होणे, त्यांच्यावर बेकारीची कुऱ्हाड न येणे, त्यांच्या कामाच्या एकूण दर्जामध्ये परिवर्तन होणे, आणि परिवहन मंडळाला फायदा होणे हे सर्व निकष योग्य आहेत. परंतु असे म्हणत असतांना केवळ प्रवासाची सोय म्हणजे एस.टी. हे जे अवलंबित्व आहे त्याला माझा विरोध आहे. आपण सर्वजण आज प्रवास करीत असतो, त्यावेळी ग्रामीण भागातील चित्र बघितले तर त्याठिकाणी लोक नाईलाजास्तव एस.टी. बसने प्रवास करीत असतात. दुसरे असे की, आपण एस.टी. बसमधील सेवा सुरक्षित आहे असे म्हणत असतांना अवैध वाहतुकीमुळे अपघात होत आहेत. याबाबतची वस्तुस्थिती लक्षात घेऊन आपण अवैध हा शब्द सारखा वापरतांना या अवैध सेवेला नियम लावून त्यांचे स्टॅंडर्डायझेशन किंवा त्यामध्ये नियमितपणा आणून एस.टी. महामंडळामार्फत किंवा दुसरे अन्य महामंडळ निर्माण करुन त्याच्यामार्फत ही वाहतूक रेग्युलेट कशी करता येईल याचा विचार झाला पाहिजे असे मला वाटते. याचे कारण असे की, गावा गावात आपण बघितले तर दिवसभरामध्ये एकसुध्दा बस गावामध्ये जात नाही. आणि लोक डोक्यावर हंडे, टोपल्या प्राणी घेऊन दहा-दहा किलोमीटर चालत निघाले आहेत अशाप्रकारचे दृश्य सकाळी किंवा संध्याकाळी आपणास बघावयास मिळते त्यावेळी गाव तिथे एस.टी. झाली पाहिजे असे म्हणणे सोपे असते. आपण त्याबाबत केलेली घोषणा चांगली आहे. परंतु ज्याठिक्राणी एस.टी. पोहोचलेली नाही त्याठिक्राणी काय व्यवस्था आहे? याप्रश्नाचे उत्तर अनेक वर्षापासून आपण देऊ शकलेलो नाही. एस.टी. महामंडळाचे संपूर्ण खाजगीकरण करणे हा जरी त्यावरील उपाय नसला तरी देखील मला निश्चितपणे आपले लक्ष वेधावेसे वाटते की, या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे...

अवैध वाहतुकीला विरोध करीत असतांना परिवहन विभागाची भूमिका काय असणार आहे? हा मोठा प्रश्न आहे. या अवैध वाहतुकीबाबत अनेक वेळा आवाज उठविला जातो. आज कुठल्याही शहरामध्ये आपणास पहावयास मिळते की, सातत्याने परिवहन विभागाकडे निवेदने देऊन, आंदोलने करुन काहीही उपयोग होत नाही. आज आपण बघतो की, खाजगी बसेस हायवेवरुन अतिशय वेगाने आणि बेदरकारपणे पळविल्या जातात. तसेच, छोटया छोटया वाहनांच्या बाबतीतील त्यांचे वर्तन अतिशय बेदरकारपणाचे असते. लहान-मोठया शहरांमध्ये खाजगी वाहनांखाली लहान मुले चिरडली जाण्याच्या घटना सातत्याने घडल्या आहेत. त्यामुळे मोठया बसेस असोत किंवा सहा आसनी वाहने असोत...

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

या कोणत्याही गोष्टीचे नियंत्रण करावयाचे ठरविले तर परिवहन विभाग आणि खास करुन वाहतूक पोलिसांची भूमिका पाहिली तर दुर्दैवाने असे म्हणावे लागते की, जोपर्यंत महामंडळामध्ये स्वच्छ कारभार होत नाही, तेथे गुणवत्तेचे जतन होत नाही तोपर्यंत यामध्ये कोणताही फरक होईल असे मला वाटत नाही. उलट येथील कारभार नियमित करण्यासाठी जेवढी नवीन बंधने आणत आहोत पण त्या नुसार काही बदल होत असल्याचे दिसून येत नाही. एकेका गाडीतून 40-40 प्रवासी प्रवास करताना दिसतात याबद्दल सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी काळजी व्यक्त केली आहे. पण नियमितपणे अशा गाडयांच्या बाबतीत हप्ता सुरु असतो हे सर्वांना माहिती आहे. तसेच दुसरीकडे या गाडयांमधून जाण्याशिवाय लोकांसमोर दुसरा मार्गच नसतो. जर लोकांना येण्या-जाण्यासाठी गाडीच मिळणार नसेल तर लोक 30-40 कि.मी.अंतरावर चालत जाऊ शकत नाहीत. जिल्हयाची ठिकाणे सोडून, जर आपण तालुक्याच्या ठिकाणी गेलो तर दिसून येईल की, जर तेथे पुरेशी वाहतुकीची सोय नसेल तर मग लोक मिळेल त्या वाहनाने जाण्याचा प्रयत्न करतात. वस्तुस्थिती अशी आहे की, अनेक गोष्टींसाठी, कामासाठी लोकांना तालुक्याच्या ठिकाणी, जिल्हयाच्या ठिकाणी जावे लागते. म्हणून सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी असे म्हटलेले आहे की, ज्या बसेस जुन्या झालेल्या आहेत, त्यांचा आढावा घेतला जात नाही. या यंत्रणेमध्ये किती मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे याचा आढावा घेतला तर असे दिसून येईल की, कर्मचाऱ्यांनाही याचा फटका सहन करावा लागत आहे. मला येथे स्पष्टपणे बोलावे लागेल, केवळ एकाचीच बाजू घेणे बरोबर होणार नाही. एस.टी. महामंडळामध्ये अनुकंपा तत्वावर अनेक कर्मचाऱ्यांची भरती केली जाते. यामध्ये अनुकंप तत्वावर महिला कर्मचाऱ्यांची देखील भरती केली जाते. पण माझ्याकडे काही महिला कर्मचाऱ्यांच्या बऱ्याच तक्रारी आलेल्या आहेत की, त्यांचे लैंगिक शोषण केले जात आहे. त्यामुळे केवळ कर्मचारी, कर्मचारी असे म्हणत असताना, या कर्मचाऱ्यांमध्ये देखील वेगवेगळया प्रकारचे कर्मचारी आहेत. यामध्ये जसे जबाबदार कर्मचारी आहेत, तसेच बेजबाबदार कर्मचारी देखील आहेत. भ्रष्टाचाराचा जो मूलाधार आहे, त्यामध्ये जसे राजकीय नेत्यांचे संरक्षण असते. तशा प्रकारे अनेक ठिकाणी याची देखील लिंक लागल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येते.याठिकाणी एस.टी.कर्मचाऱ्यांच्या बाबतीत विचार करीत असताना, एस.टी. प्रवाशांच्या बाबतीत विचार केला तर नगरच्या एस.टी.स्टॅण्डची अवस्था पाहिली तर ती चिंताजनक असल्याचे...

. . . .एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

दिसून येईल. आम्हाला एस.टी.ने प्रवास करण्याची जास्त वेळ येत नाही. पण आमचे कार्यकर्ते एस.टी.ने प्रवास करीत असतात. त्यांना जर याबाबतीत माहिती विचारली तर आज कोणत्याही एस.टी.स्टॅण्डमधील महिलांचे किंवा पुरुषांच्या स्वच्छता गृहाची काय अवस्था आहे ? तेथे घाणेरडेपणाची एवढी परिसीमा आहे की, या स्वच्छता गृहामध्ये गेल्यानंतर कोणीही ओकारी येऊन परत येईल. या स्वच्छता गृहांचा अतिशय घाणेरडया पध्दतीने वापर केलेला असतो. त्याठिकाणी पाणी नसते, अनेक गैरप्रकार असताता, लाईट नसतो, असेल तर तो तुटलेला असतो. तसेच एस.टी.च्या मध्ये बसणारे जे लोक आहेत, त्यांच्या बाबतीत अनेक छायाचित्रे प्रदर्शित होत असतात. त्यामध्ये दिसून येते की, एस.टी.मोडण्याच्या अवस्थेमध्ये आहे.पावसाळा सुरु झाल्यानंतरही गळणाऱ्या एस.टी.वापरात आणल्या जात आहेत, त्यामुळे लोकांवर रेनकोट, छत्री घेऊन बसण्याची वेळ येते. म्हणून मला मुद्दाम सांगितले पाहिजे की, येथे एस.टी.च्या कामगिरीबाबत आढावा घेत असताना, ज्याठिकाणी एस.टी.ला स्वत:ची सेवा पुरविणे शक्य नाही, तेथे खाजगीकरणाच्या माध्यमातून किंवा ज्याला आपण अवैघ वाहतूक म्हणतो त्याला जास्त चांगले स्वरुप देऊन नियमित कसे करता येईल याचा विचार केला पाहिजे. जेणेकरुन दोन्ही घटकांना फायदा होऊ शकेल आणि समाजामध्ये दळणवळणाची सोपी साधने उपलब्ध होऊ शकतील. धन्यवाद.

. . . .एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, याठिकाणी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कारभारासंबंधात सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले आणि इतर सन्माननीय सदस्यांनी चर्चा उपस्थित केलेली आहे. अशा वेळी सुदैवाने आपण सभापती स्थानावर आहात, ज्यांचा एस.टी.आणि तेथील कामगारांच्या अस्तित्वाशी संबंध आलेला आहे. तसेच येथे एस.टी.महामंडळावर चर्चा सुरु असताता, ज्यांनी खऱ्या अर्थाने एस.टी.महामंडळामध्ये संचालक पद भुषविलेले आहे, ते माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम याठिकाणी उपस्थित होते. परंतु ते आताच सदनामधून बाहेर गेले आहेत. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी महिला इंटकच्या अध्यक्ष म्हणून एस.टी.महामंडळामध्ये केलेले काम सर्वांना माहिती आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर भाषण करीत असताना सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी सांगितले की, एस.टी. ही महाराष्ट्राची लोकवाहिनी आहे, एवढेच नाहीतर महाराष्ट्राची अस्मिता आहे. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये असंघटित प्रवासी वाहतूक होत असे, असुरक्षित प्रवासी वाहतूक होत होती. म्हणून 1947 मध्ये असा निर्णय घेण्यात आला की, प्रवासी वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड .....

प्रवास सुसह्य झाला पाहिजे. एस.टी. चे हे हिरक महोत्सवी वर्ष आहे. एस.टी. ला साठ वर्षे पूर्ण झाली. 1948 साली शासनाने या प्रवासी वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण केले. या काळामध्ये अनेक टप्पे आले. या ठिकाणी बसणाऱ्या प्रत्येक सन्माननीय सदस्याच्या आयुष्यामध्ये हा लाल डबा ज्याला पूर्वी कोणी एस.टी. असे म्हणत नव्हते, त्या लाल डब्याचा उपभोग घेतलेला आहे. एस.टी. मध्ये अनेक परिवर्तने झाली. रंग बदललेली बस आज यशस्वीतेकडे चाललेली आहे. एस.टी.ने सुरु केलेली शिवनेरी बस, एस.टी. ने सुरु केलेली होल्वो बस असा प्रदीर्घ प्रवास या 60 वर्षात झालेला आहे. 1960 साली पूर्वी असलेले एस.टी.महामंडळ गेले. 1 मे, 1960 ला गुजरातचे वेगळे परिवहन महामंडळ झाले. नागपूर प्रोव्हींशीयल ट्रान्सपोर्ट, मराठवाड्यातील एस.टी. एकत्रित करुन राज्य परिवहन महामंडळ तयार झाले. इंटकचा आणि या कामगार संघटनेचा सरचिटणीस म्हणून माझा एस.टी.शी संबंध आला त्यामुळे त्यांच्या विविध समस्या मला माहीत आहेत. राज्यामध्ये अनेक महामंडळे काम करीत असताना 1948 साली 35 बेडफोर्ड गाड्यांवर सुरु झालेले हे महामंडळ आज 16 हजार वाहनांचा ताफा असणारे देशातील क्रमांक दोनचे महामंडळ आहे. या महामंडळामध्ये लाखापेक्षा जास्त कर्मचारी काम करीत आहेत. रोजची प्रवासी वाहतूक क्षमता 1 कोटी प्रवाशांची आहे. परंतु दुर्देवाने एस.टी. ची प्रवासी वाहतूक 60 लाख प्रवाशांपर्यंत खाली आलेली आहे. परंतु 1 कोटी प्रवासी वाहतूक करण्याची क्षमता असणारे हे महामंडळ आहे. रोज 40 लाखापेक्षा जास्त किलोमीटर प्रवास करणारे एस.टी. महामंडळ रोजी किती पृथ्वी प्रदक्षिणा करु शकते याची आकडेवारी आपण काढू शकतो. एस.टी. महामंडळाने काम करीत असताना सामान्य प्रवाशांच्या मनामध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण केलेली आहे. आजही चांदा ते बांदा कोठेही जा, चंद्रपूरकडील दुर्गम भाग असू द्या, कोकणातील बांदा-रत्नागिरीकडील दुर्गम भाग असू द्या किंवा नागपूर, पुणे, नाशिक शहर असू द्या, सामान्य माणसाच्या मनामध्ये सुरक्षित प्रवास आणि विश्वसनियता एस.टी.ने मिळविलेली आहे, हे कोणीही नाकारु शकणार नाही. ग्रामीण भागातील एखादी वृध्द स्त्री एकटी प्रवासाला निघणार असेल, घरात तिला नेऊन पोहोचविणारा कोणी नसेल आणि मुलगा मुंबईला राहात असेल तर त्या घरातील माणूस तिला विश्वासाने कंडक्टर आणि ड्रायव्हरच्या हातामध्ये सोपवितात किंवा बहीण असेल तिला प्रवास करण्याची परवानगी देतात. हा

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

श्री. जयप्रकाश छाजेड .....

जो विश्वास एस.टी.ने निर्माण केलेला आहे तो महाराष्ट्राचा विश्वास आहे हे आपल्याला विसरुन चालणार नाही. आज अनेक आव्हाने एस.टी. पुढे आलेली आहेत. अनेक आव्हानांची वेगवेगळ्या पध्दतीने चर्चा झाली. केवळ प्रवासी वाहतूक करण्याचा व्यवसाय करणे एवढाच धंदा एस.टी. करीत नाही. आपण मान्य केले पाहिजे की, आजचे असणारे एस.टी. महामंडळाचे अध्यक्ष श्री. सुधाकर परिचारक, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, कामगार तसेच एस.टी.चे प्रशासन धन्यवादाला पात्र आहेत. केवळ नुकसान करुन प्रवासी वाहतूक करीत असताना देखील सामाजिक दायित्व निभावण्याची जबाबदारी जर कोणी घेतली असेल तर ते एकमेव एस.टी. महामंडळ आहे असा आपल्याला गौरवाने उल्लेख करावा लागेल. अंध असतील, अपंग असतील, पत्रकार असतील, स्वातंत्र्यसैनिक असतील, दलितमित्र असतील, कलाकार असतील या सर्वांना सवलतीच्या दराने प्रवास करण्याची संधी एस.टी. महामंडळामध्ये आहे. राज्यातील कुपोषित बालकांसाठी 437 कोटी रुपयांचा निधी एस.टी. महामंडळाने राज्य सरकारला दिलेला आहे. हा निधी कुपोषित बालकांकरिता कोणी दिलेला आहे ? एस.टी.मध्ये प्रवास करणाऱ्या सामान्य माणसाच्या तिकिटातून हा निधी उभा केला गेला आणि तो एस.टी. महामंडळाने शासनाकडे दिला. दुर्दैवाने राज्यातील कुपाषित बालकांची काळजी करणारे एस.टी.महामंडळ स्वत:च कुपोषित होते की काय अशी अवस्था निर्माण झाली आहे. या एस.टी. महामंडळाचे कुपोषण बंद करण्याची वेळ आलेली आहे. पंढरपूर हे राज्याचे दैवत आहे. एस. टी. महामंडळाने असे जाहीर केले आहे की, आषाढी आणि कार्तिकीला ज्या वारकऱ्याला पूजेचा मान मिळेल त्याला एक वर्षाचा प्रवास मोफत देणार. म्हणजे खऱ्या अर्थाने पूजा करणारी एस.टी. राहणार आहे की नाही अशी अवस्था दुर्दैवाने निर्माण झालेली आहे. याबाबत गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे. केवळ एस.टी. नफ्यात चालते की तोट्यात चालते हा विषय चर्चेला आणून चालणार नाही. अनेक वेळा अनेक राज्यामध्ये तुटीचे अर्थसंकल्प असतात म्हणून ती राज्ये मोडीत काढत नाहीत. माझी शासनाला विनंती आहे. वैध वाहतूक असो किंवा अवैध वाहतूक असो, खाजगी बसेसना दिलेले परवाने, पॉइन्ट टू पॉइन्ट सर्व्हिस आणि पर्यटनाच्या नावाखाली दिलेले परवाने असतील त्याचा उपयोग नियमितपणे एस.टी. स्टँडच्या जवळून प्रवासी वाहतूक करण्यासाठी केला जातो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड....

एस.टी.महामंडळाने अनेक बस स्थानकांचे पुनरुज्जीवन केले. बी.ओ.टी.तत्वावर महामंडळाने नवीन इमारती बांधल्या. दुर्दैवाने एस.टी.महामंडळाने त्याची दखल घेतली नाही. ज्यांनी बी.ओ.टी.तत्वावर इमारती बांधलेल्या आहेत त्यांनी एस.टी.ला बेकायदेशीरपणे पर्यायी वाहतूक निर्माण केली आहे. खाजगी बिल्डरने त्यांच्या कार्यालयासाठी जागा दिलेली आहे त्याची सुध्दा गांभीर्याने दखल घेण्याची वेळ आली आहे. एस.टी.ला सांगण्याची वेळ आली आहे. पर्यटनाच्या नावाखाली अनेकांना खाजगी प्रवासी वाहतुकीचे परवाने मिळाले आहेत. एका बाजूला एस.टी.ला प्रत्येक सीटमागे प्रवासी कर द्यावा लागतो. दुस-या बाजूला पर्यटनाच्या नावाखाली ज्यांनी परवाने घेतले आहेत त्यांना सीटमागे प्रवासी कर द्यावा लागत नाही. दोन वेगवेगळी आव्हाने सार्वजनिक वाहतुकीसमोर उभी राहिलेली आहेत. एस.टी.या सरकारची आहे म्हणजे या राज्यातील प्रत्येक नागरिकाच्या मालकीची आहे. आज आपण सर्वजण रस्त्याने एस.टी.ची व्होल्वो बस जाताना बघतो. एस.टी.महामंडळाने जे सामाजिक दायित्व स्वीकारलेले आहे. ते या खाजगी वाहतुकदारांना स्वीकारण्यास लावले जाणार आहे की नाही हा सरकारपुढे पहिला प्रश्न आहे. एस.टी.ची सेवा दर 8 कि.मी.मागे उपलब्ध आहे आणि ग्रामीण भागात 99 टक्के एस.टी.ची वाहतूक आज चालू आहे. प्रवासी असो की नसो पण एस.टी.तेथे जाते आणि परत येते. नाशिक ते मुंबई गाडी सोडावयाची असेल तर ती सुरगाणापासून सोडली पाहिजे असे खाजगी वाहतूकदारांना शासन सांगणार आहे का ? नागपूर विभागातून प्रवासी नेणार असेल तर त्या भागातील दुर्गम भागापासून गाडी सोडली पाहिजे असे बंधन त्यांच्यावर घातले जाणार आहे काय ? एका बाजूला एस.टी.समोर असलेल्या आव्हानांना तोंड देण्याच्या आपण गोष्टी करतो आणि दुस-या बाजूला वाहतूक वैध आहे की अवैध आहे, परवाने आहेत की नाही त्याचा विचार करतो. परवाने दिले असले तरी त्या परवान्यांचा कायदेशीरपणे वापर होतो किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. हे पाहिले नाही तर उद्या एस.टी.तोटयात जाईल. एस.टी.चे खाजगीकरण करण्याचा घाट घातला तर या महामंडळामध्ये 1 लाख कामगार काम करतात ते बेकार होतील. 450 बस डेपो आहेत. जवळपास 1000 बस स्थानके आहेत त्याच्या आजुबाजूला पेपर स्टॉल्स असतील, उपहारगृहे असतील, पिण्याच्या पाण्याची सोय करणारे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK

श्री.जयप्रकाश छाजेड....

असतील, जवळपास 10 लाख कुटुंबांचा सांभाळ करणारे हे महामंडळ हे सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे की नाही ? गेल्या वर्षी महामंडळ नफ्यामध्ये आले त्याबद्दल महामंडळाचे अध्यक्ष, कार्यकारी संचालक मंडळाचे अभिनंदन केले पाहिजे. एवढया संकटातून एस.टी.महामंडळ नफ्यामध्ये आणले त्याबद्दल सर्वांचे सभागृहामार्फत अभिनंदन केले पाहिजे. परंतु केवळ एक वर्ष नफ्यामध्ये येऊन चालणार नाही. याचे कारण असे की, एस.टी.महामंडळाने शासनाला सन 2008-09 चा अर्थसंकल्प सादर केला आहे त्यामध्ये 67 कोटी रुपयांचा तोटा दाखविण्यात आला आहे. डिझेलची भाववाढ झालेली आहे. परंतु एस.टी.ला दरवाढ करण्यासाठी सर्व प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. परंतु खाजगी बसचा मालक तिकिटाचा दर 250 रुपये असेल तर प्रत्यक्षात बसमध्ये बसताना 350 रुपये घेतो. त्याच्याकडे विचारणा केली तर तो डिझेलचे भाव वाढले आहेत असे सांगतो. त्यांच्यावर कोणचेही नियंत्रण नाही. पर्यटनाच्या नावाखाली चढ्या दराने ते प्रवासी वाहतूक करणार असतील तर त्यासंबंधी शासनाने गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. मुंबई-पुणे या मार्गावर खाजगी बस बंद पडली तर त्या प्रवाशांना ऊन्हातान्हात, पावसात रस्त्यावर उभे रहावे लागते, कारण त्यांच्याकडे पर्यायी गाडीची व्यवस्था नसते. परंतु एस.टी.ची गाडी बंद पडली तर त्याच रस्त्याने एका पाठोपाठ अनेक गाडया जात असल्यामुळे त्या प्रवाशांची लगेच व्यवस्था होऊ शकते.

सभापती महोदय, या एस.टी.ने आतापर्यंत अनेक आव्हाने स्वीकारली आहेत. पुणे-मुंबई टॅक्सी सुरु झाल्यानंतर हे टॅक्सीवाले प्रवाशांना नाडत होते. त्यामुळे महामंडळाने दादर-पुणे आणि पुणे-दादर अशी दर 15 मिनिटांनी एक एशियाड बस सोडण्याचा निर्णय घेतला. ही वाहतूक आजही यशस्वीरित्या सुरु आहे. या गाडयांमधून दररोज लाखो प्रवासी प्रवास करीत आहेत. त्याचप्रमाणे महामंडळाने व्होल्वो बस सुरु केली, त्यानंतर शिवनेरी बस सुरु केली, या बसेसही यशस्वीरित्या सुरु आहेत. सभापती महोदय, एस.टी.महामंडळाच्या अनेक मागण्या शासनाकडे प्रलंबित आहेत त्या लवकरात लवकर पूर्ण कराव्यात. प्रवासी कर कमी करण्याची एक प्रमुख मागणी आहे. एस.टी.वर असलेल्या दायित्वाचा विचार करुन सरकारने महामंडळाला मदत करावी अशी विनंती करतो.

नंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत पत्र / शोधनीसाठी नाही

(श्री. जयप्रकाश छाजेड....)

ग्रामीण भागामध्ये जी सेवा दिली जाते त्या सेवेवरील प्रवासी कर हा 6 टक्के केला पाहिजे. शहरातील प्रवासी वाहतूक ही महापालिकेचे दायित्व आहे. शहरातील प्रवासी वाहतूक करण्यासाठी एस.टी.ला परवानगी दिली जात नाही. एस.टी.महामंडळ तोट्यात जात आहे. तेव्हा हा प्रवासी कर संपूर्णपणे रद्द केला पाहिजे.

या ठिकाणी मी तीन गोष्टींचा उल्लेख करु इच्छितो. तालिका सभापती महोदय, आपण एस.टी.मधील युनियनचे नेते म्हणून काम करता. मी देखील एस.टी. कामगारांचा नेता म्हणून काम केलेले आहे. आपण दोघांनीही संघटित कामगारांच्या दहशतवादा विरुध्द आवाज उठविला. त्या बाबतीत आपण दोघांनीही संघर्ष केलेला आहे. माझी शासनाला विनंती आहे की, एस.टी.ला एमआरटीपी कायद्यातून वगळले पाहिजे. हे एस.टी.चे प्रशासन मेजॉरिटी नसलेल्या अशा संघटनेच्या दहशतवादाखाली आहे. डेप्युटी जनरल मॅनेजर पासून एम.डी.पर्यन्तचे प्रशासन हे दहशतवादाखाली दबलेले आहे. एस.टी.ला खाजगी प्रवासी वाहतुकीप्रमाणे सर्व सोयी सुविधा मिळायला पाहिजेत आणि एमआरटीपी कायद्यातून वळले पाहिजे. एस.टी.ही महाराष्ट्राची अस्मिता आहे, तो केवळ व्यवसाय नाही या दृष्टीकोनातून या एस.टी.कडे पहावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, एस.टी.च्या संदर्भात नियम 260 अन्वये आणलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, गेल्या काही वर्षामध्ये समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये जेथे जेथे सरकारी कंपन्या होत्या त्याला पर्यायी प्रायव्हेट कंपन्या अस्तित्वात आल्या. विमान सेवेमध्ये पूर्वी इंडियन एअर लाईन्स आणि एअर इंडिया या कंपन्या होत्या. आता या कंपन्यांच्या बरोबरीने जेट, किंगफिशर, एअर डेक्कन अशा विमान कंपन्या अस्तित्वात आल्या आहेत. विमा कंपनी म्हटली की लोक एल.आय.सी.चाच विचार करीत होते. आता बिर्ला सन राईज, कोटक महिंद्रा, बजाज अलायन्स अशा विमा कंपन्या अस्तित्वात आल्या आहेत. बी.एस.एन.एल. आणि एम.टी.एन.एल या कंपन्या मार्फत पूर्वी टेलिफोन सेवा दिली जात होती. आता त्यांच्या बरोबरीने रिलायन्स, टाटा या कंपन्या देखील टेलिफोन सेवा देऊ लागल्या आहेत. प्रायव्हेट सेक्टरमधील लोक स्पर्धक महणून येणे हा केवळ एस.टी.पुरता मर्यादित राहिलेला विषय नाही. ज्या ज्या ठिकाणी हे स्पर्धक आले त्यांना त्यांच्या क्वॉलिटीबाबत आग्रह धरला गेला. एस.टी.ला प्रायव्हेट जीप, बसेस हे स्पर्धक म्हणून आले. एका बाजूला एस.टी.ला या स्पर्धकापासून प्रोटेक्शन दिले पाहिजे आणि दुस-या बाजूला या स्पर्धेला पर्याय म्हणून काही नियमांच्या बाबतीत आग्रह धरला पाहिजे. मघाशी या ठिकाणी एक उदाहरण देण्यात आले की, ज्या वेळी रिलायन्स कंपनीला शहरामध्ये टेलिफोन सेवा सुरु करायला परवानगी दिली गेली त्यावेळी त्यांनी अमुक इतक्या गावामध्ये देखील टेलिफोन सेवा पुरविल्या पाहिजेत अशा प्रकारचा आग्रह धरण्यात आला. या पध्दतीने जे प्रायव्हेट कॉम्पिटिशन आलेले आहे त्याचे कायद्याने मॉनिटरिंग करणे आवश्यक आहे. खाजगी प्रवासी वाहतूक करणारी कंपनी असेल तर तिला रिमोट भागामध्ये प्रवासी सेवा उपलब्ध करुन देण्याचे बंधन घातले पाहिजे आणि त्याबाबतीत शासनाने आग्रही भूमिका घेतली पाहिजे. एस.टी. गेली 60 वर्षे ग्रामीण भागामध्ये सेवा देत आहे. या एस.टी.ला प्रोटेक्शन दिले पाहिजे. आपल्याला स्पर्धा टाळता येणार नाही. या स्पर्धेमध्ये आपल्याला एस.टी.ची क्वॉलिटी वाढवायला पाहिजे. आता ग्रामीण भागातील माणासाची मानसिकता अशी व्हायला लागलेली आहे की, त्याला एस.टी.मध्ये बसण्याचे कमीपणाचे वाटू लागले आहे. खाजगी लक्झरी बसमधून प्रवास करणे त्याला प्रतिष्ठेचे वाटायला लागले आहे. एस.टी.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. चंद्रकांत पाटील...)

स्टॅण्डवर लालगाडी, एशियाड किंवा शिवनेरी या गाड्या असल्या तर तो एस.टी.च्या लाल गाडी ऐवजी एशियाड किंवा शिवनेरी बसमधून प्रवास करतो. त्याचे उत्पन्न वाढल्यामुळे एस.टी. पेक्षा एशियाड बस मधून प्रवास करणे त्याला श्रेयस्कर वाटत असावे. एकाच मार्गावर दोन बसेस धावणार असतील तर ग्रामीण भागातील माणूस स्टेटस म्हणून एस.टी.च्या लाल गाडी ऐवजी एशियाड किंवा खाजगी लक्झरी गाडीतून प्रवास करणे प्रतिष्ठेचे समजतो अशी त्याची मानसिकता झालेली आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, आपली जी परंपरागत एस.टी. आहे तिची क्वॉलिटी सुधारली पाहिजे. एस.टी.मधील ड्रायव्हर, कंडक्टर यांचे पेहराव, तसेच एस.टी.चे स्वरुप बदलले तर नफ्यामध्ये निश्चितपणे वाढ झाल्या शिवाय राहाणार नाही असे मला वाटते. एक कार्पोरेट कंपनी म्हणून एस.टी.च्या बाबतीत आपण विचार केला पाहिजे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील....

सभापती महोदय, कोंडुसकर ट्रॅव्हल एजन्सी आहे, ती एजन्सी प्रवासी वाहतुकीपेक्षा कुरिअरच्या व्यवसायास जास्त प्राधान्य देत आहे. याचा अर्थ कुरिअरच्या व्यवसायातून त्या एजन्सीला मोठया प्रमाणात उत्पन्न मिळते् आहे. ते आपल्या प्रवासी बसच्या खाली सामान ठेवण्याची जागा असते, त्यातून स्कुटर्स, मोटार सायकल पाठवावयाला लागले आहेत. एस.टी.महामंडळाने कुरिअर सेवा सुरु केली आहे, ती सेवा का चालू शकत नाही ? कोंडुसरक ट्रॅव्हलची बस 100 पाकिटे घेऊन जाते त्यामुळे त्यांचे उत्पन्न 3 ते 4 हजार रुपयांनी वाढते. त्या कॉर्पोरेट कंपनीला सी.ई.ओ.असतो, आमच्या एस.टी.महामंडळाचा डेपो मॅनेजर या कॉर्पोरेट कंपनीचा सी.ई.ओ. का होत नाही ? माझ्या डेपोकडे असलेले उत्पन्नाचे साधन आहे, ते डेपो मॅनेजर कार्यक्षमतेने का चालवू शकत नाही ? एस.टी.महामंडळातील अधिकारी आणि कर्मचारी यांची यासंदर्भात कॉर्पोरेट कंपनी तयार करुन त्यास उत्पन्न कशा पध्दतीने वाढेल यासंबंधी त्यांची मानसिकता तयार केली पाहिजे तसेच त्यांना उत्पन्न कसे वाढेल याबाबतीत प्रशिक्षण दिले पाहिजे असे माझे प्रामाणिक मत आहे

सभापती महोदय, डिझेल हा एस.टी.महामंडळाचा सर्वात मोठा खर्चाचा फॅक्टर असेल आणि सातत्याने डिझेलच्या किंमतीत वाढ होत असेल तर त्यासाठी बायो-डिझेलचे प्रोजेक्ट एस.टी.महामंडळाच्या माध्यमातून सुरु करण्यात आले पाहिजेत. बायो-डिझेल प्रोजेक्ट निर्मितीसाठी कोणाची परवानगी घ्यावी लागत नाही. छत्तीसगड प्रांताचे मुख्यमंत्री श्री. रमणसिंग हे त्यांची सफारी गाडी गेल्या चार वर्षापासून बायो-डिझेवर चालवित आहेत. बायो-डिझेलचा वापर करीत असल्यामुळे त्यांना त्यांच्या वाहनाचे इंजिन अजूनपर्यंत तरी बदलावे लागले नाही. म्हणून एस.टी.महामंडळाच्या माध्यमातून बायो-डिझेलचे प्रोजेक्ट मोठया प्रमाणात निर्माण केले पाहिजे. या ठिकाणी सी.एन.जी.चा उल्लेख केला. सी.एन.जी.चा वापर केला तर आपण मोठया प्रमाणात प्रॉफिटमध्ये जाऊ शकतो. ज्या कारणासाठी खर्च जास्त होतो, ती कारणे मुळात शोधली पाहिजे आणि त्यावर आपल्याला काही उपायोजना करता येतील काय? याचा शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, परळ एस.टी. बस स्थानकाचे मॉलमध्ये रुपांतर करण्याची शासनाने परवानगी दिली. एस.टी.बस स्थानक खूप मोठा एफ.एस.आय.वाया घालवित असतो. मोठया शहरातील एस.टी.बस स्थानकांचा एफ.एस.आय. आपण युटीलाईज केला तर त्यातून येणा-या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील...

पैशात एस.टी.महामंडळाची आजपर्यंतची सर्व तूट भरुन निघू शकते. यात काहीही चूक नाही. एस.टी.चे बस स्थानकाचे स्वरुप बैठेच असले पाहिजे असे काही नाही. त्या स्थानकांच्या जागेवर इमारती उभ्या राहू शकतात. त्या ठिकाणी बसेसची व्यवस्था करुन इमारतीतील गाळे आपल्याला विकता येऊ शकतात. मला असे वाटते की, एस.टी.महामंडळाचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण ही एक फार मोठी कंपनी आहे. कंपनीचा कोणताही माणूस कंपनी प्रॉफीटमध्ये आली पाहिजे अशाच पध्दतीचा विचार करीत असतो. तशा प्रकारचा विचार करण्यासंदर्भात महामंडळातील अधिकारी आणि कर्मचारी यांची मानसिकता तयार केली तर या कंपनीच्या देखील प्रॉफिटमध्ये वाढ निश्चितपणे होऊ शकते. पथकर कमी करण्यास माझा विरोध नाही, त्यास माझा पाठिंबा आहे. एस.टी.महामंडळ प्रॉफीटमध्ये येण्यासाठी जे काही सपोर्ट द्यावे लागतील ते आपण द्यावेत. परंतु या महामंडळातील वरिष्ठ अधिका-यांना सांगण्याची आवश्यकता आहे की, प्रत्येक वेळेला कुबडया घेण्याची आवश्यकता नाही. कॉम्पीट करणा-या कंपन्या प्रॉफीटमध्ये येऊ शकतात. तर ही कंपनी सुध्दा निश्चितपणे प्रॉफीटमध्ये येऊ शकते. एस.टी.महामंडळाच्या अधिका-यांना आणि कर्मचा-यांना चांगले पगार आहेत. तसेच सर्व कर्मचारी संघटीत आहेत. तुम्ही एखाद्या चांगल्या कंपनीचा आदर्श डोळयासमोर ठेवून एस.टी महामंडळाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून अधिका-यांची आणि कर्मचा-यांची मानसिकता वाढविली पाहिजे अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत) : आज सकाळी 10.20 वाजता माननीय उपसभापतींनी नावे वाचून दाखविली. सन्माननीय सदस्य चर्चेत भाग घेण्यासाठी नावे देतात, परंतु त्यांचे नाव पुकारले जाते, त्यावेळी मात्र ते सभागृहात उपस्थित रहात नाहीत ही गोष्ट बरोबर नाही. त्यांनी ज्यांची नावे वाचून दाखविली ते सभागृहात नाहीत. ज्यांची नावे नाहीत ते बोलण्यासाठी आग्रह धरीत आहेत. मी सर्व सन्माननीय दोन-दोन मिनिटे बोलण्याची संधी देईन. परंतु सन्माननीय सदस्यांनी कृपया वेळेचे बंधन पाळावे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, महाराष्ट्राची लेकुरवाळी, गरीबांची गाय, संपूर्ण राज्याची रक्तवाहिनी, लोकवाहिनी म्हणून सेवा करणा-या एस.टी.सेवेस आज 60 वर्षे पूर्ण झाली आहेत त्या एस.टी.महामंडळाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी या सभागृहात चर्चा उपस्थित केलेली आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी एस.टी.महामंडळाच्या बाबतीत अतिशय सुंदर वर्णन केलेले आहे. महाराष्ट्रातील काही डोंगराळ आणि अतिदुर्गम भागात एस.टी.महामंडळाची बस जाऊ शकत नाही. त्या विभागात एस.टी.महामंडळाने लहान लहान बसेस उपलब्ध करुन दिल्या तर त्या विभागात सुरु असलेल्या अवैध वाहतुकीला निश्चितपणे आळा बसू शकेल. डोंगराळ आणि अतिदुर्गम भागात एस.टी.ची बस पोहोचू शकत नाही अशा प्रकारची कारणे महामंडळाच्या अधिका-यांकडून सांगितली जातात. कोकणात डोंगराळ आणि अतिदुर्गम भाग मोठया प्रमाणात आहे, त्या ठिकाणी देखील एस.टी.बसेस पोहचू शकत नाहीत अशी आजची स्थिती आहे. त्या ठिकाणी एस.टी.महामंडळाने लहान लहान बसेसची सेवा सुरु केली पाहिजे. डोंगराळ आणि अतिदुर्गम भागातील प्रवासी त्या बसेसचा लाभ घेऊ शकतील. पर्यायाने या विभागात होणा-या अवैध प्रवासी वाहतुकीस निश्चितपणे आळा बसू शकेल.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ....

अनेक उदाहरणे मला द्यावयाची होती परंतु ती सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी त्यांच्या भाषणात दिलेली आहेत. अवैध वाहतुकीच्या संदर्भात अधिकाऱ्यांबरोबर बैठक झाली होती.अवैध वाहतुकीमुळे अपघातांचे प्रमाण फार वाढलेले आहे. अवैध वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांना जी सर्रासपणे लायसन दिली जातात त्याला आळा घातला पाहिजे. हे लायसन देण्याचे प्रकार थांबले पाहिजेत. महाराष्ट्रामध्ये अवैध वाहतूक करणारे लोक पाहिले तर त्याच्यामध्ये महाराष्ट्रातील लोक कमी आहेत. इतर प्रांतातील लोक जास्त प्रमाणात आहेत. कोणत्याही प्रांताबद्दल मला बोलावयाचे नाही. परंतु पैसे घेऊन ताबडतोब लायसन दिले जाते. त्यामुळे छोटया छोटया गाडयांचे अपघात होत आहेत. तसेच ज्यावेळी पाऊस असतो त्यावेळी अपघातांचे प्रमाण मोठे असते. यागोष्टीलाही कुठेतरी आळा बसला पाहिजे.

सभापती महोदय, या विषयावर बोलत असताना मी फक्त 2-3 सूचना करणार आहे. एस.टी.महामंडळ अधिक सक्षम करण्यासाठी ज्या उपाययोजना सुचविल्या आहेत त्यामध्ये दरवर्षी टोल टॅक्सच्या रुपाने महामंडळ 35 कोटी रुपये शासनाकडे भरते. त्यामध्ये शासनाने सवलत दिली पाहिजे. तसे झाले तर महामंडळाचे कोटयवधी रुपये वाचतील. एस.टी.महामंडळाच्या डेपोंची फार मोठया प्रमाणावर जागा आहे. या महामंडळाला रेल्वेप्रमाणे पायाभूत सुविधा दिल्या गेल्या पाहिजेत. त्यादृष्टीने शासनाने महामंडळाला मदत केली पाहिजे. रेल्वेमध्ये ज्याप्रमाणे अनेक जाहिरातीद्वारे पैसे मिळविले जातात त्याचप्रमाणे एस.टी.डेपोमध्ये जाहिराती लावून उत्पन्न वाढविले पाहिजे.

एस.टी.डेपोमध्ये प्रचंड प्रमाणावर दुर्गंधी आणि घाण असते. शौचालयांची अवस्था अत्यंत दयनीय असते. शासनाने या गोष्टींकडे लक्ष दिले आणि रेल्वेप्रमाणे सुखसोई उपलब्ध करुन दिल्या तर एस.टी. च्या उत्पन्नामध्ये निश्चितच भर पडेल. त्याचप्रमाणे एस.टी.ची टपाल आणि कुरीअर सेवा अत्याधुनिक केली तर त्यातूनही एस.टी.चे उत्पन्न वाढू शकेल. गोरगरिबांची एस.टी. गोरगरिबांची असल्यामुळे शासनाने एस.टी.महामंडळाला मदत केली पाहिजे. माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी भाषण करताना जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्यांचा शासनाने विचार करुन त्यादृष्टीने एस.टी.ला मदत केली पाहिजे. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानते आणि माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. दोनच दिवसापूर्वी सदनामध्ये वाहतुकीच्या विषयावर चर्चा झाली होती. एस.टी.हा देखील वाहतुकीचा एक भाग आहे. जास्तीत जास्त प्रवासी घेऊन जाण्याचे काम एस.टी.करीत असते. 'गाव तेथे एस.टी.' हे बिरुद घेऊन जन्माला आलेल्या एस.टी.ला आज 60 वर्षे पूर्ण झालेली आहेत. 60 वर्षामध्ये गेल्या वर्षी एस.टी.ला 140 कोटींचा नफा झाला असे आकडेवारीवरुन दिसते. परंतु नेमका किती नफा झाला आहे याबद्दल संभ्रमावस्था आहे. माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी सांगितले की, यावर्षी म्हणजे 2008-09 मध्ये एस.टी.ला तोटा अपेक्षित आहे. हा तोटा कशामुळे होत आहे आणि कोणती कारणे यासाठी असतील याचा विचार केला तर एस.टी.महामंडळाच्या अहवालामध्येच असे लिहिले आहे की, डिझेलची भाववाढ, वंगण, कर्मचाऱ्यांनी केलेली हेळसांड, 21 ठिकाणी झालेल्या शहरीकरणामुळे वाहतुकीमधील तोटा, कमी उत्पन्नाच्या फेऱ्या अशी 7-8 कारणे एस.टी.तोटयामध्ये जाण्यासाठी आहेत आपल्याला एस.टी.जगवायची आहे. आज एस.टी.कडे असलेल्या गाडयांचा विचार केला तर 15500 गाडया महाराष्ट्राच्या रस्त्यावरुन धावत आहेत. रस्त्यांच्या वाईट अवस्थेमुळे गाडयांवर त्याचा परिणाम होत आहे. त्यादृष्टीने एस.टी.गाडयांमध्ये सुध्दा बदल होणे आवश्यक आहे. म्हणजे चेसीस बदलणे, शॉकऑप्सर बदलणे आवश्यक आहे. एस.टी.गाडयांसाठी जे टायर्स वापरले जातात त्यांची क्वॉलिटी मेंटेन केली जात नाही. आज एस.टी.महामंडळामध्ये जवळजवळ 1 लाख 2 हजार कर्मचारी कार्यरत असून एस.टी.चे 247 डेपो अस्तित्वात आहेत.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

महामंडळाचे 1.2 लाख कर्मचारी आहेत, त्यांच्याही काही समस्या आहेत. आज अनेक कर्मचारी विशेषकरुन सिंधुदुर्ग जिल्हयातील डेपोमध्ये काम करणारे कर्मचारी, डेपो मॅनेजर वर्षानुवर्षे त्याच ठिकाणी कार्यरत आहेत. त्यांच्या बदल्या होत नाहीत. त्यामुळे गैरव्यवहार करण्यास वाव मिळतो. ठराविक काळानंतर डेपो मॅनेजर किंवा कर्मचारी यांची दुस-या ठिकाणी बदली होणे आवश्यक आहे. एकाच ठिकाणी अनेक वर्षे कार्यरत असल्यामुळे त्यांचे लागेबांधे निर्माण होतात.

सभापती महोदय, मी मुंबई-गोवा महामार्गाबद्दल बोलणार आहे. मुंबई-गोवा महामार्गावर विशेषत: सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये 352 एस.टी.बसेस धावतात, त्यापैकी फक्त 327 एस.टी. बसेस सुरु आहेत. काही एसटी सिझनच्या वेळी चालतात, इतर वेळी चालविल्या जात नाहीत. शाळेतील मुलांना ने-आण करण्यासाठी एस.टी. असतात त्या शाळांच्या काळातच चालू असतात, इतर वेळी बंद असतात. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये 'गाव तेथे एसटी' हे सूत्र लागू पडत नाही. राज्यातील इतर जिल्हयात ते लागू पडत असावे. एसटी बस स्थानकापासून 200 मीटरपर्यंत अवैध प्रवासी वाहतूक करण्यास बंदी असल्याचा कायदा आहे. परंतु सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये किंवा महाराष्ट्रातील कोणत्याही एसटी बस स्थानकाच्या परिसरात किंवा स्थानकाबाहेर सर्रास अवैध प्रवासी वाहतूक वैधपणे सुरु असल्याचे दुर्दैवाने सांगावे लागत आहे. आज पॅसेंजर लोड वाढला आहे. लोकांना थांबण्यासाठी वेळ नसतो. इच्छित स्थळी त्वरेने जायचे असते. एस.टी. बसपेक्षा कमी दरात जायचे असते. जिवाला धोका असला तरी त्याकडे दुर्लक्ष केले जाते. शासनाने निदान अवैध प्रवासी वाहतुकीला वैधता तरी द्यावी. त्यादृष्टीने नियम तयार करावेत. सहा आसनी रिक्षामध्ये सहा लोकच प्रवास करतील, एका मॅटेडोअरमध्ये 8 लोकच प्रवास करतील. त्यांच्या प्रवासी वाहतुकीचे दर निश्चित करुन द्यावेत. म्हणजे एस.टी.ला तोटा होणार नाही.

सभापती महोदय, मी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकविषयक कामकाजासाठी बीड जिल्हयामध्ये गेलो होतो. तेथे चित्र काय दिसून आले? काही लोक वाहनांच्या टपावर बसून, वाहनाबाहेर लटकून अवैधपणे प्रवास करीत होते. त्यांना त्यांच्या जिवाची पर्वा वाटत नव्हती, परंतु इच्छित स्थळी जाण्यासाठी अशाच रितीने प्रवास केला जातो असे मला कळले. आज नांदेड शहरात काय परिस्थिती आहे? तेथे अवैध प्रवासी वाहतूक मोठया प्रमाणात सुरु आहे. संभाजीनगरमध्ये किंवा महाराष्ट्रातील इतर जिल्हयांमध्ये देखील अशीच परिस्थिती आहे. मुंबईच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

दादर टी.टी.ला जाऊन पहा. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी अनेकदा हा प्रश्न सभागृहात मांडला आहे. आजही दादर एस.टी. स्टॅण्ड, एशियाड बस स्टॅण्डच्या शेजारी अवैधपणे प्रवासी वाहतूक सुरु आहे. मंत्रीमहोदयांनी कधी याची दखल घेतली आहे का? सन्माननीय सदस्यांनी अनेकदा या प्रश्नावर सभागृहात कंठशोष केला आहे. परंतु अवैध प्रवासी वाहतुकीच्या व्यवहारात कोणताही फरक पडलेला नाही. एस.टी. व एशियाड बस वाहतूक नफ्यात आणावयाची असेल तर ही अवैध वाहतूक प्रथम बंद केली पाहिजे. अवैध प्रवासी वाहतुकीसंबंधी कारवाई केल्याचे शासन म्हणते. 1888 चालकांचे परवाने आणि 5964 वाहनांची नोंदणी निलंबित केली आहे. 90 हजारपेक्षा अधिक वाहनांची तपासणी करण्यात आली, त्यापैकी 24718 वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. परंतु ही आकडेवारी हेच सांगते की, हा विभाग कारवाई करण्याबाबत किती सुस्त आहे. परिवहन विभागात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार सुरु आहे, हे दुर्दैवाने सांगावे लागते. आज प्रवासी संख्या आणि कारवाई केलेल्या प्रकरणांची संख्या विचारात घेतली तर हेच सिध्द होते की, पोलिसांचे हात ओले झाले की, अवैध वाहतूक करणाऱ्यांना सोडून दिले जाते. परिवहन विभागातील भ्रष्टाचार म्हणजे मिनी तेलगी प्रकरण आहे असे म्हटले तर चुकीचे ठरू नये. एसटी महामंडळाने 433 कोटी रुपये इतका आरोग्य पोषण निधी शासनाला दिला. परंतु खरोखरच हा पैसा कुपोषणावर उपाय करण्यासाठी वापरला का? आज महाराष्ट्रात कुपोषणाची काय स्थिती आहे? इतका पैसा कुपोषणाच्या समस्येवर खर्च केला असता तर महाराष्ट्रातील कुपोषणाचा प्रश्न मिटला असता. एस.टी. महामंडळाने आरोग्य पोषण निधी देऊन आपले कर्तव्य बजावले. परंतु सन्माननीय आरोग्यमंत्री डॉ.विमल मुंदडा व महिला बालविकास मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी कुपोषणाच्या प्रश्नाबाबत काय भूमिका बजावली? दोन्ही विभागांची ही सामुहिक जबाबदारी असल्याचे आम्हाला सांगण्यात येते.

(नंतर श्री.भारवि...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

(तालिका सभापतीस्थानी श्री.उल्हास पवार.)

त्यामुळे सर्व खाती काय करतात हे मला पहायचे आहे.

सभापती महोदय, तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुंबई-गोवा महामार्गावर सणासुदीच्या दिवशी खाजगी व्होल्वो गाड्या धावतात. या गाड्यांतून प्रवास करण्याला लोकांची पसंती असते. पण या गाड्यांना देखील अपघात होतात. खाजगी व्होल्वो व आरामगाड्यांना अपघात झाल्यानंतर जखमींना विम्याचे संरक्षण मिळत नाही. अशा गाड्यांमधून प्रवास करणाऱ्या लोकांचा जीव हा मोलाचा नसतो काय ? तेव्हा या गाड्यांना देखील विमा संरक्षण लागू करण्याबाबत शासनाने ताबडतोबीने विचार करावा अशी माझी सूचना आहे. तसेच मुंबईहून सुटणाऱ्या खाजगी बसगाड्यांमधील प्रवाशांची यादी आपण तपासून पहावी. ते परिवहन विभागाकडे सादर करीत असलेली यादी आणि प्रत्यक्षातील यादी यात फरक असतो. खाजगी बसगाडी धारकांना 24 तास आधी प्रवाशांची यादी परिवहन विभागाकडे सादर करून वाहतूक करण्यासाठी परवानगी घ्यावी लागते. पण आज सगळीकडे ॲडजेस्टमेंट केली जाते. ही छोटी गोष्ट दिसत असली तरी ती अवैध प्रवासी वाहतुकीला पोषक अशी आहे. एस.टी.जगली पाहिजे, असे प्रत्येकाचे मत आहे. याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. एस.टी.मधील टेलिफोन कॉईन बॉक्स चालत नसेल तर तो चालला पाहिजे. त्याद्वारे प्रेमीजनांचा संवाद झाला तरी चालेल. आज एस.टी.च्या वातानुकूलित बसेसने देखील खाजगी बसेसची स्पर्धा करणे आवश्यक आहे. तसेच डिझेलवरचा अधिभार देखील कमी केला पाहिजे. डिझेलसाठी सबसिडी दिली तर एस.टी.महामंडळाचा तोटा कमी होईल, एवढे सांगून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

.....

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आम्ही देखील सदर प्रस्तावावर बोलण्यासाठी नावे दिलेली आहेत. तेव्हा आपण काटेकोरपणे नियमाचे पालन करावे.

तालिका सभापती (श्री.उल्हास पवार) : मी आपल्याला बोलण्याची संधी देणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, आदरणीय प्रा.सुरेश नवले यांनी म.वि.प.नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आणला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. 1 जानेवारी 2008 रोजी एस.टी.महामंडळाला 60 वर्षे पूर्ण झालेली आहेत. सन 2007-2008 मध्ये म्हणजे जवळ जवळ 12 वर्षांनी तोट्यामध्ये चालणाऱ्या एस.टी.महामंडळाला रूपये 158 कोटी इतका नफा झालेला आहे. याबद्दल मी एस.टी.महामंडळाचे अध्यक्ष, कर्मचारी व अधिकारी या सर्वांना मनापासून धन्यवाद देतो, अभिनंदन करतो. एस.टी.महामंडळातील कर्मचाऱ्यांनी एक चांगला पायंडा पाडल्याबद्दल त्यांचे देखील अभिनंदन करणे आवश्यक आहे. एस.टी.महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात कर्मचाऱ्यांना भेट वस्तू व रोख बक्षिस देण्यासाठी दोन कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु, एस.टी.कर्मचाऱ्यांनी मंडळाकडून वस्तू व रोख रक्कम न घेता त्या रकमेतून 22 बसगाड्या खरेदी करून एस.टी.महामंडळाला दिल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो, आभार मानतो. हा चांगला उपक्रम आहे. याचा आदर्श अन्य विभागातील कर्मचाऱ्यांनी देखील घेणे आवश्यक आहे,असे मला वाटते. पूर्वी एस.टी.तोट्यात होती. एस.टी.ची सेवा ही गोरगरीबांसाठी आहे. आज एस.टी.महामंडळामध्ये 1 लाख 3 हजार कर्मचारी आहेत. एस.टी.वाचेल की नाही, पुढे काय होईल अशी भीती सर्व कर्मचाऱ्यांच्या मनात निर्माण झाली होती. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यानी एस.टी.वाचविण्यासाठी स्वत:चे योगदान देण्यास सुरूवात केली. त्यादृष्टीने सर्वांनी एस.टी.कडे बघण्याची गरज आहे. येथे सर्व सन्माननीय सदस्यांनी एस.टी.लोकवाहिनी आहे, असे सांगितले आहे. ते बरोबर आहे. आजही लोक एस.टी.ची वाट बघतात. कारण एस.टी.चा प्रवास हा सुरक्षित असतो. असे जरी असले तरी आज राज्यात अवैध वाहतूक सुरू आहे. तेव्हा एस.टी.चा सुरक्षित प्रवास आणि अवैध वाहतूक या दोन गोष्टींचा विचार करण्याची गरज आहे. आज अवैध वाहतूक ग्रामीण भागामध्ये सुरू आहे. ज्या गावाची लोकसंख्या 500 पेक्षा जास्त नाही अशा ठिकाणी 10 ते 15 खाजगी बसगाड्या उभ्या असतात.

यानंतर श्री.पी.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन् तेली .....

आणि मग स्पर्धा सुरु असते. एस.टी.ला मात्र अधिकारी, कर्मचारी अथवा लोकप्रतिनिधींच्या आग्रहास्तव ग्रामीण भागात एस.टी. पाठवावी लागते. परंतु या अवैध वाहतुकीमुळे ग्रामीण भागातून एस.टी.ला आवश्यक तेवढे प्रवासी मिळत नाहीत म्हणून एस.टी.ला तोटा होतो. अशा प्रकारचा तोटा किमान 200 कोटीचा आहे. ग्रामीण भागात ज्या एस.टी. चालतात त्यासंदर्भात एका बाजूला विचार केला असता एस.टी. ला ग्रामीण भागात प्रवासी मिळत नाही, त्यातल्या त्यात शासनाने मोटार वाहन कायद्यात बदल करुन स्वतंत्र पर्यटन परवाने दिल्यामुळे एस.टी. वर त्याचा परिणाम झालेला आहे, त्याचाही विचार वेळीच करण्याची गरज आहे. असे परवाने मिळविण्याचे काम नेमके कोणी केली आणि या प्रायव्हेट गाडया नेमक्या कोणाच्या आहेत, सुशिक्षित बेरोजगारांच्या नावाने कोणी तरी धनदांडग्यांच्या गाडया ड्रायव्हर्सच्या माध्यमातून अथवा भाडयाने चालविल्या जातात काय याचाही विचार करण्याची गरज आहे, म्हणून पर्यटन परवाने दिलेले आहेत त्यांचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे. ज्या भागात गरजेपेक्षा जास्त असे पर्यटन परवाने दिलेले आहेत, त्याचा विचार करुन हे परवाने थांबविता येतील काय, हेही पहावे. राज्यात आजच्या परिस्थिती अपघाताचे प्रमाण अवैध वाहतुकीच्या माध्यमातून जवळपास 95 टक्के एवढे आहे. कारण या गाडया तरुण मुले फारच सुसाट वेगाने चालवितात त्यामुळेच असे अपघात होत असल्याचे आढळून येते. आपण आज एस.टी. वाचविण्याचा विचार करतो पण त्या तुलनेने लक्ष देतो काय याचाही विचार होणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्यांनी येथे भाषण करीत असताना सांगितले की, एस.टी. ला जो डिझेलचा पुरवठा होतो त्यावरील कर काढून टाकला पाहिजे. ज्याप्रमाणे शासनाने मच्छीमारांना करमुक्त डिझेलचा पुरवठा करण्याचा निर्णय घेतला तसाच निर्णय एस.टी. च्या बाबतीत देखील घ्यावा, अशी माझी विनंती आहे. कारण एस.टी. ही राज्यातील ग्रामीण भागात, जेथे रस्तेही चांगले नसतात अशा भागात सेवा देते. म्हणून ही एस.टी. आपल्याला जगवावयाची असेल तर अशा प्रकारे त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. उलट आपल्याकडे जो 17.5 टक्के एवढा टॅक्स एस.टी. वर लावला जातो त्याचाही कुठेतरी विचार करणे आवश्यक आहे. कारण आजुबाजूच्या गोवा आणि कर्नाटक सारख्या राज्यात फक्त 6 टक्के एवढाच टॅक्स आहे आणि आपल्याकडे तो जास्त असल्याने जवळपास 250 कोटी रुपये टैंक्सच्या रुपाने आपण जास्त

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन् तेली.....

भरतो, ही रक्कम एस.टी. च्या नफ्यात आपल्याला घेता येऊ शकते. त्यानंतर पथकराच्या माध्यमातून दरवर्षी 50 कोटी एवढी रक्कम एस.टी.ला भरावी लागते, वास्तविक एस.टी. हा शासनाचाच अंगिकृत व्यवसाय असल्यामुळे पथकरातून एस.टी.ला वगळले तर एस.टी.ला फायदा झाल्याशिवाय राहणार नाही, अशा अनेक बाबींचा विचार एस.टी. जगविण्यासाठी करावा, अशी माझी सूचना आहे. पथकराबाबत विचार केला असता साध्या बसला 2.51 लाख रुपये द्यावे लागतात आणि खाजगी बसला मात्र ही रक्कम 1.40 लाख एवढीच द्यावी लागते. एस.टी. च्या आराम बसला मात्र 8.66 लाख एवढी रक्कम आपण देतो. याचा विचार केला तर खाजगी बस लोकांना कोणत्या प्रकारची सेवा देते तर ती फक्त शहरातील मुख्य रस्त्यावरुनच जाते पण एस.टी. मात्र ग्रामीण भागात, जेथे रस्ते चांगले नसतात, जेथे लोक राहतात त्या ठिकाणी एस.टी. सेवा देत असते. "गाव तेथे एस.टी." या ब्रीद वाक्याप्रमाणे एस.टी. काम करीत असते परंतु दुर्दैवाने खाजगी व अवैध वाहतूक आणि एस.टी. ची वाहतूक यांचा टॅक्सच्या बाबतीत विचार केला तरच एस.टी. तरणार आहे. कारण आज आपल्याला 500 कोटीच्या जवळपास तोटा अवैध वाहतुकीमुळे सहन करावा लागत आहे, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. तसेच इतर करांचा विचार केला तर एस.टी. महामंडळा 1 हजार कोटी रुपये दरवर्षी देत असते. आज एस.टी. ने कात टाकायला सुरुवात केली असे आपण म्हणत असलो तरी या सर्व गोष्टींचा विचार करुन एस.टी. मध्ये नवीन गाड्या खरेदी करण्याचीही आवश्यकता आहे. कारण प्रायव्हेट गाड्यांबरोबर एस.टी.ला स्पर्धा करण्यासाठी एस.टी. ची सेवा दर्जेदार होणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे एस.टी. स्टँडमधील स्वच्छतागृहात गेलो तर परत येऊ की नाही अशी भीती वाटत असते. त्याचप्रमाणे कँटीनची परिस्थिती वेगळी नाही. अशा प्रकारे या सुखसोईंमध्येही सुधारणा करायला पाहिजे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. राजन तेली....

ग्रामीण भागात जी काही छोटी छोटी गावे आहेत त्या ठिकाणी मोठी एस.टी. गेल्यानंतर भरुन येत नाही, पर्यायाने तोटा होतो व त्या ठिकाणची एस.टी. बस बंद केली जाते त्यामुळे छोटया छोटया गावांमध्ये 35 सिटर गाडया एस.टी. ने पाठविल्या तर निश्चितपणे भारमान चांगल्या प्रकारे राखले जाईल व ग्रामीण भागातील लोकांची सोय देखील होईल. 647 कोटी रुपये शासनाने एस.टी. महामंडळाला द्यावयाचे आहेत. ही रक्कम शासनाने 647 कोटी रुपये एस.टी. महामंडळाला त्वरीत द्यावी अशी विनंती आहे.

एस.टी.महामंडळाने महिला कंडक्टरांची जशी नेमणूक केलेली आहे तशीच महिलांची ड्रायव्हर म्हणून नेमणूक करणे गरजेचे आहे. परदेशामध्ये मोठया प्रमाणात महिला ड्रायव्हार आहेत त्यामुळे एस.टी. महामंडळाने सुध्दा आपल्या बसेसवर महिला ड्रायव्हर नेमण्याची आवश्यकता आहे. एस.टी. ही ग्रामीण भागातील महत्वाची सोय आहे. एस.टी. महामंडळ वाचवण्याचे काम एस.टी.महामंडळातील अधिकारी-कर्मचारी करीत आहेत, एस.टी. महामंडळाचे सन्माननीय अध्यक्ष श्री. परिचारक करीत आहेत त्यांना धन्यवाद देतो. दोन वर्षापासून एस.टी. नफ्यात आलेली आहे तसाच नफा यापुढेही होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे. आज एस.टी. ला खाजगी वाहनांशी स्पर्धा करावी लागत आहे त्यामुळे एस.टी. स्पर्धा करता यावी यासाठी एस.टी. मध्ये तशा प्रकारची सुधारणा केली तर निश्चितपणे एस.टी. अजून नफ्यात येईल. एस.टी. अजून नफ्यात चालावी यासाठी शासनाने प्रयत्न करावेत अशी विनंती करतो व मला आपण या ठिकाणी विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : माननीय सभापती महोदय, एका अतिशय जिव्हाळयाच्या विषयावर या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले व त्यांच्या सहकार्यांनी चर्चा उपस्थित केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी एस.टी. च्या संदर्भात अतिशय चांगले विचार मांडलेले आहेत. आम्ही दोघेही एस.टी. च्या कर्मचा-यांची युनियन चालवितांना एकत्र होतो. मला सुरुवातीला वाहनांचे काही ज्ञान नव्हते परंतु एस.टी.च्या कर्मचा-यांचे नेतृत्व करावयास लागल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातील डेपोंना मी भेटी दिल्या होत्या. एस.टी.च्या टायरच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी विचार मांडलेले आहेत परंतु त्यांना कल्पना नसेल की, एस.टी.चे टायर रिट्रेडींग प्लँटस् आहेत. टायर रिट्रेडींग प्लँटस् हे दोन पध्दतीचे आहेत. कोल्ड टायर रिट्रेडींग प्लँटस् आणि हॉट टायर रिट्रेडींग प्लँटस् असे टायर रिट्रेडींगचे दोन प्रकार आहेत. टायर पुन्हा कसे वापरावे यासंदर्भातील ज्ञान एस.टी. च्या अधिका-यांना आणि कर्मचा-यांना आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये एस.टी. चा खारीचा वाटा आहे हे प्रत्येकाला मानावेच लागेल. दुर्दैवाने ग्लोबलायझेशन, प्रायव्हटायझेशनमध्ये एस.टी. चा कोंडमारा होत आहे. त्यातून सुध्दा चांगले मार्ग काढता आले असते किंबहूना एस.टी. च्या कर्मचा-यांचे नेतृत्व करीत असतांना जी.सी.एफ. नावाच्या फोरम होते. त्यावेळी धुळयाचे श्री. पी.के. अण्णा-पाटील हे एस.टी. महामंडळाचे चेअरमन होते. त्यावेळेस एस.टी.ने मिनी बसेस किंवा आज जशा व्होल्व्हो बसेसे सुरु आहेत तशा बसेस सुरु कराव्यात असे मी त्यांना त्यावेळी सांगितले होते. त्यावेळेस त्यांनी सांगितले होते की, हा प्रकार व्हायबल होणार नाही. परंतु आता तरी एस.टी. महामंडळाने उपाययोजना केल्यामुळे आज एस.टी.नफ्यात सुरु चालली आहे. मधील काळात एस.टी.तोटयात होती. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी एस.टी. च्या डिझेलच्या संदर्भात विचार व्यक्त केलेले आहेत. मुंबई शहरात डिझेलचे भाव अधिक आहेत. डायरेक्ट डिझेल कंपनीकडून डिझेल घेतले तरी जास्त टॅक्सेस पडून डिझेल महाग होत असते. त्यामुळे मधील काळात एस.टी.महामंडळाच्या व्हाईस चेअरमन आणि मॅनेजींग डायरेक्टर यांनी मुंबईच्या बाहेर डिझेल घेण्याचा निर्णय घेतल्यामुळे एस.टी. महामंडळाचा एक लिटर डिझेलमागे एक रुपया वाचला व एक रुपयाने एस.टी. चा फायदा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत.....

झाला. परंतु ही प्रक्रिया पुढे तशीच चालू राहिली आहे की नाही हे मला माहिती नाही. ही प्रक्रिया पुढे चालू ठेवली असेल तर ती निश्चितच स्वागतार्ह व अभिनंदनास पात्र होईल. चांगल्याला चांगले म्हटले पाहिजे परंतु एस.टी. महामंडळाचे सर्व विभाग नियंत्रक हे एक एक सम्राट आहेत. सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई यांनी या विषयाच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे त्यामुळे मी त्यासंदर्भात उल्लेख करीत नाही. खरे म्हणजे विभाग नियंत्रक अकाऊंटेबल नाहीतच. एस.टी. महामंडळाची थ्री टायर सिस्टीम आहे. कॉर्पोरेट ऑफिस, प्रादेशिक कार्यालय, डिव्हीजन कार्यालय, डेपो, वर्कशॉप डेपो, सेंट्रल वर्कशॉप डेपो या विषयावर मी बोलणार आहे. ज्यावेळेस एस.टी. ची एशियाड बरोबर स्पर्धा झाली होती त्यावेळेस एशियाड बसेस एस.टी. महामंडळानेच बनवल्या होत्या. एस.टी. महामंडळातील कर्मचारी अतिशय निष्णांत आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

मी एक गोष्ट सांगितली तर तुम्हाला आश्चर्य वाटेल. त्यातील रिव्हॅटींग करीत असतांना व्हर्निअर कॅलीपर्सने डिस्टन्स मोजले जाते परंतु एस.टी.महामंडळातील कर्मचारी हाताने डायरेक्ट मोजमाप करीत होते परंतु त्यामध्ये 001 सुध्दा फरक येत नव्हता. अशा प्रकारचे अत्यंत कुशल कारागीर एस.टी.महामंडळाच्या वर्कशॉप्समध्ये त्यावेळी काम करीत होते. त्यातील काही कर्मचारी आजही तेथे काम करतात. चिखलठाणा, नागपूर, पुण्याजवळील भोसरी, दापोडी या ठिकाणी एस.टी. महामंडळाची सेन्ट्रल वर्कशॉप्स असून तेथे मोठया प्रमाणावर लॅन्ड असेटस आहे. परंतु या असेटसचा वापर कसा करावयाचा या संदर्भात नियोजन करण्यात आलेले नाही. त्या संबंधीचे नियोजन करण्यात आपल्याकडे दूरदृष्टीचा अभाव आहे .एस.टी.च्या वर्कशॉप्समध्ये केवळ एस.टी.च्या गाडयांची बॉडी न बांधता खाजगी गाडयांच्या बॉडी बांधण्याचा कार्यक्रम सुरु करण्यात आला पाहिजे. बी.ई.एस.टी. कडून बसेसची बॉडी बांधण्यात येते, पी.एम.टी.लासुध्दा गाडयांची आवश्यकता असते. तेव्हा या गाडयांची बॉडी बांधण्याचे काम देखील एस.टी. महांमंडळाला देण्यात आले पाहिजे. तसे करण्यात आले तर आपण एकमेकांना सहकार्य करु शकू. परंतु खाजगीमध्ये या कामासाठी जेवढा खर्च येतो त्यापेक्षा एस.टी.महामंडळाच्या वर्कशॉपमध्ये जास्त खर्च येतो त्यामुळे हे काम दिले जात नाही .आज सगळया क्षेत्रात स्पर्धा सुरु आहे त्या स्पर्धात्मक युगात आपण का टिकत नाही या दृष्टीनेसुध्दा अभ्यास करण्याचा प्रयत्न . एस.टी.तील अधिका-यांनी किवा अन्य कोणी केलेला दिसत नाही. मी नेहमी हा मुद्दा पोटतिडकीने त्यांना समजावून सांगत असतो. आपल्याकडे जी वर्कशॉप्स आहेत त्याचा पूर्णपणे कर्मर्शिअली वापर करण्यात आला पाहिजे आणि केवळ आपल्याच गाडया बांधण्याचे काम न करता देशातील कोणत्याही खाजगी कंपनीने गाडयांची बॉडी बांधण्याच्या कामाचे टेन्डर काढले तर ते टेन्डर एस.टी.महामंडळाने भरले गेले पाहिजे त्याचबरोबर स्पर्धेचा विचार करुन स्पर्धात्मक रेटने दिले पाहिजे आणि त्यांच्या पेक्षा अधिक चांगल्या दर्जेचे काम केले पाहिजे. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आता हे काम आपल्याकडे आलेले आहे तेव्हा राज्यातील दोन तीन सेन्ट्रल वर्कशॉपला जरी आपण भेट दिली तरी आपल्याला दिसून येईल की त्या ठिकाणचे वर्कशॉप्स फार मोठे आहेत.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे.अवैध गाडयातून प्रवास करीत असताना अजूनही अनेक प्रवाशांना हे माहीत नाही की, एस.टी.तून प्रवास करणे हा केवळ

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुरक्षित असतो असे नाही तर एस.टी.मधून प्रवाशांनी जर प्रवास केला आणि दुर्देवाने जर एखाद्या एस.टी.ला अपघात झाला तर त्यातील प्रवाशाच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई म्हणून विम्याची रक्कम मिळते. या उलट .खाजगी वाहनातून प्रवास करणा-या व्यक्तीला मात्र अपघात झाल्यानंतर कोणतीही रक्कम मिळत नाही. एखादी खाजगी बस जर रस्त्यात बंद पडली तर दुसरी बस येण्यास बराच वेळ जातो. परंतु एस.टी.ची जर बस बंद पडली तर लगेच दुसरी बस पाठविण्याची यंत्रणा आहे. एस.टी.चा ताफा वाढू नये यासाठी केन्द्रातील खात्याने निर्णय घेतला आहे. एस.टी.कडे 16 हजार बसेसचा ताफा होता परंतु गेल्या दहा वर्षात एकही नवीन बस एस.टी.महामंडळ घेऊ शकलेले नाही. त्यांनी एकही नवीन गाडी घेऊ दिली नाही त्यामुळे 16 हजार गाडयांचा आकडाच मेन्टेन केला आहे. ज्या गाडया स्क्रॅप करण्यात आल्या आहेत त्यांच्या बदल्यात दुस-या नवीन गाडया खरेदी करण्यात आल्या नाहीत तेव्हा याकडेसुध्दा लक्ष देण्याची आवश्यकता आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मिनी बसेसचा उल्लेख करण्यात आला आहे तेव्हा मिनी बसेस सुरु करणे हा अवैध वाहतूकीला पर्यायी उपाय आहे. राज्यातील चांद्या पासून ते बांद्या पर्यंत किंवा चंद्रपूर ,गडचिरोली मधील अनेक डेपोंची नावे मला सांगता येतील की त्या ठिकाणी अवैध वाहतूक सुरु आहे. मोठया गावातील डेपो जवळूनच केवळ ही अवैध वाहतूक होत असते असे नाही तर भोर वेल्हयाच्या ठिकाणी सुध्दा अवैध वाहतूक सुरु असल्याचे दिसून येते.. पूर्वी रात्रीच्या वेळी गाव आलेले आहे हे हागणदारी आल्यानंतर लक्षात यावयाचे. आजही अनेक ठिकाणी हागणदारी मुक्त गाव झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे हागणदारी आले की गाव आले आहे हे लक्षात येते त्याप्रमाणेच अवैध वाहतूक करणा-या जीप्स ज्या ठिकाणी उभ्या आहेत त्यावरुन जवळपास एस.टी.चा डेपो आहे हे दिसून येते. अवैध वाहतूक करणा-या विरुध्द कारवाई करण्याचे अधिकार पूर्वी एस.टी.च्या अधिका-यांना होते परंतु हे अधिकार त्यांच्याकडून काढून घेऊन परिवहन विभागाला देण्यात आलेले आहेत .पूर्वी एस.टी.चा अधिकारी अैवध प्रवासी वाहतूक करणा-या गाडया अडवून त्याच्याकडून दंड वसूल करीत असे. तेव्हा हाच अधिकार परिवहन विभागाने एस.टी.च्या अधिका-यासंना पुन्हा दिला तर त्याना चांगल्या प्रकारची कारवाई करता येईल. आज अनेक ठिकाणी राजकारणी, पोलीस आणि अवैध वाहतूक करणारे वाहन चालक यांचे साटेलोटे

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

असल्याचे दिसून येते. कोणत्याही पक्षातील राजकारणी असला तरी त्यांच्यामध्ये साटेलोटे असते अवैध वाहतूक करणा-यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होत असतो त्यामुळे कर्नाटक सरकारने या खाजगी वाहतूक करणा-या गाडया अधिग्रहीत केल्या होत्या. त्यानुसार एस.टी.महामंडळसुध्दा खाजगी वाहतूक करणा-या गाडया अधिग्रहीत करु शकेल असा निर्णय जर राज्य शासनाने घेतला तर बरे होईल. अशा प्रकारे जर करण्यात आले तर प्रवास करणा-याला सुरक्षा मिळेल, त्याचबरोबर त्यांचा तिकीटाचा दर न बदलता तो स्टॅन्डर्डाईजच राहील. यात्रा नसेल, सुट्टयाचे दिवस नसतील तेव्हा खाजगी वाहतूक करणारे वाहतूकीचा दर कमी करतात. मुबई - पुणे वाहतूकीचा इतर वेळी 200 वा 250 रुपयांचा दर असेल तर सुट्टी नसलेल्या वेळात 125 रुपये घेतला जातो. परंतु एस.टी.महामंडळाला मात्र अशा प्रकारे बसचे दर कमी करता येत नाही. तेव्हा निदान एस.टी.महामंडळाला अशा प्रकारे दर कमी जास्त करण्याचे अधिकार द्यावेत. ज्याप्रमाणे खाजगी वाहतूक करणारे प्रवासाचे दर कमी जास्त करतात त्याप्रमाणे एस.टी.चे दरसुध्दा कमी जास्त करण्याचे अधिकार त्यांना द्यावेत हे अधिकार त्यांना दिल्यानंतर ते आपले दर ठरवतील. परंतु अशा प्रकारचा अधिकार एस.टी.महामंडळाला दिला जात नाही. एस.टी.महामंडळाच्या बसेसच्या वाहतूकीचे दर मात्र नेहमीकरता फिक्सच असतात.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आदिवासीचे कुपोषण होऊ नये म्हणून एस.टी.महामंडळाकडडून 433 कोटी रुपयांचा अधिभार घेण्यात येतो त्याचा उल्ेख केला होता. त्या पैशाचा विनियोग कशाप्रकारे केला जातो . हा वेगळा विषय आहे. एस.टी.महामंडळाकडून तसेच महानगरपालिकेकडून चालविल्या जाणा-या बसेस कडून हा अधिभार वसूल केला जातो. त्याचप्रामाणे खाजगी बसेस चालविणा-याकडून हा अधिभार वसूल का केला जात नाही ? आदिवासींचे कुपोषण होऊ नये यासंदर्भात त्यांचे काहीही दायित्व नाही किंवा त्यांची कोणतीही सामाजिक बांधिलकी नाही काय ? "एस.टी. ही प्रवाशांच्या सेवेसाठी" अशा प्रकारची बिरुदावली लावली जाते परंतु एस.टी.ला जगविण्यासाठी कोण प्रयत्न करीत आहे हा खरा प्रश्न आहे. एस.टी. सेवा देऊ शकते म्हणून तिला जगवले पाहिजे परंतु तसा प्रयत्न न करता उलट एस.टी.ला अधिभार आणि टोल भरण्यास सांगितले जाते.. मला असे सांगावयाचे आहे की.....

नतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठ नाही

श्री. अरविंद सावंत ....

टोलनाक्यावरील हा जो छळवाद एसटी बसेसच्या बाबतीत आहे तो प्रथमत: थांबवा. एसटी कडून एक पैशाचाही टोल घेतला जाता कामा नये. तुम्ही पीएमटीला टोलमधून सोडता, इतर बसेसना सोडता आणि एसटीकडून मात्र टोल घेता, हे कशासाठी ? मुंबईच्या बेस्ट बसेसकडून तसेच पीएमटीच्या बसेसकडून टोल नाक्यावर पैसे घेतले जात नाहीत मात्र एसटी बसेसकडून टोल घेतला जातो. तेव्हा एसटी बसेसना टोल का आकारला जातो ? त्यांना त्यातून सूट का दिली जात नाही ? तेव्हा एसटी बसेसना टोल आकारू नका असा धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे, तो आपण घ्यावा अशी माझी आपणास नम्र सूचना आहे. सभापती महोदय, खाजगी गाड्या अधिग्रहित केल्या तर त्या गाड्या आपल्याकडे येतील आणि त्याचा फायदा आपल्याला घेता येईल.

(वेळ संपल्याची घंटी वाजविली जाते.)

सभापती महोदय, मी एक दोन बाबीच येथे मांडणार आहे आणि दोन मिनिटात माझे भाषण संपविणार आहे. त्यासाठी आपण मला थोडा अवधी द्यावा. दुसरी गोष्ट अशी की, आपला जो डेपो मॅनेजर आहे त्याला अकौंटेबल करा. किती धंदा तू केलास ? हा प्रश्न त्याला विचारला गेला पाहिजे आणि त्यानेही याचे उत्तर रोजच्या रोज दिले पाहिजे. तसेच त्याला हेही सांगितले पाहिजे की, एसटीचा धंदा वाढविण्याच्याबाबतीतील तुझ्या कल्पनाशक्तीला आम्ही पूर्णपणे वाव देतो, तू तुझी कल्पनाशक्ती वापरून एसटीचा धंदा वाढविणार असशील तर त्यासाठी आमचा तुला पूर्ण पाठिंबा आहे, आणि त्याप्रमाणे वागले पाहिजे. याबाबतीत असे होते की, या धंद्यातील कोंडूसकर, घाटगे-पाटील वगैरेची नावे मी घेऊ इच्छित नाही पण त्यांच्या खाजगी बसेस या धंद्यात चांगल्या प्रकारे धंदा करतात, त्यांच्या बसेस कोल्हापूर, पुणे आणि इतरत्र सर्व ठिकाणी चालतात. त्यांची गाडी निघाल्यानंतर आमची एसटीची गाडी निघते. या वेळा ठरविण्याच्या बाबतीत देखील आमचे डेपो मॅनेजर आणि खाजगी बसेसवाल्यांचे साटेलोटे आहे. खाजगी बसेसवाले सांगतात की, आमची 4 वाजता गाडी आहे, तेव्हा तुमची गाडी 4 वाजता येता कामा नये, तशी ती येत असेल तर थोडी लेट करा. आणि त्याप्रमाणे केले जाते. त्यामुळे खाजगी गाडी भरून गेल्यानंतर मग आमची एसटी गाडी घंटी वाजवत येते. हा जो धंद्याचा दृष्टीकोन आहे, वेळेचे बंधन आहे त्याचा विचार करा आणि म्हणूनच आपले जे डेपो मॅनेजर आहेत त्यांना आपण अकौंटेबल करा असे मी आग्रहाने सांगतो.

..... एस 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सावंत ....

सभापती महोदय, सवलतीची प्रतिपूर्ती हा माझा आणखी एक मुद्दा आहे. आम्ही विद्यार्थ्यांना, तसेच 65 वर्षे वयाच्या वरील माणसांना, पत्रकारांनाही सवलत देतो. या सवलतींची प्रतिपूर्ती सरकार करते का ? गेल्या वर्षामध्ये सवलती पोटी एसटीला किती खर्च आला आहे ? त्याचा प्रतिपूर्ती सरकारने एसटी महामंडळाला केली आहे का ? डिझेल आणि पेट्रोलियम पदार्थांचे भाव वाढतात तेव्हा एसटीला त्या आधारे आपले भाव वाढविण्याचे अधिकार आपण महामंडळाला दिले पाहिजेत, तसे अधिकार आपण महामंडळाला द्यावेत अशी विनंती मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, माझा सगळ्यात शेवटचा मुद्दा प्रवाशांना दंड करण्याबाबतचा आहे. हा एक भयानक प्रकार आहे. एसटी महामंडळामध्ये प्रवाशाला दंड केला जात नाही तर कंडक्टरला दंड केला जातो. लांब पल्ल्याच्या गाडीच्या कंडक्टरला दंड केला जातो ते मी समजू शकतो. कारण तेथे बराच वेळ असतो प्रवाशांना तिकीट देण्यासाठी. पण शहरी वाहतुकीमध्ये उदा. नागपूर आणि उरण-पनवेल वाहतुकीमध्ये प्रवासी विना तिकीट आढळला की दंड कंडक्टरला केला जातो. आता तेथील प्रवाशांना हे माहीत झाले आहे की, तिकीट काढले नाही तरी आपल्याला दंड होत नाही. आता एसटीतील सारेच कंडक्टर अगदी धुतल्या तांदळासारखे आहेत असे नाही. तोही काही वेळेस गडबडी करतो. नाही असे नाही. पण तो का करतो ? त्याचे कारण असे की, दोन रूपये तिकीट असेल तर तो एक रूपया घेऊन गप्प बसत असेल. पण कित्येकदा प्रवासीच तिकीट काढत नाहीत. एसटीचा प्रवासी आज इतका सुरक्षित झाला आहे की, त्याला काही दंडच केला जात नाही. म्हणून माझी आग्रहाची मागणी आहे की, कोणत्याही बाबतीत कंडक्टरला दंड करण्यापेक्षाही प्रवाशाला दंड केला गेला पाहिजे. जसा मुंबईमध्ये बेस्ट बसेसमध्ये विना-तिकीट प्रवासी आढळल्यास त्याला दंड केला जातो त्याप्रमाणे एसटी बसेसच्या बाबतीतही करावे. तसे केल्याने निश्चितपणे एसटी महामंडळ तोट्यातून बाहेर येईल. तसेच आपण जो प्रवासी कर घेता तो कर कमी करावा. खाजगी वाहनांन वर्षाचा कर आकारला जातो आणि एसटी बसेसला मात्र रोजचा प्रवासी कर आणि तोही जास्त प्रमाणात द्यावा लागतो. तो कर आपण कमी केलात तर एसटी महामंडळ केव्हाच तोट्यात जाणार नाही आणि तिची सेवा जनतेसाठी अशीच निरंतर राहील. सभापती महोदय, आपण मला एक मिनिटांचा वेळ वाढवून दिला त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

*** ..... एस 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदूरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव येथे आणला आहे त्यावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, या ठिकाणी सर्वच सन्माननीय सदस्यांनी आपली या संबंधीची भूमिका स्पष्ट केली आहे त्याची मी पुनरावृत्ती करणार नाही. परंतु महत्त्वाच्या संदर्भात, एसटी महामंडळालादेखील सामान्य स्पर्धेत उतरावे लागेल आणि त्या दृष्टीने महामंडळाच्या देखील काही जबाबदाऱ्या वाढल्या आहेत याची जाणीव महामंडळाने आणि महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी ठेवली पाहिजे. एसटी महामंडळाच्या असलेल्या मोक्याच्या ठिकाणी काही अंशी आम्ही बीओटी तत्त्वावर बस स्थानके विकसित केले आहेत. त्या माध्यमातून एसटी महामंडळाला चांगल्या प्रकारे उत्पन्न मिळाले आहे. तरी देखील राज्याने या संदर्भात घेतलेल्या निर्णयांची अजूनही, 2-2, 3-3 वर्षे झाली पण महामंडळाच्या माध्यमातून अमलबजावणी होत नाही हे देखील खेदाने व्यक्त करावे लागेल. उदाहरण द्यायचे म्हटले तर मी नंदूरबारचे उदाहरण देईन. नंदूरबारचा बस स्टॅण्ड बीओटी तत्त्वावर विकसित करावा असा निर्णय तीन वर्षांपूर्वी घेतला गेला. परंतु आज देखील एस.टी. महामंडळ त्या संदर्भात पुढे जात नाही. एकीकडे महामंडळाच्या असलेल्या मोक्याच्या जागेवर अतिक्रमणे होत आहेत आणि एसटी महामंडळाचे कर्मचारी किंवा अधिकारी याचीच वाट बघतात असे चित्र समाजात निर्माण होत आहे. सभापती महोदय, अवैध प्रवासी वाहतुकीच्या संदर्भातसुद्धा आपण फार मोठ्या प्रमाणात येथे चर्चा केली. खरे म्हणजे जेथे एसटी जात नसेल तेथे अवैध प्रवासी वाहतुकीला कायद्याने कोठे तरी एक रूप दिले पाहिजे असे माझे वैयक्तिक मत आहे. कारण दुर्दैवाने आमचा तो पांढरा ड्रेस घातलेला हवालदार त्या ॲपे रिक्शॉ किंवा जीपचा पाठलग करतो आणि तो ड्रायव्हर जो ट्रॅक्टर चालविणारा जीप चालवायला लागतो. त्या हवालदाराना बघून तो एवढ्या जोरात चालवू लागतो की अपघात झाल्याशिवाय रहात नाही.

(यानंतर श्री. सरफरे ....टी 1 ...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी...

अपघात झाल्याशिवाय रहात नाही. एकेका जीपमध्ये किती प्रवासी बसवावयाचे याचे देखील नियम ठरविण्यात आले पाहिजेत. नंदूरबार जिल्हयातील अति दुर्गम भागामध्ये अवैध प्रवासी वहातूक आम्ही आमच्या डोळयांनी बघतो. त्याठिकाणी एकेका जीपमधून 50-50 प्रवासी उतरतात. एस.टी. महामंडळाच्या बसमधून 5 ते 10 प्रवासी सुध्दा उतरत नाहीत. जीपच्या टपावर बसून किंवा बोनेटवर उभे राहून, लटकून लोक प्रवास करीत असतात. अशाप्रकारचा धोका हे प्रवासी घेत असतीलतर याबाबतीत आपले काहीतरी गणित चुकते आहे असे मला वाटते. आज सर्वच रस्त्यांवर एस.टी. ची बस जात नाही. ऑटो रिक्षांची संख्या जास्त झाली असल्यामुळे त्यांच्या पार्किंगसाठी सुध्दा जागा पुरत नाही. शहरामधील ऑटो रिक्षा किंवा खाजगी जीपमधून प्रवासी वहातूक करीत असतांना पोलीस त्यांच्याकडून हप्ते घेतात. पूर्वी सट्टयाच्या चिठयांवरुन पोलिसांचे हप्ते ठरायचे, दारुच्या अड्डयावरुन हप्ते ठरायचे. आता अवैध वहातुकीच्या किती गाडया त्या पोलीस स्टेशनच्या क्षेत्रामध्ये चालतात हाच पोलिसांचा सर्वात मोठा हप्ता आहे. आणि म्हणून याबाबतीत कायद्याचे बंधन घालून शासनाने या खाजगी जीप चालकांकडून जो टॅक्स घ्यावयाचा असेल तो वसूल करावा. आज शासनाला कराच्या रुपाने जे उत्पन्न मिळावयास हवे ते मिळत नाही. त्याचप्रमाणे दुर्दैवाने आज सर्वसामान्य प्रवास करणारा नागरिक सुध्दा असुरक्षित आहे. त्यादृष्टीने खाजगी जीप वहातुकीला कायद्याचे स्वरुप दिले गेले पाहिजे.

सभापती महोदय, मी पोलीस लाईनच्या शेजारी रहातो. अवैध वहातूक करणाऱ्या सर्वात जास्त गाडया पोलिसांच्याच होत्या ही वस्तुस्थिती आहे. एस.टी. महामंडळाचे उत्पन्न सर्व स्तरावरुन वाढले पाहिजे. या एस.टी. चा जन्मच मुळी जनसेवेच्या भावनेतून झाला आहे. जनसेवेचे व्रत घेतलेले हे महामंडळ कायम चालले पाहिजे अशी सर्वसामान्य माणसाची अपेक्षा आहे. त्यासाठी महामंडळाने विचार केला पाहिजे. सभापती महोदय, कंडक्टरच्या गल्ल्यामध्ये जर दोन रुपये कमी किंवा जास्त निघाले तर त्या बिचाऱ्याला सरळ सेवेतून बडतर्फ करण्यात येते. काल माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या सभागृहामध्ये सांगितले की, व्हाईट कॉलरच्या लोकांनी या राज्यामध्ये 2200 कोटींचा भ्रष्टाचार केला. वेगवेगळया पतसंस्था, बँकांना त्यामध्ये बुडविले. आणि दुसरीकडे जर आपल्या गल्ल्यामध्ये दोन-चार रुपये कमी जास्त झाले तर त्या एस.टी. महामंडळाच्या कर्मचाऱ्याला सेवेतून बडतर्फ केल्यामुळे त्याचे कुटुंब उद्ध्वस्त होते. सभापती महोदय, एस.टी. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना आपली रजा मंजूर करुन घेण्यासाठी आज डेपो मॅनेजरला पैसे द्यावे लागतात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. चंद्रकांत रघुवंशी...

त्याशिवाय रजा मंजूर होत नाही इतके दुर्दैवी चित्र आपल्याला पहावयास मिळत आहे. अशाप्रकारे वरिष्ठ अधिकारी आपल्या कर्मचाऱ्यांना वेळेवर मदत करीत नसतील तर त्यांच्या मनामध्ये असंतोष निर्माण झाल्याशिवाय रहात नाही. या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर खऱ्या अर्थाने एस.टी. महामंडळाची कार्यपध्दत बदलण्याची गरज आहे. एस.टी.च्या जागेसंबंधी महामंडळाकडून जे जे निर्णय घेतले गेले आहेत त्यांची तात्काळ अंमलबजावणी करण्यात आली पाहिजे.

सभापती महोदय, धुळे, शिरपूर, नंदूरबार येथील एस.टी. बस स्टँड बी.ओ.टी. तत्वावर विकसित करण्याचे सर्व प्रकारे प्रयत्न करण्यात आले. परंतु दुर्दैवाने त्याची अंमलबजावणी होत नाही. नंदूरबार हे आता जिल्हयाचे हेडक्वॉर्टर झाले आहे, परंतु तालुका असतांना 40 वर्षापूर्वी बांधण्यात आलेले ते एस.टी. बस स्टँड आहे. त्या दृष्टीकोनातून शासनाने घेतलेल्या निर्णयाची एस.टी. महामंडळाने अंमलबजावणी करावी अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. सभापती महोदय, एस.टी. महामंडळाचे कर्मचारी दुर्दैवाने अपघातामध्ये सापडून मरण पावल्यानंतर त्यांच्या विधवा पत्नीला अनुकंपा तत्वावर महामंडळाच्या सेवेत सामावून घेण्याबाबत कार्यवाही केली जात नाही. त्याकरिता तिला महामंडळाकडे वारंवार चकरा माराव्या लागतात. तरीसुध्दा तिला वेळेवर न्याय मिळत नाही. तेव्हा या प्रश्नाच्या माध्यमातून त्या महिलेला पारदर्शीपणे लवकरात लवकर न्याय कसा देता येईल याचा विचार एस.टी. महामंडळाने करावा. सभापती महोदय, भविष्यात हे महामंडळ जागतिक स्पर्धेमध्ये टिकले पाहिजे. फक्त शासनाचा अंगिकृत उपक्रम म्हणून लोकांनी या महामंडळाकडे न पहाता सर्वसामान्य लोकांना दर्जेदार सेवा या महामंडळाने दिली पाहिजे. आज गाव तिथे एस.टी. अशाप्रकारची महामंडळाची असलेली संकल्पना भविष्यात साकार होईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, एस.टी. महामंडळाने छोटया बसेस विकत घेतल्या पाहिजेत. आज टाटा कंपनीने छोटया बसेसचे उत्पादन केले आहे. त्या बसेस 20 किलोमीटरचे ॲव्हरेज देतात. एस.टी. महामंडळाच्या अनेक बसेस आज रात्रीच्या वेळी कित्येक गावांमध्ये मुक्कामासाठी जातात. आणि पुन्हा सकाळी त्या ज्यावेळी निघतात त्यावेळी त्या बसमध्ये 5 ते 6 लोकांपेक्षा जास्त माणसे नसतात. अशावेळी आपण गाडयांचे नियोजन केले आणि चांगल्या प्रकारच्या बसेस घेतल्या तर

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. चंद्रकांत रघुवंशी...

कमीत कमी पैश्यामध्ये या बसेस आपल्याला खरेदी करता येतील. त्याचप्रमाणे महामंडळाला देखील जास्त पैसे मिळतील. तसेच, या बसेसच्या दुरुस्ती व देखभालीवर होणारा खर्च कमी 24-07-2008 होईल. तेव्हा आज जग बदलत चालले असल्यामुळे जगाबरोबर महामंडळाने सुध्दा बदलले पाहिजे अशी मी अपेक्षा करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

तालिका सभापती (श्री.उल्हास पवार) : मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, माननीय मंत्री महोदयांना या प्रस्तावाच्या संदर्भात उत्तर देण्यासाठी 15 मिनिटांचा वेळ लागणार आहे आणि आता फक्त 20 मिनिटे शिल्लक राहिलेली आहेत.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मला फक्त दोन-तीन सूचना करावयाच्या आहेत.

सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, तीन वर्षापूर्वी टायरच्या बाबतीत एक कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. येथे माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्याचे आश्वासनही देण्यात आले होते. मात्र ते आश्वासन पाळण्यात आलेले नाही. त्यावेळी माननीय मंत्री श्री.धर्मरावबाबा आत्राम यांनी सांगितले होते की, "मी सी.आय.डी.मार्फत चौकशी करु इच्छितो. पण मला विभागाचे सचिव असे सांगत आहेत की, सी.आय.डी.मार्फत चौकशी करु नये. तेव्हा याबाबतीत काय झाले आहे ? हा माझा पहिला मुद्दा आहे.

सभापती महोदय, दुसरी बाब म्हणजे, असे म्हटले जाते की, एस.टी.मालामाल झाली आहे. पण खरे म्हणजे एस.टी.च्या जागेमध्ये मॉल उभे राहिल्यामुळे ही मालामाल झालेली आहे. एकतर यु.एल.सी. कायद्याखाली सरकारने यासाठी सगळया जमिनी देऊन टाकलेल्या आहेत आणि एस.टी.ने देखील अशा प्रकारे आपल्या सगळयाच जमिनी मॉलसाठी दिल्या तर मग महामंडळाकडे कोणत्याच जमिनी शिल्लक रहाणार नाहीत अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, मला तिसरा मुद्दा सांगावयाचा आहे. पण याठिकाणी सर्व सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले आहे, मी त्याचीच एका कारणासाठी पुनरावृत्ती करणार आहे. राज्यामध्ये सुमारे 1 लाख 8 हजार खाजगी वाहने, जीप्स आहेत, त्यातून प्रवाशांची वाहतूक होत असते. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, जर याला नियमित करावयाचे असेल तर जरुर करा. कारण सध्या त्यांच्याकडून कर देखील मिळत नाही. म्हणजे एकीकडे करही नाही आणि दुसरीकडे एस.टी.तोटयामध्ये जात आहे. म्हणून याबाबतीत विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला होता, तोच सांगून मी माझे भाषण संपविणार आहे. एस.टी.चे डेपो आणि थांबा असतो, तेथेच खाजगी ...

. . . .यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण . . . .

वाहतूक सुरु असते आणि संगनमताने सर्व गोष्टी सुरु असतात. आपल्याला जर पहावयाचे असेल तर आपण दादर येथे जावे. तेथे कोंडूसकर आणि इतर ट्रॅव्हल्स्च्या बसेस सुटल्यानंतर मग एस.टी.महामंडळाच्या मुंबई-पुणे बसेस सुटतात. खाजगी बसेसचा जो कारकून असतो, धावत-धावत कोहिनूर मिलच्या फुटपाथवर जाऊन संबंधितांना सांगतो की, "हमारी गाडी भर गई है, अभी आपकी गाडी छोड दो." त्याठिकाणी तुम्ही इतके बेशरम अधिकारी बसविलेले आहेत. मला असे वाटते की, या चर्चेच्या निमित्ताने जे मुद्दे किंवा ज्या सूचना मांडण्यात आल्या आहेत, त्याबाबतीत आपण त्वरित अंमलबजावणी करण्यासाठी अधिकाऱ्यांची बैठक घ्यावी. धन्यवाद.

. . . .यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महाराज, याठिकाणी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे, त्यावर चर्चा सुरु आहे. नियम 260 अन्वये असलेली चर्चा ही साधारणपणे अडीच तास करण्यात यावी अशी अपेक्षा असते. याठिकाणी एस.टी.महामंडळाच्या संदर्भात चर्चा सुरु आहे आणि ग्रामीण भागामध्ये एस.टी.ला किती महत्व आहे हे सर्वांना माहिती आहे. पण आज एस.टी.ला उतरती कळा लागलेली आहे. अशा प्रश्नाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांना मुक्तपणे चर्चा करावयाची आहे. आज सकाळी 10.00 वाजता ही चर्चा सुरु झाल्यानंतर दुपारी 12.00 वाजता माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह ही चर्चा पूर्ण करावयाची आहे. अशा परिस्थितीत ही चर्चा दोन तास देखील होत नाही. पण आपण काही-काही चर्चा चार-साडेचार तास करतो. आज याठिकाणी ज्या प्रस्तावावर चर्चा उपस्थित केलेली आहे, ती महत्वाची असल्याने प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर, महत्वाचे कामकाज झाल्यानंतर हा प्रस्ताव पुन्हा चर्चेसाठी घेण्यात यावा असे माझे म्हणणे आहे.

तालिका सभापती (श्री.उल्हास पवार) : काल सभागृहाचे कामकाज रात्री 8 वाजून 15 मिनिटापर्यंत सुरु होते. आता सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी आपले भाषण दोन मिनिटांमध्ये संपवावे.

--

. . . .यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्य शासनाचा एक अंगिकृत व्यवसाय म्हणून एस.टी.महामंडळावर चर्चा सुरु आहे. सर्वसाधारणपणे शासनाचे जे व्हिजिबल सिम्बॉल्स् आहेत, ज्याचा लोकांशी संपर्क येत असतो त्यामध्ये पोलीस, सरकारी दवाखाना आणि सरकारी शाळा आणि एस.टी. या चार गोष्टी जिव्हाळयाच्या आणि लोकांशी थेट संबंध असणाऱ्या आहेत. त्यामुळे एस.टी.महामंडळ हे अतिशय चांगल्या पध्दतीने आणि नफ्यामध्ये चालणे ही शासनाच्या या महत्वाच्या उपक्रमातील अतिशय प्राथमिक गरज आहे. यासाठी एस.टी.सेवा चांगली रहाण्यासाठी जे पुरेसे इन्फ्रास्ट्रक्चर किंवा ज्या-ज्या मुलभूत गोष्टी आहेत, त्या उपलब्ध आहेत का? त्यावर भांडवली खर्च झाला आहे काय ? यासाठी शासनाने योग्य प्रमाणात गुंतवणूक केलेली आहे काय ? हा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट म्हणजे जेव्हा उद्योग चालविण्यात येतात, तेव्हा विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून खालच्या पातळीवर अधिकार दिल्यानंतर परफॉर्मन्स् आणि रिझल्ट या दोन्हीमध्ये फरक होऊ शकतो. त्याप्रमाणे विभागीय पातळीवर काही अधिकार देण्याच्या बाबतीत एस.टी.महामंडळ योजना हातामध्ये घेणार आहे काय ? त्याचबरोबर एस.टी.च्या संबंधातील सर्व गोष्टी गुणवत्ता विकास वाढीच्या कार्यक्रमाव्दारे करता येतील काय ? याचाही विचार झाला पाहिजे.

सभापती महोदय, तिसरी गोष्ट म्हणजे वाहक आणि चालक यांना जर गाडयांचे पालकत्व दिले आणि त्या गाडीच्या परफॉर्मन्स्संबंधात एखादी बक्षीस योजना सुरु करता आली, तर त्याचाही निश्चितपणे उपयोग होऊ शकेल असे मला वाटते.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

सर्वात महत्वाच्या या शासकीय यंत्रणेमध्ये सर्वोच्च पदावर ज्यांना आणतो त्यांना त्या क्षेत्राचे ज्ञान मिळविण्यासाठी पुरेसा कालावधी देतो काय याचाही विचार केला पाहिजे. मुळात एस.टी. मध्ये काम करणाऱ्या सगळ्यांची मानसिकता बदलण्याकडे आपण जास्त लक्ष दिले पाहिजे. या विषयाशी संबंधित या मुद्यांचा विचार व्हावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

तालिका सभापती (श्री. उल्हास पवार) : आता माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तराच्या भाषणाला सुरुवात करावी.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मला या प्रस्तावावर बोलावयाचे आहे. हा अतिशय जिव्हाळ्याचा विषय आहे.

तालिका सभापती : माननीय मंत्रिमहोदयांकडून सविस्तर उत्तर मिळाले पाहिजे. त्यांनी घाईघाईने उत्तर दिले तर आपले समाधान होणार नाही. उत्तर देखील परिपूर्ण आले पाहिजे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावाची चर्चा अडीच तास असते. अजून अडीच तास झालेले नाहीत.

तालिका सभापती : काल रात्री 8.15 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज चालले. संध्याकाळी परत आपण असे म्हणणार की, आता उशीर झाला आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, काल रात्री 8.15 वाजेपर्यंत सभागृहात बसल्यानंतर सन्माननीय सदस्य लायब्ररीमध्ये बसतात आणि तयारी करतात. ही अडीच तासाची चर्चा आहे. आपण अडीच तास चर्चा करावी. सन्माननीय सदस्यांना 2-2 मिनिटे बोलू द्यावे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात)

तालिका सभापती : या प्रस्तावावरील चर्चेची वेळ कालच जाहीर झालेली आहे. माननीय मंत्रिमहोदयांना उत्तरासाठी 15-20 मिनिटे तरी द्यावयास पाहिजेत.

श्री. विनोद तावडे : आपण सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे. आपण अडीच तासाची चर्चा दोन तासात संपवित आहात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : या प्रस्तावावर सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 पर्यंतची चर्चेची वेळ कालच जाहीर झालेली आहे.

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्यांना 1-1 मिनिट तरी बोलू द्यावे.

तालिका सभापती : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 अशी या चर्चेची वेळ कालच जाहीर झालेली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बोलावयाचे नाही काय ?

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, आपण एक मिनिट माझे म्हणणे ऐकून घ्यावे. कालच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर माझी अर्धा-तास चर्चा होती ती उद्याच्या कामकाजामध्ये घ्यावी.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाच्या वतीने आलेल्या प्रस्तावावर विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी बोलावयाचे नाही काय ?

तालिका सभापती : या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्य बोलले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण, डॉ. दीपक सावंत, श्री. अरविंद सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे असे अनेक सन्माननीय सदस्य या प्रस्तावावर बोलले आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी आपले उत्तराचे भाषण सुरु करावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधान परिषद नियम 260 अन्वये सत्तारुढ पक्षाकडून सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी एका अतिशय चांगल्या उपक्रमासंबंधीचा हा प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी अनेक चांगल्या सूचना केल्या. एस.टी. सुरु होऊन 60 वर्षे झालेली आहेत. एस.टी. ही लोकवाहिनी आहे, रक्तवाहिनी आहे. लोकांच्या जीवनामध्ये एस.टी.चा अतिशय जवळचा आणि निकडीचा संबंध आहे. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी याच्याही पुढे जाऊन असे सांगितले की, पूर्वी एस.टी. गावात आली की लोक पूजा करावयाचे आणि नंतर एस.टी. सुरु करावयाचे. पूर्वी लोकप्रतिनिधींचे जर थर्मामीटर बघावयाचे असेल, लोकप्रतिनिधींनी काय काम केले हे बघावयाचे असेल तर ज्याप्रमाणे वीज आणली, विकासाची कामे केली त्या पध्दतीने त्या गावामध्ये लोकप्रतिनिधीने एस.टी. आणली असा उल्लेख त्या काळामध्ये व्हावयाचा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या प्रस्तावावर आम्हाला बोलण्याची संधी दिली नाही त्याबद्दल निषेध व्यक्त करुन आम्ही सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात)

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, एस.टी. लोकांच्या जीवनातील अविभाज्य अंग बनलेली आहे. एस.टी. लोकांच्या जीवनात अतिशय समरस झालेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ....

या एस.टी.मध्ये अनेक सुविधा केल्या आहेत. त्याचा उल्लेख अनेक सन्माननीय सदस्यांनी केला आहे. अनेकांनी चांगल्या सूचना केल्या आहेत. एस.टी.महामंडळाचे अधिकारी वा कार्यकारी संचालक मंडळाचे वर गॅलरीत सदस्य बसले असते आणि त्यांनी या सूचना ऐकल्या असत्या तर त्यांना याचा उपयोग झाला असता. या एस.टी.बद्दल अनेक माननीय सदस्यांनी गौरवोद्गार काढले आहेत. परंतु एस.टी.महामंडळाने आता स्पर्धेत उतरण्याची आवश्यकता आहे. एस.टी.ला खाजगी प्रवासी वाहतुकीची स्पर्धा निर्माण होत असेल आणि लोक तेथे आकर्षित होत असतील तर एस.टी.महामंडळाचे नुकसान होईल. त्यामुळे महामंडळाच्या अधिकारी व कर्मचा-यांची मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. 1948 साली एस.टी.सुरु झाली. त्यानंतर आजपर्यंत महामंडळ तोटयामध्ये होते. हा संचित तोटा 580 कोटी रुपये होता. परंतु सन 2006-07 मध्ये महामंडळाला 23 कोटींचा नफा झाला त्याबद्दल महामंडळाचे अध्यक्ष आणि त्यांच्या सहका-यांचे अनेकांनी अभिनंदन केले. त्यानंतर सन 2007-08 या वर्षात 158 कोटींचा नफा झाला. हे महामंडळ या दोन वर्षात प्रथमच नफ्यामध्ये आल्यानंतर संचित तोटा कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. सध्या एस.टी.महामंडळाच्या 15,500 बसेस रस्त्यावर धावत आहेत, 135 मिनी बसेस आहेत. 59 व्होल्वो बसेस आहेत, जवळजवळ 2 कोटी रुपये दिवसाचे उत्पन्न आहे. 1 लाख 3 हजार कर्मचारीवर्ग आहे. 247 डेपो आहेत. या महामंडळाच्या बस स्थानकांमध्ये आजुबाजूला जे व्यवसाय करतात त्यांच्या उपजीविकेचे एस.टी. साधन बनली आहे. त्यामुळे एस.टी.जगली पाहिजे, वाढली पाहिजे आणि शासनाने एस.टी.ला मदत केली पाहिजे या मताशी मी सहमत आहे. एस.टी.चे उत्पन्न वाढविण्यासाठी शासन मनापासून प्रयत्न करीत आहे. बी.ओ.टी.तत्वावर बांधलेल्या इमारतीमधून 75 कोटीचा प्रिमियम आहे, त्यानुसार 75 कोटी रुपये या बांधकामातून उभे केलेले आहेत. असे अनेक प्रस्ताव प्रलंबित आहेत. हे प्रस्ताव लवकरात लवकर मार्गी लावले जातील. एस.टी.महामंडळाचे उत्पन्न कसे वाढेल यासाठी शासन जरुर मदत करील. या एस.टी.महामंडळाला 6 टक्के दराने 232 कोटींचे भागभांडवल दिलेले आहे. त्यांची अशी मागणी आहे की, अनेक राज्यांमध्ये प्रवासी कर कमी आहे त्यामुळे आपल्याकडे 17.5 टक्के प्रवासी कर शासनाला द्यावा लागतो तो कमी करण्यात यावा. या मागणीबाबात शासन जरुर विचार करील.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.हसन मुश्रीफ....

सभापती महोदय, एस.टी.महामंडळामार्फत विविध 23 प्रकारची प्रवासी सवलत दिली जाते. यामध्ये विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दलित मित्र, आदिवासी मित्र इत्यादीचा समावेश आहे. यासाठी 500 कोटी रुपयांचे समायोजन केले जाते. हा प्रवासी कर साधारणपणे 535 कोटी रुपयांचा आहे. त्याशिवाय असमायोजित रक्कम 259 कोटी रुपये आहे. दरवर्षी शासनाला महामंडळाकडून प्रवासी कर दिला जातो त्याच्यातून ही रक्कम वजा करुन वळती करण्याचा प्रयत्न केला जातो. एस.टी.ने सुध्दा खाजगी प्रवासी वाहतुकीच्या स्पर्धेत उतरण्याचे ठरविले आहे. त्यानुसार आता जुन्या गाडया मोडित काढून नवीन गाडया घेण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार सन 2006-07 मध्ये 2105 बसेस बांधल्या आहेत. सन 2008-09 मध्ये 2500 बसेस बांधण्याचा संकल्प केला आहे.

नंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. हसन मुश्रीफ....)

ॲव्हेरेज फ्लीट साडेसहा कि.मी. होते ते 6.26वर आणलेले आहे. तसेच एस.टी.च्या गाड्या टू बाय टू, आरामदायी करण्याचे तसेच त्या आकर्षक गुलाबी रंगांच्या करण्याचे ठरविलेले आहे. खाजगी गाडया आकर्षक दिसत असल्यामुळे त्या गाड्याकडे प्रवासी आकर्षित होतात. तेव्हा खाजगी प्रवासी गाडयाप्रमाणेच एस.टी.च्या गाडया देखील आकर्षक दिसाव्यात आणि प्रवासी आकर्षित व्हावेत या दृष्टीने एस.टी. महामंडळ मनापासून प्रयत्न करीत आहे.

अनेक सन्माननीय सदस्यांनी येथे सांगितले की, डिझेलच्या दरामध्ये वाढ होत असली तरी एस.टी.च्या भाड्यामध्ये वाढ होत नाही. आता शासनाने डिझेलचे दर वाढले की एस.टी.च्या भाड्यामध्ये देखील वाढ करण्याचे सूत्र आखून दिलेले आहे. यामुळे एस.टी.च्या तोट्यामध्ये फारशी वाढ होणार नाही. एस.टी.ला डिझेलच्या दरवाढीनुसार भाडेवाढ करता येईल. 1 कोटी प्रवाशांची वाहतूक करण्याची एस.टी.ची क्षमता असताना फक्त 69 लाख प्रवासी वाहतूक होते. पृथ्वीला रोज प्रदक्षिणा घालता येईल इतका प्रवास ही एस.टी. करीत असते. एस.टी.चे रोजचे उत्पन्न 1021 कोटी रु. असून 6432 कोटी रोजचा खर्च आहे. रोज 15 कोटी कि.मी. इतका एस.टी.चा प्रवास होतोय. गाव तेथे एस.टी. हे सामाजिक तत्व आपण पाळलेले आहे. दुर्गम भागामध्ये एस.टी.ची सेवा बंधनकारक केलेली आहे. एस.टी.चे उत्पन्न फक्त 6.60 रुपये प्रति कि.मी. असून खर्च 17.5 रु. इतका होतो. 156 कोटी रुपये इतका वार्षिक तोटा एस.टी.ने 76 थेट सेवा केल्यामुळे होत आहे. तरी देखील हा तोटा दुसरीकडे भरुन काढून चांगल्या प्रकारे सेवा देण्याचा प्रयत्न एस.टी.च्या माध्यमातून होतोय. या एस.टी.ला अवैध वाहतुकीचे आव्हान आहे. आपण 1089 टुरिस्ट बसेसना परवाने दिलेले आहेत. 16 हजार काळया-पिवळया टॅक्सीजना परवाने दिलेले आहेत. 2004 पासून हे परवाने देण्याचे बंद केलेले आहे. टुरिस्ट गाडयांना परवाने देताना त्यांना काही नियम घालून दिलेले आहेत. त्यांना कॉन्ट्रॅक्ट प्रवास करता येईल, त्यांना स्टेज कॅरेज करता येणार नाही. स्टेज कॅरेज करण्याची मक्तेदारी फक्त एस.टी.कडे आहे. या ठिकाणी असेही सांगितले गेले की, एस.टी.चे डेपो मॅनेजर, अधिकारी यांचे आणि खाजगी प्रवासी वाहतूकदारांचे साटेलोटे असते. असे प्रकार जर कुठे आढळून आले तर संबंधित अधिका-याला ताबडतोबीने सस्पेण्ड करण्याची कारवाई एस.टी. महामंडळामार्फत केली जाईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. हसन मुश्रीफ....)

सभापती महोदय, एस.टी. कर्मचा-यांची मानसिकता आता बदलत आहे. प्रवासी वाहतूक करण्याची आमचीच मक्तेदारी आहे, तो आमचाच ठेका आहे अशी पूर्वी या कर्मचा-यांची मानसिकता होती ती आता बदललेली आहे. मी एक उदाहरण देतो. कोल्हापूर ते रंकाळा अशी एस.टी.सेवा सुरु केल्यानंतर तेथील कर्मचा-यांनी स्वत:च्या खर्चाने टेपरेकॉर्डर आणून तो गाडीमध्ये बसविला. प्रवाशांचे मनोरंजन करण्याचा या कर्मचा-यांनी प्रयत्न केला आहे. त्यांना आता हे समजायला लागले आहे की, चांगल्या प्रकारची सेवा दिली तरच लोक एस.टी.कडे आकर्षित होतील. एस.टी.तून प्रवास करण्यासाठी लोकांना सौजन्याने आणि कार्पेट घालून बोलावण्याची आवश्यकता आहे हे एस.टी.तील कर्मचा-यांना समजलेले असून तसे त्यांचे प्रयत्न होत आहेत. प्रवासी वाहतुकीमध्ये स्पर्धा वाढलेली आहे याची जाणीव त्यांना झालेली आहे. अवैध वाहतुकीसंबंधात औरंगाबाद खंडपीठापुढे एक रिटपिटीशन करण्यात आले होते. त्यावेळी खंडपीठाने ही अवैध वाहतूक रोखण्यासाठी आराखडा तयार करण्याचे, पोलीस आणि आर.टी.ओ. यांचे संयुक्त पथक नेमण्याचे आदेश दिले. तसेच नो पार्किंग झोनमध्ये पार्किंग करता येणार नाही, एस.टी.स्टॅण्डच्या 200 मीटरच्या परिघामध्ये खाजगी गाडया उभ्या करता येणार नाहीत, दर तीन महिन्यांनी अवैध वाहतुकीची माहिती प्रसिध्द करावी, असेही आदेश खंडपीठाने दिलेले आहेत.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रक नाही

श्री.हसन मुश्रीफ...

सभापती महोदय, काळी-पिवळी टॅक्सीच्या मागील बाजूस पाचवे दार असते ते बंद करण्यासंबंधीचे आदेश देण्यात आला आहे. यासंदर्भातील अटी आणि शर्तीची काटेकारेपणे अंमलबजावणी करावी अशा प्रकारचे आदेश औरंगाबाद हायकोर्ट खंडपीठाने दिलेला आहे. या आदेशाप्रमाणे हजारो वाहनांवर शासनाने कारवाई केली. 7.47 कोटी रुपये वाहनधानकांकडून दंड म्हणून वसूल केला. या राज्यातील अवैध प्रवासी वाहतूक खरोखरच रोखू शकलो काय? हा महत्वाचा प्रश्न आहे. ग्रामीण भागातील लोकांना बाजारासाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते, त्यांच्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. रुग्णालयाची गरज भासली तर त्यासाठी ग्रामस्थांना तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. लहान लहान मार्गावर एस.टी.बसेस फे-या करु लागल्या तर एस.टी.च्या बसेस तोटयात जातील. जवळच्या प्रवासासाठी ग्रामीण भागातील प्रवासी अवैध वाहनांचा वापर करीत आहेत. आज ग्रामीण भागातील शिक्षण पूर्ण झालेल्या तरुणांना नोक-या नसल्याने ते बँकेचे कर्ज काढून काळी-पिवळी जीप घेऊन अवैध प्रवासी वाहतूक करीत आहेत. जवळपास अशा वाहनांची संख्या 1 लाखापेक्षा जास्त आहे. या तरुण वाहकांची मागणी आहे की, आम्ही बँकाकडून कर्ज घेऊन ही वाहने खरेदी केली आहेत. आम्हाला तुम्ही नियमित का करीत नाही ? सदर वाहनांच्या वाहकांनी आम्हाला नियमित करण्यात यावे अशा प्रकारची मागणी शासनाकडे अनेक वेळा केली आहे. त्या वाहनांच्या वाहकांना नियमित करा अशा प्रकारची मागणी या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी केली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मुद्दाम या विषयावर भाषण केले नाही. सरकार अवैध प्रवासी वाहतूक थांबविण्यासाठी हतबल झाले आहे. 1 लाख बेकादेशीर वाहने वाढली तोपर्यंत तुमच्या विभागाचे अधिकारी, पोलीस अधिकारी काय करीत होते ? या वाहनांमधील अर्ध्या पेक्षा जास्त वाहने परिवहन विभागातील अधिका-यांचीच आहेत. त्यामुळे राज्यात अवैध प्रवासी वाहतुकीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. अवैध वाहतूक रोखण्यास शासनास अपयश का आले आहे?

श्री. हसन मुश्रीफ : ही अवैध प्रवासी वाहतूक शासन रोखू शकले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. मी परवाच सांगितले की, त्यात एवढया मोठया प्रमाणात तोटा वाढलेला आहे. त्यामुळे जे आकाश फाटले आहे, त्या आकाशाला कुठे कुठे ठिगळ लावावयाचे असा प्रश्न निर्माण झाला आहे. शासन यासंदर्भात जे काही करणार आहे ते प्रामाणिकपणे करणार आहे. आठ अधिक एक असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ...

प्रवासी घेण्याची आपल्याला परवानगी देता येईल या विषयी परिवहन विभागाचा एक प्रस्ताव आहे. यातून अंदाजे 100 कोटी रुपये उत्पन्न येऊ शकेल. ते उत्पन्न एस.टी.महामंडळाला मिळवून देता येईल काय ? या संदर्भात एस.टी.च्या कर्मचा-यांबरोबर चर्चा करता येईल काय ? हा विषय दोन वेळा मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर आला होता. यासंबंधीच्या संघटनांच्या प्रतिनिधींना, यासंबंधीच्या युनियनच्या प्रतिनिधींना सोबत घेऊन एक बैठक आयोजित करुन त्या बैठकीत यासंबंधीचा निर्णय घेता येऊ शकतो. एस.टी. महामंडळाचे उत्पन्न वाढविण्याचे अनेक मार्ग मी मघाशी सांगितले आहे. बी.ओ.टी.तत्वार उत्पन्न वाढविता येईल, अधिभार कमी करुन उत्पन्न वाढविता येईल. खाजगी प्रवासी वाहतुकीशी स्पर्धा करुन उत्पन्न वाढविता येईल, एस.टी.चा पॅसेंजर टॅक्स कमी करता येईल याबाबतीतही शासन विचार करीत आहे अशा विविध मार्गातून महामंडळाचे उत्पन्न वाढविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. तसेच अवैध प्रवासी वाहतूक नियमित करुन या माध्यमातून एस.टी.च्या उत्पन्नात भर घालता येईल काय असा विचार वाहतूक संघटनेच्या लोकप्रतिनिधींना तसेच संबंधित युनियन्सच्या लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन करावा लागणार आहे. दरवर्षी एस.टी.महामंडळ टोलच्या रुपाने 35 कोटी रुपये देते. ही टोलची रक्कम पूर्वी प्रवाशांकडून वसूल केली जावयाची. परंतु त्या वसुलीस कोर्टाने स्थगिती दिली. कोर्टाने सांगितले की, टोलची रक्कम महामंडळाने भरली पाहिजे. विशेषत: भाडयाच्या दरात हे परावर्तीत होत आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी एक बैठक घेऊन हा टोल शासनालाच भरता येईल काय याचा विचार केला गेला. या बैठकीत यासबंधी असा विचार केला गेला की, टोलचा कंत्राटदारांना कालावधी वाढवून देऊन टोलची रक्कम ॲडजेस करता येईल या दृष्टीने देखील विचार करण्यात आला आहे. एस.टी.महामंडळाला टोलच्या रुपाने 35 कोटी रुपये द्यावे लागतात. ती टोलची रक्कम कशा पध्दतीने वाचविता येईल यादृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी सूचना केली की, एम.आर.टी. कायद्यातून युनियनचा ॲक्ट आहे ते वगळण्यात यावे. याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा झाली आहे. यासंदर्भात देखील शासन विचार करीत आहे.

3....

श्री.हसन मुश्रीफ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, एस.टी.बसचा अपघात झाला व त्यात मृत्युमुखी पडलेल्या प्रवाशास तातडीने 1 लाख रुपयांची नुकसान भरपाई दिली जाते. अपघातात प्रवासी कायम स्वरुपी विकलांग झाला तर त्यास 75 हजार रुपये नुकसान भरपाई दिली जाते. अंशत: दुखापत झाली तर अशा प्रवासास 50 रुपये नुकसान भरपाई दिली जाते.

सभापती महोदय, एस.टी.महामडळाने पार्सल कुरिअर सेवा सुरु केलेली आहे. कुरिअरच्या माध्यमातून एस.टी.महामंडळाला वार्षिक 3.50 लाख रुपये मिळते आहे. परंतु महामंडळाची कुरिअर सेवा चांगली होण्याची आवश्यकता आहे. ही सेवा चांगली झाली तर महामंडळाचे उत्पन्न मोठया प्रमाणात वाढू शकते.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी सी.एन.जी.वर महामंडळाच्या बसेस चालविता येतील काय ?

यानंतर श्री. कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ...

अनेक सन्माननीय सदस्यांनी सीएनजीवर बस चालविण्याबाबत सूचना केलेली आहे. महामंडळ 250 बसेसना सीएनजी कीट लावण्याचा प्रयोग करणार आहे. त्यायोगे डिझेलचे पैसे वाचतील आणि एस.टी.ला नफा मिळवून देण्यामध्ये उपयुक्त होईल. बस 16000 कि.मी.वर चालवायची नाही पण केंद्राचा तसा कायदा नाही. एस.टी.चे उत्पन्न बघून जास्तीत जास्त पैसा एस.टी.खरेदी करण्यासाठी कसा देता येईल याचा शासन निश्चितपणाने विचार करील. बीओटी तत्वावर एकूण 96 प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. 15 प्रस्ताव मंजुरीच्या वेगवेगळया टप्प्यावर आहेत. रिलायन्सच्या 4 मोठया प्रकल्पांना शासनाने मान्यता दिलेली आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यावर माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी सांगितल्याप्रमाणे एस.टी.महामंडळाला चांगला फायदा होऊ शकेल. अशा विविध मार्गांनी एस.टी.ला शासनाकडून मदत करण्याचे काम सुरु आहे. शासन एस.टी.मागे हिमालयासारखे उभे राहणार आहे. एस.टी.सामान्य लोकांची जीवनदायिनी आणि रक्तवाहिनी आहे. तिला जिवंत ठेवण्यासाठी मदत करणे हे शासनाचे काम आहे. आजच्या जागतिकीकरणामध्ये एस.टी.ला बाहेरच्या स्पर्धेमध्ये तोंड देता यावे यासाठी तिला सशक्त करण्याचे प्रयत्न शासन स्तरावर चालू आहेत. एस.टी.चे खाजगीकरण होणार नाही. अवैध वाहतुकीच्या संदर्भात सुध्दा विचार चालू आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला आणि अतिशय चांगले विचार मांडले त्यांचे मी मनापासून आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

श्री. दिवाकर रावते : अवैध वाहतुकीच्या संदर्भात शासनाचे काय धोरण आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, अवैध वाहतुकीच्या संदर्भात एस.टी.महामंडळ, पोलीस आणि आर.टी.ओ. यांची संयुक्त समिती आहे. आतापर्यंत अवैध वाहतुकीच्या संदर्भात 16000 लोकांवर खटले भरले आहेत. 7 कोटी 47 लाख रुपयांचा दंड वसूल केलेला आहे. अवैध वाहतूक रोखण्याचे जास्तीत जास्त प्रयत्न सुरु आहेत. वाढले आहे याचा अर्थ अवैध वाहतूक कमी झालेली आहे आणि एस.टी.ला फायदा झालेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अवैध वाहतुकीच्या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने निर्णय दिला आणि काळयापिवळया गाडीचा मागील दरवाजा सील करा असे सांगितले. परंतु गाडया रस्त्यावर उभ्या करुन त्यांचे वेल्डींग तोडून आजही

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

वाहतूक सुरु आहे. मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना सांगितले की राज्यात 1 लाख अवैध जीपगाडया चालतात. सरकार त्यांना नियमित करुन एस.टी.बुडवायला निघाले आहे. याचा आम्ही निषेध करतो. मी परिवहन मंत्री असताना असा प्रस्ताव आला होता पण मी तो नाकारला होता. राज्यामध्ये चुकीचा मेसेज चालला आहे. शासनाच्या या धोरणाचा आम्ही निषेध करतो आणि सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभागृहातून बहिर्गमन करतात.)

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, संपूर्ण राज्यामध्ये अवैध वाहतूक मोठया प्रमाणात सुरु आहे. माझी माहिती अशी आहे की, या अवैध वाहतुकीमध्ये एस.टी.चे कर्मचारी आणि आर.टी.ओ.विभागाचे अधिकारी तसेच निरीक्षक यांच्या गाडया मोठयो प्रमाणावर आहेत. अशा अवैध गाडयांची शासनाने चौकशी केली आहे काय आणि केली नसल्यास करणार आहे काय ?

यानंतर श्री. भोगले

.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : अवैध वाहतुकीच्या संदर्भात अधिकाऱ्यांच्या जर गाड्या असतील तर त्या शोधून काढल्या जातील, त्यांच्यावर कारवाई केली जाईल. त्यांना नोकरीतून बडतर्फ करण्याची सुध्दा कारवाई केली जाईल. आकाश फाटले आहे. ठिगळं लावण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहोत. एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढले ते अवैध प्रवासी वाहतूक रोखल्यामुळेच वाढले आहे हे मी मघाशीच सांगितले आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, एसटी महामंडळाकडून शासन 17.5 प्रवासी कर वसूल करते. महाराष्ट्र शासन हा कर 6 टक्क्यावर आणणार आहे का?

श्री.हसन मुश्रीफ : या संदर्भात सुध्दा मी उत्तर दिले आहे. 17.5 टक्के प्रवासी कर आहे तो 6 टक्क्यावर आणण्याबाबत सुध्दा शासन विचार करील.

श्री.सय्यद जामा : सभापति महोदय, यह बात सही है कि अवैध पाईवेट बस, टॅक्सी और जीप को बंद करने का प्रयास किया गया है, उन पर दंड लगाने का प्रयास किया गया है. लेकिन पर्यटन बस परवाने देने के कारण प्राईवेट वाहनों की संख्या बढ़ती जा रही है और ये बसे लांग रुट पर जैसे औरंगाबाद, पुणे इत्यादि शहरों में नियमित रुप से चलाई जा रही है जिससे एस.टी. महामंडल को नुकसान हो रहा है. पर्यटन बस परवाने के नाम पर ये बसे नियमित रुप से चल रही है. इसलिए क्या इन अवैध रुप से चल रही बसों को रोककर उन रास्तों पर एस.टी. की बसें चलाई जाएंगी ?

श्री.हसन मुश्रीफ : मी सांगितलेच आहे की, स्टेज कॅरियरचा अधिकार फक्त एसटी महामंडळाला आहे, इतर कोणालाही हा अधिकार नाही. ज्यांना टूरिस्ट लायसन्स दिले आहे ते फक्त कॉन्ट्रॅक्टवर प्रवासी वाहतूक करु शकतात. गावामध्ये पाटी लावून प्रवासी वाहतूक करता येणार नाही. अशी वाहतूक केली जात असेल तर त्याबाबत तपासून त्याठिकाणी एसटी सोडण्याचा शासन विचार करील.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, बीओटी तत्वावर बस स्थानकांचा विकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून त्याची त्वरित अंमलबजावणी करु असे मंत्रीमहोदयांनी सांगितले. चार वर्षापूर्वी ज्या बस स्थानकांचा बीओटी तत्वावर विकास करण्याचा निर्णय घेतला, त्या कामाचे टेंडर एका महिन्यात काढले जाईल का?

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : आम्ही हे काम लवकरात लवकर करु. एका महिन्यात टेंडर काढण्याचा प्रयत्न करु.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, एसटी प्रवासाबाबत ज्या सवलती दिल्या जातात त्याची प्रतिपूर्ती समायोजनाने केली जाते. कर्मचाऱ्यांच्या पगाराचे समायोजन करुन उर्वरित निधी दिला जातो. त्याऐवजी शासन डायरेक्ट तिजोरीतून निधी का देत नाही? हे सगळे समायोजनाने मॅनेज होणार नाही. आता मंत्रीमहोदयांनी सांगितले की, प्रवासी कर 17.5 टक्क्यावरुन 6 टक्के करु. सवलतीपोटी द्यावयाचा निधी, कर्मचाऱ्यांचे वेतन यांचे समायोजन कसे होईल? शासन स्वत:च्या तिजोरीतून हा पैसा देण्याचा विचार करणार आहे काय?

श्री.हसन मुश्रीफ : एकूण 23 प्रकारच्या सवलती एसटी प्रवासाच्या संदर्भात दिल्या जातात. 500 कोटी रुपयांचे समायोजन केले जाते. 535 कोटी रुपये कराच्या माध्यमातून द्यावयाचे असतात. 2007-08 पर्यंतचे 255 कोटी रुपये देणे शिल्लक आहे. याबाबत ताबडतोब निर्णय घेऊ. अशी रक्कम बजेटमधून देण्याचा शासन विचार करील.

तालिका सभापती (श्री.उल्हास पवार) : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून नियमित बैठक दुपारी 12.30 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.14 ते 12.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाही नाही

(स्थगिती नंतर)

सभापतीस्थानी माननीय सभापती

औचित्याच्या मुद्याबाबत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आज दुपारी कामकाज सल्लागार समितीची बैठक आहे. अधिवेशनाचे कामकाज किती दिवस घ्यायचे, अधिवेशन कधी संस्थगित करायचे यासंबंधीचा निर्णय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये होतो. पण आज आमच्या पुढे जी बातमी आली आहे, ती अत्यंत गंभीर आहे. माननीय संसदीय कार्य मंत्री यांनी वर्तमानपत्राकडे एक निवेदन दिले आहे. ते मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. हे अधिवेशन जास्त दिवस चालणार नाही यासंबंधात ती बातमी आहे. या बातमीत असे नमूद करण्यात आले आहे की, "याबाबत ससंदीय कामकाज मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, माझ्याशी दोन्ही सभागृहातील असंख्य आमदारांनी अधिवेशन लवकर संपवा, अशी मागणी केली आहे." त्यामुळे मला हे जाणून घ्यायची इच्छा आहे की, आमच्या सदनातील असे कोणते आमदार आहेत की, त्यांनी मंत्रिमहोदयांकडे अधिवेशन लवकर संपवा अशा प्रकारची मागणी केली आहे ? या बातमीमध्ये पुढे अशीही पुस्ती जोडण्यात आली आहे की, "या अधिवेशनाचा कमी केलेला कालावधी नागपूरच्या अधिवेशनामध्ये वाढवून देऊ." तेव्हा यासंबंधीची माहिती जाणून घेणे हा आमचा अधिकार आहे. माननीय संसदीय कार्यमंत्री अशाप्रकारे जाहीरपणे सांगत आहेत. तेव्हा या सदनातील किती आमदार आहेत की, ज्यांना हे अधिवेशन लवकर संपावे असे वाटते हे देखील आम्हाला कळले पाहिजे. तसेच हे अधिवेशन लवकर का संपावे याचे कारण देखील समजले पाहिजे. म्हणून मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरूनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, वर्तमानपत्रात अशी बातमी आली असेल तर ती चूक आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी ज्या बातमीचा उल्लेख केला आहे आणि ती जर वर्तमानपत्रात आली असेल तर ते बरोबर नाही. कारण अधिवेशनाचे कामकाज किती दिवस करायचे, अधिवेशनाचा कालावधी किती दिवस ठेवायचा हा अधिकार कामकाज सल्लागार समितीला आहे. कामकाज सल्लागार समितीचे जे सदस्य आहेत, त्यांना समितीमध्ये जेवढे कामकाज ठरविण्यात आले आहे, तेवढेच ते सदनाला आणि वृत्तपत्र प्रतिनिधींना सांगता येते. त्यापलीकडे काही सांगता येत नाही. पण वर्तमानपत्रात जी बातमी आली आहे, ती बरोबर नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उल्लेख केल्याप्रमाणे वर्तमानपत्रात बातमी आली असेल तर ते चुकीचे आहे एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अशा प्रकारची बातमी आली आहे, हे खरे आहे. ती येणे देखील बरोबर नाही. मुख्यत्वे हे सेशनच लहान आहे. तीन आठवड्यांचे आहे. त्यात सुद्धा कुणाची इच्छा आहे असे सांगणे हे बरोबर नाही. मला वाटत नाही की, दोन्ही सभागृहातील कोणी सन्माननीय सदस्यांनी असे म्हटले असेल. सन्माननीय सदस्यांच्या नावाने मोघमपणाने सांगणे हे काही बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांची तशी इच्छा आहे, असे मला व्यक्तिश: वाटत नाही.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.गुरूनाथ कुळकर्णी यांनी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. श्री.हर्षवर्धन पाटील हे संसदीय कामकाज मंत्री आहेत. वर्तमानपत्रात जी बातमी आली आहे, ती श्री.हर्षवर्धन पाटील बोलल्यामुळे आली का ? हे देखील तपासून पहावे लागेल. श्री.हर्षवर्धन पाटील हे विधान सभेच्या सभागृहात आहेत. तेथे थोडासा गोंधळ चालला आहे. त्यातून ते मोकळे झाल्या-नंतर त्यांना बोलावून घेऊ. विधान सभा कामकाज सल्लागार समितीचा मी देखील सदस्य आहे. तेव्हा अशाप्रकारची चर्चा श्री.हर्षवर्धन पाटील बाहेर करतील असे मला वाटत नाही. कारण ते नवीन मंत्री नाहीत. ते अनुभवी मंत्री आहेत. तेव्हा कदाचित त्यांचे नाव कोट करून वृत्तपत्राने बातमी देण्याची शक्यता नाकारता येत नाही. आजच कामकाज सल्लागार समितीची बैठक आहे. या बैठकीमध्ये किती दिवस कामकाज करायचे हे ठरेल. तेथे जो कार्यक्रम ठरविला जातो, तो दोन्ही सभागृहात मान्य केला जातो. ..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : औचित्याच्या मुद्याद्वारे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सभागृहाचे लक्ष वर्तमानपत्रातील एका बातमीकडे वेधले आहे. त्यावर सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुळकर्णी, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.अजित पवार यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. मी यासंबंधी माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांबरोबर जरूर चर्चा करीन. विधानसभा सभागृहातील त्यांचे कामकाज संपल्यानंतर संसदीय कामकाज मंत्र्यांना मी माझ्या दालनात बोलवून घेईन. दोन्ही सभागृहाचे कामकाज कसे करावे, किती दिवस करावे हे ठरविण्याचा अधिकार कामकाज सल्लागार समितीला आहे. कामकाज ठरविणे हा कोणा एका व्यक्तिचा अधिकार नाही. तेव्हा या बाबीवर मी माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांना खुलासा करायला जरूर सांगेन.

यानंतर श्री.पी.खर्चे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

संसदीय कामकाम मंत्री हे संसदीय कार्य विभागाचे काम अनेक वर्षांपासून पाहत असून ते एक जुने-जाणते मंत्री असल्यामुळे सभागृहाची तसेच कामकाज सल्लागार समितीची प्रतिष्ठा ते नक्कीच राखत आले आहेत. म्हणून त्यांच्या संदर्भात जो मुद्दा सभागृहात उपस्थित झाला आहे त्या अनुषंगाने त्यांना प्रत्यक्ष बोलावून त्यांचे याबाबतीतील मत काय आहे हे सभागृहाला ते सांगतील. आज कामकाज सल्लागार समितीची बैठक दुपारी 4.00 वाजता ठेवलेली असून सभागृहाचे कामकाज किती व कसे घ्यावयाचे आहे हे ठरविणे हा सर्वस्वी समितीचाच अधिकार आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

कसारा (जि.ठाणे) येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्याबाबत होणारी गैरसोय

(1) * 42117 श्री. रामनाथ मोते, श्री. संजय केळकर, श्री. विनोद तावडे, श्री. राजेंद्र जैन, श्री. जितेंद्र आव्हाड, प्रा. फौजीया खान : तारांकित प्रश्न क्रमांक 39457 ला दिनांक 1 एप्रिल, 2008 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कसारा जि.ठाणे गावाची लोकसंख्या सुमारे 30 हजार असून या गावातील नागरिकांना दिवसाआड पाणी मिळत असून मिळणारे पाणी गढुळ (गाळयुक्त) असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(2) माहे 2002 मध्ये जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून साडेतीन कोटीची योजना प्रस्तावित केली होती हे खरे आहे काय,

(3) तसेच लोकवर्गणीचा हिस्सा ग्रामस्थांनी यापूर्वीच जमा केला आहे हे खरे आहे काय असल्यास जीवन प्राधिकरणाने ही योजना पूर्ण न करण्याची कारणे काय आहेत,

(4) नवीन योजना कार्यान्वित करण्यात येणार असल्यास त्याचे स्वरुप काय आहे ?

श्री.अजित पवार : (1) हे अंशत: खरे आहे.

या भागात दिवसातून दोन वेळा सहा तासांकरिता वीज भारनियमन असल्यामुळे दररोज पाणीपुरवठा करता येणे शक्य नसल्याने एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तसेच सदर योजनेची देखभाल व दुरुस्ती कसारा ग्रामपंचायतीमार्फत केली जात असून पिण्याचे पाणी शुध्द करण्यासाठी टि.सी.एल.पावडर व तुरटीचा वापर करण्यात येतो.

(2) सन 2005 मध्ये योजना तयार करण्यात आली.

(3) योजनेचे सर्वेक्षण अंदाजपत्रके व आराखडे तयार करण्यासाठी लोकसहभागातून रु.50,000/- एवढी रक्कम म.जी.प्रा.स. भरणा केलेली आहे. योजनेकरीता जवळपास शाश्वत उद्भव नसल्यामुळे या योजनेसाठी प्रस्तावित उद्भव म्हणून अस्तित्वातील धरणाची साठवण क्षमता वाढविण्यासाठी धरणाची उंची वाढविणे, बळकटीकरण करणे, यासाठी लघुपाटबंधारे विभागाकडून अहवाल मागविला असून अहवाल प्राप्त होताच योजनेस अंतिम स्वरुप देता येईल.

(4) नवीन योजनेमध्ये अस्तित्वातील धरणाची उंची वाढविणे, धरणातील गाळ काढणे, पंपिंग मशिनरी, शुध्द पाण्याची गुरुत्ववाहिनी टाळणे 3.6 द.ल.लि. क्षमतेचे जलशुध्दिकरण केंद्र बांधणे, 9 लक्ष क्षमतेची उंच पाण्याची टाकी, 4.5 लक्ष क्षमतेची भुस्तर टाकी व वितरण वाहिन्या इत्यादि कामांचा समावेश आहे.

श्री. रामनाथ मोते : महोदय, हा प्रश्न ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात कसारा येथील ग्रामस्थांच्या पाणी पुरवठ्याबाबतचा आहे. यापूर्वी जी योजना या गावासाठी कार्यान्वित झाली ती सन 1986 मध्ये सुरु झाली. परंतु त्यावेळेस त्या गावाची लोकसंख्या 14 हजार होती. ही लोकसंख्या विचारात घेऊन ही योजना आखली होती. परंतु त्या लोकसंख्येत वाढ होऊन ती आता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

30 हजारावर गेली आहे त्यामुळे जो पाणीपुरवठा होत आहे तो एक दिवसाआड होतो तसेच दूषित पाण्याचा पुरवठा या गावाला होत आहे, असे शासनानेही मान्य केले आहे. यासंदर्भात जी नवीन योजना तयार झाली आहे त्याबाबत 1 एप्रिल, 2008 रोजी शासनाने उत्तर दिलेले असून, त्यात या योजनेचे काम प्रगतीपथावर असल्याचे सांगण्यात आले होते. आता ही योजना राबविण्याचे शासनाने निश्चित केले आहे. परंतु ही योजना किती दिवसात पूर्ण होण्याची शक्यता आहे ? याचा खुलासा करावा.

श्री. अजित पवार : महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा खरा आहे की, सन 1988 साली ही योजना कार्यान्वित करण्यात आली. परंतु सध्याच्या परिस्थितीत या भागात मोठया प्रमाणावर लोकसंख्या वाढल्यामुळे जेवढे पाणी मिळायला पाहिजे तेवढे पाणी मिळत नाही. म्हणून शासनाने असा निर्णय घेतला आहे की, कसारा गाव आणि गांगडवाडी मिळून एक योजना करावयाची, कांबळीपाडा आणि धोबीपाडा हे कसारा योजनेतील पाडे जे सध्याच्या योजनेवर अवलंबून आहेत ती गावे बाजूला काढावीत आणि या दोन आदिवासी पाड्यांसाठी जो विहिरीचा लोकल सोर्स आहे तो घेऊन एक वेगळी योजना करावयाची आणि मोखवडे गावासाठी तेथील डॅमखाली एक विहिर स्वतंत्रपणे घ्यावयाची व त्यात कांबळीपाडा आणि धोबीपाडा ही दोन हजार वस्तीची गावे आणि मोखवडे हे तीन हजार वस्तीचे गाव असे मिळून पाच हजार लोकसंख्या असलेला भाग कमी झाल्यानंतर ओरिजिनल योजनेचे पाणी कसारा गाव आणि बेंगडवाडी या गावांना पुरेल. यापूर्वी एमजेपीने एक तलाव तेथे केला होता. तसेच हे करण्यासाठी धरणाची उंची वाढविणे आवश्यक आहे. म्हणून यासंदर्भात जलसंपदा व पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना मी सूचना दिल्या आहेत की, या धरणाची उंची वाढवावयाची असल्यास त्यात वन विभागाची अडचण येण्याची शक्यता आहे काय, अथवा कोणाचा त्याला विरोध आहे काय, तसेच कॅचमेंट एरियाचा विचार करता आणखी साठा वाढण्याची आवश्यकता, अशा सर्व परिस्थितीचा विचार करुन ठराविक मुदतीत प्रस्ताव सादर करावा. पण ज्यावेळी धरणाची उंची वाढविण्यात येते तेव्हा वन विभागाची अडचण नसेल तर ते काम तातडीने हाती घेऊ. आणि आता मात्र तातडीने काम करावयाचे असेल तर हे काम आपण दोन टप्प्यात करावयाचे ठरविले आहे. त्यात पहिला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42117..... श्री. अजित पवार .....

टप्पा म्हणजे तेथील गळती थांबवावयाची आणि हे काम मार्च 2009 पर्यंत पूर्ण करता येईल. आता पावसाळा असल्यामुळे, पाऊस जरी पडला नसला तरी सप्टेबर-ऑक्टोबर नंतरच या कामाला गती देता येईल, म्हणून मार्च 2009 पर्यंत हे काम करु शकतो. तसेच दुसऱ्या टप्प्यात धरणाचे मजबुतीकरण करणे, उंची वाढविणे अशी कामे करावयाची आहेत. त्यासाठी पाणीपुरवठा व जलसंपदा अशा दोन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांनी जॉइंट इन्स्पेक्शन करावे लागेल. कारण धरणाची उंची वाढल्यानंतर पूर्वीचा जो पाया घेतला आहे तो व्यवस्थित आहे काय, अशा सर्व बाबी या जॉइंट इन्स्पेक्शनच्या माध्यमातून पाहिल्या जातील.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :42117.....

श्री. अजित पवार ....

व या ठिकाणी पाण्याची अडचण येणार नाही यासाठी काही उपाययोजना केलेल्या आहेत. मोखवडे आणि कसारा ग्रामपंचायतीने शुध्द पाण्याचा पुरवठा होता असे आम्हाला पत्र दिलेले आहे. मधील काळात या गावांना जरुर गढूळ पाणी येत होते परंतु आता पाणी शुध्द करण्यासाठी टीसीएल पावडर आणि तुरटीचा उपयोग होत असल्यामुळे पाणी शुध्द येत आहे. पाण्याच्या संदर्भात या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिलेली आहे ती सत्य आहे. कसा-याला पाणी कमी पडू दिले जाणार नाही याची निश्चितपणे खबरदारी घेतली जाईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, सदर प्रश्नाचे लेखी उत्तरात तपशीलवार माहिती देण्यात आलेली आहे. सन 2002 मध्ये या ठिकाणच्या ग्रामस्थानी त्यांच्या वाटयाची 50,000/- रु. लोकवर्गणी भरली होती. सन 2002 मध्ये या कामाची किंमत 3.5 कोटी रुपये होती. सात वर्षानंतर या ठिकाणच्या लोकवस्तीमध्ये वाढ झालेली आहे. आराखडे काढणे, धरणाची उंची वाढवणे, गाळ काढणे पंपिंग मशिनरी यासारख्या कामासाठी शासनाने तरतूद केलेली आहे काय ? आता या ठिकाणच्या लोकवस्तीमध्ये मोठया प्रमाणात भर पडली असून आता या ठिकाणी अशा प्रकारचे काम झाले नाही तर लोकवस्ती वाढल्यामुळे या गावांच्या लोकांना पाण्याचा त्रास अजून भेडसावू लागेल. त्यामुळे या कामासाठी किती तरतूद करण्यात आलेली आहे व या ठिकाणच्या प्रत्यक्ष कामाला कधी सुरुवात होणार आहे ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, कसारा येथील नळपाणी पुरवठा करण्यासाठी ग्रामस्थांनी 50 हजार रुपयांची लोकवर्गणी दिली नव्हती तर त्यांनी 7.44 लक्ष रुपये अकाऊंटमध्ये जमा केले होते. त्यांचा हिस्सा त्यांनी पूर्णपणे भरलेला आहे. या ठिकाणच्या कामाला दोन टप्प्यात सुरुवात होणार आहे. पावसाची अडचण नसेल तर गळती थांबविण्याचे काम पहिल्या टप्प्यात करण्यात येईल व दुस-या टप्प्यात एक महिन्याच्या आत जलसंपदा आणि पाणीपुरवठा विभाग एकत्र बसून इंसपेक्शन करेल व एक महिन्याच्या आत रिपोर्ट देतील. हा आदिवासी भाग असल्यामुळे या ठिकाणी निधीची अडचण येणार नाही हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. ब-याच दिवसापासूनचा हा प्रलंबित प्रश्न आहे त्यामुळे तातडीने निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

---------- ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गोंदिया जिल्ह्यातील हलबीटोला (कोटरा) उपसा जलसिंचन योजनेच्या कामाची प्रगती व सद्य:स्थितीबाबत

(२) * ४२३८१ श्री. जगदीश गुप्ता , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.केशवराव मानकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३८७२३ ला दिनांक ११ मार्च, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील हलबीटोला (कोटरा) उपसा जलसिंचन योजनेला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार किती निधी मंजूर करण्यात आला आहे,

(३) असल्यास, निधी उपलब्धतेनुसार प्रकल्पाचे काम केव्हा सुरु करण्याचे शासनाचे नियोजन आहे,

(४) अद्यापपर्यन्त सदर प्रकल्पासंदर्भात कोणतीच कार्यवाही झाली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात : (१) होय.

(२) आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, जो प्रश्न विचारलेला आहे त्याचे उत्तरच तारांकित प्रश्नाच्या यादीमध्ये देण्यात आलेले नाही. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, या प्रकल्पासाठी किती निधी लागणार आहे व हा निधी किती दिवसात उपलब्ध करुन दिला जाणार आहे"?

श्री. बाळसाहेब थोरात : सभापती महोदय, प्रकल्पाची किंमत १.५४ कोटी रुपये असून या प्रकल्पाला जुलै महिन्यात प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या मानसून अधिवेशनातील पुरवणी मागण्यात हा विषय सबमिट न झाल्यामुळे डिसेंबरच्या अधिवेशातील पुरवणी मागण्यामध्ये यासंदर्भात तरतूद करण्यात येईल. पहिल्या वर्षी ३० लक्ष रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे.

...३..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष डावलून अन्यत्र निधी वळविल्याबाबत

(३) * ४२३१६ श्री. दिवाकर रावते , श्री. अरविंद सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. सुरेश जेथलिया , श्री.परशुराम उपरकर : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने स्विकारलेल्या व शासनावर आता बंधनकारक असलेल्या तरतुदीनुसार विदर्भाच्या सिंचनाच्या निधीची कोट्यावधी रुपयांची रक्कम मध्यांतरी शासनाने अन्यत्र वळविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिंचन निधी शासनाने अन्यत्र वळविल्याने विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष वाढला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या मागास भागावरील अन्याय दूर करण्यासाठी शासनास (मुख्याला) असलेल्या घटनात्मक अधिकारान्वये व विदर्भाचा सिंचनाचा निधी अन्यत्र वळविण्याची भरपाईपोटी सिंचनासाठी आता प्रत्यक्षात विदर्भाला २ हजार ४७८ कोटी रुपये शासनाला द्यावे लागणार आहेत, हे खरे आहे काय ?

डॉ. सुनील देशमुख, श्री. अजित पवार यांच्याकरिता : (१) नाही. तथापि राज्यातील ११ जिल्हयात उद्‌भवलेल्या दुष्काळी परिस्थितीमध्ये राज्यपालांच्या मान्यतेने सदर जिल्हयातील प्रकल्पांना रु. १,५०० कोटीचा निधी उपलब्ध करणे, या व अन्य कारणाने, निधीचे वाटप निदेशाप्रमाणे राहू शकलेले नाही.
सन २००४-०५ व २००५-०६ या कालावधीत निदेशाच्या तुलनेत उर्वरित महाराष्ट्रात झालेल्या रु. १६१७.२५ कोटी अतिरिक्त खर्च सन २००७-२००८ पासून तीन वर्षात समायोजित करण्याचे निदेश मा. राज्यपालांनी दिलेले आहेत. त्यानुसार उर्वरित महाराष्ट्रातील प्रकल्पांना उपलब्ध होणाऱ्या निधीतून रु. ५३९.०८ कोटीची कपात करुन मराठवाडयास रु. १००.२६ कोटी व विदर्भासाठी रु. ४३८.८२ कोटी वाढ करण्यात येऊन समायोजन करण्यात आलेले आहे.
(२) निदेशाप्रमाणे समायोजन करण्यात येत असल्याने आर्थिक अनुशेष वाढणार नाही.
(३) प्रश्न उदभवत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विदर्भाच्या सिंचनाचा कोटयावधी रुपयांचा निधी शासनाने इतरत्र वळविला होता. निधीचे वाटप निदेशाप्रमाणे होऊ शकलेले नाही अशी माहिती उत्तरात दिलेली आहे. घटनेच्या 371(2) प्रमाणे अशा प्रकारे एका भागाचा निधी दुस-या भागाकडे वळवता येत नाही तरी सुध्दा निधी वळवण्यात आलेला आहे. आता दुष्काळी परिस्थिती आहे. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, 3 वर्षात निधी न वळविण्याच्या संदर्भातील कारणे लेखी उत्तरात दिलेली आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42316 श्री.दिवाकर रावते..

राज्यातील मराठवाडा आणि विदर्भ भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून त्या संदर्भात सभागृहात देखील चर्चा झालेली आहे. तेव्हा या व्यतिरिक्त किती निधी दुष्काळाच्या नावाखाली या भागासाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, निधी वळवला होता हे म्हणणे योग्य नाही.

श्री.दिवाकर रावते : उत्तरामध्ये तसे म्हटलेले आहे.

डॉ.सुनील देशमुख : तसे कोठेही म्हटलेले नाही. उर्वरित महाराष्ट्रातील 11 जिल्हयामध्ये जेव्हा दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली होती त्यावेळी दीड हजार कोटी रुपये अतिरिक्त देण्यात आले होते.माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार आणि माननीय राज्यपालांची मान्यता घेऊनच अतिरिक्त निधी त्यावेळी देण्यात आला होता. त्यानंतर जे ॲब्रेजन झाले होते ते 2006-2007 सालापासून आपण करेक्ट करीत आहोत. त्याचबरोबर 539 कोटी रुपये उर्वरित महाराष्ट्राच्या निधीतून वजा करुन त्यातील 100 कोटी रुपये मराठवाडयाला आणि 439 कोटी रुपये विदर्भाला अशा प्रकारे दरवर्षी आपण अतिरिक्त निधी देत आहोत. त्यामुळे विदर्भातील अनुशेष भागातील पैसे दुसरीकडे वळवले आहे असे म्हणणे खरे नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, " नाही, तथापि राज्यातील 11 जिल्हयात उद्भवलेल्या दुष्काळी परिस्थितीमध्ये राज्यपालांच्या मान्यतेने सदर जिल्हयातील प्रकल्पाना रु.1500 कोटीचा निधी उपलब्ध करणे, या व अन्य कारणाने, निधीचे वाटप निदेशाप्रमाणे राहू शकलेले नाही. " तेव्हा याचा नेमका अर्थ काय आहे ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, विदर्भाचे पैसे उर्वरित महाराष्ट्रासाठी दिलेले नाहीत तर त्यांना अतिरिक्त पैसे दिले होते. त्यामुळे तो पैसा विदर्भाचा होता आणि तो विदर्भाचा पैसा वळवून उर्वरित महाराष्ट्राला दिला हे म्हणणे योग्य नाही असा खुलासा मी केला होता.

प्रा.बी.टी.देशमुख :सभापती महोदय, राज्यातील 11 जिल्हयामध्ये त्यावेळी दुष्काळी स्थिती निर्माण झाली होती त्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी त्यांना 1500 कोटी रुपये.माननीय राज्यपालांच्या परवानगीने फॉर्म्युल्यापेक्षा अतिरिक्त निधी दिला होता. ही दोन तीन वर्षापूर्वीची गोष्ट होती. त्यानंतर माननीय राज्यपालांनी असे निदेश दिले होते की मूळ सूत्रामध्ये जे डेव्हीएशन

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42316 प्रा.बी.टी.देशमुख..

झालेले आहे ते भरुन काढण्यात यावे. या संदर्भात मला माननीय मंत्रिमहोदयांना दोन तीन लहान लहान प्रश्न विचारावयाचे आहेत. विदर्भामध्ये तसेच मराठवाडयामध्ये काही जिल्हयामध्ये मोठा अनुशेष आहे तेव्हा अनुशेषग्रस्त जिल्हयाचा पैसा अनुशेष ग्रस्त जिल्हयातच खर्च व्हावयास पाहिजे. म्हणजे हे जिल्हे सरासरीवर येण्या इतके प्रकल्प तरी त्या जिल्हयात सुरु व्हावयास पाहिजेत. नवीन प्रकल्पांना मान्यताच देण्यात येणार नाही अशा प्रकारची भूमिका मध्यंतरी शासनाने घेतली होती त्या संदर्भात वित्त विभागाने जी अडचण निर्माण केली होती ती अडचण आता दूर करण्यात आली होती. आता या प्रकल्पाना मान्यता देण्यात येत आहे. त्यासाठी अमरावतीला चीफ इंजिनिअर यांचे एक जादा कार्यालय देण्यात आलेले आहे, त्याचबरोबर सर्व्हेच्या काही तुकडया मंजूर करण्यात आल्या आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, त्या फॉर्म्युल्याप्रमाणे प्रत्येक जिल्हयाच्या वाटयाला किती निधी मिळणार आहे हयाची माहिती आपल्या समोर आहे.हा निधी खर्च होण्यासाठी व त्या प्रकल्पांना मान्यता देण्यासाठी सर्व्हेक्षण करण्याची एक यंत्रणा पाठविलेली आहे त्यामध्ये गेस्ट इंजिनिअर्सच्या टीम पाठविण्यात येणार आहे काय ? महाराष्ट्राच्या इतर भागामध्ये मोठया प्रमाणावर प्रकल्पाच्या सर्व्हेक्षणाचे काम सुरु नसल्यामुळे ते कर्मचारी या ठिकाणी पाठवून या प्रकल्पाचे सर्व्हेक्षण लवकर करुन त्या कामांना मान्यता देण्यता येणार आहे काय ? त्यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, माननीय पंतप्रधानांनी श्री.आदेश मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती व तिने अशी शिफारस केली होती की, त्या भागाला दिलेला निधी हा त्याच भागात खर्च केला पाहिजे परंतु जर तो खर्च त्या भागात खर्च होत नसेल तर "नॉन लॅप्सेबल अकाऊन्ट" त्या ठिकाणी ओपन करुन त्यात हा निधी जमा करण्यात यावा व हा निधी लॅप्स न होता पुढच्या वर्षात हा पैसा खर्च करण्यात यावा. या सूचनांचा विचार करण्यात येणार आहे काय ? अनुशेषग्रस्त भागाचा हा प्रश्न असल्यामुळे यामध्ये एकूण दोन बाबी आहेत त्या ठिकाणी इंजिनिअर्सची जादा कुमक पाठवून दोन चार महिन्यात खर्च होऊ शकेल इतक्या प्रकल्पांना मान्यता देण्यात येणार आहे काय, त्याचप्रमाणे माननीय पंतप्रधानी नेमलेल्या समितीने केलेल्या शिफारशीचा शासन विचार करणार आहे काय ?

नंतर श्री.सुंबरे

अशोधित प्रत / अशोधित प्रत नाही

ता.प्र.क्र. 42316 ....

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर 'होय' असे आहे आणि दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर आहे 'जरूर विचार करू'.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, विदर्भासाठी दिलेल्या पंतप्रधान पॅकेज 3750 कोटी रूपयांचे आहे त्यातून 2200 कोटी रूपये सिंचनासाठी प्रस्तावित केलेले आहेत. तर या 2200 कोटी मधील किती पैसे या दोन वर्षात प्रत्यक्ष देण्यात आले आहेत ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, पंतप्रधान पॅकेजमध्ये 2177 कोटी रूपये पाटबंधारे प्रकल्प जे आपण घेतले होते त्यासाठी दिलेले होते आणि त्यातील या दोन वर्षामध्ये जवळपास 1800 कोटी रूपये पूर्ण खर्च झालेले आहेत.

****

..... एफएफ 2 .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तिसगांव प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेबाबत केलेले उपोषण

(4) * 43443 श्री.यशवंतराव गडाख, श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री.संजय दत्त : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) तिसगांव येथे प्रादेशिक नळ योजनेचे पाणी मिळावे याकरीता पाथर्डी येथील तहसील कार्यालयासमोर नागरिकांनी दिनांक 26 मे, 2008 रोजी उपोषण करुन आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त योजनेच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे व सदर काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(3) या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार : (1) होय,
(2) व (3) मिरी तिसगाव व 22 गावे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेत तिसगाव या गावाचा समावेश असून योजनेतून पाणी पुरवठा करण्याकरिता तिसगाव येथे चार उंच टाक्या बांधावयाचे असून त्यापैकी प्रतापनगर व माळीवाडा येथील दोन उंच टाक्यामार्फत दिनांक 6.6.2008 व दिनांक 15.6.2008 पासून पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे. उर्वरित दोन जलकुंभ (1) शिरापूर रोड कोठ विभाग व (2) पाथर्डी रोड देशमुख मळा येथील उंच टाकीमधून पाणी पुरवठा करण्याचे काम पूर्णत्वाच्या टप्प्यावर आहे, ते पूर्ण करुन गावास पाणी पुरवठा करण्यात येईल,
(4) कार्यवाही सुरु असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, प्रतापनगर व माळीवाडा येथे पाणीपुरवठा सुरू झालेला आहे असे येथे सांगण्यात आलेले आहे. पण तो पाणीपुरवठा पुरेसा आहे काय ? तसेच शिरापूर रोड कोठ विभाग व पाथर्डी रोड देशमुख मळा येथील पाणी पुरवठ्याची सध्याची परिस्थिती काय आहे ? तेथे किती दिवसात पाणी पुरवठा होणार आहे ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, ही जवळपास 22 गावांची पिण्याच्या पाण्याची योजना आहे. यामध्ये सुरूवातीच्या काळात जे काम झालेले आहे त्यात काही ठिकाणी पाईपलाईन खराब लागली म्हणून ती बदलण्याचा निर्णय घेण्यात आला. साधारणत: जेनुकाईवाडी ते जावखेड फाटा येथे 300 मि.मि.ची डीआयके 9 लाईन टाकणे असा बदल केला आहे आणि हे 5 कि.मी.चे काम केलेले आहे. मी मघाशी बोलताना सांगितले नाही. पण ही गोष्ट खरी आहे की, राज्यामध्ये सध्या मोठ्या प्रमाणात भार नियमन सुरू असल्याने राज्यात जेथे जेथे अनेक गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना आहेत, काही ठिकाणी त्या 22 गावांसाठीच्या आहेत तर काही 58 गावांसाठीच्याही आहेत.,

..... एफएफ 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या योजनांना पूर्ण क्षमतेने वीज मिळाली नाही तर अडचण येऊ लागली आहे. त्यामुळे सगळ्याच जिल्ह्यांना एक सूचना करण्यात आलेली आहे की, अशा प्रकारे लोड शेडींग मोठ्या प्रमाणात असल्याने आपल्याला सर्व गावांना पिण्याचे पाणी देता येत नसेल तर जेथे पाणी देता येत नसेल अशा ठिकाणी तातडीने टँकरद्वारा पाणी देण्याची व्यवस्था करण्यात यावी. सभापती महोदय, मिरी तिसगाव व 22 गावे ही प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना आहे तिचे केलेले काम आहे त्यात उशीर झाला आहे. साधारणत: 30 कोटी रूपयांचे हे काम असून जून 2008 पर्यंत साडेअठ्ठावीस कोटी रूपये आपण खर्च केलेले आहेत. तसेच तीसगावमध्ये ऑगस्ट 2008 पर्यंत म्हणजेच येत्या सव्वा महिन्यात तो पाणीपुरवठा करण्यात येईल आणि झोन 2 मधील दोन पाईपलाईन्स बदलणे आणि टाकी बदलण्याचे काम मार्च 2009 पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तेथील पीव्हीसी पाईप्स आहेत त्यात काही गळती आहे ती काढण्याचे कामाचे नियोजन ऑक्टोबर 2008 पर्यंत करण्यात आलेले आहे आणि त्याप्रमाणे संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, मी एक या संदर्भात कॉमन प्रश्न विचारू इच्छितो. आताच्या परिस्थितीत पिण्याच्या पाण्याची योजना ही प्रत्येक ठिकाणी मग ती नगरपालिका असेल, जिल्हा परिषद असेल, ग्रामपंचायत असेल तेथे पिण्याच्या पाण्याच्या योजनेची कामे होत नाहीत कारण पाईप्सचे दर डीएसआर पेक्षा 60 ते 80 टक्क्यांनी वाढलेले आहेत आणि त्या संस्थांना 5-10 टक्क्यापेक्षा अबोव्ह दर देता येत नाहीत. त्यामुळे ती कामे अपूर्ण अवस्थेत पडत आहेत. तेव्हा याबाबत शासन काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रघुवंशी यांनी उपस्थित केलेला प्रश्न अगदी बरोबर आहे. जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग, ग्रामविकास विभाग या विभागांना सध्या हा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. कारण ठराविक काळात स्टील आणि सिमेंटच्या किंमती या प्रचंड प्रमाणात वाढलेल्या आहेत. त्यामुळे डीएसआरचे रेट हे अधून मधून एकंदरीत बाकीचे दर लक्षात घेऊनच ठरविले जातात. परंतु काही चर्चा करीत असताना असे सांगण्यात आले की, आंध्र प्रदेशने याबाबत एक पॅटर्न ठरविला आहे आणि त्यांनी यासाठी एक सचिव पातळीवर समिती केलेली आहे आणि त्या समितीलाच याबाबतचे अधिकार दिले आहेत की, त्या समितीने दरमहिन्याला सिमेंट, स्टील वगैरेचे दर किती वाढले आहेत हे लक्षात घेऊन त्यानुसार दर वाढवावेत. .. (यानंतर श्री. सरफरे ....जीजी 1 ...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीकी चाही

ता.प्र.क्र. 43443...

श्री. अजित पवार...

ते कॅबिनेटपुढे येत नाही, मंत्र्यांकडे येत नाही. आता सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे रेट वाढल्यामुळे बऱ्याच कॉंट्रॅक्टर्सना काम परवडत नाही म्हणून ते सोडून निघून जातात. त्याठिकाणी नवीन कॉंट्रॅक्टर नेमून त्यांचे टेंडर काढण्यास विलंब होतो. त्याकरिता आपल्याला नवीन काही व्यवस्था निर्माण करता येईल काय हे तपासून बघतो. आणि हा निर्णय 15 ऑगस्ट 2008 अखेरपर्यंत जितक्या लवकर घेता येईल तितक्या लवकर घेण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न राहील.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, आज सर्व ठिकाणी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. गावामध्ये पाणी आहे, परंतु वीज नसल्यामुळे लोकांना पाणी मिळत नाही. वीज रात्रीच्या वेळी येत असल्यामुळे लोकांना रात्र रात्र जागून रांगा लाऊन पाणी भरावे लागते. याकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाने राज्य विद्युत मंडळाला सांगून रात्री वीज पुरवठा करण्याऐवजी दिवसा वीज पुरवठा केला तर लोकांना पाणी मिळेल. अशाप्रकारचे आवाहन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण करणार आहे काय?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, तसे करण्याचा प्रश्न नाही. राज्यात दिवसा अनेक भागामध्ये लोड शेडींग असते. एखादी पाणी पुरवठा योजना ही दोन जिल्हयांशी निगडीत असेल, दोन जिल्हयांच्या सीमेपर्यंत असेल उदा. पुणे जिल्हयामध्ये सकाळी 6 ते 9 पर्यंत लोड शेडींग असेल आणि शेजारी सातारा जिल्हा असेल आणि त्या पिण्याच्या पाण्याच्या योजनेवर दोन्ही जिल्हे अवलंबून असतील तर त्या योजनेला एकाच वेळी वीज पुरवठा सुरु ठेवावा असे ऊर्जा विभागाला सांगितले आहे व त्यांनी ते मान्य केले आहे. या बाबतीत विभागाने सांगितले आहे की, दोन्ही जिल्हयाकरिता असलेल्या पाणी पुरवठा योजनेकरिता ट्रान्सफॉर्मरमधून एकाच वेळी वीज पुरवठा करण्यात येईल. त्यामुळे हा वीज पुरवठा दिवसा होईल की रात्री होईल हे सांगता येणार नाही. जेव्हा केव्हा वीज पुरवठा होईल त्यावेळी आपणास टाकीमध्ये पाणी भरुन घ्यावे लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/ SBT/ MMP/

राज्यातील नद्यांचे पाणी दूषित असल्याबाबत

(५) * ४१९७५ डॉ. निलम गोऱ्हे , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप , श्रीमती मंदा म्हात्रे , प्रा. फौजीया खान , श्री. राजेंद्र जैन , डॉ. वसंत पवार , श्री.राम पंडागळे , श्री.विक्रम काळे , श्री.रमेश शेंडगे , श्री. अरविंद सावंत , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री.परशुराम उपरकर , श्री. किसनचंद तनवाणी : तारांकित प्रश्न क्रमांक ४०४९७ ला दिनांक १५ एप्रिल, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नद्यांमधील झालेले जलप्रदूषण नष्ट करण्यासंदर्भातील शासनाच्या विचाराधीन असलेल्या अहवालावर निर्णय घेण्यात आलेला आहे काय,

(२) उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

श्री.अजित पवार : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) सदर अहवाल मुख्य अभियंता जलविज्ञान प्रकल्प नाशिक यांचे पत्र दि. १५.७.२००८ नुसार शासनास प्राप्त झाला आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, नद्यांमधील दूषित पाण्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. महाराष्ट्रामध्ये जवळ जवळ सर्व नद्यांमध्ये उदा. गोदावरी, विदर्भातील नागभीड, पंचधारा, कृष्णा अशा अनेक नद्यांमधील दूषित पाण्यासंबंधीचा अहवाल शासनाकडे प्राप्त झाला आहे. त्यानुसार नगरपालिकेमार्फत एक टक्का देखील पाण्याचे शुध्दीकरण होत नाही. दररोज किमान ५०० कोटी लिटर पाणी महाराष्ट्रामधील नदीमध्ये प्रदूषित होत आहे. सन २००५-०६ चा जो अहवाल आला आहे त्यामध्ये म्हटले आहे की, ७५१ कोटी लिटर पाणी प्रदूषित होत आहे. त्यापैकी ५५० कोटी लिटर पाणी शुध्द केले जाते असे हा अहवाल सांगत आहे. ५५० कोटी लिटर पाणी नदीमध्ये प्रदूषित होऊन ते सर्वत्र पसरते. आणि आपल्या प्रदूषण नियंत्रण मंडळाचा अहवाल आपणाकडे असून त्यामध्ये फक्त १ कोटी लिटर पाणी अशुध्द होते. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, प्रदूषण नियंत्रण मंडळाचा हा संपूर्ण अहवाल रद्द करुन याबाबतीत परिपूर्ण कार्यवाही करण्यासाठी नदी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/ SBT/ MMP/

ता.प्र.क्र. **४१९७५....**

डॉ. नीलम गोऱ्हे....

सुधार योजना आपण सुरु करणार आहात काय? त्यादृष्टीने आपण कोणती उपाय योजना करणार आहात?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, संबंधित अहवाल दिनांक १५.७.२००८ रोजी तपासणी करण्याकरिता शासनाकडे आला. माननीय सदस्य म्हणत आहेत ती गोष्ट खरी आहे. सद्या ४२ टक्के नागरीकरण झाले असल्यामुळे शहर आणि नगरपालिका क्षेत्रामध्ये असलेल्या नद्यांमधून प्रक्रिया न केलेले सांडपाणी सोडण्यात येते. त्याचप्रमाणे नगरपालिकेचे घनकचरा निर्मूलनाचे काम आहे. त्यामुळे शहरी भागातील नगरपालिका क्षेत्राच्या आजूबाजूला नदी असेल तर त्यामधील पाणी मोठया प्रमाणावर प्रदूषित होते. त्यामुळे शासनाकडे हा अहवाल नुकताच आलेला असून त्यावर अभ्यास करुन कोणती कारवाई करावयाची ते ठरविण्यात येईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, नद्या आणि सागर या दोन्ही ठिकाणी प्रदूषण होत आहे. हे जल प्रदूषण आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळातील प्रदूषण अशी दोन प्रकारची प्रदूषणे आहेत. यावरील उपाय जलविद्युत प्रकल्पाच्या बाबतीत आहे. याबाबतीत माझे म्हणणे असे आहे की, पंचगंगेच्या काठावरील अनेक कार्यकर्त्यांनी देखील भाग घेतला होता. यामध्ये वाळूचा होत असलेला उपसा आणि कंपन्यांच्या माध्यमातून, नागरिकांच्या माध्यमातून सोडण्यात येणारे अशुध्द पाणी चिपळूणजवळ असलेल्या सावित्री व वशिष्टी या दोन्ही नद्यांमध्ये सोडले जाते आणि त्यामुळे तेथील पाणी मोठया प्रमाणात प्रदूषित होत असते.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, आपल्याकडे जो अहवाल आलेला आहे, त्यावर आपण किती दिवसामध्ये कार्यवाही करणार आहात ? नाहीतर तुम्ही असे सांगाल की, आम्ही अहवाल तपासत आहोत. तसेच सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी प्रश्न विचारला आहे की, या अहवालाच्या बाबतीतील कार्यवाही किती दिवसामध्ये सुरु करणार आहात ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य जल गुणवत्ता आढावा समिती होती. सचिव, जलसंपदा विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती करण्यात आली होती. जल गुणवत्ता मुल्यांकन प्राधिकरणाची केंद्रीय स्तरावर केंद्र शासनाने स्थापना केली. त्यावेळी त्यांनीच असे सांगितले होते की, प्रत्येक राज्यांनी अशा-अशा प्रकारे आढावा समिती स्थापन करावी आणि त्या मध्ये वेगवेगळया राज्यस्तरीय संस्था समाविष्ट झालेल्या होत्या. जलविंधन प्रकल्प, पाटबंधारे संशोधन विकास संचालनालय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा या सर्वांनी मिळून सगळया भागातील अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. वेगवेगळया ठिकाणचे पाण्याचे नमुने देखील घेण्यात आलेले आहेत. सगळयाच विभागांनी पूर्णपणे ताकद लावून हे सर्व काम केले. त्यावेळेस हेही लक्षात आले की, गोदावरी, तापी, मुळा-मुठा, भीमा, कृष्णा, वर्धा, वैनगंगा, उल्हास इ.ठिकाणी कुठे-कुठे मोठया प्रमाणात प्रदूषणाची ठिकाणे आहेत आणि त्यासंबंधात काय केले पाहिजे ? याचा विचार केला. तसेच कुठे पी.एच.जास्त आहे ? कुठे डी.ओ.जास्त आहे ? इ.सर्व गोष्टी अहवालामध्ये आलेल्या आहेत. आम्ही

. . . .2 एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठरविले आहे की, मंत्रिमंडळाच्या समोर या अहवालाच्या संदर्भातील प्रेझेंटेशन करावयाचे आहे. त्यानंतर याबाबतीत मंत्रिमंडळ निर्णय घेईल आणि यामध्ये ॲक्शन प्लॅन तयार केला जाईल. हे सर्व एकाच विभागाशी संबंधित नाही. तर हे वेगवेगळया विभागाशी संबंधित असल्यामुळे मंत्रिमंडळ यासंबंधातील निर्णय घेईल. एक गोष्ट खरी आहे की, पावसाळा सुरु झाल्यानंतर नदीमध्ये जास्त पाणी आले की, बऱ्याचशा शहरातील घनकचरा या पाण्यामध्ये टाकला जातो. बऱ्याचशा ठिकाणी सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॅन्ट नाही. त्यामुळे खूप मोठया प्रमाणात अडचणी निर्माण होतात. याबाबतीत काय उपाययोजना केल्या पाहिजेत यासंदर्भात समितीने अतिश्याय व्यवस्थितपणे सांगितलेले आहे. यासंदर्भात जवळपास 11 शिफारशी आणि उपाययोजना सुचविलेल्या आहेत. त्यामुळे मी ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील. अशा प्रकारे सर्व गोष्टी तपासून मंत्रिमंडळामध्ये देखील याबाबत चर्चा होईल. तसेच यामधील काही तज्ञ लोकांचा अधिकाऱ्यांचा सल्ला घेण्यात येईल आणि जल गुणवत्ता पर्यवेक्षण आणि जल गुणवत्तेचा कल पाहणी ही उद्दिष्टे जल विज्ञान प्रकल्पाकडे असून प्रदूषण नियंत्रण आणि व्यवस्थापन ही उद्दिष्टे राज्य आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे आहेत. त्यामुळे जल प्रदूषण नियंत्रण करण्याच्या दृष्टीने प्रभावी उपाययोजना करण्याची जबाबदारी ही प्रदूषण नियंत्रण मंडळावर येईल. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी बोलत असताना एका मंडळाच्या बाबतीत टीकाटिप्पणी केली. काही ठिकाणी त्रुटी असतील, चुका असतील त्या दुरुस्त करुन एकंदरीतच मोठया प्रमाणावर नद्यांच्या पाण्यामध्ये जे प्रदूषण होते, त्यामुळे सगळयाच पर्यावरणाचा समतोल किंवा आपल्याला एका नवीन समस्येला सामोरे जावे लागते. या सर्व गोष्टी लक्षात घेऊनच महाराष्ट्र जल गुणवत्ता आढावा समितीचा अहवाल साधारणपणे ऑगस्टच्या अखेर म्हणजे 31 ऑगस्टपर्यंत मंत्रिमंडळापुढे सादर केला जाईल. मग यासंबंधात मंत्रिमंडळ जो निर्णय घेईल, त्याप्रमाणे ॲक्शन प्लॅन तयार करुन पुढील कार्यवाही केली जाईल.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयामध्ये अनेक मोठया नद्या आहेत. खास करुन उद्योगाच्या माध्यमातून होणाऱ्या प्रदूषणामुळे नद्यांचे पाणी दूषित होते. बल्लारपूर शहरामधील वर्धा नदीच्या पाण्याचे अनेक वेळा सॅम्पल घेतलेले आहे. हे पाणी पिण्यास योग्य नाही. माणसे आणि जनावरे देखील हे पाणी पिऊ शकत नाही अशी स्थिती आहे.

यानंतर श्री.बरवड . . ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापी नाही

ता. प्र. क्र. 41975 श्री. जैनुद्दीन जव्हेरी .....

त्याचा रिपोर्ट सुध्दा आहे. त्याबद्दल शासनाने काय उपाययोजना केली आहे ? तसेच जे उद्योग पाणी शुध्द न करता केमिकल्स नदी-नाल्यामध्ये सोडतात त्यांच्यावर शासन काही कारवाई करणार काय ? त्यांच्याकडून शुद्ध पाणी मिळेल अशी काही व्यवस्था शासन करणार काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मी उत्तर देत असताना सुरुवातीला सांगितले की, वर्धा नदीवर धाबा या ठिकाणी आणि वैनगंगा नदीवर कामठी-खैरी या ठिकाणी प्रदूषणप्रवण स्थळ लक्षात आलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी वर्धेच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे असे मला वाटते. त्या ठिकाणी उन्हाळ्यामध्ये सरासरी किती घटकमूल्य होते, पावसाळ्यामध्ये किती होते, हिवाळ्यामध्ये किती होते, त्या ठिकाणी पी.एच. किती होता हे सर्व काढलेले आहे. हे सर्व काढून तेथील कोणत्या कारखान्यामुळे हे घडत असेल तर उद्या ॲक्शन प्लॅन तयार करीत असताना त्या कारखान्यावर बंदी सुध्दा आणली जाईल किंवा ते जेवढे पाणी खराब करतात त्यावर ट्रिटमेंट करुन पाणी चांगले करुनच त्यांना नदीमध्ये सोडावे लागेल अशा प्रकारचे बंधन सुध्दा त्या ठिकाणी आणता येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा जल प्रदूषणाचा विषय अतिशय गंभीर आहे. खरे म्हणजे महाराष्ट्रामध्ये प्रदूषण नियंत्रण मंडळ असूनही महाराष्ट्राला अशा प्रकारच्या परिस्थितीला सामोरे जावे लागते, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, यामध्ये रासायनिक प्रदूषणामुळे किती नद्यांचे पाणी दुषित झाले आहे ? दुसरा प्रश्न असा की, आपल्या कॅबिनेटच्या निर्णयामध्ये तसेच सर्व अहवाल तपासल्यानंतर यामध्ये जर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची यामध्ये चूक आढळून आली तर शासन त्यांच्यावर कडक कारवाई करणार काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले की, यामध्ये बऱ्याचशा विभागांनी म्हणजे जो जलविज्ञान प्रकल्प आहे त्यांच्याकडे आम्ही पाण्याच्या 127 नमुन्यांच्या संदर्भातील जबाबदारी दिली होती. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्याकडून 1871 भूसुत्रांची मूलभूत स्थळे आणि नमुना संकलन पृथक्करण करण्यात आले. केंद्रीय भूजल मंडळाच्या मार्फत 803 नमुने तपासण्यात आले. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत अशाच पध्दतीने जवळपास 73

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 41975 श्री. अजित पवार ....

केंद्राच्या ठिकाणी पर्यवेक्षणाचे काम करण्यात आले. असे प्रत्येक ठिकाणी झालेले आहे. प्रत्येक नदीच्या बाबतीतील रेकॉर्ड आपल्याकडे आहे. ते सगळे सांगून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. परंतु ज्या मोठ्या महत्वाच्या नद्या आहेत त्यामध्ये गोदावरी, तापी, मुळा-मुठा, भीमा, कृष्णा, वर्धा, वैनगंगा, उल्हास या महत्वाच्या नद्यांबरोबर बाकीच्या सुध्दा नद्या आहेत. काही नद्यांची नावे घेतली नाही तर सन्माननीय सदस्य असे म्हणतील की, आमची नदी यामध्ये कशी राहिली ? यामध्ये तसे नाही. परंतु प्रमुख नद्यांची नावे सांगण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. त्या पध्दतीने हे सगळे झालेले आहे. त्याचा ॲक्शन प्लॅन तयार केला जाईल. सन्माननीय सदस्यांनी असेही विचारले की, यामध्ये जर प्रदूषण नियंत्रण मंडळ चुकीचे काम करीत असेल तर त्यांच्यावर ॲक्शन घेणार काय ? त्यांची जबाबदारी सोडून तिसरेच जर काही काम चालले असेल तर जरुर त्यांच्यावर सुध्दा ॲक्शन घ्यावी लागेल. परंतु पहिल्यांदा त्यांच्यावर काय जबाबदारी होती आणि कशामध्ये ते कमी पडले त्यासंदर्भातील चित्र स्पष्ट होईल. ते चित्र स्पष्ट झाल्यानंतर संबंधित अधिकारी किंवा त्यांचे कोणी खालचे कर्मचारी त्यामध्ये दोषी असतील तर त्यांच्यावर सुध्दा ॲक्शन घेतली जाईल.

श्री. गोपिकिसन बाजोरिया : सभापती महोदय, नदीचा काही भाग नागरी एरियातून जातो म्हणजे महानगरपालिका आणि नगरपालिकेमधून नदी जाते अशा भागामध्ये जलकुंभीची खूप वाढ झालेली आहे. माझा महत्वाचा प्रश्न असा आहे की, ही जलकुंभी काढण्याची जबाबदारी महानगरपालिकेची किंवा नगरपालिकेची आहे की इरिगेशन विभागाची आहे ?

श्री. अजित पवार : जर महानगरपालिका आणि नगरपालिकेच्या हद्दीतून नदी जात असेल आणि त्यांच्या एरियामध्ये त्या शहराच्या चुकीच्या गोष्टीमुळे जलपर्णी वाढली असेल तर ती काढण्याची जबाबदारी त्याच शहराची आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अकोला जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण पाणी गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रमांतर्गत गावांना अनुजैविक तपासणी किटस्चा पुरवठा करण्याबाबत

(६) * ४२९१६ श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री सुभाष चव्हाण : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण पाणी गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रमांतर्गत गुणवत्ता बाधीत गावांना अनुजैविक तपासणी किट्सचा पुरवठा करण्यासाठी अकोला जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमधील अंदाजे २७०० प्रशिक्षणार्थींकरीता जिल्हा परिषदेने दिनांक २७ नोव्हेंबर, २००७ पासून प्रशिक्षण कार्यक्रम सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशिक्षणाचे काम पूर्ण झाले असल्यास अणुजैविक किट्सचे वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) राष्ट्रीय ग्रामीण पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद, अकोलाने शासन परिपत्रक क्र. डब्ल्यूक्यूएम-२००६/प्र.क्र.५१/पापु-१२,
दि. ५.१२.२००७ नुसार संस्कार वाहिनी, अमरावती या संस्थेतर्फे १७९० व पत्र क्र. डब्ल्यूक्यूएम - २००६/प्र.क्र.५१/पापु-१२, दि. २९.१.०८ नुसार पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, खामगाव या संस्थेतर्फे ९२० याप्रमाणे अकोला जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती मधील एकूण २७१० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम सुरु केला आहे. आतापर्यंत २७१० प्रशिक्षणार्थीपैकी १७६४ प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिले आहे. उर्वरित प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण देणे सुरु आहे.

(२) अकोला जिल्ह्यातील सर्व ५३८ ग्रामपंचायतींना प्रत्येकी ९ प्रमाणे एकुण ४८४२ अणुजैविक किट्सचे वाटप नोव्हेंबर ०७ मध्ये करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, अकोला जिल्हयात २७१० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आले आहे. यासाठी किती खर्च झाला आहे, सदर प्रशिक्षण किती दिवसाचे होते, प्रत्येक किटची किंमत किती होती आणि एकूण किटसाठी किती खर्च करण्यात आला आहे ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सदरहू प्रशिक्षणाचा कालावधी दोन दिवसाचा होता, दोन दिवसाकरिता ६०० रुपये खर्च आला. त्यांना ३०० रुपये जेवणासाठी व इतर बाबींसाठी खर्च येतो. २ दिवसांच्या प्रशिक्षणामध्ये पाण्याची गुणवत्ता, पाण्याचे व्यवस्थापन कसे असले पाहिजे, स्वच्छतेला महत्व कसे दिले पाहिजे यासंदर्भात प्रशिक्षण दिले जाते. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, जिल्हा आरोग्य केंद्र, स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत हे प्रशिक्षण दिले जाते. अणुजैविक किटची

२....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

किंमत ११.९० पैसे, नायट्रिट किटची किंमती २८० रुपये, फ्लोराइड किटची किंमत ३३६ रुपये आहे आणि कोणते किट कधी वापरावे याचीही माहिती त्यांना दिली जाते. यासाठी संपूर्ण निधी केंद्र सरकारकडून दिला जातो. त्यातून रासायनिक किट्सचे वाटप केले जाते.

३....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

जळगाव जिल्हा परिषदेअंतर्गत सिंचन विभागाचे पाझर तलाव बांधकामाकरीता संपादित करण्यात आलेल्या शेतजमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत

(७) * ४२७५० श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. चंद्रकांत रघुवंशी , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हा परिषदेअंतर्गत सिंचन विभागाचे पाझर तलाव बांधकामाकरीता संपादित करण्यात आलेल्या शेतजमिनीचा मोबदला ४०१ शेतकऱ्यांना देणे बाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ४०१ शेतकऱ्यांना शेतजमिनीचा मोबदला लवकरात-लवकर देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात : (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सन २००७-०८ पर्यंत रु. ३६१.१७ लक्ष इतकी रक्कम भूसंपादन मोबदल्यापोटी अदा करण्यात आली आहे. उर्वरित जलसंधारण विभागाच्या ३२ योजनांचा भूसंपादन मोबदला अदा करण्यासाठी सन २००८-०९ च्या आराखड्यात रु. ४४८.८२ लक्ष रक्कमेची मागणी करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे रोजगार हमी योजनेंतर्गत १९ योजनांच्या भूसंपादन मोबदल्यासाठी रु. ८२.३२ लक्ष रक्कमेची मागणी कार्यकारी अभियंता लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांच्यामार्फत जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडे करण्यात आली आहे.

निधीच्या उपलब्धतेनुसार संबंधित शेतकऱ्यांना मोबदला अदा करण्यात येईल.

श्री.संजय दत्त : माननीय मंत्रिमहोदयांनी पहिल्या उत्तरामध्ये "अंशत: खरे आहे" असे उत्तर दिले आहे. शेत जमिनीचा मोबदला ४०१ शेतक-यांना देणे बाकी आहे. हे सर्व शेतकरी पात्र असताना सुध्दा सर्वांना हा मोबदला मिळालेला नाही. माझा प्रश्न असा आहे की, किती शेतक-यांना शेत जमिनीचा मोबदला मिळाला आहे आणि या शेतक-यांच्या जमिनी केव्हा संपादित करण्यात आल्या होत्या आणि या योजनेची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, पाझर तलाव २७०२ अंतर्गत बिगर आदिवासी योजनेमध्ये ३२ पाझर तलाव आणि रोजगार हमी योजनेमध्ये १९ पाझर तलाव असे एकूण ५१ पाझर तलाव १९९० ते २००० या कालावधीमध्ये पूर्ण करण्यात आलेले आहेत. रोजगार हमी योजनेतील आणि बिगर आदिवासी योजनेतील एकूण ३८४ शेतकरी आहेत. या शेतक-यांना भूसंपादनापोटी काही रक्कम दिलेली आहे. २७०२ मध्ये आतापर्यंत ३६१ कोटींचे वाटप केलेले आहे. हा खर्च डीपीसीमधून करावा लागतो. त्याप्रमाणे दरवर्षी काही रक्कम त्यामध्ये घातली केली जाते.

४...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यानुसार रकमेचे वाटप केले जाते. यासाठी ४ कोटी ४८ लाख रुपये २७०२ अंतर्गत अपेक्षित आहे. रोजगार हमी योजनेमधून भूसंपादनासाठी ८२.३२ लाख रुपये अपेक्षित आहेत. त्यासाठी यावर्षी १.५० कोटी रुपयांचे नियोजन केलेले आहे. रोजगार हमी योजनेतून जिल्हाधिका-यांकडे मागणी केलेली आहे.

५....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

भंडारकवठे (जि.सोलापूर) येथील हत्तरसंग कुडळ या बंधाऱ्यातून ५८ गावासाठी कायमस्वरुपी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत

(८) * ४३५३७ श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. गोविंदराव आदिक , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. चरणसिंग सप्रा : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारकवठे (जि.सोलापूर) येथील हत्तरसंग कुडळ या बंधाऱ्यातून ५८ गावासाठी कायमस्वरुपी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना राबविण्यासाठी तेथील नागरिकांनी मा. ग्रामविकास मंत्री यांचेकडे माहे फेब्रुवारी, २००८ रोजी वा त्यादरम्यान मागणी केलेली आहे,

हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हत्तरसंग बंधाऱ्यातून ५८ गावांनी नळपाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) होय.

(२) प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने मागणी आधारित धोरणानुसार कार्यवाही करण्याबाबत जिल्हा परिषदेस कळविण्यात आले आहे. दरम्यान रु. ४१.२५ कोटी किंमतीच्या योजनेचा प्रारुप आराखडा तयार केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, दुष्काळग्रस्त, अवर्षणप्रवण क्षेत्रातील ५८ गावांसाठी १.५० लाख रुपये किंमतीची कायम स्वरुपी पाणीपुरवठा योजनेची मागणी करण्यात आलेली आहे. शासनाने आजपर्यंत या योजनेसाठी लाखो रुपये खर्च केलेले आहेत. पण हा भाग दुष्काळी असल्यामुळे तेथे पाण्याचा उद्‌भव नाही. त्यामुळे भीमा नदीतून पाणीपुरवठा योजना करण्यासाठी ४१ कोटी रुपये मंजूर केले असे उत्तर दिलेले आहे. परंतु हा निधी देखील कमी पडणार आहे. हा निधी वाढवून देण्यात येईल काय आणि ही योजना केव्हा मंजूर होईल ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, उत्तरामध्ये ४१ कोटी २५ लाख रुपये किंमतीच्या योजनेचा प्रारुप आराखडा तयार करण्यात आलेला आहे असे नमूद केले आहे. या योजनेला अद्याप मंजुरी दिलेली नाही.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्य श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांचे म्हणणे असे आहे की, भीमा नदीवर 58 गावांची पिण्याच्या पाण्याची योजना करावी. उजनी धरणामध्ये पाणी असले तर भीमा नदीला पाणी असते. त्यामुळे त्या ठिकाणाहून जरी पाण्याची योजना केली तरी त्याठिकाणी पाणी जाण्यासाठी उजनी धरणातून पाणी सोडावे लागेल. हे पाणी सोडताना खूप पाणी वाया जाते. शिवाय टंचाईच्या काळामध्ये हे पाणी अजिबात सोडता येत नाही. म्हणून मधल्या काळामध्ये सोलापूर शहराला बंद पाईप लाईन मधून थेट उजनी धरणातून पाण्याची योजना केली. ही योजना कमी पडत आहे. म्हणून दुसरी अशाच प्रकारची पिण्याच्या पाण्याची योजना सोलापूर शहरासाठी करण्याचे प्रस्तावित आहे. हे करीत असताना जी 58 गावे आहेत त्यापैकी 11 गावांची कुंभारी कासेगाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजना एकरुप लघु पाटबंधारे बंधा-यावरुन हाताळण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी देखील आता पाऊस नसल्यामुळे पाणी नाही. त्याच पध्दतीने 15 गावांची विविध कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजना केलेली आहे. त्यामध्ये जी 8 गावे येतात तेथे स्वजल धारा कार्यक्रमांतर्गत कामे प्रगतिपथावर आहेत. महाजल योजनेतून 2 गावे घेतलेली आहेत, जलस्वराज योजनेतून 6 गावे घेतलेली आहेत, 2 गावे विशेष घटक योजनेतून घेतलेली आहे. 14 गावांसाठी पाणी पुरवठयाची व्यवस्था नसल्यामुळे सदर गावात पाणी टंचाई असून तेथे नवीन योजना घेणे आवश्यक आहे. या प्रश्नाच्या संदर्भात बरीच माहिती मी घेतलेली आहे. आणखी काही दुसरा पर्याय सन्माननीय सदस्यांकडे असला तर त्याचाही विचार आमचा विभाग जरुर करील. सोलापूर जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता आणि ही गावे दक्षिण सोलापूर परिसरामध्ये मोडत असून तिथे देखील गेली काही वर्षे पाऊस पडलेला नसल्यामुळे पाण्याची कमतरता आहे. पाण्याचा हक्काचा सोर्स असणे गरजेचे आहे. म्हणून भीमा नदीवरुन सोर्स घेण्याऐवजी डायरेक्ट उजनीवरुन सोर्स घेतला तर ह्या योजना पुढे नीट कार्यान्वित होऊ शकतील. नाही तर केवळ काही कोटी रुपये खर्च करुन 58गावांची योजना केली जाईल आणि त्या योजनेसाठी नदीमध्ये पाणी सोडावे लागेल. आताच उजनीमध्ये मायनस 20 टक्के पाणी आहे. मधल्या काळामध्ये मृत साठ्यातून पाणी वापरले गेले इतकी बिकट परिस्थती आहे. म्हणून या सगळया गोष्टींचा विचार करुन जिथे हक्काचा सोर्स मिळेल तेथून योजना घेणे उचित होईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आता तरी आमच्या पुढे हा हक्काचा सोर्स उजनी आहे. परंतु अजूनही दुसरा एखादा पर्याय सन्माननीय सदस्य सूचवू शकत असतील तर त्याचा विचार विभाग निश्चित करील.

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील : सोलापूर जिल्हा हा कायमस्वरुपी दुष्काळी आहे. त्यात दक्षिण सोलापूर तालुका हा अतिशय दुष्काळी आहे. उजनी धरणाच्या वर 16-17 धरणे असल्यामुळे उजनी धरणामध्ये पाणी येत नाही अशी परिस्थिती आहे. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे ही शासनाची जबाबदारी आहे. माझी आग्रहाची विनंती आहे की, या 58 गावांसाठी पाण्याचा दुसरा स्त्रोत नाही. बोअरला पाणी लागत नाही आणि भीमा नदीवरुनच पाणी पुरवठा करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. म्हणून शासनाने पिण्याच्या पाण्याला अग्रक्रम देऊन ही योजना राबविण्याचे आश्वासन माननीय मंत्री महोदयांनी द्यावे अशी माझी विनंती आहे.

श्री. अजित पवार : मी पहिल्यांदाच उत्तरामध्ये सांगितले की, ज्या ठिकाणी भीमा नदीचा स्त्रोत सुचविण्यात आलेला आहे तिथे देखील आज पाणी नाही. तेव्हा सन्माननीय सदस्य म्हणतात ती बाजू देखील तपासून घेतली जाईल आणि महाग पडत असली तरी उजनी धरणातूनही योजना राबविण्याचा विचार केला जाईल. या दोन्ही गोष्टी तपासून जो सोईचा मार्ग असेल त्याचा अवलंब करुन या गावांना पिण्याच्या पाण्याची योजना करण्यासाठी पावले उचलली जातील.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील शेतकऱ्यांना सेंद्रीय खताचे योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्याबाबत

(9) * 42048 श्रीमती उषाताई दराडे , श्रीमती मंदा म्हात्रे : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील शेतकऱ्यांना सेंद्रीय खताचे योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण व्हावे याबाबत राज्यातील सर्व कृषि विद्यापीठामधून सेंद्रीय शेती हा विषय अंतर्भूत करण्याची मागणी बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी मा.कृषि मंत्री यांना दि. 7 मे, 2008 रोजी व तत्पूर्वी अनेक वेळा निवेदन सादर करुन केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त मागणीनुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात : (1) होय.

(2) व (3) सदर विषय शैक्षणिक वर्ष 2007-08 पासून कृषि व संलग्न विषयातील सुधारित पदवी अभ्यासक्रमात अंतभूर्त करण्यात आला आहे.

श्रीमती उषा दराडे :, हा विषय सन 2007-2008 वर्षापासून कृषी व संलग्न विषयातील सुधारित पदवी अभ्यासक्रमात अंतर्भूत करण्यात आल्याबद्दल मी सर्वप्रथम शासनाचे आभार मानते. या विषयाचा अंतर्भाव करीत असताना सेंद्रीय खताचे कोणकोणते प्रकार त्यांनी अभ्यासक्रमामध्ये घेतलेले आहेत याचा खुलासा होणे गरजेचे आहे. त्यामध्ये दशपर्णी अर्क किंवा निंबोळी अर्क यासारख्या कीटकनाशकाचा अंतर्भाव केलेला आहे काय ? गायीच्या सिंगापासून आणि दुभत्या गायीच्या शेणापासून होणा-या सी.पी.पी. या खताचा अंतर्भाव केलेला आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : आपण सेंद्रीय शेतीचे महत्व लक्षात घेऊन विद्यापीठाने सिलॅबसमध्ये त्याचा समावेश करुन नवीन सिलॅबस तयार केलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एवढेच नव्हे तर हा महत्वाचा विषय असल्यामुळे ॲग्रोनॉमीमध्ये त्याचा समावेश केलेला आहे. पहिल्या वर्षामध्ये शिकविण्याची व्यवस्था केलेली आहे. संशोधनाचे प्रोजेक्ट तयार करण्यात आले आहेत. सेंद्रीय शेतीच्या संदर्भात कुलगुरु डॉ. राजाराम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केलेली होती. त्या समितीने आपला अहवाल दिलेला आहे. कृषी विद्यापीठांनी कोणकोणत्या प्रकारचा सहभाग घ्यावा यासंबंधी शिफारशी केल्या आहेत. याबाबतीत सगळी चांगल्या प्रकारची माहिती घेऊन सुधारणा करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी कोणकोणत्या खतांचा समावेश त्यांनी केलेला आहे अशा प्रकारची माहिती विचारली आहे. त्याबाबतीत सांगू इच्छितो की, सेंद्रीय शेतीमध्ये आतापर्यंत जे काम झाले आहे, मुख्यत्वे करुन शेतक-यांनी स्वत:च्या शेतावर निरनिराळे प्रयोग करुन खते तयार केलेली आहेत. जनावरांच्या शिंगापासून तयार होणा-या खताचा यात समावेश आहे काय अशीही सन्माननीय सदस्यांनी विचारणा केली आहे. महाराष्ट्रातील अनेक शेतक-यांनी आपापल्या शेतावर खताच्या बाबतीत वेगवेगळे यशस्वी प्रयोग केलेली आहेत. त्या सगळया प्रयोगांची यादी एकत्रित केली जाईल आणि संशोधनामध्ये या खतांचा समावेश केला जाईल. शेतक-यांनी यासंदर्भात जे विविध यशस्वी प्रयोग केले आहेत त्याची माहिती विद्यापीठाला नसेल. जे जे शेतकरी यशस्वी प्रयोग करीत आहेत, त्यांचा समावेश संशोधनामध्ये केला जाईल. दशपर्णी अर्क सारखे किटकनाशके तयार केलेली आहेत. त्यावर आपण संशोधन सुरु केलेले आहे. कोणत्या कारणाने किटकांचा नाश होतो यासंबंधी देखील संशोधनाच्या कामास सुरुवात केलेली आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : माननीय मंत्री महोदयांनी अतिशय सविस्तर उत्तर या ठिकाणी दिले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. यासंदर्भात विद्यापीठामध्ये सेंद्रीय शेतीच्या बाबतीत स्वतंत्र विभाग सुरु केलेला आहे काय आणि त्याचे प्रमुख कोण राहणार आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात : सेंद्रीय खताचा निरनिराळया संबंध येतो. त्यामुळे त्या खताचा संशोधनामध्ये समावेश करतो आहोत. कृषी विद्यापीठात यासंदर्भात स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आलेला नाही.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, कृषि विद्यापीठ शिक्षण और संशोधन का काम बहुत प्रभावी ढंग से कर रहे हैं, लेकिन विस्तार के काम में कहीं न कहीं कम पड़ते हैं. सेंद्रीय शेती के बारे में प्रचार और प्रसार बहुत आवश्यक है. हमारे प्रदेश में 10 हजार कृषि स्नातक हर

. . . LL 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

साल निकलते हैं. इस सभागृह में बार बार यह सुझाव आया है कि कृषि स्नातक बेरोजगार हैं और उनको एक साल की इंटर्नशिप पर रखकर उनके माध्यम से विस्तार का काम अधिक से अधिक हो सकता है तो क्या शासन इस बारे में निर्णय लेगा ?

श्री. बाळासाहेब थोरात : यामध्ये एक्स्टेक्शनचा कार्यक्रम चांगला व्हावा अशी अपेक्षा सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे. आपण यासंबंधीचे तीन,चार कार्यक्रम केलेले आहेत. यासंदर्भात कृषी विद्यापीठामध्ये अशा प्रकारचे मोठे मेळावे आयोजित केले आहे. शिवार पाहणीचे मेळावे घेतले आहेत. परभणीच्या विद्यापीठात अशा प्रकारचे मेळावे घेतले आहेत. एक्स्टेक्शनच्या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचा उपयोग व्हावा अशीही अपेक्षा व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या चार वर्षाच्या कालखंडात शेतक-यांशी संपर्क ठेवणे, आणि त्यावरील टिप्पणी त्यांनी सादर करणे, विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त शेतक-यांशी संबंध आला पाहिजे, या विद्यार्थ्यांनी शेतक-यांपर्यंत नवीन तंत्रज्ञान पोहोचविले पाहिजे अशा प्रकारचा नवीन अभिनव उपक्रम शासन हाती घेत आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रायगड जिल्ह्यातील पाताळगंगा, पनवेल, रसायनी तळोजा, उरण, द्रोणगिरी या क्षेत्रात राज्य कामगार विमा योजनेचा विस्तार करण्याबाबत

(१०) * ४४७३४ श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान : दिनांक १० एप्रिल, २००८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्र.१५ व्या यादीतील प्र.क्र.३१०४३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पाताळगंगा, पनवेल, रसायनी तळोजा, उरण, द्रोणगिरी या क्षेत्रात राज्य कामगार विमा योजनेचा विस्तार करण्याबाबत राज्य कामगार विमा मंडळातर्फे सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे, डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता : (१) नाही.

(२) व (३) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. राजेंद्र जैन : सभापति महोदय, मेरे पहले उप प्रश्न का उत्तर शासन ने "नाही" दिया है, इसलिए मेरा प्रश्न यह है कि शासन के पास जो प्रस्ताव है, उसमें इस योजना का विस्तार करने के संदर्भ में राज्य कामगार विमा मंडल की तरफ से कार्यवाही कब तक शुरु होगी ? दूसरे और तीसरे उप प्रश्न के उत्तर में शासन ने कहा है "सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे." मेरा प्रश्न यह है कि यह कब से विचाराधीन है और शासन इस पर कब कार्यवाही शुरु करेगा ?

यानंतर श्री. कानडे...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 44734 पुढे सुरु ....

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, कोणत्याही नवीन कामगार विमा योजनेचा विस्तार करताना कामगार विमा योजना विभागातर्फे दरवर्षी औद्योगिक एरियामध्ये सर्व्हे केला जातो. आंतररुग्ण किती आहेत याची माहिती घेतली जाते. त्यानुसार राज्य शासनाला कळविले जाते. जेथे राज्य शासनाची आरोग्य सेवा पुरविली जाऊ शकत नाही तेथे अशा प्रकारे कामगार विमा योजनेअंतर्गत रुग्णालय सुरु करण्याबाबत मान्यता द्यावयाची किंवा नाही हे ठरविले जाते. केंद्र व राज्य शासनाकडून 7:1 याप्रमाणात रक्कम खर्च केली जाते. या खर्चावरही सिलींग आहे. 7:1 याप्रमाणापेक्षा जास्त खर्च झाला तर खर्चाचा 100 टक्के भार राज्य शासनावर येतो. येणारा आर्थिक भार लक्षात घेता यासंदर्भात अहवाल वित्त विभागाकडून मागितला होता. वित्त विभागाचे असे म्हणणे होते की आता ज्या सुविधा आहेत त्यातूनच आंतररुग्णांना ट्रीटमेंट देता येऊ शकते. मध्यंतरीच्या काळात केंद्र शासनाने निर्णय घेतला आणि राज्याचे मुख्य सचिव व इएसआयचे दिल्ली येथील डायरेक्टर यांच्यामध्ये एक बैठक झाली. इएसआय,दिल्ली यांनी असा प्रस्ताव दिला की 1000 टक्के या परिसरामध्ये आम्ही सेवा देऊ शकतो. परंतु त्यासाठी राज्य शासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. त्यासाठी काम थांबलेले आहे. ना हरकत प्रमाणपत्र केंद्र शासनाला देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. प्रकाश शेंडगे :सभापती महोदय, पाताळगंगा, पनवेल, रसायनी, तळोजा, उरण या भागात कामगारांची संख्या प्रचंड प्रमाणावर आहे. त्यामध्ये माथाडी कामगार आहेत, औद्योगिक कामगार आहेत तसेच गोडाऊनमधील कर्मचारी आहेत. एवढे मोठे कामगारक्षेत्र असताना कामगार विमा योजनेचा विस्तार करण्यास इतका विलंब लागण्याची कारणे काय ? केंद्र शासन यासाठी होणारा खर्च उचलण्यास तयार असताना राज्य शासनाला योजना सुरु करण्यात कोणती अडचण आहे ? ही योजना शासन ताबडतोब या भागामध्ये सुरु करील काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी यापूर्वीच उत्तर दिले आहे. योजना राबविण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाचा हिस्सा राहतो. राज्य शासनाचे आरोग्य खाते या विभागात सेवा देत आहे. त्या व्यतिरिक्त आंतररुग्णांसाठभ वेगळी योजना आहे. त्यामध्ये सिलींगपेक्षा जास्त खर्च झाला तर राज्य शासनाला 100 टक्के खर्च द्यावा लागतो. केंद्र शासन 100 टक्के खर्च

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 44734 .....

श्री. रणजित कांबळे ....

करण्यास तयार आहे परंतु राज्य शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात एक बैठकही झालेली आहे. लवकरच याबाबतचा निर्णय होईल आणि तो निर्णय राज्य शासन केंद्राला कळवील.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्य सरकारचा उपक्रम असलेल्या बृहन्मुंबई दुधपुरवठा योजना व आरे येथील कार्यालयात रोजंदारीवर काम करणाऱ्या ३६४ कामगारांना अद्याप सेवेत कायम करुन न घेण्यात आल्याबाबत

(११) * ४३०८२ श्रीमती अलका देसाई , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारचा उपक्रम असलेल्या बृहन्मुंबई दुधपुरवठा योजना व आरे येथील मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयात चाळीस वर्षापासून रोजंदारीवर काम करणाऱ्या ३६४ कामगारांना अद्याप सेवेत कायम करुन घेण्यात आले नसल्याचे दिनांक २९ एप्रिल, २००८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या संदर्भात दिनांक ३१ ऑगस्ट, २००५ रोजी तात्काळ शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे असे आदेश मा.न्यायालयाने दिलेले असूनही अद्यापही याबाबत कार्यवाही झालेली नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व सदरच्या रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री.अनीस अहमद : (१) नाही.

(२) मा.औद्योगिक न्यायालयाच्या निकालाविरुद्ध मा.उच्च न्यायालयात अपिल दाखल करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाला 'नाही' असे उत्तर दिलेले आहे. 'नाही' असे उत्तर असताना उच्च न्यायालयात सरकारने अपिल का दाखल केले ? औद्योगिक न्यायालयाने या ३६४ कामगारांना कामावर घेण्याचे आदेश दिलेले असताना सुध्दा कामावर का घेण्यात आले नाही ? सरकारला उच्च न्यायालयात जाण्याची गरज का भासली ? पुरोगामी महाराष्ट्रात कामगारांच्याविरुध्द असे निर्णय चालतील काय ?

यानंतर श्री. भोगले

अप्रसिद्धीसाठी नाही / अप्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, 240 दिन काम करने के बाद कामगारों की दोनों यूनियन ने पिटीशन फाइल किया था, उसके माध्यम से कोर्ट ने कहा है कि इनको परमानेंट करना चाहिए. हमारे विभाग ने हाईकोर्ट में अपील करने का तय किया है.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, शासन अत्यंत निर्दयपणे वागत आहे. मी नागपूर दूध पुरवठा योजनेचा विषय आपल्यापुढे मांडला होता. आपण सहृदयतेने म्हणाला होतात की, या संदर्भात मी विचार करतो. तेथील कर्मचारी निवृत्त झाले, काही दिवंगत झाले तरी त्यांना सेवेत असताना कायम केले नाही. औद्योगिक न्यायालयाने सांगूनही शासन 25 वर्षे सेवा केलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करीत नाही. शासनाला त्यांच्या सेवेची गरज आहे. तरी देखील ते कर्मचारी आज रोजंदारीवर काम करीत आहेत. त्यांना नियमित सेवेत घेत नाही हे योग्य नाही. सभापती महोदय, आपण निर्देश दिल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. आपण कृपया शासनाला निर्देश द्यावेत अशी मी विनंती करतो. वित्त विभागाकडून प्रस्ताव मान्य होत नाही म्हणून यांना सेवेत कायम केले जात नाही. सातत्याने पदुम विभागकडून प्रस्ताव पाठविला जातो, परंतु वित्त विभाग तो प्रस्ताव नामंजूर करीत आहे. सभापती महोदय, आपण या प्रकरणी न्याय मिळवून द्यावा अशी विनंती आहे.

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, वहां के जी.एम. ने 1990 में इन वर्कर्स को शासन का एप्रूवल न लेते हुए जिला स्तर पर अपाइंट किया था. 240 दिन होने के बाद इनको डिस-कन्टीन्यू करना चाहिए था, लेकिन वहां के मेनेजर इनको कन्टीन्यू किया. यह प्रश्न पहले भी सभागृह में आया था और मानवता के आधार पर इनको रोजगार मिलना चाहिए, इनको नौकरी मिलनी चाहिए, इसलिए हमने यह प्रस्ताव बार बार फायनेन्स डिपार्टमेंट के पास भेजा है, लेकिन डेयरी डिपार्टमेंट को अभी तक फायनेन्स डिपार्टमेंट से मंजूरी नहीं मिली है. इसमें मुख्य रुप से चंद्रपुर और नागपुर के लोग डेली वेज पर पिछले 20-25 साल से काम कर रहे हैं. सदन के अन्दर बार बार यह मांग आ रही है कि इन लोगों को रोजगार मिलना चाहिए, नौकरी मिलनी चाहिए. हमने माननीय फायनेंस मिनिस्टर के साथ मीटिंग रखी है, लेकिन अभी तक उनकी मंजूरी नहीं आई है.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, शासन अपिलात गेले आहे, ते अपील मागे घेऊन औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार सर्व कामगारांना कायम करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला जाईल काय? त्यासाठी कॅबिनेटची मान्यता मिळवून आर्थिक तरतूद केली जाईल काय?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, पिछले दिनों में हमने अपने सेक्रेटरी को बुलाकर मा. मुख्यमंत्री के प्रिन्सिपल सेक्रेटरी के साथ मीटिंग ली थी. मुझे प्रिन्सिपल सेक्रेटरी ने सुप्रिम कोर्ट का ऑर्डर दिखाया था कि आप केवल डेयरी डिवलपमेंट डिपार्टमेंट के डेली वेज के मामले मत भेजिए, मंत्रालय के सभी विभागों का एक साथ प्रस्ताव आना चाहिए. केवल एक डिपार्टमेंट का इस प्रकार का प्रस्ताव नहीं आना चाहिए, ऐसा कहकर फाइल वापस आ गई.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मला आपल्यामार्फत माननीय मंत्रीमहोदयांकडून जाणून घ्यायचे आहे की, औद्योगिक न्यायालयाने 31 ऑगस्ट, 2005 रोजी सदर कामगारांना सेवेत सामावून घ्यावे असा आदेश दिला होता. उत्तरात म्हटले आहे की, त्यानुसार उच्च न्यायालयामध्ये त्या निकालाविरुध्द जाण्याची कारवाई सुरु आहे. तीन वर्षे उलटून गेली आहेत. मंत्रीमहोदयांनी मानवतावादी दृष्टीकोनाचा उल्लेख केला. या प्रकरणी जी दिरंगाई झाली याची जबाबदारी निश्चित करणार आहात का? मंत्रीमहोदयांची भूमिका काय आहे?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, मेरी भूमिका साफ है. इन डेली वेज वर्कर्स को काम करते हुए 20-25 साल हो गए हैं. मेरे विभाग की और मेरी व्यक्तिगत रुप से भूमिका है कि इनको रोजगार मिलना चाहिए, इनको नौकरी मिलनी चाहिए.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, सुप्रीम कोर्टाचे निर्देश आहेत की, अशाच पध्दतीने काम करीत असलेल्या सर्व विभागातील रोजंदारी कर्मचाऱ्यांची माहिती एकत्रितपणे संकलित करुन निर्णय घ्यावा.

(नंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43082....

श्री.भास्कर जाधव....

शासकीय दूध पुरवठा योजनेमध्ये काम करणारेच कर्मचारी आहेत असे नाही. मी आपल्याला छोटेसे उदाहरण देणार आहे. शासनाच्या विविध आस्थापनेवर अनेक कर्मचारी 15-20 वर्षे फक्त 1500 ते 2000 रूपयांवर हंगामी कर्मचारी म्हणून काम करीत आहेत. रोजगार हमी योजनेवरील मस्टर क्लार्कला देखील शासनाने शासकीय सेवेत कायम केले आहे. जनगणना करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देखील शासकीय सेवेत कायम करून घेतले आहे. परंतु, ज्यांची 15-20-30 वर्षे सेवा घेतली आहे, अशा कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायम का करून घेत नाहीत ? अशा कर्मचाऱ्यांना थकबाकी द्यायची नसेल तर ती देऊ नका. पण त्यांची सेवा सलग करून आयुष्यातील शेवटचा लाभ तरी त्यांना शासन मिळवून देण्यासाठी विचार करणार आहे काय ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, आप अपने स्तर पर वित्त मंत्री से पूछिए कि यह क्यों नहीं हो रहा है. 3 साल से यह प्रश्न चल रहा है और मेरे विभाग को न्याय नहीं मिल रहा है. मेरे विभाग की तरफ किसी का ध्यान नहीं है, आप इस बारे में न्याय दीजिए.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, 364 कामगारांनी आपले 25 ते 30 वर्ष आयुष्य विभागाची सेवा करण्यामध्ये घालविले आहे. या कामगारांनी कायम सेवेत घ्यावे म्हणून अर्ज देखील केला आहे. परंतु, त्यांचा अर्ज शासनाने फेटाळलेला आहे म्हणून त्यांनी औद्योगिक न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत. न्यायालयाचा निर्णय देखील या कामगारांच्या बाजूने लागला. न्यायालयाचा आदेश शासन धाब्यावर बसविणार असेल तर या कामगारांनी न्यायासाठी कोणाकडे बघायचे ? म्हणून माझी विनंती आहे की, या अधिवेशनामध्ये या कामगारांना सेवेत कायम करण्यासंबंधी मंत्रिमहोदय निर्णय घेणार आहेत काय ? मंत्रिमहोदयांनी सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

श्री. अनिस अहमद : सजेशन फॉर एक्शन.

सभापती : कामगारासंबंधीची एक महत्त्वाची बाब सभागृहासमोर आलेली आहे. 240 दिवस सलग सेवा झाल्यानंतर शासकीय सेवेत कालेलकर ॲवॉर्डप्रमाणे सामावून घेण्यासंबंधी शासनावर बंधन आहे. त्या बंधनाच्या आधारे औद्योगिक न्यायालयाने आपला निकाल दिलेला आहे. मला वाटते या अनुसार मंत्रिमहोदय देखील प्रयत्न करीत आहेत. तरी देखील माझ्या दालनामध्ये या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती....

प्रश्नासंबंधी मार्ग काढण्यासाठी मी माननीय वित्त मंत्री, माननीय दुग्धविकास मंत्री श्री.अनिस अहमद आणि या सदनातील एक-दोन सन्माननीय सदस्यंना बोलावून घेतो. कालेलकर अवॉर्डचा आधार धेऊन औद्योगिक न्यायालयाने सन 2005 साली निर्णय दिलेला आहे. यासंबंधी शासनाला अपिलामध्ये जायचे होते, तर ते मुदतीत जाणे आवश्यक होते. म्हणून मी या प्रश्नासंबंधी जरूर लक्ष घालीन.

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, मैं आपका आभारी हूँ. आपके माध्यम से मुझे न्याय मिलेगा.

श्री.गुरूनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, ज्या कामगारांनी सलग 240 दिवस काम केले आहे, त्यांना सेवेत कायम करण्यासंबंधीचे माननीय उच्च न्यायालयाचे देखील निवाडे आहेत. उच्च न्यायालयाने असे नमूद केले आहे की, It shall be mandatory for the government to absorb such employees.

सभापती : म्हणूनच मी माझा निर्णय दिलेला आहे. प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

.....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे.

मु.शी.:तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

श्री.अजित पवार (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "भाम या नियोजित धरणाच्या बांधकामाला (ता.इगतपुरी, जि.नाशिक) विरोध दर्शविण्याकरिता धरण कृती समितीच्या नेतृत्त्वाखाली आदिवासींनी आयोजित केलेला मेळावा" या विषयावरील सर्वश्री प्रतापराव सोनवणे, जगदीश गुप्ता, केशवराव मानकर, वि.प.स. तसेच श्री.श्रीकांत जोशी, माजी वि.प.स.यांच्या दिनांक 25 मार्च रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 40838 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : अधिक माहिती छापावी.)

यानंतर श्री.पी.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार (पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात सर्व कामाच्या निविदा एकत्रितपणे काढण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत" या विषयावरील श्री. अरविंद सावंत, वि.प.स. तसेच सर्वश्री नितीन शिंदे, रविंद्र मिर्लेकर व श्रीमती उन्मेषा पवार, माजी वि.प.स. यांच्या दिनांक 15 डिसेंबर, 1998 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 31040 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची अधिक माहिती छापावी.)

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ. सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007-08 या वर्षात स्थायी पदात रुपांतरित केलेल्या अस्थायी पदांसंबंधीचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादितचा सन 2006-07 चा 36 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री. बाबा सिध्दीकी (कामगार राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने माल वाहतूक कामगार मंडळ, मुंबई यांचा सन 2006-07 छत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 च्या सूचना.

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, संजय केळकर, मधुकर चव्हाण यांनी "कवठे महांकाळ (ता. तासगांव, जि. सांगली) येथे पवन उर्जा प्रकल्पासाठी जमीन संपादित करताना शेतकऱ्यांना त्यांचे कुटुंबातील सदस्यांना नोकरीस घेणे, सदर कामगारांना किमान वेतनाप्रमाणे पगार देण्याचा नियम असूनही देण्यात न येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील यांनी "पेण, जि. रायगड तालुक्यातील खारगांधे व खारचोळे येथील सुमारे 100 एकर भातशेती गेल इंडिया कंपनीच्या पाईपलाईनमुळे व खार जमीन विभागाच्या बेपर्वाईमुळे नापीक होणे, कंपनीने खोदलेल्या मातीमुळे मोठे बांध तयार होऊन खाडीमध्ये आलेले पाणी बाहेर पडण्यास मार्ग नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री सुरेश जेथलिया यांनी "पुणे विद्यापीठांतर्गत बी.एस.सी. ची अंतिम परीक्षा एप्रिल, 2008 मध्ये घेण्यात येणे, सदर परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांना संपूर्ण सत्राकरिता 1900 गुण असून नजरचुकीने उत्तीर्ण करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना 0.163 या नियमाखाली वाढीव गुण देण्यात येणे, सदर उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना देण्यात आलेले गुण रद्द करीत अनुत्तीर्ण करण्याचा विद्यापीठाने घेतलेला निर्णय, त्यामुळे सुमारे 1400 विद्यार्थ्यांना झालेला मनस्ताप" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब, यांनी "राज्य शासनाने मुंबई शहरासाठी झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत शासनाच्या जमिनीवर झोपडपट्टीत राहणाऱ्या अनेक रहिवाशांना पक्की घरे मिळण्याची शाश्वती मिळणे, या योजनेत केंद्रशासनाची परवानगी लवकर मिळत नसल्याने उक्त योजना राबविण्यास विकासक पुढे येत नसल्याने रहिवाशांना चांगली घरे मिळण्याची स्वप्ने पूर्ण न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, चंद्रकांत पाटील, संजय केळकर यांनी "दिनांक 23 जुलै, 2008 रोजी बोरिवली ते कांदिवली दरम्यान एका चोरट्याने मोटर सायकलवरुन महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या व मंगळसूत्रे खेचून पळून जाणे, परिसरात सदर घटना वाढत असल्याने पोलिसात तक्रार करुनही त्यावर कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, यांनी " मुंबईतील पाणी कपातीचे संकट लक्षात घेता नगरसेवकांनी मोठमोठ्या टॉवरचे बांधकाम थांबविण्यात यावे या केलेल्या आव्हानास आयुक्तांनी महानगरपालिकेचा कोट्यावधी रुपयाचा महसूल बुडेल म्हणून बांधकामाचे पाणी तोडण्यास दिलेला नकार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ...

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी "राज्यातील माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा निकाल उत्तम लागला असून ज्या विद्यार्थ्यांना 50 ते 94 टक्के गुण मिळाले आहेत अशांना अजूनही प्रवेश मिळाला नसून 49 टक्के पेक्षा कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठीचे अर्ज देखील न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकात पाटील, विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते यांनी "मुंबईतील सुमारे 11 रेशनिंग दुकानाचे परवाने खोटी प्रमाणपत्रे सादर केल्याच्या कारणावरुन या दुकानदारांवर पोलीस केसेस दाखल करण्यात येणे, सदर प्रकरणात श्री. पवण अगरवाल व श्री. राजाराम यादव यांच्या व्यतिरिक्त रेशनिंग कार्यालयातील अधिकारी सहभागी असल्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही करण्याची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदिश गुप्ता यांनी "सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 23 मार्च, 1994 च्या शासननिर्णयान्वये संपूर्ण राज्यात इतर मागासवर्गाला वर्ग 3 व वर्ग 4 च्या नोकरभरतीसाठी आरक्षण लागू करण्यात येणे, सदर लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या 52 टक्के असून मंडल आयोगाने त्यांच्यासाठी 27 टक्के आरक्षणाची शिफारस करुनही त्यांना फक्त 19 टक्के आरक्षण मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 च्या सूचनेसंबंधी</u>

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मागच्या आठवडयात सन्माननीय सदस्यांनी नियम 93 च्या अनेक सूचना दिल्या होत्या. त्या सूचनांबाबत शासनाने निवेदन करावे असे आदेशही आपण दिले होते. शासनाकडून या सूचनांची निवेदने अद्यापही आलेली नाहीत, अधिवेशन संस्थगित व्हायला फक्त दोनच दिवस शिल्लक आहेत. अशा परिस्थितीत ही निवेदने कधी होणार आहेत ? यासंबंधीची माहिती सभागृहाला समजली पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

सभापती : कालपर्यंत 15 निवेदन आली होती. 42 निवेदने घेण्याच्या संदर्भात मी सूचना दिलेली आहे. कालपर्यंत 15 निवेदनाच्या संदर्भात चर्चा झालेली असून अजून 32 निवेदने यावयाची आहेत. त्यामुळे मंत्रीमहोदयांना सूचना करतो की, सभागृहाच्या उद्याच्या कामकाजात जास्तीत जास्त निवेदने कशी घेता येईल यादृष्टीने गांभीर्याने नोंद घ्यावी.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :जालना जिल्हयातील भोकरदन येथील पळसखेड गावात जमावाने चोरांना चोप दिल्यामुळे तीन चोर ठार होणे व त्यासंदर्भात गावक-यांविरुध्द पोलिसांनी खोटया केसेस दाखल करणे.

मु. शी :जालना जिल्हयातील भोकरदन येथील पळसखेड गावात जमावाने चोरांना चोप दिल्यामुळे तीन चोर ठार होणे व त्यासंदर्भात गावक-यांविरुध्द पोलिसांनी खोटया केसेस दाखल करणे यासंबंधी सर्वश्री सुरेश जेथलिया, किशनचंद तनवाणी, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुरेश जेथलिया (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जालना जिल्ह्यातील भोकरदन येथील पळसखेड गावात दिनांक २५ जून,२००८ रोजी चोर आल्याची वर्दी जवळच्या गावकऱ्यांनी निरिक्षकांना दिल्यावर पोलिसांत व चोरांमध्ये पैशाची देवाण-घेवाणीबाबत चर्चा झाल्याने पोलिस चोरांना मदत करीत असल्याची तेथील जमावाचा झालेला समज, परिणामी जमावामध्ये व चोरांमध्ये झालेला तीव्र संघर्ष, चोरांना जमावाने दिलेला चोप, त्यात तीन चोर ठार होणे, परिणामी भोकरदन परिसरात पंधरा-वीस दिवस चोरांनी दहशत निर्माण करणे, याबाबत पोलिसांना माहिती देवूनही पोलिसांनी दखल न घेणे, तथापि पोलिसांनी या प्रकरणी गांभीर्याने कारवाई न करता निरपराध गावकऱ्यांविरुध्द खोट्या केसेस दाखल केल्याने भोकरदन परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, या घटनेला जबाबदार असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची तेथील नागरीकांनी केलेली मागणी, याबाबत शासनाने संबंधितांवर करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश जेथलिया : सभापती महोदय, जालना जिल्हयातील ही दुसरी घटना आहे. भोकरदन परिसरातील ग्रामस्थ गेल्या दोन महिन्यापासून चोर आल्याची माहिती पोलिसांना देत असतांना पोलिसांनी या घटनेकडे लक्ष दिलेले नाही. पोलिसांना चोर आल्याची माहिती 1 वाजता दिल्यानंतर पोलीस त्या ठिकाणी 5 वाजता पोहचले. त्यामुळे मला माननीय मंत्रीमहोदयांना विचारावयाचे आहे की, भोकरदन गावक-यांनी चोर आल्याची माहिती पोलिसांना 15 दिवस अगोदर दिलेली असतांना पोलिसांनी काहीही कारवाई केलेली नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश जेथलिया.. .

त्याचप्रमाणे पोलिसांनी जादा कुमक पाठविण्यात यावी असे वरिष्ठ पोलीस अधिका-यांना कळविले असतांना त्याबाबतीत कार्यवाही का केली नाही ? ज्या गावातील गावक-यांनी चोरांना पकडण्यास मदत केली होती .त्या गावकरांच्या विरुध्द पोलीस केस दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली होती हे खरे आहे काय ? त्याचबरोबर सदर गावातील लोक मदत करण्यासाठी आले होते, शेतातमध्ये हे लोक राहत होते ते बेकसूर होते परंतु त्यांच्या विरुध्द पोलिसांनी 302 कलमाखाली गुन्हे दाखल केले व त्यांना अटक केली आहे. तेव्हा या प्रकरणामध्ये ज्या बेकसूर लोकांना अटक केलेली आहे त्याची ताबडतोब सुटका करण्यात येणार आहे काय,त्याच प्रमाणे त्या पोलीस स्टेशनमधील पोलीस इन्सपेक्टर श्री.घोडके यांच्या संदर्भात सतत तक्रारी असतांना त्यांच्याविरुध्द आतापर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही .तेव्हा त्यांच्या विरुध्द कारवाई न करण्याची कारणे काय आहेत, श्री.घोडके यांना निलंबित करण्यात येणार आहे काय ?

श्री.सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्या भागात काही चोरटे ठराविक मार्गावरुन येत आहेत व चोरी करण्याचा त्यांचा उद्देश आहे असे पोलिसांना फोनवरुन कळाले होते. त्यानंतर पोलिसांकडे जेवढा स्टाफ होता तेवढा स्टाफ घेऊन ते त्या ठिकाणी गेले होते आणि वॉटर फिल्टर प्लॅन्टजवळ त्यांनी नाकाबंदी केली होती. त्यानंतर एक काळी गाडी तेथे आली होती आणि ती लांबच थांबली होती. तेथे पोलिसांनी नाकाबंदी केली असून गाडयांची तपासणी करीत आहेत हे लक्षात आल्यानंतर ते गाडी तेथेच ठेवून चोरटे पळून जावयास लागले. हे चोर दोन दिशानी पळाले होते एक चोर एका दिशेने पळाला तर बाकीचे सात चोर दुस-या दिशेने पळाले होते व त्यांच्या मागे पोलीस धावत होते . पोलिसांची संख्या कमी होती त्याचबरोबर अंतरसुध्दा कमी होते त्यामुळे पोलीस "चोर चोर, पकडा, पकडा "असे ओरडत होते हे खरे आहे. त्यावेळी आजूबाजूच्या शेतक-यांनी या चोराना पकडून पोलिसांकडे आणले होते. या चोरांना गाडीमध्ये घालून पोलीस स्टेशनकडे जात असताना त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर जमाव जमला होता व हा जमाव पोलिसांच्या गाडीला पुढे जाऊ देत नव्हता. त्यांनी पोलिसांची गाडी उलटी केली व तिला आग लावली. त्यामुळे हे चोरटे पुन्हा पळून जावयास लागले. त्यावेळी सगळया गावक-यांनी या चोरटयांना पुन्हा पकडले आणि घेराव घालून त्यांना मारहाण करावयास लागले. त्यामध्ये तीन व्यक्तिचा मृत्यू झाला असून सबंधित व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्या

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्यक्तिना अटक करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, श्री.घोडके यांच्याविरुध्द वारंवार तक्रारी करुनही कारवाई केली जात नाही.तेव्हा याबाबत त्यांची चौकशी केली जाईल आणि योग्य ती कारवाई केली जाईल. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी असेही सांगितले की या प्रकरणातील निष्पाप लोकांच्या विरुध्द कारवाई करण्यात आली व त्यांना अटक केली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, यामध्ये कोणीही व्यक्ती निष्पाप नाहीत. आतापर्यंत 54 व्यक्तींना अटक करण्यात आली आहे व अजूनही 48 लोकांची नावे निष्पन्न झालेली आहेत यामध्ये जे कोणी बेकसूर असतील त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येऊ नयेत अशी सूचना संबंधितांना देण्यात आलेली आहे.अशा प्रकारची घटना घडल्यानंतर तेथे बघ्याची गर्दी जास्त असते आणि गुन्हा करणा-यांची संख्या कमी असते त्यामुळे जे कोणी दोषी असतील त्यांच्या विरुध्दच कारवाई करण्यात यावी अशी सूचना देण्यात आली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, भोकरदन परिसरामध्ये 15-20 दिवसापासून सतत चो-या होत असून अजूनही चोर सापडत नसल्यामुळे लोकांमध्ये प्रचड संताप निर्माण झाला आहे हे मंत्रिमहोदयांना मान्य करावे लागेल. त्या ठिकाणी चोर आले होते आणि त्यांच्या मागे पोलीस लागले असतांना " चोर,चोर पकडा पकडा "असे पोलीस म्हणू लागले. त्यांचा आवाज ऐकून त्या ठिकाणच्या शेतात राहणारे लोकसुध्दा त्या चोराच्या मागे लागले आणि त्यांनी या चोराला पकडले होते. असे असतांना या सर्व निष्पाप लोकांच्या विरुध्द गुन्हे दाखल केले आहेत. तेव्हा खरा गुन्हेगार आणि निष्पाप व्यक्ती कोण आहेत हे आपण कशावरुन ठरविणार आहात ? चोराना पकडण्यामध्ये पोलिसांना अपयश आलेले आहे. चोरांना पोलिसांना पकडता आले नाही ॅम्हणून गावकरी मदतीला आले व सर्व गावक-यांनी एकत्रित येऊन या चोरांना पकडले होते. गेल्या एक महिन्यापासून त्या भागात सतत चो-या होत असून चोर सापडत नाही म्हणून लोकांमध्ये संताप निर्माण झाला आहे मराठवाडयात अनेक ठिकाणी चो-या होऊनही चोर सापडत नाही म्हणून लोकांमध्ये संतापाची भावना निर्माण झालेली आहे. जे चोर सापडले होते त्यांना गावक-यांनी मारहाण केली होती परंतु त्यामुळे संपूर्ण गावाला वेठीस धरण्यात आलेले आहे तेव्हा हा प्रकार थांबडतोब थांबविण्यात आला पाहिजे. ज्या गावक-यांना अटक करण्यात आलेली आहे त्यातून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

तुम्हाला एकही गुन्हेगार मिळणार नाही कारण हे गावकरी काही गुन्हेगार नाहीत . हे सगळे गावकरी निष्पाप आहेत. या चोरांना पकडा असे पोलिसांनी कशाला सांगावयास पाहिजे. पोलिसांना चोर पकडता येत नाही म्हणून त्यांना पकडा असे पोलिसांनीच आवाहन केले होते . त्यामुळे गावक-यांनी पोलिसांना मदत केली होती. त्यानंतर या गावक-यांनी चोरांना मारहाण केली व त्यात चोरांचा मृत्यू झाला आहे. परंतु गावक-यांनी हे कृत्य जाणीवपूर्वक केलेले नाही. मघाशी माननीय मंत्री महोदयांनी असे सागितले की, या गावक-यापैकी जे गुन्हेगार आहेत त्यांना अटकेत ठेवावे आणि बाकीच्यांना सोडून देण्यात यावे अशी सूचना देण्यात आली आहे. . मला माननीय मंत्री महोदयांना असे विचारापवयाचे आहे की, या गावातील गावकरी गुन्हेगार आहेत काय ? गावातील नागरीकांच्या बाबतीत माननीय मंत्री महोदय अत्यंत गैर पध्दतीने विधीमंडळात बोलले आहेत.पोलिसांना चोर पकडता येत नसल्यामुळे गावक-यांनी या चोराला पकडून दिले आहे त्यातील काही चोरांना मारहाण केली होती व त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला आहे. हे सगळे ठीक आहे परंतु सर्वच गावकरी गुन्हेगार आहेत असे बोलणे बरोबर नाही. पोलिसांना आलेल्या अपयशाबद्दल पोलिसांच्या विरुध्द आणि श्री.घोडके यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : मी सुरुवातीलाच सांगितले होते की त्या ठिकाणी 2500-3000 लोकांचा जमाव जमला होता. त्यांनी पोलिसांची गाडी उलटवून तिला आग लावली होती. गावकरी चोरांना मारहाण करीत होते तेव्हा पोलिसांनी त्यांना सांगितले की चोराना तुम्ही मारहाण करु नका त्यांना आमच्या ताब्यात द्यावे आम्ही त्यांच्याविरुध्द रितसर कारवाई करु.

श्री.दिवाकर रावते : आज सकाळी सुध्दा मुले चोरणा-या टोळीला महिलांनी पकडले होते

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : तेथे मोठा जमाव जमला होता सर्वाची नावे गुन्हेगार म्हणून घेण्यात आलेली नाहीत. या प्रकरणात एकूण 54 लोकांना अटक करण्यात आली असून इतर लोकांची नावे जरी निष्पन्न झालेली असली तरी पोलिसांना अशी सूचना देण्यात आली आहे की त्यांचा जर सहभाग असेल तरच त्यांच्याविरुध्द कारवाई करावी अन्यथा करण्यात येऊ नये या प्रकरणात 3 जणांचा मृत्यू झाला आहे म्हणून संबंधिताविरुध्द 302 खाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्या पद्धतीने येथे शासनाकडून उत्तर येत आहे ते बरोबर नाही. मी हे निवेदन पूर्णपणे वाचले आहे. एक स्टोरी बनवून उत्तर दिलेले आहे. मूळ घटनेमध्ये नाणेगावाला चोर रात्री 1 वाजता घुसले अशी सूचना पोलिसांना मिळाली. आता चोर घुसले एका गावात आणि पोलीस तपास चौकी लावतात दुसऱ्याच ठिकाणी. खरे तर त्या चोरांशी या पोलिसांचे संगनमत आहे आणि त्याबाबतच्या तक्रारी तेथील खासदार श्री.दानवे यांनी मानवी हक्क आयोगाकडेदेखील दिलेली आहे. खरे तर तेथील फौजदार श्री.घोडके याच्यावर आपण त्याबाबत कारवाई केली पाहिजे. त्या भागामध्ये मोठ्या प्रमाणात चंदन तस्करी होते. आता या संबंधात माझ्याकडे अशी माहिती आहे की, या चोरांच्या गाडीमध्ये त्यावेळेस 12 लाख रूपये होते आणि ते पैसे प्रथमत: सुरक्षितरित्या पोहोचविण्यासाठी ताब्यात पोलिसांनी घेतले आणि ते सुरक्षित ठिकाणी ठेवून आल्यानंतर त्यांनी चोरांना पकडण्याची कारवाई केली. त्यामुळेच तेथील जनता बिथरली. त्या चोरांना तेथील लोकांनी पकडले म्हणून तो गुन्हा झाला का ? त्या ठिकाणी दोन तीन हजारांचा मॉब एकत्र येतो आणि चोर सापडतात, पोलीस त्याबाबत काही करीत नाहीत.... सभापती महोदय, महाराष्ट्रात अशी उदाहरणे आहेत की, महिलांनी राग अनावर होऊन न्यायालयाच्या आवारात गुन्हेगार-आरोपीला ठेचून मारले आहे. तेव्हा पोलीस अशा प्रकारे अकार्यक्षम असेल तर जनतेला कायदा हातात घ्यावा लागणार आहे. म्हणून या प्रकरणामध्ये 302 वगैरेचे जे गुन्हे लावले आहेत ते कमी करण्यासाठी आपण काही विचार करणार काय ? निर्णय घेणार आहात का ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले ती घटना रात्री आहे. पण ही जी घडलेली घटना आहे ती दुपारची घडली आहे. पोलिसांना गुप्त बातमी मिळाली की, त्या भागामध्ये चोर येत आहेत म्हणून तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी तेथे असलेला सगळा स्टाफ घेऊन चोर पकडण्यासाठीची कारवाई केली. परंतु त्यांच्याकडे त्यावेळेस अपुरा स्टाफ होता म्हणूनच मग त्या चोरांना पकडण्यासाठी पोलिसांनी 'चोर, चोर' म्हणून ओरडा केला आणि लोकांना चोर पकडण्यासाठी आवाहन केले त्याप्रमाणे लोक जमा होऊन त्यांनी त्या चोरांना पकडून दिले. नंतर ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी बोलताना चुकून दुपार ऐवजी रात्री घटना घडल्याचे म्हटले आहे. सदर घटना दुपारीच घडलेली आहे. पण तेथील पोलिसांची त्या चोरांशी संगनमत असल्याने, तेथे चंदनाची तस्करी मोठ्या प्रमाणात होत असते त्यातूनच त्या चोरांची

..... एसएस 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

पोलिसांशी संगनमत वाढले होते आणि हे सगळे तेथील श्री.घोडके या पीएसआयच्या माध्यमातूनच चालले आहे. त्यामुळे तुम्ही प्रथमत: त्या श्री.घोडके या पोलीस अधिकाऱ्याला ताबडतोब निलंबित करणार आहात का ? तसेच या प्रकरणात निरपराध लोकांवर जे गुन्हे दाखल केले आहे ते मागे घेणार आहात का ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, यामध्ये जे निरपराध असतील त्यांच्यावर खटले मागे घेता येईल. नियम 169 प्रमाणे आपल्याला ते करता येईल. त्याबद्दल पोलिसांना सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पोलिसांनीच चोर चोर असे ओरडून त्या चोरांना पकडण्यास लोकांना सांगितले म्हणून गावकऱ्यांनी एकत्र येऊन त्या चोरांना पकडले आहे. पण त्यावेळेस पोलिसांनी त्या चोरांकडील माल हडप केला आहे .....

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, काही लोकांनी चोरांना पकडा, मारा म्हणून सांगितले त्यामुळे गावकऱ्यांनी त्या चोरांना पकडले आणि त्यांना मारले. त्यात 3 लोक ठार झालेले आहेत. ...

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण सारेच एकदम उठून प्रश्न विचारू लागलात तर त्यातून आपल्याला अपेक्षित उत्तर मंत्र्यांकडून येणार नाही. तेव्हा एका एकाने प्रश्न विचारल्यास आपल्याला योग्य उत्तर मिळू शकेल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे जे काही चालले आहे ते बरोबर नाही, आपण स्वत: यामध्ये लक्ष घालावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, ज्यावेळेस गावऱ्यांनी चोरांना पकडले आणि मारहाण करण्यास सुरूवात केली तेव्हा चोरांनी तेथील पी.आय.ला फोन केला आणि सांगितले की, आम्हाला हे लोक मारायला लागले आहेत. तेव्हा या प्रकरणात प्रथमत: त्या पोलीस अधिकाऱ्याच्या फोन कॉल्सची तपासणी करण्याची गरज आहे. तसेच या प्रकरणात जी गाडी जळाली आहे त्या गाडीच्या ड्रायव्हरने ज्या व्यक्तीचे नाव घेतले त्याच व्यक्तीचे नाव पोलीस शिपायानेदेखील घेतलेले आहे. त्याला आपण अटक केली आहे काय ? सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्यावेळेस हे लोक काठोरा बाजारमध्ये गेले .....

(यानंतर श्री. सरफरे ..... टीटी 1 ..

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल...

त्यावेळी त्या लोकांना मारेपर्यंत पी.एस.आय. कुठे होते? पैसे सुरक्षित ठिकाणी ठेऊन ते पुन्हा आले काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले आहे की, त्याठिकाणी पी.आय. श्री. घोडके होते. त्यांनी लोकांना सांगितले की, मारु नका. त्यावेळी त्यांनी हवेत तीन फैरी झाडल्या. त्यामध्ये कुणीही जखमी झाले नाही...

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, आपण त्यांचे फोन तपासून बघावे. चोरांनी त्या पी.आय. ला फोन केला होता की नाही?

सभापती : माननीय सदस्यांनी दिलेली माहिती मंत्रिमहोदयांनी तपासून घ्यावी.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, माहिती तपासून घेण्यात येईल.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, मंत्रिमहोदय असे सांगत आहेत की, चोराच्या पाठीमागे लागून आणि चोराला पकडून मारहाण करण्यात आली. त्यानंतरच्या केसमध्ये कोणती पध्दत अंगिकारण्यात येते याची माहिती लोकांना असते. गावामध्ये जे प्रतिष्ठित लोक असतात त्यांना मारहाण करणारे लोक कोण आहेत हे माहीत असते. त्याठिकाणी पत्रकारांना देखील पकडण्यात आले, त्या लोकांबरोबर पत्रकारांना देखील आतमध्ये टाकण्यात आले. स्वत:चा गुन्हा लपविण्यासाठी सरसकट सर्वांवर गुन्हा दाखल केला जात आहे. त्यामध्ये चांगले लोक कोण आहेत? आणि मारहाण करणारे लोक कोण आहेत हे माहीत असतांना आपले पाप लपविण्यासाठी चांगल्या लोकांवर गुन्हे दाखल करण्याची कारवाई एक तासाच्या आत हे सर्व लोक करु शकतात. तेव्हा या सर्व लोकांची वेगाने तपासणी करण्याकरिता दुसऱ्या यंत्रणेला कामाला लावून पकडण्यात आलेल्या लोकांना आपण मुक्त करणार काय? आणि ज्यांनी स्वत:चे पाप लपविण्यासाठी अशाप्रकारचा प्रयत्न केला आहे त्यांना आपण निलंबित करणार काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले आहे की, यामध्ये हे लोक निरपराध आहेत की नाहीत याची चौकशी केली जाईल...

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, चौकशी करण्यासाठी जास्त वेळ लागतो.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, चौकशी करण्यात येईल. आणि चौकशीमध्ये जे दोषी सापडतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.आणि कलम 169 लावून ती नावे काढण्यात येतील. सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये याबाबत माहिती दिली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. सिध्दाराम म्हेत्रे....

ज्याठिकाणी गुन्हा घडला आहे त्या सर्वांचे जबाब घेण्यात आले आहेत. आणि पोलिसांनी ज्यांना पकडले आहे त्यांचे जबाब घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला. त्यांनी स्वत:च मारहाण केली असल्याचे म्हटले आहे.

सभापती : मंत्रिमहोदय, त्या गावामध्ये काही चोर, दरोडेखोर आले असे ज्यावेळी लोकांना समजले त्यावेळी काही लोकांनी पोलिसांना वर्दी दिली. त्यावेळी पोलीस त्याठिक्राणी आले . त्या लोकांनी दरोडेखोरांना थोपविण्याचा प्रयत्न केला. त्या दरम्यान पळून जाणाऱ्या दरोडेखोरांना पकडण्यासाठी पोलिसांचे बळ कमी पडले. अशापरिस्थितीत 8 ते 10 दरोडेखोर पळून जात असतांना त्यांना पकडून देण्यासाठी जर लोक पोलिसांना मदत करीत असतील तर त्याची दखल घेतली पाहिजे. त्यादृष्टीने एखादा उच्चस्तरीय अधिकारी त्याठिकाणी पाठवून चौकशी करण्याची आवश्यकता आहे. आपण याठिक्राणी सांगितले की, याबाबत पुन्हा चौकशी करुन जे निष्पाप लोक आहेत त्यांना कलम 169 खाली मुक्त करण्याच्या दृष्टीने कारवाई करण्यात येईल. त्यादृष्टीने आपण त्याठिक्राणी एक उच्चस्तरीय अधिकारी पाठवावा आणि या प्रकरणाची पुन्हा चौकशी करावी. तसेच, इन्सपेक्टर श्री. घोडके यांचेबाबत माननीय सदस्यांनी माहिती दिली व माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या विभागाच्या खासदारांनी माहिती दिली आहे. त्या अनुषंगाने कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करावेत अशी दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांची इच्छा आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण या चर्चेमध्ये हस्तक्षेप करुन योग्य ते निदेश शासनाला दिल्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. प्रश्न असा आहे की, श्री. घोडके हे त्या पोलीस स्टेशनला आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

परंतु प्रश्न असा आहे की, श्री.घोडके त्याच पोलीस स्टेशनमध्ये काम करीत आहे आणि तोच चौकशी करणार आहे. मी याठिकाणी तेथील खासदारांच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे आणि खासदारांनी संबंधिताविरुध्द स्पष्ट आरोप केलेला आहे की, "पोलीस निरीक्षक श्री.रमेश घोडकेचे चंदनचोराशी लागेबांधे आहेत. त्यांचे मोबाईल रेकॉर्ड तपासावे. श्री.घोडके यांच्यावर कलम 302 चा गुन्हा दाखल करण्यासाठी मानवी हक्क आयोगाकडे खासदारांनी केलेली तक्रार." सभापती महोदय, हे अतिशय गंभीर स्वरुपाचे प्रकरण आहे. असे असताना देखील माननीय मंत्री महोदय सांगत आहेत की, यामध्ये कोण गुन्हेगार आहेत हे नंतर तपासून पाहू वगैरे. हे सर्व प्रकरणे ज्या इन्स्पेक्टरमुळे घडलेले आहे, ज्यांच्या निष्काळजीपणामुळे घडले, ज्यांचे चोरांशी लागेबांधे असल्यामुळे घडले अशा पोलीस अधिकाऱ्याच्या विरोधात ताबडतोब निलंबनाची कारवाई करावी आणि तेथे नवीन अधिकाऱ्याची नेमणूक करुन या सर्व प्रकरणांची आपण चौकशी करणार आहात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, दि.8-7-2008 रोजीच संपूर्ण केस सी.आय.डी. क्राईमकडे वर्ग करण्यात आलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, संबंधित इन्स्पेक्टर तेथे काम करीत आहे, त्यामुळे पुरावे . . . .

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ही संपूर्ण सी.आय.डी.कडे वर्ग करण्यात आलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, संबंधितांची तेथून बदली करावी. पुरावे . . . .

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आता संबंधितांकडे चौकशीचे काम नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ...

सभापती : माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या संपूर्ण प्रकरणाचा तपास दि.8-7-2008 रोजी सी.आय.डी.क्राईम यांच्याकडे वर्ग करण्यात आलेला आहे. आता सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांनी सांगितले, त्या मुद्यांबाबत देखील सी.आय.डी.ला सांगितले जाईल की, संबंधित पोलीस निरीक्षक श्री.घोडके आहे, त्याच्या मोबाईलचे सर्व रेकॉर्ड तपासून याबाबतीत सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पोलीस निरीक्षक श्री.घोडके यांच्यावर तेथील खासदारांनी चंदनचोरीच्या बाबतीत आरोप केलेला आहे. त्यामुळे त्यांना तेथे ठेऊन चालणार नाही. त्यांना निलंबित करावे. त्यांना त्या जिल्हयाच्या बाहेर काढावे.

सभापती : माननीय राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मी तुम्हाला या आसनावरुन काही आदेश देणार नाही. पण एकंदरीत या घटनेचे गांभीर्य पाहिले व त्या अनुषंगाने याबाबतीत अत्यंत निकोप चौकशी व्हावयास हवी असेल तर आपण स्टेट सी.आय.डी.यांच्याकडे हे प्रकरण दिलेले आहे, त्याबद्दल मी धन्यवाद देतो. ही चौकशी करीत असताना, त्याठिकाणी संबंधित अधिकाऱ्याला ठेवणे योग्य आहे काय ? हे तुम्ही पहावयाचे आहे. मी "अ" किंवा "ब" असे काही म्हणणे बरोबर नाही. पण त्यादृष्टीने आपण त्याचा गांभीर्याने विचार करावा अशी माझी आपल्याला सूचना आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, संबंधित अधिकाऱ्याची जिल्ह्याबाहेर बदली करुन चौकशी करण्यात येईल.

सभापती : यानतर लक्षवेधी सूचना क्रमांक 2 घेण्यात येईल.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, माझी अशी विनंती आहे की, लक्षवेधी सूचना क्र.3 अगोदर चर्चेसाठी घेण्यात यावी.

सभापती : ठीक आहे. लक्षवेधी सूचना क्र.2 नंतर घेण्यात येईल.

. . . .2 यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नाशिक शहरामध्ये निर्माण झालेली पाणी टंचाई

मु.शी. : नाशिक शहरामध्ये निर्माण झालेली पाणी टंचाई
यासंबंधी सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार
वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नाशिक जिल्हयात या वर्षी हवा तसा पाऊस न पडल्याने नाशिक शहरातील पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणात अवघा 800 द.ल.घ.फूट पाणी साठा शिल्लक रहाणे, त्यामुळे महापालिकेने शहराच्या पाणीपुरवठयात 20 टक्के कपात करण्यात येणे, अद्याप कपात कायम रहाणे, पाणलोट क्षेत्रात झालेल्या पावसामुळे धरणात 300 द.ल.घ.फूट पाणी साठा वाढणे, अन्य आरक्षणे विचारात घेतली तरी शहराला ऑगस्ट, 2008 पर्यंत पाणीपुरवठा पुरेल असे महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंता यांनी केलेला अंदाज आणि तद्नुषंगाने पाणी काळजीपूर्वक वापरणेबाबत केलेले आवाहन, तसेच या प्रकरणी पाणी टंचाई निवारण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.अजित पवार (पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचने-संबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

. निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .2 यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, नाशिक शहराची वाढ जबरदस्त मोठया प्रमाणात होत आहे आणि महानगरपालिकेने, शासनाने पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात चांगली मदत केलेली आहे.

आज गंगापूर धरणामध्ये 1783 द.ल.घ.फू., गौतमी-गोदावरी धरणामध्ये 297 द.ल.घ.फू., काश्यपी धरणामध्ये 217 द.ल.घ.फू आणि दारणा धरणामध्ये 5475 द.ल.घ.फू.एवढा साठा असून टोटल वार्षिक 3850 द.ल.घ.फू.पैकी 50 टक्केच साठा उपलब्ध आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, माझी शासनाला नम्र विनंती आहे की, पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे गरजेचे आहे आणि 31 जुलै पर्यंत पाण्यामध्ये 25 टक्के कपात करण्यात आलेली आहे आणि ऑगस्टमध्ये 50 टक्के कपात करणार आहात. दुष्काळ पडला म्हणून पाण्याचा साठा वाढविण्यासाठी त्यामध्ये कपात करण्याऐवजी, भविष्याचा वेध घेऊन सध्या नाशिक शहराची जी वाढ होत आहे त्याबाबतीत विचार केला पाहिजे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, आपण नाशिक कॉर्पोरेशनला, तसेच इतरही सगळया कॉर्पोरेशनला पाण्याचे रि-सायकलींग करण्याच्या बाबतीत योजना तयार करण्यास सांगणार आहात काय ? दुसरा प्रश्न असा की, जे.एन.एम.यु.आर.एम. ही योजना आहे, त्याला केंद्र शासन फायनान्स करणार आहे. नाशिक शहरातील गंगापूर धरणामध्ये फार मोठया प्रमाणात गाळ साचलेला आहे. त्यामुळे 1200 एम.सी.एफ.टी.ची कपॅसिटी कमी झालेली आहे. आमची 1300 एम.सी.एफ.टी.ची कपॅसिटी कमी झालेली आहे, म्हणून तेवढे कॉम्पनसेट करण्यासाठी जे.एन.एम.यु.आर.एम.च्या योजनेखाली नवीन किकवी धरणाचे काम आम्ही प्लॅनमध्ये घेतलेले आहे. आपल्याकडून याच्या प्लॅन आणि एस्टीमेटबाबत पूर्तता होणे शिल्लक आहे. आपण ते तातडीने करणार आहात काय ?

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. अजित पवार : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये आपण सिंचनाकरिता जी धरणे बांधली त्या सगळ्या धरणांचा वापर आता सिंचन सोडून पिण्याच्या पाण्यासाठी व्हावयास लागला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजी दिसते. शेतकरी असे म्हणतात की, ही धरणे आमच्याकरिता बांधलेली असताना त्यातून पिण्यासाठी पाणी द्यावयास लागला आहात आणि आमचे पाणी कमी करावयास लागला आहात. राज्यकर्ते कोणीही असले तरी पहिल्यादा पिण्यासाठी पाणी दिले पाहिजे. मुंबईला पाणीपुरवठा करण्याकरिता महानगरपालिकेने स्वत:ची धरणे बांधली. नवी मुंबई महानगरपालिकेने स्वत:च्या पिण्याच्या पाण्याकरिता मोरबे धरण बांधले. राज्य शासनाने देखील मोठ्या महानगरपालिकांना असे सुचविले आहे की, त्या ठिकाणी आपल्याला धरण करावयाचे असेल तर त्याचे सर्वेक्षण करण्याकरिता किंवा इतर जी मदत पाहिजे असेल ती सगळी मदत आपल्याला जलसंपदा विभाग किंवा राज्य शासनाकडून केली जाईल परंतु त्याकरिता निधी उभा करणे आणि ते धरण पूर्ण करणे यासाठी महानगरपालिकेने लक्ष दिले पाहिजे. काही महानगरपालिकांनी मनावर घेतले. काही ठिकाणी साईट्स राहिलेल्या नाहीत. सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांनी नाशिकच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला. नाशिक शहरामध्ये या दुष्काळामुळे फारच बिकट परिस्थिती आहे. आज त्या ठिकाणी वार्षिक पाण्याची गरज 113.7 एम.एम.क्युबिक असताना उपलब्ध साठा 65.15 एम.एम. क्युबिक आहे. हीच परिस्थिती राहिली तर 1 तारखेपासून आज जी 25 टक्के पाणी कपात नशिक शहरामध्ये आहे ती 50 टक्के करावीच लागेल. सर्व नागरिकांनी अतिशय काळजीपूर्वक पाण्याचा वापर केला पाहिजे अशा पध्दतीने महानगरपालिकेला लक्ष द्यावे लागेल. आम्ही जिल्हाधिकाऱ्यांना तसेच संबंधित प्रशासनाला योग्य त्या सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी गंगापूर धरणातील गाळ काढण्याबाबत किंवा त्या ठिकाणी जो गाळ साचलेला आहे त्यामुळे गंगापूर धरणाचा पाण्याचा साठा कमी झालेला आहे त्यामुळे किकवी धरणाला परवानगी द्यावी असा मुद्दा उपस्थित केला. वरच्या भागात धरणे झाल्यानंतर खालच्या धरणामध्ये पाणी कमी येते. जायकवाडी धरणाच्या बाबतीत तसेच झाले. नाशिकपुरते बोलावयाचे झाले तर त्या ठिकाणी परिणाम झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी असे सांगितले होते की, उजनी धरणाच्या वरच्या भागात 15 धरणे आहेत. ती धरणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

भरल्यानंतर उजनी धरण्यामध्ये पाणी येते. या मधल्या काळामध्ये पाऊस कमी झाला तर आपण असा कायदा केलेला आहे की, वरच्या धरणातील पाणी त्या त्या प्रमाणात सोडावयाचे जेणेकरुन खालच्या धरणामध्ये किमान माणसांना पिण्यापुरते तरी पाणी साठविता येईल. अशाच प्रकारची परिस्थिती तीन-चार वर्षापूर्वी आली होती. त्यावेळी वरच्या धरणतून 10 टी.एम.सी. पाणी उजनी धरणामध्ये सोडले होते आणि लोकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविला होता. तशाच पध्दतीने दुर्दैवाने या वर्षी दुष्काळी परिस्थिती राहिली आणि वरच्या काही धरणांमध्ये पाणी असेल तर तशा प्रकारे पाण्याचे नियोजन जलसंपदा विभागाकडून आणि राज्य शासनाकडून केले जाईल. सन्माननीय सदस्यांनी किकवी धरणाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. तो प्रस्ताव आमच्याकडे आलेला आहे. जेएनएनयूआरएममध्ये कोट्यवधी रुपयांचा निधी देण्यास सुरुवात झालेली आहे. ठाणे महानगरपालिकेने शाई धरण बांधण्याकरिता पुढाकार घेतलेला आहे. त्याला एमएमआरडीए निधी देत आहे. आज कॅबिनेटच्या निमित्ताने बाळगंगा धरणाचा विषय मंत्रिमंडळापुढे आला होता. अशा पध्दतीने ज्या ज्या साईट्स आहेत त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याकरिता धरणे कशी करता येतील याचा प्रयत्न चालू आहे. गंगापूर धरणामध्ये जो काही गाळ साचलेला आहे त्यामुळे त्या ठिकाणी तेवढे पाणी साठविले जात नाही. त्यामुळे किकवी धरणाला परवानगी देता येईल काय ही बाब तपासून घेतली जाईल आणि पिण्याचा पाण्याचा जो अतिशय महत्वाचा प्रश्न आहे त्यासंबंधी मनापासून सहकार्य करण्याची भूमिका आमच्या जलसंपदा विभागाची राहील. सन्माननीय सदस्यांनी रिसायकलींगबद्दलचा मुद्दा उपस्थित केला. पाण्याचे दुर्भिक्ष्य लक्षात घेऊन त्याबद्दल देखील राज्यातील सर्व महानगरपालिकांना तशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : जळगाव जिल्हा परिषदेच्या शाळांमधून इयत्ता 5 वी ते 7 वी पर्यंतचे विद्यार्थी शाळा सोडण्याचे दाखले काढून घेण्याचे वाढलेले प्रमाण.

मु. शी. : जळगाव जिल्हा परिषदेच्या शाळांमधून इयत्ता 5 वी ते 7 वी पर्यंतचे विद्यार्थी शाळा सोडण्याचे दाखले काढून घेण्याचे वाढलेल्या प्रमाणासंबंधी सर्वश्री रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे, संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्य शासन एकीकडे केंद्र शाळांमध्ये पाचवीचे वर्ग सुरु करण्याचे निर्देश देत असतांना दुसरीकडे जळगांव जिल्हा परिषदेच्या शाळांमधून ५ वी ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे शाळा सोडण्याचे दाखले काढून घेण्यात येत असल्याचे जून, २००८ च्या शेवटच्या आठवड्यात उघडकीस येणे, दाखले काढून घेण्यासाठी दबावतंत्र वापरले जात असणे, दिवसेंदिवस हे प्रमाण वाढत असल्यामुळे जिल्हा परिषदेचे ५ वी ते ७ वी चे वर्ग बंद पडण्याच्या मार्गावर असणे, त्यामुळे सदर शाळांमधील शिक्षक व मुख्याध्यापकांसमोर मोठा पेच निर्माण होणे, राज्य प्राथमिक शिक्षक परिषदेने याबाबत एक निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) व प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना देणे, सदर प्रकरणी शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना व शासनाची याबाबत प्रतिक्रिया."

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे) 2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे आणि त्यातही यापूर्वी शासनाने घेतलेल्या चुकीच्या निर्णयामुळे ज्या गावामध्ये जिल्हा परिषदेची इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतची शाळा आहे त्याच गावामध्ये इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतची माध्यमिक शाळा जर असेल या तर विद्यार्थ्यांच्या संख्येअभावी किंवा विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी, माध्यमिक शाळेच्या आपल्या तुकडया टिकविण्यासाठी त्या शाळांची मागणी होत आहे. अशाप्रकारे विद्यार्थी पळविण्याचे प्रकार संपूर्ण राज्यामध्ये होत आहेत. जळगाव जिल्हयाचे हे एक उदाहरण घेतले आहे. त्याठिकाणी जिल्हा परिषदेच्या ज्या प्राथमिक शाळा आहेत त्याठिकाणी इयत्ता 5 वी ते 7 वीचे वर्ग आहेत. त्याच गावामध्ये माध्यमिक शाळेकडून त्या विद्यार्थ्यांना जिल्हा परिषदेच्या शाळेतून घेतले जात आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचे इयत्ता 5 वी ते 7 वीचे वर्ग बंद पडू लागले आहेत हा एक भाग झाला. सभापती महोदय, केंद्र शाळामध्ये 5 वी, 6 वी आणि 7 वीचे वर्ग सुरु करण्याचा मध्यंतरी शासनाने असा निर्णय घेतला होता. ज्या गावामध्ये माध्यमिक शाळेत इयत्ता 5 वी ते 7 वीचे वर्ग असतील त्यासंबंधी आपण धोरणात्मक निर्णय घेतला असला तरी सुध्दा 5 वी ते 7 वीचे वर्ग सुरु करणे म्हणजे त्या शाळातील वर्ग बंद करण्यासारखे होईल म्हणून यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. एकतर लोकल ट्रान्सफर करणे अलाऊड नाही ज्या गावामध्ये जिल्हा परिषदेची शाळा आणि माध्यमिक शाळा आहेत त्या शाळामध्ये या शाळांचा विद्यार्थी जाऊ नये असे निर्बध असताना ते पाळले जात नाहीत. याठिकाणी लेखी उत्तरामध्ये अशाप्रकारची तक्रार आलेली नाही असे म्हटले आहे. पण पुढील परिच्छेदामध्ये अशाप्रकारची तक्रार आलेली आहे असे म्हटले आहे. अनेक ठिकाणी असे प्रकार सर्रासपणे चालू आहेत. या अनुषंगाने माझा पहिला प्रश्न असा आहे की, ज्या गावामध्ये माध्यमिक शाळा आहे व 5 वी ते 7 वीचे वर्ग जिल्हा परिषदेचेही शाळा आहे या दोन्ही शाळेतील विद्यार्थी टिकविण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ? ज्या गावामध्ये प्राथमिक शाळेमध्ये 5 वी ते 7 वीचे वर्ग आहेत त्या गावातील माध्यमिक शाळेला 5 वी ते 7 वीचे वर्ग देण्याचे बंद करणार आहे काय ? तिसरा प्रश्न असा आहे की, ज्या गावामध्ये माध्यमिकच्या 5 वी ते 10 वीच्या शाळा आहेत म्हणजे 5 वी ते 7 वीची शिक्षणाची सोय आहे असे असताना जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये 5 वी ते 7 वीचे वर्ग सुरु करण्याचा जो आग्रह धरला जात आहे त्याबाबत शासन पुनर्विचार करणार आहे काय ?

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, जळगाव जिल्हयामध्ये जिल्हा परिषदेच्या इयत्ता 5 वी ते 7 वीचे वर्ग आहेत 443 आहेत. काही अपरिहार्य कारणामुळे मागील वर्षी 5 तुकडया बंद पडल्या होत्या. या सत्रामध्ये तेथे पुन्हा 4 वर्ग वाढलेले आहेत. स्थायी समितीने असा निर्णय घेतला होता की, जळगाव जिल्हयामधील जेवढया केंद्र शाळा आहेत त्यामध्ये 5 वी ते 7 वीचे वर्ग सुरु करण्यात यावेत. मग विद्यार्थ्यांची ने-आण सुरु झाल्यामुळे तेथे मुले मिळेनाशी झाले. तरीही यावर्षी चार ठिकाणी अशा नवीन शाळा सुरु झाल्या आहेत. हे सर्व वर्ग बंद पडू नये असे वाटत असेल तर अलिकडे स्पर्धात्मक भावना निर्माण झालेली. निकोप स्पर्धा निर्माण होऊ नये असा देखील सरकारचा मानस आहे. पण जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये, अन्य नगरपालिकेमध्ये किंवा खाजगी शाळेमध्ये आता दर्जेदार शिक्षण दिल्याशिवाय पर्याय नाही. जर अशाप्रकारे एकाच गावामध्ये किमान दोन शाळा असल्या तरच स्पर्धात्मक भावना निर्माण होईल. संख्येबाबत रिलॅक्सेशन द्यावयाचे किंवा नाही यावर विचार करावा लागेल. त्यांच्या संख्येबाबत एका गावामध्ये साधारणपणे 2 दोन शाळा असतील तर स्पर्धात्मक भावना निर्माण होते आणि म्हणून काही ठिकाणी शाळा दिल्या असतील, पण एखाद्या ठिकाणी निकोप स्पर्धा नसेल तर त्याबाबत निश्चितपणे गांभीर्याने विचार करु.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी मंत्रिमहोदयांच्या उत्तराशी काही अंशी सहमत आहे. त्याचे कारण असे की, जिल्हा परिषदांच्या शाळेतून ज्या दर्जाचे शिक्षण दिले जाते ते पाहता एका पिढीचे पाप शासनाच्या डोक्यावर येणार आहे. आम्ही ग्रामीण भागातून आलेले कार्यकर्ते आहोत. जिल्हा परिषदेच्या शाळेतील इयत्ता 5 वी ते 7 वी विद्यार्थी इयत्ता 10 वी किंवा 12 वीच्या परीक्षेमध्ये टिकू शकत नाही.

नंतर श्री.शिगम

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

इतके निकृष्ट दर्जाचे शिक्षण जिल्हा परिनषदांच्या शाळांमध्ये दिले जात असले तरी शिक्षण क्षेत्रातील स्पर्धेमुळे 5वी ते 7वीचे वर्ग खाजगी शाळांना देऊ नयेत असा धोरणात्मक निर्णय करु नये. ज्या शाळांमध्ये चांगले शिक्षण दिले जाईल त्या शाळेमध्ये पालक आपल्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी पाठवतील. जिल्हा परिषदेला 5 वी ते 7वी पर्यन्त शाळा द्यावयाची आणि ग्रामपंचायतीचे ना हरकत प्रमाणप्रत्र असल्या शिवाय खाजगी संस्थेला शाळा उघडण्याची परवानगी ने देणे, हा नियम शिथील करावा.

प्रा. वसंत पुरके : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या मताशी मी सहमत आहे. नक्षलग्रस्त आणि आदिवासी भागातील शाळांतील शिक्षकांना विशेष प्रोत्साहनपर भत्ता दिला जातो, घरभाडे भत्ता दिला जातो. त्यांच्या मुलांसाठी मेडिकल रिइम्बर्समेंट दिली जाते. एका गावामध्ये दोन शाळा असल्या तरच त्यांच्यामध्ये स्पर्धात्मक भावना निर्माण होईल. आमच्या जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी सातवी ते नववी पर्यन्त कधीच नापास होत नाही आणि दहावीमध्ये तो कधीच पास होत नाही असे बोलले जाते. अन्हेल्दी कॉम्पिटिशन होणार नाही याची दखल घेतली जाईल. एका गावामध्ये किमान दोन शाळा असल्या तरच स्पर्धात्मक भावना निर्माण होईल. निकष लावून शाळा देत असताना स्पर्धात्मक भावना निर्माण होईल याची दक्षता घेतली जाईल.

श्री दिलीपराव सोनावणे : केन्द्र शाळामध्ये पहिली ते सातवी पर्यन्तचे वर्ग सुरु आहेत. तसेच माध्यमिक शाळेमध्ये पाचवी ते दहावी पर्यन्तचे वर्ग सुरु आहेत. समन्वयाने तेथे काम चालू असताना जळगाव जिल्हयामध्ये सर्व ठिकाणी अशी परिस्थिती निर्माण का झाली हे मी थोडक्यात सांगतो. प्राथमिक शाळेमध्ये पाचवीचा वर्ग सुरु करण्याचा निर्णय जिल्हा परिषदेने घेतला. आता आपल्या विद्यार्थ्याला जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये घालायचे की खाजगी शाळेमध्ये घालायचे हे पालक ठरवितात. जेथे चांगले शिक्षण दिले जाते त्या शाळेत पालक आपल्या मुलांना घालतात. पालक जर आपल्या मुलांना जिल्हा परिषदेच्या शाळेतून काढून खाजगी शाळेमध्ये घालू इच्छित असतील तर तसे करण्यास त्यांना अडविले जाते. त्यांना विद्यार्थ्यांचे दाखले काढू दिले जात नाही अशी परिस्थिती आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागावर कुणाचे नियंत्रण आहे की नाही असा

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीपराव सोनावणे...

प्रश्न निर्माण झालेला आहे. चालू शैक्षणिक वर्षामध्ये जळगाव जिल्हा परिषदेने पाचवी ते सातवी पर्यन्तच्या शाळेची वेळ सकाळी 7.00 ते दुपारी 1.00 अशी केलेली आहे हे खरे आहे काय ? जळगाव जिल्ह्यामध्ये हा जो शिक्षणाच्या बाबतीत गोंधळ सुरु आहे त्यास शिक्षणाधिकारी जबाबदार असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री. वसंत पुरके : 73व्या घटना दुरुस्ती नुसार अधिकारांचे विकेन्द्रीकरण करुन जिल्हा परिषदांना अधिकार देण्यात आले आहेत. शिक्षण समितीने जिल्ह्यामध्ये किती शाळा सुरु करावयाचा यासंबंधीचा निर्णय घेऊन त्यानुार या शाळा सुरु केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागावर शासनाने नियंत्रण असले तरी त्यांना स्वतंत्र अधिकार आहेत. शिक्षण खात्याचे काही निकष असले तरी बरेचसे अधिकार स्थायी समितीला आहेत. त्यामध्ये काही सुधार करणे आवश्यक असेल तर त्यासंबंधी त्यांना निश्चितपणे सूचना करण्यात येतील.

श्री. विक्रम काळे : राज्यातील जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांमध्ये शिक्षक नाहीत, मुख्याध्यापक नाहीत. औरंगाबाद जिल्हयामध्ये शिक्षकांची 46 पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषदेची पहिली ते चौथी पर्यन्त शाळा असेल आणि खाजगी संस्थेची पाचवी ते दहावी पर्यन्त शाळा असेल तर जिल्हा परिषद पाचवीचे वर्ग का सुरु करते ?

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

जिल्हा परिषदांमध्ये वेगवेगळया राजकीय पक्षाचे अध्यक्ष असतात म्हणून विनाकारण तेथील खाजगी शाळांना त्रास द्यावयाचा, खाजगी शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या कमी करावयाची, गावामध्ये इयत्ता 5 वी वर्ग सुरु असताना सुध्दा जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये इयत्ता 5 वी चे वर्ग सुरु करण्याचा घाट घातला जातो ही गोष्ट बरोबर नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिलीपराव सोनावणे जळगाव जिल्हयाचे उदाहरण दिले. तशा पध्दतीने अनेक ठिकाणी गरज नसताना प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता 5 वी चे वर्ग जाणीवपूर्वक काढण्यात येत आहेत...

उपसभापती : एखाद्या प्रश्नावर ठराविक वेळेत प्रश्न विचारले जातात. परंतु असा विषय सभागृहात उपस्थित झाला तर जवळपास 30 ते 35 मिनिटे वेळ घेतला जातो. सन्माननीय सदस्यांनी कृपया स्पेसिफीक प्रश्न विचारावा.

श्री. विक्रम काळे : ज्या गावात इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतची शाळा आहे. त्या ठिकाणी जिल्हा परिषद इयत्ता पाचवीचा वर्ग उघडणार नाही अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय शासन घेईल काय ? माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्या प्रमाणे निकोप स्पर्धा असली पाहिजे. परंतु जिल्हा परिषदेच्या शाळांना विद्यार्थी कोठून येतील. गावातील मुले गावातील शाळेतील शिकतात. ज्या गावात प्राथमिक शाळेत इयत्ता 5 वी वर्ग सुरु आहे, त्या ठिकाणी जिल्हा परिषद इयत्ता 5 वी चा वर्ग उघडणार नाही अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय शासन घेईल काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, असे कोणावरही बंधन घालता येणार नाही. जी चांगली शाळा असेल, ज्या शाळेत शिक्षणाचा दर्जा चांगला असेल, अशा ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यास मुभा आहे. आपली स्वतःची मुले चांगल्या शाळेत पाठवावयाची. परंतु दुसरीकडे मात्र अंकूश ठेवण्यास सांगावयाचे. जी चांगली शाळा असेल त्या शाळेस मुभा दिली जाईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अधिवेशन लवकर संपविण्याबाबत वृत्तपत्रात आलेल्या वृत्ताचा खुलासा

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या सदनात तारांकित प्रश्नोत्तराचा तास सुरु होण्यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, संसदीय कार्य मंत्र्यांनी हे अधिवेशन उद्या संपणार आहे अशा प्रकारचे एका वृत्तपत्रात स्टेटमेंट केले आहे. सभापती महोदय, मी जवळपास साडेतीन ते चार वर्षापासून संसदीय कार्य मंत्री म्हणून या सदनात काम करीत आहे. मला माझ्या जबाबदा-या पूर्णपणे माहिती आहेत. अधिवेशन कधी ठरवावयाचे आणि कधी संपवावयाचे यासंबंधीचे अधिकार कामकाज सल्लागार समितीला आहेत. कामकाज सल्लगार समितीमध्ये जे निर्णय घेतले जातात, ते निर्णय मी या ठिकाणी ठरावाच्या माध्यमातून वाचून दाखवितो. मी नम्रपणे सांगू इच्छितो की, मी अशा प्रकारचे स्टेटमेंट कोणत्याही वृत्तपत्रात केलेले नाही. वृत्तपत्रात आलेले स्टेटमेंट रेकॉर्डवर राहू नये अशी माझी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, सभागृहाच्या बाबतीत अशा प्रकारचे स्टेटमेंट छापून येणे गैर आहे. सदर स्टेटमेंट हे माननीय संसदीय कार्य मंत्र्यांच्या नावाने छापून आलेले आहे. या वृत्तामध्ये असे लिहिले आहे की, संसदीय कामकाज मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, माझ्याशी दोन्ही सभागहातील असंख्य आमदारांनी अधिवेशन लवकर संपवा अशी मागणी केली आहे, मतदार संघात दुष्काळ पडलेला आहे अधिवेशनाच्या नावाखाली कलेक्टर, तहसिलदार, पोलीस अधिकारी, विभागीय आयुक्त असे अनेक वरिष्ठ अधिकारी मुंबईत येऊन बसतात. त्यामुळे जिल्हातील निर्णय घेण्यासाठी अधिकारी थांबत नाहीत, त्यामुळे अधिवेशन लवकर संपल्यास ते अधिकारी आपआपल्या भागात थांबतील व आम्हाला त्यांच्याकडून काम करुन घेता येईल, पुढे आपल्याबाबतीत गंभीर आक्षेप आहेत, यामध्ये सन्माननीय श्री, नितीन गडकरी यांचा देखील उल्लेख आहे, यासंदर्भात श्री, नितीन गडकरी यांनी तीव्र आक्षेप घेतलेला आहे, आमदारांचे असे म्हणणे आहे की, सरकारने नुकत्याच घोषणा केलेल्या आहेत, दुष्काळाच्या बाबतीत कोणकोणत्या उपाययोजना केल्या जातात हे रोजच्या रोज सभागृहासमोर आले पाहिजे ते येत नाही. राज्यात कोठे काही परिस्थिती आहे त्याची माहिती सभागृहाला मिळत नाही. सरकारने नुसत्या घोषणा केलेल्या आहेत. किती कामे सुरु

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आहेत, मजूर किती मिळाले आहेत, टॅकर्स किती सुरु करण्यात आले आहेत ? या गोष्टींची माहिती सदस्यांना मिळालेली नाही. सभापती महोदय, या वृत्तात शेवटचे वाक्य असे आहे की, या अधिवेशनात कमी झालेले दिवस नागपूर अधिवेशनमध्ये वाढवून देऊ असे आपण म्हटले आहे. ही बातमी दैनिक लोकमतमध्ये आलेली आहे. अधिवेशन लवकर संपणार आहे या शीर्षकाखाली हे वृत्त छापून आले आहे. सभागृहाच्या बाहेर अशा प्रकारची बातमी कोणी दिली, यासंदर्भात कोणी चर्चा केली, आमदारांनी काय मत व्यक्त केले यासंबंधीची बातमी छापून आली आहे. माननीय मंत्र्यांचे आणि आमदारांचा नावांचा उल्लेख आलेला असल्यामुळे मी हा मुद्दा उपस्थित केला. अशा प्रकारचे वृत्त छापून आले नसते तर अशा प्रकारचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रश्नच आला नसता.

यानंतर श्री. कानडे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MMP/ 14:30

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी कोणतेही अधिकृत स्टेटमेंट वर्तमानपत्रांना दिलेले नाही. अधिवेशनाचा कालावधी किती असावा आणि किती कालावधीपर्यंत ते चालवावे हे कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरविले जाते. आज विधानसभेच्या कामकाज सल्लागार समितीची बैठक 3.00 वाजता आणि परिषदेच्या कामकाज सल्लागार समितीची बैठक 4.00 वाजता होणार आहे. सभापती महोदय, आपणही त्या बैठकीला उपस्थित असता. त्यामुळे असे कोणतेही ऑफीशीअल स्टेटमेंट केलेले नाही. माझ्या नावाचा उल्लेख वर्तमानपत्रातील बातमीसंदर्भात झाला म्हणून मी हा खुलासा केला आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: नाशिक येथील सहा ते सात सराफांचे दागिने दरोडा टाकून लुटणे.

मु.शी.: नाशिक येथील सहा ते सात सराफांचे दागिने दरोडा टाकून लुटणे यासंबंधी सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नाशिक येथील नामवंत सहा ते सात सराफ हे माल ट्रकमधून अंगाडीयामार्पत सोन्याचे,हिऱ्याचे व प्लॅटिनियमचे दागिने नेण्या-आणण्याचे काम सातत्याने करीत असणे, दिनांक 15 मे 2008 रोजी माल ट्रक नंबर एम.एच. 17 पी 3786 या ट्रकमधून अंगाडीयामार्फत सोन्याचे, हिऱ्याचे व प्लॅटिनियमचे दागिने मुंबई येथून नाशिककडे नेत असताना विऱ्होळी जकात नाका येथे दरोडा टाकून सुमारे 10 लाख रुपये किंमतीचा माल लंपास करणे, याबाबत अंबड पोलीस स्टेशनला फिर्यादी तक्रार नोंदविण्यास गेले असता त्यांनाच दमबाजी करण्यात येणे, याठिकाणी अशा घटना घडल्यावर संबंधित पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांनी दरोडेखोरांकडून माल घेऊन तो परस्पर अन्य सराफांना विकणे, दरोडेखोरांकडून मालाच्या किंमतीइतकी रक्कम घेणे, शिवाय फिर्याद देण्याकरिता गेलेल्या फिर्यादींकडे पैशाची मागणी करणे, यामुळे व्यवसाय करणाऱ्या नामवंत सराफांमध्ये घबराट व संताप निर्माण होणे, सबब शासनाने याबाबत केलेली कार्यवाही वा करावयाची उपाययोजना ".

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृहराज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. "असे करीत असताना मी आपल्या अनुमतीने निवेदनात पुढील दुरुस्ती करु इच्छितो ". निवेदनामध्ये एकूण 10 आरोपींना अटक करण्यात आली आहे असे नमूद केले आहे त्याऐवजी 11 आरोपींना अटक केली आहे असे वाचावे.

उपसभापती : निवेदन सुधारल्याप्रमाणे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कुंपणच शेत खात आहे अशातला हा प्रकार आहे. न्याय देणारी माणसेच चोर आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, पकडलेल्या आरोपींमध्ये पोलीस कर्मचारी किती आहेत ? ही गंभीर बाब आहे. नाशिक जिल्हयातील ज्या सराफांचे कुरीअरमार्फत दागिने पाठविले जातात त्यांचे दागिने लुटण्याचे काम झाले आहे. ज्यांनी फिर्याद नोंदविली त्यांच्याकडून श्री. बुधवंत, पोलीस निरीक्षक यांनी पैसे मागितले. त्यानंतर मी स्त: गृहमंत्र्यांना यासंदर्भात पत्र लिहिले आहे. तपासाची कार्यवाही सुरु झाली. याप्रकरणातील आरोपी पोलीस निरीक्षक श्री. बुधवंत यांनी चोरलेले दागिने विकले आहेत. ज्यांच्याकडून दागिने घेतले त्यांच्याकडूनच 25 लाख रुपये घेतले. म्हणजे फिर्यादीकडून 25 लाख रुपये घेतले. तसेच दागिने विकून 25 लाख रुपये घेतले. त्यानंतर मी स्वत: पोलीस आयुक्तांना आमदार या नात्याने फोन केला. त्याबरोबर आयुक्तांनी त्यांची चौकशी केली. चौकशीसाठी क्राईम ब्रॅचचे पोलीस निरीक्षक श्री. सराफ यांना नेमले. नाशिक जिल्हयामध्ये आणि नाशिक शहरामध्ये आजपर्यंत जेथे जेथे दरोडे पडले त्यापैकी किती दरोडयातील चोरांना पकडण्यात आले ? काही पोलीस यामध्ये सापडले आहेत. तेव्हा या प्रकरणाची चौकशी उच्च पातळीवरुन शासन करील काय ? मी याप्रकरणात रस घेतला कारण माझे नातेवाईक श्री. टकले बंधू आहेत. त्यांचे स्वत:चे 25 लाखांचे दागिने लुटले गेले. आयुक्तांनी श्री.बुधवंत यांना निलंबित केले आहे. पोलीस आयुक्त श्री. रॉय यांची बदली करुन त्याठिकाणी श्री. सय्यद नावाचे पूर्वीचे कमिशनर आणण्यासाठी पोलीस निरीक्षक श्री. बुधवंत यांनी 40-50 लाख रुपये खर्च करण्याचा प्रयत्न केला. म्हणून याप्रकरणाची उच्च पातळीवरुन चौकशी करुन संबंधित पोलीस अधिकारी यांच्यावर शासन कडक कारवाई करील काय ? श्री. बुधवंत यांना निलंबित न करता त्यांना सेवेतून बडतर्फ करावे अशी मी मागणी करीत आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आरोपींमध्ये एकूण 5 पोलीस कर्मचारी आहेत. एक पोलीस निरीक्षक आणि चार हवालदार आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती आहे. दरोडे पडले आहेत त्याची चौकशी करण्याकरिता गुन्हे शाखेतील निरीक्षक श्री. सराफ यांची नेमणूक केलेली आहे. आरोपींवर गुन्हे दाखल केलेले आहेत. त्यांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता परंतु तो मंजूर झाला नाही. हायकोर्टात पोलिसांतर्फे जामिनासाठी विरोध करण्यात

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आला आहे. जामीन देऊ नका अशी हायकोर्टाला विनंती करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी तक्रार केल्यानंतर उपमुख्यमंत्री साहेबांनी आरोपींना घटनेच्या कलम 311 नुसार प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. प्रस्ताव आल्यावर आरोपींना सेवतून बडतर्फ करण्यात येईल.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, प्रकरण अतिशय गंभीर आहे. दरोडयामध्ये पोलीसच सहभागी आहेत. चोरीला गेलेला माल 100 टक्के रिकव्हर होत नाही. याप्रकरणात 21 लाख 32 हजार 803 रुपयांची मालमत्ता चोरीला गेली आहे त्यातील 13 लाख 31 हजार 159 रुपयांची मालमत्ता रिकव्हर झाली आहे. 15.5.08 रोजी गुन्हा घडला आहे. गुन्हयातील मालाची रिकव्हरी करण्यासाठी पोलिसांना अपयश का येते ? सगळा तपास झालेला असताना बाकीचे दागिने का सापडत नाहीत ? म्हणून तातडीने वरिष्ठ पातळीवरुन सूचना देऊन उरलेले दागिने पोलीस खाते किती दिवसात रिकव्हर करणार आहे ?

नंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4.....

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणी 11 आरोपी सापडले असून त्यांच्याकडून हे दागिने हस्तगत केले आहेत. अजूनही तपास चालू आहे. तपासातून जे काही निष्पन्न होईल ते हस्तगत करण्याविषयी आदेश दिले आहेत.

ॲड.अनिल परब : आरोपी जेल कस्टडीमध्ये गेले की, तपास बंद होईल. म्हणून उर्वरित मुद्देमाल हस्तगत करण्यासाठी पोलीस कस्टडी वाढवून घेतली जाईल काय?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : त्यासाठीच पी.सी.आर.ची मागणी करण्यात आली आहे. पोलिसांकडून नव्याने तपास सुरु झाल्यानंतर पी.सी.आर.मध्ये वाढ द्यावी म्हणून मॅजिस्ट्रेटकडे मागणी करण्यात आली आहे. ती मागणी मान्य झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ही घटना उघडकीस आली म्हणून पुढचे सगळे प्रताप कळले आहेत. अशा प्रकारचे इतरही गुन्हे घडले असतील. संबंधित पोलीस अधिकारी किती दिवसापासून त्या ठिकाणी कार्यरत होते, त्यांनी यापूर्वीच्या गुन्ह्यांमध्ये देखील अशाच प्रकारे दागिने लंपास केले असण्याची शक्यता आहे. त्या संदर्भात देखील तपास करणार आहात काय?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : यापूर्वीही संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात जेवढे गुन्हे घडले, दरोडे पडले, चोऱ्या झाल्या त्या सगळ्या घटनांचा तपास करण्याचे आदेश दिले आहेत. त्या घटनांमध्ये देखील हे अधिकारी सामील असावेत असे समजून हे आदेश देण्यात आले आहेत.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी उल्लेख केल्याप्रमाणे ही घटना माझ्याशी संबंधित आहे. या एकाच प्रकरणावरुन एकूणच पोलीस खात्याचे काम कशा पध्दतीने चालते याबद्दलचे अतिशय विदारक चित्र जनतेसमोर आले आहे. ही सगळी वाढती शहरे आहेत. उद्योगधंदे वाढत आहेत. अशा वेळेला व्यवसाय करणाऱ्यांची सुरक्षितता आणि त्यांच्या मालमत्तेची जोखीम हा महत्वाचा प्रश्न असल्यामुळे पोलीस दलातील कर्मचारी अशा प्रकारे वागत असतील तर ती बाब गंभीर आहे. जी मागणी माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी केली त्याप्रमाणे या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होण्याची नितांत आवश्यकता आहे. स्थानिक पातळीवरुन चौकशी न होता वरिष्ठ पातळीवर या प्रकरणाची चौकशी व्हावी. अशा प्रकारच्या अनेक घटना या महानगराच्या हद्दीत गेल्या काही दिवसापासून घडत होत्या. त्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4.....

श्री.हेमंत टकले.....

घटनांबाबतचा अहवाल शासनाने मागवून घ्यावा आणि तातडीने योग्य ती उपाययोजना करावी, जेणेकरुन जनतेचा पोलिसांवरील विश्वास कायम राहील.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : मी सुरुवातीलाच सांगितले की, श्री.बुधवंत व इतर 4 पोलीस कर्मचारी यांच्या संदर्भात कलम 311 अन्वये प्रस्ताव पाठवावा असे आदेश दिले असून त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सहा पोलीस अधिकारी व इन्स्पेक्टर या प्रकरणात गुंतलेले आहेत. आणखी किती पोलीस अधिकारी या प्रकरणात गुंतले आहेत? त्या सर्वांची चौकशी केली जाईल काय?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : अशा प्रकरणांमध्ये जे जे अधिकारी आणि कर्मचारी गुंतले असतील त्या सर्वांची चौकशी करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पोलिओ लसीकरण मोहिमेत घडलेला गैरप्रकार

मु. शी. : पोलिओ लसीकरण मोहिमेत घडलेला गैरप्रकार यासंबंधी सर्वश्री प्रतापसिंह मोहिते-पाटील, संजय दत्त, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, चरणसिंग सप्रा, गोविंदराव आदिक, परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पोलिओचे देशातून उच्चाटन करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार कोट्यवधी रुपये खर्चून पोलिओ निर्मुलन योजना राबवत असतानाच ठाणे महापालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्यांकडून हेतुपुरस्सरपपणे दुर्लक्ष केले जात असल्याचे माहे जुलै २००८ मध्ये वा त्या दरम्यान आढळून येणे, ठाणे जिल्ह्यातील विविध ठिकाणी पोलिओच्या बुथवर प्रशिक्षण देण्यात न आलेल्या इयत्ता ८ वी, ९ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना ५० रुपये रोजंदारीवर पोलिओचे डोस देण्यासाठी कामाला लावून ठाणे महापालिकेने पोलिओ लसीकरण मोहिमेचा पोरखेळ केल्याचे आढळून येणे, सदर मुलांमार्फत बुथवर बसून लसीकरण करण्याऐवजी घरोघरी जावून डोस देण्यात येणे, एका ४ वर्षाच्या मुलीला डोस देत असताना बाटलीतील सर्व डोस मुलीच्या तोंडात पडून ती बेशुध्द झाल्याने तीला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात येणे, अशाप्रकारे महापालिका या लहान मुलांच्या जीवाशी खेळ करीत असल्याचे आढळून येणे, तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात दिनांक १८ जुलै, २००८ रोजी पणदूर तिठा येथे एका मुलीला पोलिओ झाल्याचे आढळून येणे. यामुळे पालकांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, सबब महापालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. लक्षवेधी सूचना देणाऱ्या सन्माननीय सदस्यांपैकी प्रथम नाव सन्माननीय सदस्य श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील यांचे आहे. परंतु जे निवेदन वितरित केले आहे त्यावर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांचे नाव प्रथम दर्शविले आहे. नेमके काय आहे?

उपसभापती : नेमके मी जे वाचले तेच आहे.

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, पोलिओ निर्मूलनाबाबत केंद्र व राज्य सरकार अतिशय प्रभावीपणे काम करीत असताना ठाणे महानगरपालिकेमध्ये हा कार्यक्रम राबविण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांचा वापर करण्यात आला. एका 4 वर्षाच्या मुलीला डोस देत असताना बाटलीतील संपूर्ण औषध तिच्या घशामध्ये गेल्याने तिला हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले.

(नंतर श्री.भारवि....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील...

लोकशाही दिनी या संबंधी श्री.राजेश मोरे यांनी तक्रार केली होती. त्यांच्यावरच नौपाडा पोलीस ठाण्यामध्ये अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोग्य विषयक प्रश्न असताना ज्यांनी याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे, त्यांची चौकशी शासनाने केली आहे काय ? असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे. सदर अहवाल दडपण्यासाठी मुख्य आरोग्य अधिकारी डॉ.केंद्रे आणि त्यांचे सहकारी हे जबाबदार होते, त्यांच्यावर शासन कडक कारवाई करणार आहे काय ? अशा प्रकारामुळे महाराष्ट्रात पोलिओ रूग्ण आहे अशी शंका उपस्थित होते. तेव्हा राज्यात सध्या एकूण किती पोलिओग्रस्त रूग्ण आहेत, यासंबंधीची आकडेवारी मंत्रिमहोदयांच्या उत्तरातून मिळेल काय ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, आपल्याला भिवंडी आणि गोवंडी या भागात दोन पोलिओग्रस्त रूग्ण आढळलेले आहेत. सन 2005 पर्यंत महाराष्ट्र पोलिओ मुक्त होता. लसीकरणाच्या बूथवर चार वर्षाची मुलगी आली होती. एका व्हायलमधून आपण दोन ड्रॉप्सप्रमाणे 17 ते 18 डोस देतो. या मुलीच्या आधी 13 जणांना डोस दिला होता. तीन ते चार डोस शिल्लक होते. त्या मुलीला डोस पाजत असताना स्वयंसवेकाचा टॉपवर जोरात दाब पडल्यामुळे जादा म्हणजे 3 ते 4 ड्रॉप्स मुलीच्या तोंडात पडले. आपला पल्स पोलिओ राष्ट्रीय निर्मूलन कार्यक्रम आहे. त्यामध्ये मार्गदर्शक तत्त्वे आहेत. त्यानुसार जादा ड्रॉप्स पडल्याने काहीही त्रास होत नाही, असे नमूद करण्यात आले आहे. ज्या लाभार्थीच्या तोडांत जादा ड्रॉप्स पडले तिला कसलाही त्रास झ ालेला नाही. एवढेच नव्हे तर तिला रूग्णालयात देखील दाखल करून घेण्यात आलेले नाही. मात्र, दिशाभूल करणारी बातमी वर्तमानपत्रात आली होती. सदर बातमी ही विसंगती निर्माण करणारी होती. महाराष्ट्रात सर्वत्र पल्स पोलिओचा कार्यक्रम व्यवस्थितपणे चालतो. कोणत्याही प्रकारचे पाच वर्षाच्या खालील लाभार्थी वंचित राहता कामा नये यासाठी आपण प्रयत्न करीत असतो. यासाठी लोकांचा प्रतिसाद मिळावा म्हणून आपण स्वयंसवेकांची मदत घेत असतो. या कामासाठी आपण मुले देखील घेतली आहेत. त्यात या मुलांचा काहीही दोष नाही. आपण संबंधित पर्यवेक्षकाला काळजी घ्यावी असे सांगितले आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्रश्न यात येत नाही. आपण आपल्या राज्यात पोलिओ निमूर्लनाचा चांगला कार्यक्रम राबवित आहोत.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रतातसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, जे शालेय विद्यार्थी आहेत, ज्यांचे वय कमी आहे, ज्ञान नाही अशांना आरोग्य विषयक कार्यक्रमामध्ये सहभागी करून घेता येते काय ? हा माझा प्रश्न आहे. कुमार अतुल कांबळी या 14 वर्षाच्या मुलाला आपण स्वयंसेवक म्हणून घेतले आहे. त्याचा फोटो देखील सकाळ या दैनिकामध्ये आलेला आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, अशा कार्यक्रमांमध्ये लहान मुलांना सहभागी करून घेता येते काय ? यामुळे जे दुष्परिणाम होणार आहेत अशा अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे काय ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, अशा प्रकारच्या कार्यक्रमांना स्वयंसेवक म्हणून एन.एस.एस., लायन्स क्लब, रोटरी क्लब यांची मदत घेतो. या कार्यक्रमासाठी फार मोठे प्रशिक्षण देण्यात येत नाही. दोन तासामध्ये देखील आपण शिकू शकतो. नॅशनल इम्युनेशन प्रोग्रॅममध्ये 13 ते 14 वर्षाच्या मुलांचा समावेश करण्यास हरकत नाही अशा प्रकारच्या गाईड लाईन्स जागतिक आरोग्य संघटनेकडून, फॅमिली ब्युरोकडून देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे येथे देखील मार्गदर्शक सूचनेचे पालन केले आहे, असे दिसून येत आहे. त्यामुळे मुलांना अशा कार्यक्रमांसाठी घेता येते हे मी येथे सांगू इच्छितो.

यानंतर श्री.पी.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : महोदय, उत्तरात म्हटले आहे की, सन 1998 नंतर पोलियोचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही. सन 2008 मध्ये सुलोचना राणे या साडेतीन वर्षाच्या मुलीचे पाय लुळे पडले असे म्हटले आहे. गेल्या 10 वर्षात पोलियो निर्मुलन कार्यक्रमावर कोटयावधी रुपये खर्च करुन गावागावात ही योजना राबविण्यात आली. त्यानंतर देखील 3.5 वर्षाची मुलगी पोलियोग्रस्त आढळून आली. यासंबंधीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर काय कारवाई करणार आहे ?

डॉ. विमल मुंदडा : महोदय, आपण पोलियोमुक्त कार्यक्रम म्हणून हे पोलियोचे डोस देऊन संपूर्ण राज्यात हा कार्यक्रम राबवितो. त्यात एसएनआयडी वगैरे करतो. त्यामुळे अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा संबंध येत नाही. परंतु हा कार्यक्रम अधिकाधिक प्रभावीपणे कसा राबवावा याकडे लक्ष द्यावे, असे मला वाटते.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: आदिवासी आश्रमशाळांमध्ये मुलांची होत असलेली गैरसोय

मु.शी.: आदिवासी आश्रमशाळांमध्ये मुलांची होत असलेली गैरसोय यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, संजय केळकर, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवूधी सूचना.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेते) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"डहाणू (जि. ठाणे) तालुक्यातील आंबेसरी, धामणगांव आणि रणकोळ येथील आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे अनेक गैरसोयीमुळे हाल सुरु असणे, पावसाळ्यात डासांचा उपद्रव प्रचंड वाढलेला असतांना व त्या डासामुळे विविध आजार होत असतांना कोणतीही दखल घेण्यात न येणे, वर्गात व निवासी खोल्यात पावसाच्या पाण्याची ओल असल्यामुळे मुलांची बसण्याची व झोपण्याची गैरसोय होणे, दुरुस्तीसाठी शासनाकडून आलेल्या निधीचा गैरवापर झाल्यामुळे आश्रमशाळांची दुरुस्ती न होणे, एकीकडे विद्यार्थ्यांच्या निवासव्यवस्थेत हाल सुरु असतांनाच दुसरीकडे त्यांना देण्यात येणाऱ्या जेवणात देखील सडक्या धान्याचा अंतर्भाव असणे, चपात्यांना बुरशी असणे, वरणासाठी घेण्यात येणारी डाळ भेसळयुक्त असणे, निवास व भोजन व्यवस्थेतील या दयनीय परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे होणारे हाल त्याकडे स्थानिक अधिकाऱ्यांचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, लक्षवेधी सूचनेला जे निवेदन दिलेले आहे त्यावरुन सर्व काही आलबेल आहे असेच शासनाला म्हणावयाचे आहे, असे मला वाटते. मुळात अशी परिस्थिती आहे की, या ठिकाणच्या विद्यार्थ्यांकडून आमच्याकडे अशा तक्रारी आल्या आहेत की, अत्यंत निकृष्ट दर्जाचे अन्न त्यांना दिले जाते. तसेच वर्गामध्ये ओलावा, खोल्या नादुरुस्त असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. या अनुषंगाने माझा प्रश्न असा आहे की, या आश्रमशाळांना डाळी व कडधान्याचा पुरवठा केल्याचे म्हटले आहे. हा पुरवठा कोणी केला व कधी केला ? तसेच आदिवासी विकास महामंडळाच्या मुख्यालयाकडून तो केला आहे काय ? असल्यास तो कोणत्या पध्दतीने केलेला आहे ? गणवेश देखील प्रत्येक वर्षी दोन देणे आवश्यक आहे. तसेच या आश्रमशाळांसाठी स्पेसिफिकली 7.25 लाख, 6.50 लाख आणि 35.84 लाख एवढा निधी दिला तो कोणत्या तारखेला देण्यात आला? कोणत्या एजन्सीने त्या निधीचा विनियोग केला आणि कोणकोणती कामे या निधीतून करण्यात आली ? यासंबंधीचा खुलासा उत्तरात आलेला नाही. तसेच प्रकल्प अधिकाऱ्यांनी पावसाळ्यापूर्वी किती आश्रमशाळांना भेटी दिल्या आहेत ?

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, आपण आश्रमशाळांना अन्नधान्याचा पुरवठा आदिवासी विकास महामंडळामार्फत करतो. त्यानुसार जानेवारी-फेब्रुवारी मध्ये हा पुरवठा केलेला असून अजुनही आपल्याकडे अन्न उपलब्ध आहे आणि त्यातून रेग्युलर जेवण दिले जाते. दुसरी गोष्ट म्हणजे वर्गामध्ये ओलावा असल्याचे सन्माननीय सदस्यांनी सांगितले परंतु दिनांक 27 जून, 2007 रोजी आपण शाळा खोल्यांच्या दुरुस्तीचे आदेश दिले होते त्यानुसार 35.84 लाख, 6.50 लाख आणि 7.25 लाख एवढी रक्कम खर्च करण्यात आली. त्यातून जुने पत्रे बदलणे, खिडक्या व दरवाजे आणि काही ठिकाणी फरशा बदलण्यासाठी हा निधी दिला होता व ही सर्व कामे पूर्ण झाली आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, आताच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, हा निधी जून महिन्यात दिला. आता जुलै महिना असून एकाच महिन्यात ही कामे झाली काय ?

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, जून, 2007 रोजी हा निधी दिलेला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित ....

पिण्याच्या पाण्यासाठी, फरशा दुरुस्तीसाठी, दरवाजे, खिडक्या दुरुस्तीसाठी हा निधी वितरीत करण्यात आला होता. सदर कामे पूर्ण झालेली असल्यामुळे दरवाजे, खिडक्या व्यवस्थित आहेत, पाणी कोठेही गळत नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य सांगतात की, "त्या ठिकाणी ओलावा वगैरे असतो" ते बरोबर नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच म्हणालो होतो की, "आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आमच्याकडे तक्रारी आल्या होत्या त्यामुळे आम्ही ही लक्षवेधी सूचना दिली होती".

उपसभापती : आपण सांगितल्यानंतरच खरे म्हणजे यासंदर्भात ॲक्शन झाली असावी. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी, "विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे बरोबर नाही" असे म्हणणे बरोबर नाही.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, आमच्याकडे पालकांची किंवा कोणाचीही तक्रार आली नाही परंतु यासंदर्भातील माहिती वर्तमानपत्रात आल्यामुळे याबाबत चौकशी करण्यात आलेली आहे.

उपसभापती : विरोधी पक्षनेते हे जबाबदार लोकप्रतिनिधी आहेत. विरोधी पक्षनेते सभागृहात जेव्हा एखाद्या विशिष्ट प्रश्नावर विचार मांडत असतात, या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्यावर आरोप केलेले नाहीत. त्या ठिकाणची प्रत्यक्ष वस्तुस्थिती त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणली असेल तर त्यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडलेले आहे. त्यामुळे विरोधी पक्ष नेत्यांना मिळालेली माहिती बरोबर नाही असे म्हणणे तितकेसे योग्य नाही. कदाचित आपला शब्दप्रयोग चुकला असेल. परंतु हे सर्व प्रश्न मांडण्याच्या मागे त्यांच्या ज्या भावना आहेत त्या आपण कृपया लक्षात घ्याव्यात. हा विषय आता येथेच संपलेला आहे. आता सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई यांनी प्रश्न विचारावा.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, आदिवासी आश्रमशाळेतील प्रश्न, त्यांच्या जेवणाचे प्रश्न, आश्रमशाळा बांधकामाच्या संदर्भातील प्रश्न, मुलांना सर्पदंश होणे, मुलींच्या शोषणाबद्दल प्रश्न असे प्रश्न सातत्याने दोन्ही सभागृहात उपस्थित होत असतात. त्यामुळे माझी माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे.....

मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, आपण आश्रमशाळेच्या संदर्भात महिला आमदारांची एक समिती तयार केली होती. मला असे सूचवावयाचे आहे की, जशी अनुसूचित जातीची समिती आहे तशी आदिवासी कल्याण समिती आहे परंतु आमचा अनुभव असा आहे की, अशा समित्यांच्या शिफारशींची अंमलबजावणीच होत नाही. आपल्या विभागाचा कार्यक्रम खालपर्यंत जावा म्हणून आदिवासी शाळांच्या व्यवस्थापनाच्या संदर्भात विधानपरिषद आणि विधानसभेतील महिला आणि पुरुष आमदारांची एक समिती असणे आवश्यक आहे. आश्रमशाळेला ज्या वस्तू मिळतात त्यावर ख-या अर्थाने देखरेख ठेवण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे आदिवासी शाळांच्या व्यवस्थापनाच्या संदर्भात विधानपरिषद आणि विधानसभेतील महिला आणि पुरुष आमदारांची समिती नेमली जाणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, यासंदर्भात प्रकल्पस्तरीय एक समिती आहे. त्याच बरोबर स्थानिक स्तरावर प्रत्येक आश्रमशाळेच्या लोकल सभासदांची समिती आहे त्यामुळे यासंदर्भात समिती करण्याची गरज नाही असे मला वाटते. सन्माननीय सदस्या म्हणाल्या की, आदिवासी आश्रमशाळेच्या संदर्भात जेवनाच्या वारंवार तक्रारी येत असतात. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना मी नम्रपणे सांगू इच्छितो की, मागच्या एक वर्षामध्ये एक जरी तक्रार आली असेल व आपण ती दाखवून दिली तर मी त्यासंदर्भात पूर्ण चौकशी करीन.

(अडथळा)

उपसभापती : आदिवासी शाळेच्या संदर्भात शासनाचा दृष्टिकोन अतिशय चांगला आहे. आश्रमशाळेच्या संदर्भात शासनातर्फे जो काही निधी दिला जातो त्याचा खरोखरच आदिवासी मुलांना किंवा लाभधारकांना फायदा होतो का हा खरा प्रश्न आहे. आम्ही तक्रारी करीत नाहीत याचा अर्थ सर्व काही व्यवस्थित चालले आहे असा होत नाही. एक गोष्ट खरी आहे की, यासर्व संस्थांवर अंकुश ठेवण्याचे काम निश्चितपणे एखाद्या समिती मार्फत होणे आवश्यक आहे असे माझे स्वत:चे मत आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा सदस्य म्हणून मी काम केलेले आहे. त्यामुळे अनेक गोष्टी माझ्या निदर्शनास आलेल्या आहेत. आदिवासीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पात त्यांच्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जात असल्यामुळे सध्या त्याना मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध होत आहे . आता पर्यंत त्यांच्यासाठी जो काही निधी मिळालेला आहे तो निधी महाराष्ट्रात राहणा-या आदिवासींना द्यावयाचे ठरविले तर प्रत्येक आदिवासी व्यक्तीला एक कोटी रुपये मिळतील . अशा प्रकारे या विभागाला मोठया प्रमाणावर निधी मिळत असताना तो निधी नेमका कोठे जातो, कसा जातो हे कोणालाही समजत नाही या सभागृहामध्ये साडे तेरा कोटी रुपयांचे सरबताचे प्रकरण गाजले होते. त्यावेळी आपणच चेअरवर होता. अजूनही त्या पैशाचा हिशोब लागत नाही. माननीय मंत्री महोदय असे म्हणतात की, मी त्यांना निधी देतो परंतु ते माझ्याकडे हिशोब देत नाही ?

(उत्तर दिले नाही)

उपसभापती : हे सरबत कोण प्यायले ?

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी मघाशी उत्तर देतांना असे सागितले की, आश्रमशाळेच्या संदर्भात जर तक्रार देण्यात आली तर त्याची चौकशी करण्यात येईल. मी माननीय मंत्रिमहोदयांना मागे एक पत्र दिले होते त्याचबरोबर आयुक्तांना पत्र दिले होते . मी स्वत: अनेक आश्रमशाळांना भेटी दिल्या होत्या त्यावेळी तेथील परिस्थिती मी माझ्या डोळयांनी पाहिली होती आणि त्यानंतरच मी तक्रारीचे पत्र दिले होते. परंतु त्या संदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आली नव्हती. या आश्रमशाळेच्या दुरुस्तीच्या संदर्भात माझी अशी मागणी आहे की, आश्रमशाळेच्या दुरुस्तीच्या कामासाठी जी रक्कम देण्यात आली होती त्या संदर्भात चौकशी करण्यात येणार आहे काय ? या आश्रमशाळांची अवस्था अत्यंत वाईट असून मी अनेक आश्रमशाळांना गेल्या वर्षभरात भेटी दिल्या आहेत आणि त्यानंतरच आपल्याकडे आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार दिली होती. परंतु ती तक्रार आपल्याला मिळालेली नाही तेव्हा गेल्या वर्षभरात मी ज्या आश्रमशाळांना भेटी दिल्या होत्या आणि त्यावेळी मला जे काही आढळून आले होते त्यासबंधीची माहिती मी पुन्हा एकदा आपल्याला देईन. ठाणे जिल्हयात जव्हार, वाडा, मोखाडा, विक्रमगड इत्यादी ठिकाणी एकूण 30 आश्रमशाळा आहेत त्या ठिकाणी राहणा-या विद्यार्थ्यांसाठी तेथे धान्य उपलब्ध नाही. आदिवासी विकास महामंडळ त्यांच्यासाठी धान्य देत नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तेव्हा या ठिकाणी त्यांनी धान्य देऊ नये अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आला आहे काय ? त्या ठिकाणच्या आश्रमशाळांमध्ये राहणा-या विद्यार्थ्यांसाठी धान्य उपलब्ध झालेले नाही ही गोष्ट खरी आहे काय, त्याचप्रमाणे आज सुध्दा आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना पाटी, पुस्तक, गणवेश इत्यादी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही हे खरे आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी असे सागितले आहे की, त्यांनी आश्रमशाळेतील स्थितीसंबंधी तक्रार दिली होती परंतु ती मिळालेली नाही तेव्हा त्यांनी पुन्हा तक्रार दिल्यास त्याची मी चौकशी करीन. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनी असेही सांगितले होते की, आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके मिळालेली नाहीत. त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, या विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके मिळालेली आहेत त्याचप्रमाणे या विद्यार्थ्यांना ऑगस्ट अखेरपर्यंत गणवेश देण्यात येतात त्याप्रमाणे ऑगस्ट अखेरपर्यन्त त्यांना गणवेश देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील. त्याचप्रमाणे आश्रमशाळेमध्ये धान्य नाही असेही त्यांनी सागितलेले आहे. त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की सगळ्या आश्रमशाळेमध्ये धान्य आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपल्या जिल्हयातील आश्रम शाळेच्या संदर्भातील हा महत्वाचा प्रश्न असून या आश्रमशाळेचे काम कोणत्या एजन्सीला देण्यात आले होते हा मूळ प्रश्न असून त्या ठिकाणच्या कामामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे त्यामुळे या कामाची चौकशी करण्यात येईल काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, या प्रश्नाला मी या पूर्वीच " होय " असे उत्तर दिलेले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, गेल्या तीन वर्षापासून त्या ठिकाणी प्रकल्प अधिकारी नाहीत. हा अधिकारी आय.ए.एस. दर्जाचा असावा लागतो परंतु ठाणे येथे आय.ए.एस. दर्जाचा प्रकल्प अधिकारी नाही हे खरे आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, आम्ही वारंवार आय.ए.एस. दर्जाच्या अधिका-याची मागणी करीत आहोत परंतु आम्हाला आय.ए.एस. दर्जाचा अधिकारी मिळत नाही त्यामुळे दुस-या विभागाकडील अधिका-याला डेप्युटेशनवर घेण्यात आले आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी या सदनामध्ये आता जे निवेदन केले ते अतिशय गंभीर आहे. माननीय मंत्री महोदय म्हणत आहेत की, त्यांनी मागणी करूनही त्यांच्या खात्याला आयएएस अधिकारी मिळत नाहीत. तेव्हा या सगळ्या आयएएस अधिकाऱ्यांची त्यांच्या खात्यात जाण्याची मानसिकता नाही अशी परिस्थिती आहे काय ? यामध्ये खरे तर माननीय मुख्यमंत्र्यांनीच निवेदन केले पाहिजे. ज्या समाजाच्या विकासासाठी साठी बजेटच्या 14 टक्के निधी त्यांच्यासाठी असलेल्या विभागाकरिता राखून ठेवला जातो त्या निधीचे नियोजन करून त्या समाजाचा विकास घडविला पाहिजे असे अपेक्षित असतानाच त्या आदिवासी समाजाच्या कुपोषणाचा विषय सर्व देशभर गाजत आहे आणि असे असतानाही त्या भागामध्ये आयएएस अधिकारी जात नाहीत वा दिले जात नाहीत असे जर त्या खात्याचे मंत्री म्हणत असतील तर त्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांकडूनच येथे खुलासा होणे आवश्यक आहे.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, आमच्याकडे जे 11 अतिसंवेदनशील एरिया आहेत त्यासाठी आम्ही आयएएस अधिकाऱ्यांची मागणी केलेली आहे. परंतु पुरेसे आयएएस अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे आमच्या विभागाला ते दिले गेलेले नाहीत. त्यामुळे उपजिल्हाधिकारी तसेच वर्ग 1 दर्जाचे अधिकारी आपण त्यांच्या जागी घेतलेले आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, खरे तर याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांकडून खुलासा होणे आवश्यक आहे. ...

उपसभापती : आदिवास विकास विभागाला आयएएस दर्जाचे अधिकारी मिळत नाहीत असे जे निवेदन माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी केलेले आहे त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी तातडीने लक्ष घालावे आणि हा प्रश्न निकाली काढावा. तसेच माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून त्याबाबत सभागृहाला उद्या अवगत करावे.

डॉ. विजयकुमार गावित : ठीक आहे.

उपसभापती : लक्षवेधी सुचनांवरील चर्चा आता संपली आहे. यानंतर विशेष उल्लेख घेण्यात येतील.

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यात विविध योजना राबवूनही 29,499 हेक्टर क्षेत्र कायम स्वरूपी पडिक असणे.

मु.शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यात विविध योजना राबवूनही 29,499 हेक्टर क्षेत्र कायम स्वरूपी पडिक असणे याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि. प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. -

" सिंधुदुर्ग जिल्ह्यात 1 लाख 35हजार हेक्टर क्षेत्र हे विकासखाली आले असूनही मात्र विविध योजना राबवूनही 29 हजार 499 हेक्टर क्षेत्र हे कायम स्वरूपी पडिक म्हणून सरकारी दप्तराला नोंद लागली असणे., 65 हजार हेक्टर क्षेत्र जमीन अजूनही पडिक आहे. शिवाय 6 हजार हेक्टर क्षेत्र हे बिनशेतीचे आहे. हे क्षेत्र लागवडीखाली आणणे शक्य आहे. मात्र कृषी विभागाच्या अनास्थेमुळे लागवडीखालील क्षेत्रात गेल्या दोन वर्षात वाढ झालेली नाही. मजुरांचा तुटवडा, बैलांच्या वाढलेल्या किंमती, मजुरीचे न परवडणारे दर, घसरत जाणाऱ्या शेतीमालाच्या किंमती यामुळेच शेती व्यवस्थेचा उडालेला बोजवारा, या बाबत शासनाने ठोस कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी. "

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बीड तालुक्यातील ढोरवाडी शिवार मौजे परभणी (केसापुरी) येथील गट क्र.443 मध्ये अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेली दलित वस्ती दमदाटीने उठविण्याचा होत असलेला प्रयत्न.

मु. शी. : बीड तालुक्यातील ढोरवाडी शिवार मौजे परभणी (केसापुरी) येथील गट क्र.443 मध्ये अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेली दलित वस्ती दमदाटीने उठविण्याचा होत असलेला प्रयत्न याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

--

उपसभापती : मा□□य सदस्या श्रीमती.उषा दराडे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडते.

" बीड तालुक्यातील (जिल्हा बीड) ढोरवाडी शिवार, मौजे परभणी (केसापुरी) येथील गट क्रमांक 443 मध्ये बऱ्याच दलित लोकांनी घरे बांधली असून बऱ्याच वर्षांपासून त्या जमिनीवर ते वहिवाट करीत आहेत. वर्षानुवर्षे हे दलित बांधव त्या ठिकाणी राहून शेतीचा व्यवसाय करीत आहेत. या वर्षीसुद्धा शेतीची लागवड केली असून बाजरी व तूर या पिकांची लागवड केली आहे. परंतु आता गावातील सरपंच विठ्ठल सुखदेव शिंदे यांनी गावातील काही गुंड लोकांना हाताशी धरून दलित लोकांना मारहाण करून जमिनीचा ताबा सोडण्याबाबत जबरदस्ती करीत आहेत. या संदर्भात पोलीस अधिक्षक, बीड यांच्याकडे तक्रारी करूनही सरपंचाविरूद्ध कारवाई करण्यात येत नाही. तेथील वर्षानुवर्षे राहणाऱ्या दलितांच्या जीवितास धोका निर्माण झालेला आहे. तरी त्याबद्दल शासनाने कारवाई करावी. "

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्यातील अपंग विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी 'विशेष शिक्षक' हे पद निर्माण करूनही ते रिक्त असणे.

मु.शी. : राज्यातील अपंग विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी 'विशेष शिक्षक' हे पद निर्माण करूनही ते रिक्त असणे याबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

--

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.मधुकर चव्हाण यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो. ..

" राज्यातील 3 लाख 98 हजार अपंग विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी केवळ 850 विशेष शिक्षक आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे कठीण झाले आहे. सर्व शिक्षा अभियानांतर्गत करण्यात आलेल्या पाहणीत राज्यात विशेष गरजा असणारे 39 लाख 98 हजार विद्यार्थी असल्याचे निष्पन्न झाले आहे. यात 2 लाख 25 हजार 826 विद्यार्थी व 1 लाख 72 हजार 406 विद्यार्थिनी आहेत. कर्णबधीर, अस्थिव्यंग, दृष्टीदोष, भिन्नदोष, भिन्नमती, अध्ययन अक्षम, वाचादोष, स्वमग्न बहुविकलांग, मस्तिष्क पक्षघात इत्यादी समस्यांनी हे विद्यार्थी त्रस्त आहेत. सर्व शिक्षा अभियानानुसार या विद्यार्थ्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार सोयी सुविधा पुरविणे बंधनकारक आहे. तसेच त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी विशेष शिक्षकाचे पद निर्माण करण्यात आले आहे. परंतु यातील निम्म्याहून अधिक पदे रिक्त असल्याचे आढळून आले आहे. राज्यातील विशेष शिक्षकाच्या 2316 पदांपैकी 1416 पदे रिक्त आहेत. राज्याच्या कानाकोपऱ्यातील सोयी-सुविधां शिवाय गरीबीचे चटके सहन करीत शिक्षणाकरिता धडपडणारे हे लाखो विद्यार्थी विशेष शिक्षकांच्या कमतरतेमुळे दुर्लक्षित व उपेक्षित राहिले आहेत. शासनाने ही पदे त्वरित भरून या विद्यार्थ्यांना दिलासा देणे अत्यावश्यक आहे.

सभापती महोदय, हा अत्यंत महत्त्वाचा विषय मी आज सभागृहात 'विशेष उल्लेख'द्वारे उपस्थित करीत आहे. शासनाला विनंती आहे की, शासनाने याबाबत त्वरित कारवाई करून निवेदन करावे. "

*** (यानंतर श्री.सरफरे .... 3जी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: चलबुर्गा, ता. औसा, जिल्हा लातूर येथील कृषि विभागाच्या कामावर झालेला गैरव्यवहार

मु.शी.: चलबुर्गा, ता. औसा, जिल्हा लातूर येथील कृषि विभागाच्या कामावर झालेला गैरव्यवहार याबाबत श्री. सुरेश जेथलिया वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य श्री. सुरेश जेथलिया यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सुरेश जेथलिया (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"लातूर जिल्हयाच्या औसा तालुक्यातील चलबुर्गा येथे कृषि विभागांतर्गत मृदसंधारण, नियोजन, राष्ट्रीय पाणलोट क्षेत्र विकास योजना, नाला सरळीकरण व कंट्रोल बंडिगची लाखो रुपयांची कामे शासनाने मंजूर केली. सदर कामे पूर्ण न करताच मजुरांची संख्या बोगस दाखवून कंत्राटदाराला लाखो रुपयांची दिलेली रक्कम, सदर कामे अर्धवट असणे, सदर कामावरील मजुरांचे बोगस अंगठे व सहया करुन पैसे उकळण्यात येणे, अशाप्रकारे शासनाची करण्यात आलेली फसवणूक, राष्ट्रीय पाणलोट क्षेत्रिय समितीचे अध्यक्ष व सचिव कृषि अधिकाऱ्यांनी संगनमत करुन शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी शासनाने तात्काळ चौकशी करुन भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली याबाबत तात्काळ निवेदन करावे".

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

पृ.शी.: अवकाळी आलेल्या पावसामुळे सांगली जिल्हयातील शेतकऱ्यांचे कृषि उत्पादनाचे झालेले नुकसान

मु.शी.: अवकाळी आलेल्या पावसामुळे सांगली जिल्हयातील शेतकऱ्यांचे कृषि उत्पादनाचे झालेले नुकसान याबाबत श्री. प्रकाश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सांगली जिल्हयात वारणाकाठी जून, 2008 मध्ये वादळी वारा आणि मुसळधार पावसाने केळी आणि आडसाली ऊस यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. त्याचप्रमाणे नागज भागातही अवकाळी पावसामुळे तयार आणि शेडवर टाकलेल्या बेदाण्याचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. याचा जवळपास एक लाख टन तयार बेदाण्याला फटका बसला. याची पहाणी माननीय पालक मंत्री तसेच अन्य मान्यवरांनी करुन आपदग्रस्तांसाठी मोठया प्रमाणात मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. परंतु ही मदत अद्यापपर्यंत मिळाली नाही. कारण आपद्ग्रस्तांसाठी भरपाई देण्याचे निकष अत्यंत कडक आहेत. या सर्व निकषात बदल करुन या आपदग्रस्तांना त्वरीत नुकसान भरपाई देण्याची मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे सभागृहात उपस्थित करु इच्छितो".

सभापती महोदय, सांगली जिल्हयामध्ये कवठे महांकाळ तालुक्यात नागज भागात बेदाणे बनविण्याचा व्यवसाय मोठया प्रमाणात सुरु आहे. मे 2008 मध्ये अवकाळी पाऊस आल्यामुळे शेडवर टाकण्यात आलेले बेदाणे पावसात भिजल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. माननीय पालकमंत्र्यांनी त्याची पहाणी देखील केली आहे. शासनाने अवकाळी पावसामुळे आपदग्रस्त झालेल्या लोकांना मदत केली आहे, परंतु बेदाणे धारकांना अजूनपर्यंत शासनाची मदत मिळाली नाही. तेव्हा बेदाणे धारकांना ताबडतोब मदत देण्यात यावी अशी या विशेष उल्लेखाव्दारे मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

पृ.शी.: वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके मंजूर करण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना देणे

मु.शी.: वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके मंजूर करण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना देणे याबाबत श्री. प्रतापराव सोनवणे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य श्री. प्रतापराव सोनवणे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रतापराव सोनवणे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून रुपये 40 हजार पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे मंजूरीचे अधिकार संबंधित विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आलेले आहेत. रुपये 40 हजार वरील पुढील रकमेची बिले मंजूर करण्याचे अधिकार संबंधित मंत्रालयीन शासकीय विभाग प्रमुखांना आहेत. शाखेकडून सदर प्रकरण पाठविल्यानंतर मंत्रालयीन स्तरावर ही प्रकरणे पोहोचण्यास साधारणत: एक ते दीड वर्षे पडतात. सदर प्रकरणे प्रत्येक कार्यालयाकडून उशिराने पाठविली जातात. या प्रक्रियेमध्ये संबंधित कर्मचाऱ्यांस तीन ते चार वर्षांनी बिल मिळते. सदर होणाऱ्या उशिरा कामकाजामुळे खूप अडचणींचा सामना करावा लागतो. हा खूप मोठा अन्याय आहे. हा अन्याय दूर होण्यासाठी नियमाप्रमाणे 27 हजारावरील रुपये 40 हजाराच्या पुढील रुपये 1 लाखापर्यंतची बिले मंजूर करण्याचे अधिकार तसेच रुपये दीड लाखापर्यंत गंभीर आजारावरील उपचारासाठी अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार त्या त्या विभागातील उपसंचालकांना प्रदान करावेत. त्याचप्रमाणे मंत्रालयीन स्तरावर खास बाब म्हणून मंजूर होणारी बिले त्या त्या विभागाकडे सादर केल्यानंतर वरिष्ठ कार्यालयाकडे बिले सादर करतांना काही कालावधी निश्चित करण्यात यावा. म्हणजे विलंब टळू शकेल. या होणाऱ्या विलंबामुळे सदर कर्मचारी वर्गात तीव्र असंतोष पसरलेला असून शासनाने सदर विषयात गांभीर्याने लक्ष घालून सुचविलेल्या उपाय योजनांची त्वरीत अंमलबजावणी करावी व संबंधितांना न्याय द्यावा अशी आग्रही मागणी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

पृ.शी.: कौमी एकता पुरस्काराची अंमलबजावणी न होणे

मु.शी.: कौमी एकता पुरस्काराची अंमलबजावणी न होणे याबाबत श्रीमती फौजिया खान, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त) : : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागातर्फे दलितांच्या कल्याणासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तिना देण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्काराच्या धर्तीवर मुस्लिम समाजाच्या कल्याणासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तिना दरवर्षी राज्याच्या गृह विभागाच्या वतीने महात्मा गांधी कोमी एकता पुरस्कार देण्याची उप मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पिय अधिवेशन 2008 मध्ये केलेली घोषणा. या घोषणेचे समाजाच्या सर्व स्तरातून झालेले उत्स्फूर्त स्वागत. परंतु या बाबत अद्याप कुठलीही कार्यवाही होत नसल्याने लोकांमध्ये पसरलेली नाराजी. याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे."

सभापती महोदय, सभागृहातील माननीय सदस्य सार्वजनिक महत्वाच्या विषयावर विशेष उल्ले्खाच्या निमित्ताने शासनाकडून निवेदन अपेक्षित करीत असतात.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . . .

विशेष उल्लेखाच्या बाबतीत संबंधित विभागाने एक महिन्याच्या आत उत्तर द्यावे असा नियम असून देखील मला मागच्या अधिवेशनामध्ये मांडलेल्या विशेष उल्लेखाच्या संदर्भात एकाही विभागाकडून उत्तर आलेले नाही. फक्त आपल्या कार्यालयाकडून पत्र आलेले आहे की, संबंधित विभागाकडे पत्र पाठविलेले आहे एवढेच मला सांगावयाचे आहे.

. . . .3 एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईमध्ये असलेल्या वेलिंग्टन, नॅशनल स्पोर्टस् इ. क्लबमध्ये मुंबईमध्ये कायम स्वरुपी वास्तव्य असलेल्या विधीमंडळ सदस्यांना सदस्यत्व मिळण्याबाबत.

मु. शी.: मुंबईमध्ये असलेल्या वेलिंग्टन, नॅशनल स्पोर्टस् इ. क्लबमध्ये मुंबईमध्ये कायम स्वरुपी वास्तव्य असलेल्या विधीमंडळ सदस्यांना सदस्यत्व मिळण्याबाबत श्री.सुभाष चव्हाण वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.सुभाष चव्हाण यां□□ ए□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने मागील अधिवेशनामध्ये या विषयाच्या संदर्भात विशेष उल्लेखाची सूचना मांडली होती. परंतु मी आता परत पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

"विधान परिषद सन 2008 चे "पहिले अधिवेशनामध्ये" "मुंबईमध्ये असलेले वेलिंग्टन क्लब, नॅशनल स्पोर्टस् क्लब ऑफ इंडिया, रेडिओ क्लब, सचिवालय जिमखाना, इतर जिमखाने इत्यादी सर्व क्लबचे नियंत्रण शासनाच्या अधिपत्याखाली येते. सचिवालय जिमखाना हा शासनाच्या पैशातून उभा राहिलेला आहे. काही आमदारांच्या फंडातून इमारतींचे नुतनीकरण, सुशोभिकरण झालेले आहे. शासनाचे प्रशासकीय अधिकारी (आयएएस) अधिकारी या क्लबचे सदस्य असतात. त्याच धर्तीवर मुंबईत कायमस्वरुपी वास्तव्य असलेल्या विधानसभा व विधान परिषद सदस्यांना या क्लबचे सदस्यत्व मिळावे यासंबंधात विशेष उल्लेखाची सूचना मांडली होती. त्यावेळी देखील सदनामध्ये माननीय सभापती महोदय उपस्थित होतात. त्यावर माननीय सभापतींनी सन्माननीय मंत्री महोदयांना त्यासंबंधी त्वरित कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक बोलावून होकारार्थी निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. मीही वेळोवेळी सन्माननीय मंत्री महोदयांना स्मरण करुनही आजतागायत कोणतीही बैठक घेतली गेलेली नाही अथवा कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांच्या हिताच्या दृष्टीने मांडलेल्या प्रस्तावाची शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी."

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी सांगितल्याप्रमाणे

. . . .3 एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेखाच्या संबंधात संबंधित विभागाकडून उत्तर देखील पाठविण्यात येत नाही.

उपसभापती : ही बाब कोणत्या मंत्री महोदयांकडे येते ?

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, याबाबतीत उत्तर आल्यानंतर समाजकल्याण विभागाचा विषय असेल तर तेथील डेस्क ऑफीसर पत्रावर सही करीत असतो, माननीय मंत्री महोदय सही करीत नाहीत. जर पर्यटनाच्या बाबतीत विषय असेल तर त्यासंबंधातील पत्रावर एम.टी.डी.सी.चे मॅनेजर सही करतात. त्यामुळे या पत्रावर माननीय मंत्री महोदयांची सही असावयास पाहिजे.

उपसभापती : याठिकाणी जो विशेष उल्लेख उपस्थित केलेला आहे, त्या विभागाचे माननीय मंत्री महोदय कोण आहेत ?

श्री.सुभाष चव्हाण :सभापती महोदय, मागच्या वेळेस माननीय समाजकल्याण विभागाचे मंत्री महोदय येथे उपस्थित होते आणि आपण यासंबंधात निर्देशही दिले होते की, यासंबंधात ताबडतोब बैठक घेऊन . . . .

उपसभापती : ही बाब माननीय समाजकल्याण मंत्री महोदयांकडे आहे काय ?

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मुंबईमध्ये असलेल्या विविध क्लबमध्ये विधानसभा व विधान परिषदेतील सदस्यांना सदस्यत्व देण्याच्या संदर्भातील विषय आहे. त्यामुळे याबाबतीत त्वरित उत्तर मिळाले पाहिजे आणि तशी कार्यवाही झाली पाहिजे.

उ**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी मागील अधिवेशनामध्ये देखील ही विशेष उल्लेखाची सूचना दिली होती.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : सभापती महोदय, आपण यासंबधात आपल्या दालनामध्ये बैठक बोलवावी.

उपसभापती : ठीक आहे. मी याबाबतीत दालनामध्ये बैठक घेतो.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मी देखील विशेष उल्लेखासंबंधी सूचना दिली होती.

उपसभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय सभापतींकडे ज्या विशेष उल्लेखासंबंधीच्या सूचना दिल्या जातात . . . .

. . . .3 एच-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मी माननीय सभापतींकडे काल विशेष उल्लेखाची सूचना दिलेली होती आणि ती स्विकारण्यात आली होती.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी काल दिलेली विशेष उल्लेखासंबंधीची सूचना आजच्या यादीमध्ये आलेली नाही.

मी आता मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक 3 वाजून 45 मिनिटांपर्यंत तहकूब करीत आहे.

(3.13 ते 3.45 मध्यंतर)

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यानंतरच्या कामकाजामध्ये 4 शासकीय विधेयके दाखविलेली आहेत. कापूस बी-बियाणांसबंधीचे बिल फार महत्वाचे आहे ते आज चर्चेला घेऊ नये. आपण आज दोन विधयके पूर्ण करावीत. आता दुपारी 4.00 वाजता कामकाज सल्लागार समितीची बैठक आहे आणि त्यानंतर दुपारी 4.30 वाजता नियम समितीची बैठक बोलावलेली आहे. आपल्या सभागृहातील बरेच सन्माननीय सदस्य नियम समितीमध्ये आहेत. त्यामुळे 4.30 वाजेपर्यंत सभागृहाची बैठक स्थगित करावी. नियम समितीची बैठक झाल्यानंतर समितीची बैठक पुन्हा सुरु करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आज विनियोजन विधेयक आणि कापूस बी-बियाणांसबंधीचे विधेयक ही दोन विधेयके घ्यावीत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बी-बियाणांसबंधीचे विधेयक महत्वाचे आहे. त्या विधेयकावर चर्चा झाली पाहिजे. त्यामुळे ते विधेयक आज चर्चेला घेऊ नये.

उपसभापती : आपण सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 13 चर्चेला घेऊ.

श्री. दिवाकर रावते : आज सन 2008 चे वि. स. वि. क्रमांक 48 आणि सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 13 ही दोन विधेयके चर्चेला घ्यावीत.

उपसभापती : ठीक आहे. यानंतर सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 13 हे विधेयक प्रथम चर्चेला घेऊ.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, संबंधित माननीय मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत. बी-बियाणांसबंधीचे विधेयक आज चर्चेला घेऊ नये. दुसऱ्या दोन विधेयकाशी संबंधित माननीय मंत्रिमहोदय आता सभागृहात उपस्थित नसतील तर आपण सभागृहाची बैठक स्थगित करावी.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, कापूस बी-बियाणासंबंधीचे विधेयक चर्चेला घ्यावे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभपती महोदय, कापूस बी-बियाणासंबंधीचे विधेयक आज चर्चेला घेऊ नये.

उपसभापती : सन 2008 चे वि. स. वि. क्रमांक 48 तसेच सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 13 या दोन्ही विधेयकाशी संबंधित माननीय मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेमध्ये पहिल्या क्रमांकावर विनियोजन विधेयक आहे. माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नसतील तर आज ते विधेयक मंजूर करु नये.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करावी.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, कापूस बी-बियाणांसंबंधीचे विधेयक विधानसभेत संमत झालेले आहे.

श्री. दिवाकर रावते : विधेयके गोंधळात मंजूर केली. एकाही बिलावर चर्चा झाली नाही. खरे म्हणजे गोंधळात बिले पास केली जात नाहीत. आपण बिलांवर चर्चा करु. गोंधळ झाला तर बिल मंजूर करावयाचे नाही असा मूलभूत संकेत आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मी दुपारी 4 वाजेपर्यंत सभागृहाची बैठक तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.50 ते 4.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी.: मुंबई समचिकित्सा वैद्यक व्यवसायी (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XIII OF 2008.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY HOMOEOPATHY PRACTITIONERS' ACT, 1959).

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008चे वि.प.वि. क्रमांक 13, मुंबई समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम, 1959 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, हे एक छोटेसे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे. होमिओपॅथी प्रॅक्टीशनर्स ॲक्ट 1959 नुसार रजिस्ट्रेशन फी 300 रुपये आहे. ही रजिसट्रेशन फी ठरविण्याचे अधिकार शासनाला द्यायचे असे आम्ही प्रस्तावित करीत आहोत. आता अस्तित्वात असलेल्या कायद्यामध्ये टेम्परररी रजिस्ट्रेशनसाठी प्रोव्हीजन नाही. म्हणून होमिओपॅथीचे इण्टर्नशीप करताना त्यांचा जो ट्रेनिंग पिरियड आहे त्या परियडमध्ये एलिजिबिलिटी सर्टिफिकेट देण्याचे आम्ही प्रस्तावित केलेले आहे. तसेच मेडिकल प्रॅक्टीशनर्सना पाच वर्षासाठी आयडेण्टीटी कार्ड देण्याची तरतूद या विधेयकान्वये केलेली आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, अतिशय चांगल्या प्रकारचे विधेयक या ठिकाणी आणल्या बद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.

या विधेयकाच्या संदर्भात मी फक्त दोनच मुद्दे मांडतो. होमिओपॅथीसाठी वेगळे संचालनालय असावे अशी अनेक सन्माननीय सदस्यांनी यापूर्वी सातत्याने मागणी केलेली होती. त्याचा माननीय मंत्री महोदयांनी विचार करावा. दुसरा मुद्दा असा आहे की, राज्यामध्ये एकच होमिओपॅथी हॉस्पिटल आहे, त्याचे प्रायव्हेटायझेशनचे काम सुरु असून ते ॲलोपॅथिक हॉस्पिटलला चालविण्यास देण्याचे प्रयत्न सुरु आहेत. यासंबंधीचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहे. तेव्हा याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी लक्ष घालावे अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

...3..

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. भास्कर जाधव)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी होमिओपॅथीसाठी वेगळे संचालनालय असावे अशी मागणी केली आहे. आयुर्वेद संचालनालय आणि वैद्याकीय शिक्षण संचालनालय अशी दोन संचालनालये आहेत. होमिओपॅथीचे काम कमी असल्यामुळे संचालक, आयुर्वेद हे ते काम पहातात. होमिओपॅथीसाठी वेगळे संचालनालय करायचे झाले तर त्यासाठी वेगळा स्टाफ आणि खर्च करावा लागेल.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी.....

आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, डायरेक्टर, आयुर्वेदिक यांच्याकडे देखील काम जास्त नाही. एकच डायरेक्टर दोन्ही काम पहात आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे, ती मान्य करु शकत नाही.

दुसरा मुद्दा असा उपस्थित केला आहे की, होमिओपॅथी रुग्णालयाचे खाजगीकरण करीत आहोत. याबाबतची मी माहिती घेतो आणि ती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी या ठिकाणी अतिशय चांगले विधेयक सभागृहात मांडलेले आहे. राज्यामध्ये ॲलोपॅथीला राजाश्रय आहे, आयुर्वेदास देखील राजाश्रय दिलेला आहे. आयुर्वेदिक डॉक्टरांना शासकीय सेवेत घेतलेले आहे. त्याच पध्दतीने होमिओपॅथी डॉक्टरांना सुध्दा शासकीय सेवेत घेतले पाहिजे. होमिओपॅथी डॉक्टरांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे, अशा प्रकारची मागणी शिक्षक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीच्या संदर्भात अनेक वेळा आंदोलने देखील झाली आहेत. आयुर्वेदिक डॉक्टरांना ज्या प्रमाणे शासकीय सेवेत घेतलेले आहे, त्याप्रमाणे होमिओपॅथी डॉक्टरांना सुध्दा काही प्रमाणात शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे. होमिओपॅथी डॉक्टरांना शासकीय सेवेत सामावून घेतले तर होमिओपॅथीला सुध्दा भविष्यात चांगले दिवस येतील. माझ्या मागणीचा माननीय मंत्री महोदयांनी सहानुभूतीने विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी होमिओपॅथी डॉक्टरांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात येईल काय, अशा प्रकारचा प्रश्न उपस्थित केला आहे. यासंबंधीचा प्रस्ताव आरोग्य मंत्रालयात आलेला असून त्या प्रस्तावाच्या बाबतीत गांभीर्याने दखल घेण्यात येत आहे. आज ग्रामीण भागात डॉक्टरांची संख्या खूपच कमी आहे. या प्रस्तावाच्या बाबतीत आरोग्य मंत्रालय लवकरात लवकर निर्णय घेईल, असे मला वाटते.

श्री. मधुकर चव्हाण : विधेयकातील कलम (क) पोट कलम (3) मध्ये, "तीनशे रुपये फी दिल्यावर" या मजकुराऐवजी "राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेव्दारे विनिर्दिष्ट करील एवढी फी दिल्यावर" हा मजकूर दाखल करण्यात येईल. या ओळीचा उद्देश काय आहे त्याबाबतचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 300 रुपये ही रजिस्ट्रेशन फी आहे. रजिस्ट्रेशन फी वाढविणे अथवा कमी करण्याच्या संदर्भात शासनाला अधिकार देण्यात यावेत. ते अधिकार शासनास प्राप्त झाल्यानंतर शासन गरज भासेल त्यावेळी नोटिफिकेशन काढून त्यात बदल करु शकेल. अशा प्रकारचे बदल करावयाचे असले तर शासनाला प्रत्येक वेळी सुधारणा सभागृहासमोर आणून मंजूर करुन घ्यावी लागते. रजिस्ट्रेशन फी 300 रुपये ऐवजी 500 रुपये करावयाचे असेल तर त्यासंबंधीचे अधिकार शासन स्तरावर ठेवण्यात येणार आहेत. कारण या संस्थेला शासन अनुदान देत नाही. रजिस्ट्रेशनच्या माध्यमातून 300 रुपये फी मिळत असते, शासन जी फी ठरवून देत असते त्या फीच्या पैशातून ही संस्था चालत असते. प्रशासकीयदृष्टया ते काम शासन सोपे करीत आहे.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, या विधेयकातील पृष्ठ क्रमांक 2 वर "(ख) खंड (क) अनुसार तात्पुरती नावनोंदणी करण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला, नियमांव्दारे विहित केलेल्या नमुन्यातील तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येईल. हे प्रमाणपत्र त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीपर्यंत अंमलात असेल."हे तात्पुरती नोंदणी प्रमाणपत्र आहे, त्याचा कालावधी का ठरविण्यात आला नाही तसेच हा कालावधी कसा निश्चित केला जाणार आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे यांनी तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्राच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला आहे. तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र देण्याची कायद्यात तरतूदच नाही. आता जे विद्यार्थी शिक्षण घेतात त्यांना सहा महिने इंटर्नशीप करावी लागते. इंटर्नशीप करताना त्या विद्यार्थ्यांना तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र दिले नाही तर ते विद्यार्थी बेकायदेशीर प्रॅक्टीस करतात असा त्याचा अर्थ होऊ शकतो. म्हणून जे होमिओपॅथी मेडिकल इन्स्टीटयूट आहेत त्यासाठी हे कलम घालण्यात आले आहे.

यानंतर श्री. कानडे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त) : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 2, पोट कलम (3) मध्ये " तीनशे रुपये फी " ऐसा लिखा है. इन शब्दों के बजाए " राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील एवढी फी " ये शब्द दाखिल किए जाए तो ठीक रहेगा, ऐसा मुझे लगता है.

श्री. सुरेश शेट्टी : वैसा ही किया है.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, दूसरी बात मुझे यह बतानी है कि इस बिल के इंग्लिश वर्शन में बहुत सारी गल्तियां हैं. There are several grammatical and other mistakes, in the Statement of Objects and Reasons of the English copy of this Bill. For example, in line no. 9 "Its most of the", in line no. 11 "Which has been lastly enhanced", in line no. 14 "the Government had decided", in line no. 15 "to take power to the State Government", in line no. 26,"registration is obtaining in the State Government" these are all grammatically incorrect sentences.

सभापति महोदय, मेरा दूसरा सुझाव यह है और जिसके बारे में अभी सम्माननीय सदस्य श्री काले जी ने भी बताया है, मैं यह कहना चाहती हूं कि आज हमारे देश में मुख्य रुप से चार चिकित्सा पध्दति हैं- Alopathy, Ayurvedic, Homoeopathy and Unani. यह वस्तुस्थिति है कि ये चारों चिकित्सा पध्दति उपचार के लिए बहुत असरकारक है. आज हम यह देखते हैं कि इन चार चिकित्सा पध्दतियों में से Alopathy and Ayurvedic इन दो चिकित्सा पध्दतियों को ज्यादा महत्व दिया जाता है और Homeopathy and Unani. इन दो चिकित्सा पध्दतियों को महत्व नहीं दिया जाता है. Alopathy and Ayurvedic इन दो चिकित्सा पध्दति को महत्व इसलिए मिल रहा है क्योंकि सरकारी सेवा में इन दो चिकित्सा पध्दतियों के डॉक्टरों को लिया जा रहा है. आज हमारे राज्य के अस्पतालों में 7 हजार डॉक्टरों की कमी होने के बावजूद हम Homeopathy and Unani के डॉक्टरों को सरकारी सेवा में नहीं ले रहे हैं. जब Homeopathy and Unani में विद्याथी स्नातक (डॉक्टर) हो रहे हैं, इन चिकित्सा पध्दतियों में विद्यार्थियों को शिक्षा दे रहे हैं तो फिर उनको उनके अधिकारों से वंचित क्यों रखा जा रहा है ? इसलिए मेरा अनुरोध है कि Homeopathy and Unani चिकित्सा पध्दति के डॉक्टरों को भी मेडिकल ऑफिसर के पद पर नियुक्त करने के संबंध में जल्द से जल्द निर्णय लेकर उस पर अमल किया जाए. कृपया माननीय मंत्री जी इसका उत्तर दें.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी सांगितले की, जे बिल सादर केलेले आहे त्यामध्ये इंग्लीश भाषेच्या अनेक चुका आहेत. मी सदनाला सांगू इच्छितो की, इंग्रजी भाषा चार प्रकारात बोलली जाते. ब्रिटीश इंग्लीश, अमेरिकन इंग्लीश, एशियन इंग्लीश आणि इंडियन इंग्लीश.....

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. इंग्रजी, हिंदी , मराठी अशा अनेक भाषा आहेत. सर्व प्रकारच्या भाषांना स्वत:चे असे व्याकरण आहे. आता संगणकावर काम करताना थोडासा फरक येतो. संगणकावर अमेरिकन इंग्रजी भाषा टाकली असल्यामुळे हा फरक दिसतो. परंतु सगळया जगामध्ये इंग्रजी ही एकच भाषा आहे. त्या भाषेतील उच्चार बदलतात. अनेक प्रांतातील लोक त्यांच्या व्याकरणाप्रमाणे शब्द उच्चारतात. उदा. Circuit हा शब्द दक्षिणेकडे सर्कुट असा उच्चारतात. पण स्पेलिंगमध्ये बदल होत नाही. माननीय मंत्रीमहोदयांना मी सांगू इच्छितो की, इंग्रजी ही एकच भाषा आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी बिलातील व्याकरणाच्या चुका लक्षात आणून दिलेल्या आहेत. त्यामध्ये सुधारणा करावी अशी विनंती आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, "सजेशन फॉर ॲक्शन"

नंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी : माननीय सभापती महोदय, विधानपरिषद विधेयक क्रमांक-13 संबंधी एक सूचना मांडण्यासाठी मी उभा आहे. या विधेयकाचे स्वागत विरोधी पक्षाने देखील केलेले आहे. ॲलोपॅथी, आयुर्वेदिक, होमिओपॅथी आणि युनानी या चार चिकित्सा पध्दती अस्तित्वात आहेत. या विधेयकाचा संबंध नसला तरी प्रॅक्टिस करीत असताना आयुर्वेदिक किंवा युनानी किंवा होमिओपॅथीच्या डॉक्टरांनी ॲलोपॅथीचे औषध दिले तर त्यांच्यावर खटला दाखल करण्यात येतो. ज्यांनी 10-20 वर्षे प्रॅक्टिस केली अशा डॉक्टरांवर केवळ त्यांच्याकडे ॲलोपॅथीची पदवी नाही म्हणून खटला दाखल करणे योग्य नाही. याचा निश्चित विचार झाला पाहिजे. शेवटी अनुभव फार महत्वाचा असतो. 10-20 वर्षे प्रॅक्टिस केलेल्या डॉक्टरांवर खटला दाखल करणे मला योग्य वाटत नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी सांगितल्याप्रमाणे बिलाच्या इंग्रजी कॉपीमध्ये काही चुका आहेत. त्या तपासून घेतल्या पाहिजेत. शेवटी हे विधेयक पाच-पन्नास वर्षे टिकणारे आहे. कायद्यामध्ये नाही, परंतु बिलाच्या उद्देश व कारणे यामध्ये काही चुका असल्याचे निदर्शनास आणले आहे. पुढच्या वेळी ड्राफ्टिंग अचूक झाले पाहिजे. ड्राफ्ट गेला की कायदा गेला. त्यामुळे ड्राफ्टबाबत काळजीपूर्वक लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे. शासनाने याचा निश्चितपणे विचार केला पाहिजे. एखाद दुसरे ॲलोपॅथीचे औषध लिहून दिले तर इतर पॅथीच्या डॉक्टरांवर खटला दाखल करणे योग्य नाही. या विधेयकाचे स्वागत करतो.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी जी सूचना मांडली आहे त्याबाबत मी एवढेच सांगू इच्छितो की, होमिओपॅथी किंवा युनानी प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरांना ॲलोपॅथीची प्रॅक्टिस करण्यासाठी परवानगी दिली पाहिजे आणि त्यांच्यावर गुन्हा दाखल करु नये या संदर्भात पार्लमेंटपासून विविध स्तरावर चर्चा झालेली आहे. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया व आरोग्य मंत्रालय, भारत सरकार यांनी एकत्रितपणे चर्चा करुन निर्णय घेतला की, होमिओपॅथी, ॲलोपॅथी व युनानी यांना कम्बाईन करता येणार नाही. होमिओपॅथीची प्रॅक्टिस करणे हा स्वतंत्र व्यवसाय आहे. आयुर्वेदिक प्रॅक्टिस हा स्वतंत्र व्यवसाय आहे. त्यांना ॲलोपॅथीची प्रॅक्टिस करण्यास परवानगी देऊ नये असा केंद्र सरकारच्या स्तरावर निर्णय झाला आहे. त्यामध्ये बदल करण्याचा राज्य शासनाला कोणताही अधिकार नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक-2 वर रिन्युअल ऑफ रजिस्ट्रेशनसंबंधी तिसऱ्या परिच्छेदात म्हटले आहे की, "Provided that, any such certificate of registration or renewed certificate of registration, as the case may be, on the date of commencement of the Bombay Homoeopathic Practitioners (Amendment) Act, 2008, shall, expire after a period of five years from the date of such commencement". पाच वर्षाची मुदत का ठरविली आहे? यासंबंधी मंत्रीमहोदय खुलासा करतील काय? आम्ही देखील वकिलीचा व्यवसाय करतो. एकदा रजिस्ट्रेशन केले की, लाईफलॉंग रजिस्ट्रेशन कंटिन्यू राहते आणि व्यवसाय करता येतो. आम्हाला फक्त दरवर्षी टॅक्स भरावा लागतो. होमिओपॅथीचे एकदा रजिस्ट्रेशन केल्यानंतर 5 वर्षांनी पुन्हा रजिस्ट्रेशन करण्याची अट का घातली आहे?

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, बिलाच्या इंग्रजी प्रतीमध्ये सुरवातीला असे म्हटले आहे की " further to amend the Bombay Homoeopathic Practitioners' Act, 1959" आणि त्याखाली पुन्हा लिहिले आहे की,"This Act may be called the Bombay Homoeopathic Practitioners (Amendment) Act, 2008" माझी आपल्याला विनंती आहे की, बॉम्बेचे मुंबई नामकरण केव्हाच झाले आहे. या चुका पुन्हा पुन्हा होत आहेत. मुंबई होमिओपॅथी ॲक्ट असा उल्लेख करावा.

(नंतर श्री.भारवि...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, दर पाच वर्षांनी रजिस्ट्रेशन कशासाठी करीत आहात ? असा प्रश्न विचारलेला आहे. आम्ही हा कालावधी वाढवलेला आहे. कौन्सिलकडे प्रॉपर स्टाफ नाही. कारण ती व्हॉलंटरी संघटना आहे. मी सुरूवातीला सदनामध्ये सांगितले आहे की, आपण त्यांना काही अनुदान देत नाही. ट्रान्सफर फी, रजिस्ट्रेशन फी, यातून जो निधी जमा होतो, त्यातून ही संस्था चालते. ॲमिनिस्ट्रेशनवाईज सोपे पडावे म्हणून आपण पाच वर्षांचा कालावधी ठेवलेला आहे. प्रॅक्टीशनर्स काय करतात ? आज मुंबईला प्रॅक्टीस करतात तर उद्या महाराष्ट्र सोडून दुसऱ्या राज्यात जातात. दुसऱ्या राज्यातील प्रॅक्टीशनर्स येथे येतात. त्यामुळे हा कालावधी आपण पाच वर्षांचा केला आहे. पाच वर्षासाठी दुसरे काही कारण नाही.

तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव) : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.सुरेश शेट्टी : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 13 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 13 संमत झाले आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: (द्वितीय पुरवणी) विधेयक.

L.A. BILL NO. XLVIII OF 2008.

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2009.)

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी महाराष्ट्र विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 48 - दिनांक 31 मार्च 2009 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3 अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्याबाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

तालिका सभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

.....

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : आता वि.स.वि. क्रमांक 26 घेण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, नियम समितीची बैठक 4.30 वाजता घेण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथींसह एकूण 19 सन्माननीय सदस्य या बैठकीस उपस्थित राहणे अपेक्षित आहे. या विधेयकावर सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडता यावेत म्हणून सभागृहाची बैठक आता स्थगित करावी आणि नियम समितीची बैठक संपल्यानंतर पुन्हा सभागृहाची बैठक घेण्यात यावी म्हणजे सन्माननीय सदस्यांना नियम समितीच्या बैठकीसाठी उपस्थित राहणे शक्य होईल.

तालिका सभापती : प्रथम आपण 26 नंबरचे विधेयक मांडू या.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: महानगरपालिका व नगरपरिषदा सन 2008 चे वि.स.वि. क्रमांक, 2008.

L.A. BILL NO. XXVI OF 2008.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATION ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965).

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि. क्रमांक 26, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम,1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनमुतीने सन 2008 चे वि.स.वि. क्रमांक 26, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम,1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांना माहिती आहे की, देशाच्या दृष्टिकोनातून केंद्रशासनाच्या दोन महत्वाकांक्षी योजना आहेत. त्या म्हणजे जवाहरलाल नेहरु अर्बन रिन्यूअल मिशन आणि युआयडीएसएसएमटी अशा दोन महत्वाकांक्षी योजना आहेत. या योजनेअंतर्गत संपूर्ण देशात मोठया प्रमाणात निधी दिला जात आहे. राज्यसरकार आणि केंद्रशासनाच्या वतीने करारनामा झालेला आहे. यामध्ये जो सामंजस्य करार झाला आहे त्यात काही अटी आहे. आदर्श नागरी राज विधेयकामध्ये ज्या तरतूदी आहेत त्यासंदर्भात आपण या ठिकाणी विधेयक मांडलेले

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

आहे. या विधेयकामध्ये लोक सहभागाच्या विषयाला केंद्रबिंदू मानलेला आहे. क्षेत्रसभा ही एक नवीन समिती नगरपालिकेच्या आणि महानगरपालिकेच्या क्षेत्रात निर्माण करण्याचे काम करणार आहोत. सद्या जी टू टीयर सीस्टीम आहे, आज प्रभाग समितीच्यावर जनरल बॉडी आहे. प्रभाग समितीच्या खाली क्षेत्रसभा निर्माण करण्याचा निर्णय उद्देश या विधेयकामध्ये आहे. या विधेयकाचा लोक सहभाग वाढविण्याचा मुख्य हेतू आहे. साधारणपणे 700 ते 100 मतांचे एक पोलींग बूथ असते. 5 पोलींग बुथचे जास्तीत जास्त क्षेत्र हे एरिया समितीचे असणार आहे. साधारणपणे जास्तीत जास्त 4500 मतदार हे या एरिया कमिटीमध्ये असणार आहेत. ग्रामीण भागात जशी ग्रामसभा असते त्या पध्दतीने एरिया कमिटी बोलावली तर जास्तीत जास्त 4500 लोक यामध्ये सहभागी होऊ शकतात. मुंबई कार्पोरेशनमध्ये एक वॉर्ड 25-30 हजार लोकसंख्येचा आहे. असे 5 वॉर्ड मिळून एक प्रभाग समिती असते म्हणजे जवळ जवळ 1.5 लाख लोक मिळून एक प्रभाग समिती आहे. 1.5 लाख लोकसंख्येचा विचार केला तर कोकणामध्ये काही भागात 1.5 लाखाचा मतदारसंघ आहे. इतर महानगरपालिकेत कौन्सीलर निवडून येतात ते 5-7 कौन्सीलर मिळून एक प्रभाग असतो. आज आपल्या समोर लहान लहान समस्या अनेक आहेत. आज राज्यात झपाटयाने नागरीकरण वाढत आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे ...

नागरीकरण झपाटयाने होत असलेले एक राज्य म्हणून महाराष्ट्र पुढे येत आहे. अशा परिस्थितीमध्ये सामान्य माणसालासुध्दा व्हाईस असावा, त्यांच्या म्हणण्याला महत्व असावे यासाठी एरिया समितीची तरतूद करण्यात आलेली आहे. असे जरी असले तरी या समितीला मात्र अधिकार देण्यात आलेले नाहीत. प्रशासकीय मंजुरीचे अधिकार या समितीला दिलेले नाहीत, त्याचप्रमाणे वित्तीय अधिकारदेखील या समितीला देण्यात आलेले नाहीत. एखाद्या ठिकाणी लहानसा प्रश्न निर्माण झालेला असेल तर त्या प्रश्नाच्या बाबतीत एरिया समितीमध्ये चर्चा होईल. लहान स्वरुपाचा प्रश्न निर्माण झाल्यास इतर ठिकाणी त्याबाबतीत चर्चा करणे अवघड जाते. त्यामुळे एरिया समितीमध्ये त्याची चर्चा होईल. एरिया समिती निर्माण करण्याचा उद्देश असा आहे की, एखाद्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असेल, ड्रेनेजशी सबंधित प्रश्न निर्माण झाला असेल, स्ट्रीट लाईटचा प्रश्न निर्माण झाला असेल किंवा सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत नेहमी शहरातील भटक्या कुत्र्यांचा प्रश्न उपस्थित करतात तशा प्रकारचा एखादा लहानसा प्रश्न असेल तर त्या प्रश्नांची चर्चा एरिया समितीच्या बैठकीमध्ये केली जाईल आणि ती एरिया समिती प्रभाग समितीला शिफारस करु शकेल त्याचप्रमाणे या समितीमधील एक सदस्य प्रभाग समितीच्या बैठकीमध्ये बसू शकेल

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

सभापती महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने मी सन्माननीय सदस्यांना एवढेच सांगू इच्छितो की, या समितीमध्ये किती मेंबर्स असावेत, त्यांची नेमणूक कशी करावयाची यासंबंधीचा निर्णय घेण्याचा अधिकार जनरल बॉडीला राहणार आहे. मुंबई महानगरपालिकाची जनरल बॉडी असो किंवा नगरपालिकेची जनरल बॉडी असो ही जनरल बॉडी एरिया समितीच्या सदस्यांची निवड करणार आहे. निवड करण्यासबंधीचा अधिकार राज्य सरकारला आहे आणि राज्य सरकारला वाटेल त्या व्यक्तीची निवड राज्य सरकार करील असे कोणत्याही परिस्थितीमध्ये होणार नाही. सभापती महोदय, नगरपालिकांमध्ये ज्यांची मेजॉरिटी असेल त्यांच्या मार्फत एरिया समितीच्या सदस्यांची निवड केली जाणार आहे. अशा प्रकारचा एक नवीन विचार या विधेयकाच्या माध्यमातून मांडला जात आहे. या संदर्भातील ॲक्ट पास झाल्यानंतर रुल्स तयार करण्यात येतील.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या एरिया समितीमध्ये किती सदस्य ठेवावयाचे यासाठी कोणते नियम करावयाचे या गोष्टी नंतर ठरविता येतील. या एरिया समितीच्या सदस्याचे शिक्षण किती असले पाहिजे हे देखील नंतर ठरविले जाईल. या समितीमध्ये जर तज्ज्ञ व्यक्तीची निवड केली तर ते अधिक चांगल्या प्रकारे काम करु शकतील. त्या ठिकाणी राजकारण विरहीत काम व्हावे अशी शासनाची अपेक्षा आहे.स्लम एरियातील गरीब लोकांना एरिया कमिटीमध्ये आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळणार आहे.सभापती महोदय, या एरिया समितीच्या संदर्भात मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, राज्य शासन, महानगरपालिका किंवा नगरपालिका यांच्या माध्यमातून ज्या काही चांगल्या योजना राबविल्या जातात त्या योजनांची माहिती सामान्य माणसांपर्यन्त जाण्याची संधी या एरिया समितीच्या निर्मितीमुळे निर्माण होणार आहे .....

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण येण्यापूर्वी असा निर्णय झाला आहे की, हे विधेयक अत्यंत महत्वाचे असून त्यामध्ये अनेक लुप होल्स आहेत त्यातून गोंधळ निर्माण होणार आहे. त्यामुळे या विधेयकावर अनेक सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. म्हणून आता माननीय मंत्रीमहोदय फक्त बिल मांडतील. 4.30 वाजता नियम समितीची बैठक असल्यामुळे काही सन्माननीय सदस्यांना त्या बैठकीसाठी जावयाचे असल्यामुळे सभागृहाची बैठक स्थगित करण्यात येईल आणि पुन्हा 5.00 वाजता सभागृहाची बैठक सुरु होईल त्यावेळी या विधेयकावरील चर्चा पुढे चालू होईल.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय,. तुम्ही येण्यापूर्वी असा निर्णय झाला आहे असे सन्माननीय सदस्य चुकीचे सांगत आहेत.

श्री.मधुकर चव्हाण : मी सुचवलेले सांगत आहेत. 19 सन्माननीय सदस्य नियम समितीसाठी उपस्थित राहणे अपेक्षित आहे.

श्री. भास्कर जाधव :सभापती महोदय, त्यावेळी मीच पीठासीन अधिकारी म्हणून चेअरवर होतो त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले होते की, माननीय उप सभापतीनी असा निर्णय दिलेला आहे. त्यावेळी मी त्यांना असे म्हणालो होतो की , माननीय उप सभापतींनी जरी तसा निर्णय दिलेला असला तरी कमीत कमी आता माननीय मंत्रिमहोदयांना बिल तरी मांडू द्यावे पंरतु मी कोणताही निर्णय दिलेला नाही.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : ज्या सन्माननीय सदस्यांना नियम समितीच्या बैठकीला जावयाचे असेल ते सन्माननीय सदस्य त्या बैठकीला जाऊ शकतील आणि ज्या सन्माननीय सदस्यांना या बिलावर बोलावयाचे आहे ते या विधेयकावर बोलू शकतील.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, नियम समितीच्या बैठकीला या सदनातील एकंदर 19 सदस्यांना बोलाविले आहे, त्यात माझेही नाव आहे. आम्हा सदस्यांना सदर समितीच्या बैठकीला जायचे असल्याने आम्ही आपल्याला विनंती केली होती की, आपण अर्ध्या तासासाठी सभागृहाची बैठक स्थगित करावी. दुसरी गोष्ट अशी की, सभागृहाचे कामकाज चालू असताना, बैठक सुरू असताना कोणत्याही समितीची बैठक घ्यायची नाही असे ठरले होते तरीही नियम समितीची बैठक आज सभागृहाची बैठक सुरू असताना लावली आहे. ..

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सध्या सदनासमोर असलेले विधेयक हे महत्त्वाचे विषयक आहे आणि आम्हाला ते समजून घेऊन त्या संदर्भात शासनाकडून काही खुलासा देखील घ्यायचा आहे. तेव्हा आपण कृपया सदर नियम समितीच्या बैठकीला आम्हाला उपस्थित राहता यावे यासाठी सदनाची बैठक काही काळ स्थगित करावी किंवा हे विधेयक तरी पुढे ढकलावे.

उपसभापती : माझ्या असे लक्षात आले आहे की, सन्माननीय सदस्यांना सदनाची बैठक अर्ध्या तासासाठी स्थगित ठेवून नियम समितीच्या बैठकीला जायचे आहे. ठीक आहे. माझी काही त्यास हरकत नाही. मी सभागृहाची बैठक 5 वाजेपर्यंत स्थगित करतो.

(4.36 ते 5.00 वाजेपर्यंत सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

(यानंतर ..... 3एस 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)

सभागृहासमोरील कामकाजाबाबत

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, सभागृहामध्ये कोरम नाही. तसेच मघाशी अनेक सन्माननीय सदस्यांना समितीच्या बैठकीसाठी जावयाचे असल्याने त्यांनी अशी विनंती केली होती की, त्यांना या विधेयकाच्या बाबतीत विचार मांडावयाचे आहेत. त्यामुळेच आपण सदनाचे कामकाज तहकूब केले होते. परंतु अजून समितीची बैठक सुरु आहे. तेव्हा सदरहू बैठक संपेपर्यंत सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात यावे अशी मी विनंती करतो.

तालिका सभापती : आपल्याला असे करता येणार नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण आता असे सांगितले की, असे करता येणार नाही. मी आपल्या या वाक्याचा आदर करते. पण याठिकाणी जे विधेयक मांडण्यात आलेले आहे, ते अतिशय गंभीर आणि महत्वाचे आहे. माननीय सभापतींनी नियम समितीची महत्वाची बैठक आयोजित केलेली आहे. या सर्व बाबींचा विचार करुन सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी तहकूत करण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी विधेयकाच्या बाबतीत केवळ दोन मिनिटे भाषण करतो. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी आपापली भाषणे सुरु करावीत.

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्री महोदयांना विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडू द्यावा. त्यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे आणि इतर काही सन्माननीय सदस्यांना त्यावर विचार व्यक्त करावयाचे आहेत. या वक्त्यांची भाषणे संपेपर्यंत जर कमिटीसाठी गेलेले सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये आले नाहीत तर आपण त्यांचा भाषण करण्यासंबंधीचा हक्क अबाधित ठेऊन, मग सभागृह तहकूब करु.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय सभापतींच्या दालनामध्ये नियम 93 च्या सूचनांबाबत काय करावयाचे ? सभागृह किती चालवावयाचे ? इ. विधान परिषदेतील कामकाजाच्या अतिशय महत्वाच्या विषयावर बैठक सुरु आहे.त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, आपण सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी तहकूब करावी.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्या डॉ.नीलम

. . . .3 एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे . . . .

गोऱ्हे, सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता इ.सन्माननीय सदस्यांना भाषण करावयाचे आहे. या सन्माननीय सदस्यांचे भाषण पूर्ण होईपर्यंत समितीला गेलेले सन्माननीय सदस्य सदनामध्ये येतील. आता मी या विधेयकाच्या संबंधातील माझे भाषण पाच मिनिटांमध्ये संपवितो.

श्री.मधुकर चव्हाण (खाली बसून) : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज तहकूब करावे अशी विनंती करण्यासाठी मी माननीय सभापतींच्या परवानगीने येथे आलो आहे.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, नियम समितीच्या बैठकीसाठी अनेक सन्माननीय सदस्यांना उपस्थित रहावयाचे असल्याने आपण मघाशी सभागृहाचे कामकाज तहकूब केले होते.

तालिका सभापती : मघाशी आपण सभागृहाची बैठक 5.00 वाजेपर्यंत तहकूब केली होती. त्यामुळे आता 5.00 वाजता सभागृह सुरु झालेले आहे. माननीय मंत्री महोदय विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडणार होते, त्याच वेळी सभागृह स्थगित करण्यात आले होते. या विधेयकाच्या संबंधात सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्य सर्वश्री अरविंद सावंत, अरुण गुजराथी इत्यादींना आपली मते व्यक्त करावयाची आहेत.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती .....

मुद्दा असा आहे की, माननीय मंत्रिमहोदयांना प्रस्ताव मांडू द्यावा. सभागृहात जे सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत ते या बिलावर बोलत राहतील आणि तोपर्यंत जर ती बैठक संपली नाही तर आपला बोलण्याचा अधिकार गृहीत धरुन त्यावेळी सभागृहाची बैठक स्थगित करु आणि आपला हक्क शाबूत ठेऊ.

श्री. मधुकर चव्हाण : माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी जे स्पष्टीकरण देणार आहेत ते बैठकीला उपस्थित असलेल्या सन्माननीय सदस्यांना ऐकता येणार नाही.

तालिका सभापती : हे विधेयक विचारात घ्यावे एवढीच विनंती माननीय मंत्रिमहोदयांना करावयाची आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सुरुवातीला तीन सन्माननीय सदस्य बोलण्यानंतर समजा ती बैठक संपली नाही तर काय करणार ?

तालिका सभापती : त्यावेळी सभागृहाची बैठक स्थगित करु आणि आपला बोलण्याचा हक्क शाबूत ठेऊ.

श्री. मधुकर चव्हाण : ठीक आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : महानगरपालिका व नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO. XXVI OF 2008.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

(चर्चा पुढे सुरु)

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांना असे वाटते की, नगरसेवकांच्या अधिकारांवर, हक्कावर गदा येते की काय ? मला एवढेच सांगावयाचे आहे की, ही समिती सूचना देणारी एरिया समिती असेल. त्या एरियामध्ये जे विकासाचे प्रश्न असतील, ज्या अडीअडचणी असतील त्या सगळ्यांच्या संदर्भात काही सूचना देणारी ही समिती असणार आहे. त्यामुळे त्यांना वित्तीय अधिकार किंवा प्रशासकीय अधिकार असण्याचा प्रश्न येत नाही. त्या समितीचे जे प्रोसीडींग केली जाईल किंवा त्यांचे जे म्हणणे असेल ते प्रभाग समितीकडे मांडले जाईल. ते जनरल बॉडीपर्यंत गेले तरी ते गृहीत धरावेच असे बंधनकारक नाही. मला आपल्याला खात्री द्यावयाची आहे की, अशी कोणतीही गदा येईल असा अधिकार त्यांना नाही. यामध्ये लोकसहभाग वाढावा, लोकांचे प्रश्न आहेत, त्यांचे जे म्हणणे आहे ते निर्णय घेणाऱ्या लोकांसमोर मांडण्यासाठी चॅनेल असावे हा उद्देश आहे. एरिया समिती, प्रभाग समिती आणि त्यानंतर स्टॅंडींग कमिटी अशी त्रिस्तरीय सिस्टीम तयार होईल. सामान्य माणसांचे म्हणणे योग्य पध्दतीने स्टॅंडींग कमिटीपर्यंत किंवा जनरल बॉडीपर्यंत ऐकले जाईल. त्यावर "होय" किंवा "नाही" जो काही निर्णय घ्यावयाचा असेल तो घेण्याचा जो अधिकार स्टॅंडीग कमिटी आणि जनरल बॉडी यांना आहे तो अबाधित आहे. यामध्ये कोठेही त्यांच्या अधिकारावर गदा येण्याचा प्रश्न येत नाही.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

आपल्याला माहीत असेल की, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेमध्ये शेजार समूह गट असतो. यामध्ये पार्टिसिपेटीव मॅनेजमेंट किंवा लोकसहभाग वाढावा यादृष्टीने सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेमध्ये अत्यंत चांगल्या पध्दतीने काम केले जाते. लोकसहभागाच्या दृष्टीकोनातून, राज्य शासनाच्या योजना सुध्दा लोकांपर्यंत पोहोचाव्यात यादृष्टीने त्या समितीमध्ये चांगली चर्चा होऊ शकते. काही तज्ज्ञ लोक त्या ठिकाणी नेमले जाऊ शकतात. ते नेमण्याचा अधिकार स्थानिक जनरल बॉडीला असणार आहे. त्यामुळे शासन त्यांचे काही अधिकार घेत आहे असा विषय असू शकणार नाही. म्हणून मी सभागृहाला विनंती करु इच्छितो की, या विधेयकावर जरुर चर्चा करावी परंतु हे एक चांगले विधेयक आहे. लोकांचा सहभाग वाढविणारे विधेयक आहे. सामान्य माणसांचे म्हणणे आणि माहिती प्राप्त करुन देणारे विधेयक आहे. या अनुषंगाने भारत सरकार आणि राज्य शासन यांच्यामध्ये जो सामंजस्य करार केलेला आहे त्यातील जी अट आहे ती पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून महत्वाचे काम या विधेयकाच्या मंजुरीच्या माध्यमातून होऊ शकणार आहे. यामध्ये किती सदस्य असणार, त्यांचे शिक्षण काय असणार यासंबंधी जे छोटे-मोठे नियम असतील ते बिल मंजूर झाल्यानंतर करु शकतो. त्या नियमांमध्ये काही छोट्या मोठ्या गोष्टींचा अंतर्भाव करता येऊ शकणार आहे. लोकांचा सहभाग वाढविणारे हे विधेयक आहे.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे....

प्रत्यक्षात असे जे छोटे छोटे प्रश्न आहेत त्या प्रश्नांची सोडवणूक करणे, विकासाच्या प्रक्रियेमध्ये गती निर्माण करणे असे चांगले विधेयक चर्चेसाठी मांडले आहे. या विधेयकामुळे कोणाच्याही अधिकारावर गदा येणार नाही. नगरसेवकांचे अधिकार कमी होतील असेही नाही. या विधेयकाच्या माध्यमातून नागरी विकासाला गती देणारे हे विधेयक आहे असा विश्वास मी यानिमित्ताने व्यक्त करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मागील 20 वर्षांचा आपण आढावा घेतला तर जेव्हापासून जागतिक बँक किंवा वेगवेगळया पध्दतीचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील निधी लोकशाहीमध्ये काही महत्वाच्या भूमिका बजावत आहे. साधारणपणे आर्थिक व्यवहाराशी त्यांचा संबंध असल्यामुळे त्यांनी लोकांचा सहभाग वाढावा म्हणून स्वत:चे काही नियम, निकष देण्याची सुरुवात केलेली आहे. हे निकष व नियम देत असताना ज्या देशांमध्ये लोकशाही परिपक्व नाही किंवा अनेक देशांमध्ये लोकशाहीच अस्तित्वात नाही अशा वेळेला बरेच नोकरशहा किंवा लष्करशहा किंवा लोकशाहीच्या नावाखाली निवडून आलेले हुकूमशहा वर्षानुवर्षे त्या देशांमध्ये राज्यव्यवस्था राबवित असतात. अशा देशांमध्ये काहीना काही लोकांचे प्रतिनिधीत्व असावे असा विचार करुन ब-याच वेळा जागतिक स्तरावर अशा कल्पना समोर आणलेल्या असतात. आपण एक लक्षात घेतले पाहिजे की, जेएनयूआरएम अंतर्गत निधी मिळण्यासाठी हे क्षेत्र सभा प्रतिनिधी निवडले जाणार आहेत असे म्हटले जात आहे. उद्देश व कारणांमध्येच असे म्हटले आहे की, "महानगरपालिकेच्या कार्यामध्ये नागरिकांच्या सहभागाचा योग्य वापर करुन घेणे आवश्यक झाले आहे. या प्रयोजनासाठी नागरी कार्य व दारिद्रय निर्मूलन मंत्रालय, भारत सरकार यांनी आदर्श नगर राज विधेयक सर्व राज्यांच्या विचारार्थ पाठवले आहे." हा केवळ एक किंवा दोन महानगरपालिकांपुरता प्रश्न नाही. आपण आपल्या लोकशाहीच्या चौकटीद्वारे निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या अधिकारांकडे कशाप्रकारे बघतो याच्याशी त्याचा संबंध आहे. आज आपण राजकारणाचे चित्र पहात आहोत, समाजकारणाशी संबंधित असल्यामुळे माझा ब-याच लोकांशी संपर्क असतो. मध्यंतरी फिलिपिन्स देशामध्ये भूकंप झाला होता. भूकंप झाल्यानंतर सरकारी अधिकारी आणि काही समाजाच्या प्रतिनिधींची बैठक चालू होती. पण नंतर असे लक्षात आले की, जखमी किंवा दगावलेले लोक एकमेकांचे नातेवाईक होते. म्हणजे अधिका-यांनी लोक सहभागाचा भाग म्हणून स्वत:च्या कुटुंबातील लोकांना नेमले होते. भूकंपात सापडलेल्या लोकांची नावे पाहिल्यानंतर हे सर्व एकाच कुटुंबातील आहेत असे लक्षात आले. या विधेयकाद्वारे क्षेत्र सभा प्रतिनिधी म्हणून निवडून देण्याचा विचार केला जात आहे. भारताच्या लोकशाहीमध्ये, महाराष्ट्र राज्यातील लोकशाहीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था जगातील अनेक देशापेक्षा प्रगत आहे. भारतात त्या मानाने नियमित निवडणूका होतात. जरी काही वेळेला घोडे बाजार झालेला दिसला तरी त्या

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

डॉ.नीलम गोऱ्हे.....

तुलनेमध्ये आज स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महाराष्ट्राचे वैशिष्टय असे आहे की, येथे अधिकारांचे विकेंद्रीकरण झालेले आहे. आपल्यासारखे कार्यकर्ते समजून घ्यायला लागतात. त्यावेळी कायम हेच म्हटले जाते की, जेवढे अधिकार विकेंद्रित होतील तेवढा सामान्य लोकांना फायदा मिळू शकेल. पण विकेंद्रीकरणाच्या नावाखाली पुन्हा एकदा संपूर्ण स्थानिक राजकारणाचा चुथडा करुन टाकण्यासाठी हे विधेयक आणले आहे की काय अशी मला शंका वाटते. याला अनेक कारणे आहेत. नाही म्हटले तरी या सगळया जबाबदा-या निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या आहेत. त्या सर्वावर सुपरविजन असणे, त्यासाठी नावे सुचविणे, लाईट कोठे लावावयाची हे सुचविणे, निधी कसा वापरावयाचा हे ठरविणे म्हणजे एका अर्थाने पर्यायी सत्ताकेंद्र तयार केलेले आहे. हे पर्यायी केंद्र म्हणजे त्या त्या महानगरपालिकेत जे सत्तेमध्ये आहेत त्यांनी निवडलेले प्रतिनिधी असले तरी एका वॉर्डामध्ये कशा पध्दतीने निर्णय होणार आहे ते सांगता येत नाही, यासंबंधी संघर्ष होऊ शकतो. कारण ती सत्ता आहे. हे लोक सामाजिक कामाची माहिती असलेले असतील काय, त्यातील काही लोकांचे प्रशिक्षण झालेले असेल काय, काही लोकांना खरोखर कामाची कल्पना असेल काय, किती लोकांना वेगवेगळया मार्गाने क्षेत्र सभेचे प्रतिनिधी म्हणून निवडून येतील याबद्दल कोणतेही निकष किंवा नियम नाहीत.

नंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंदी

(डॉ. नीलम गो-हे...)

याबाबत मी असे विचारु इच्छिते की, या लोकसहभागामध्ये शासनाने नेमलेल्या लोकांचा सहभाग असणार आहे की, समाजाच्या वेगवेगळया स्तरावरील वेगवेगळया लोकांचा सहभागर त्यामध्ये असणार आहे ? मी एक उदाहरण देते. एका वार्डामध्ये उद्यान करावयाचे असेल तर कोणी असे म्हणेल की, ते उद्यान देवळा जवळ असावे, दुसरा असे म्हणेल की, ते उद्यान शाळेजवळ असावे. म्हणजे वार्डाच्या विकासाच्या संदर्भात हा जो छोटा छोटा आवाज असतो त्यांचे हा प्रतिनिधी कशावरुन ऐकणार आहे ? हा प्रतिनिधी, लोकप्रतिनिधीला छेद देण्यासाठी म्हणून काम करील की पूरक म्हणून काम करील ? आमच्या एखाद्या निर्वाचित झालेल्या महिलेचा पती देखील त्या क्षेत्रसभेवर निवडून येईल आणि दोघे मिळून कारभार करतील. तेव्हा या क्षेत्रसभेच्या बाबतीत काही तरी निकष लावले पाहिजेत. जेथे आरक्षण असेल तेथून जो क्षेत्रसभा प्रतिनिधी निवडून येईल तो वेगळया प्रकारचे हितसंबंध व्यक्त करणारा असला तर तेथे देखील वेगवेगळया मार्गाने दबाव येईल. आपण जो लोकसहभागाचा दावा केलेला आहे त्याबाबतीत खूप मर्यादा आहेत असे मला आवर्जून सांगावेसे वाटते. ज्यावेळी महानगरपालिकांची मुदत संपेल त्यावेळी हे क्षेत्रसभेचे लोक देखील संपतील. भूकंप झाल्यानंतर 10-12 वर्षे काम करीत असताना बरेचसे लोकप्रतिनिधी बदलले जातात, अधिकारी बदलले जातात आणि सातत्याने काम करणा-या सामाजिक संघटना ह्या कायम राहातात हे आम्ही पाहिलेले आहे. आता महानगरपालिकेनेच नेमलेले हे समाज कार्यकर्ते आहेत. समाज कार्यकर्त्यांचे वैशिष्टय असे असावयास पाहिजे की ते कधी बरखास्तच होत नाहीत. परंतु त्यांनाही आपण बरखास्त करण्याचा चमत्कार करुन दाखविणार आहोत. कारण हे सरकारच्या कृपेने नेमलेले समाजसेवक त्या त्या वॉर्डामध्ये असणार आहेत. म्हणून या विधेयकाला विरोध करीत असताना मी हे सांगू इच्छिते की, वेगवेगळया पध्दतीने स्वत:च्या हातामध्ये सत्ता कशी केन्द्रीत करता येईल या दृष्टीने सरकारचे प्रयत्न सुरु आहेत. कृषी उत्पन्न बाजार समित्या कशा पध्दतीने बरखास्त करता येतील यादृष्टीने आपण निर्णय घेतला. रोजगार हमी योजनेचा निधी कॉर्पस निधी दाखवून एकत्रित निधीमध्ये वळविला. म्हणजे एका बाजूला नाम के वास्ते आपण हे सर्व चालू ठेवलेले आहे. हे सर्व करीत असताना एक हुशार राजकारणी असे माननीय मंत्री

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे...)

महोदयांना म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. मोठमोठया इमारती उभारल्या जात आहेत, मोठे मोठे भूखंड विकसित केले जात आहेत. पण त्याच वेळी त्या नगरपालिका अथवा महानगरपालिकेच्या हद्दीतील जे शेतकरी वंचित होणार आहेत त्यांना किती प्रतिनिधीत्व मिळणार आहे हे कोणालाच माहीत नाही. जागतिक बँक आणि आयएमएफ यांच्याकडून वॉटर आणि सॅनिटेशनसाठी जे पैसे दिले जातात त्यांना कागदोपत्री सिध्द करुन दाखविण्यासाठी तुम्हाला लोकांच्या कमिटया पाहिजेत आणि त्यासाठी तुम्ही हे नामधारी रबरी ठसे याठिकाणी आणून बसविणार आहात. या नामधारी माणसाने कन्सल्टेशनमध्ये सांगितले की, मार्केटमध्ये टायलेटची पाहिजे अशी महिलांनी मागणी केलेली आहे आणि एक्स,वाय,झेड पक्षाचा नगरसेवक म्हणाला की, हे आम्हाला मान्य नाही तेथे आम्ही शॉपिंग मॉल बांधणार आहोत, तर मग या प्रतिनिधींच्या सांगण्याला काहीच अर्थ राहाणार नाही. नगरसेवक सांगतील त्या प्रमाणे निर्णय होणार असतील तर कन्सल्टेशन पेक्षा संघर्षच अधिक होईल. कन्सल्टेशनची कार्यपध्दती काय आहे ? विचारात घेणार, म्हणजे काय विचारात घेणार ? मी नाव न घेता एका ठिकाणच्या आमसभेचे उदाहरण देते. त्याठिकाणी अशा पध्दतीने आम सभा होते की, 10 हजार माणसे त्या आमसभेला उपस्थित असतात आणि कोणी विरोधी करायला लागला की, मागच्या बाजूने त्याचे शर्ट खेचून आणि बाहेर नेऊन त्याला बडवून काढले जाते आणि अशा त-हेने त्या आमसभेमध्ये आमदारांची सर्व कामे मंजूर केली जातात. अशा आमसभेला कन्सल्टेशन म्हणता येईल काय ? तेव्हा अशा प्रकारे हे क्षेत्र प्रतिनिधी निवडून लोकशाहीचे एक बुजगावणे उभे करु नये. तुम्हाला जर कमिट्या करावयाच्या असतील तर त्या लोकांनी स्वत:हून तयार केलेल्या असल्या पाहिजेत. त्यामध्ये वेगवगळया पक्षाचे लोक असले पाहिजे. मुंबई शहरामध्ये शेजार समित्या केलेल्या आहेत. लोकांपर्यन्त योजना पोहोचविण्यासाठी आपण लोकसहभागाच्या मोहिमा केलेल्या असून त्यातून केवढे प्रश्न निर्माण झाले हे आपणास माहीत आहे. यामध्ये अधिका-यांना लाडके असणारे लोक घुसतात आणि स्थानिक प्रतिनिधी बाजूला राहातात. मला हे सांगावयाचे आहे की, केवळ प्रॉक्झ ी किंवा नावापुरता लोक सहभाग दाखविणे इष्ट नाही. त्यामुळे नोकरशहांचे फावते.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे...)

अनेक ठिकाणी आम्ही असे पाहातो की, ज्यांना राजकीय प्रशिक्षण नाही किंवा जे लोक भाबडे आहेत त्यांना चुकीच्या मुद्यांसाठी वापरुन वितंडवाद निर्माण केले जातात आणि त्या भाबडया माणसाला आपण किती योग्य भूमिका घेतोय असे वाटत असते. प्रत्यक्षात निर्णय होऊ नये म्हणून त्या माणसाचा वापर केलेला असतो. त्यामधून कार्यहानी आणि विकास कामाला खीळ बसत असते.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

म्हणून मला आपल्याला असे सांगावयाचे आहे की, आपण अशा प्रकारची विधेयके सभागृहासमोर आणता, त्यावेळी निदान शासनाने विरोधी पक्ष नेत्यांना, गट नेत्यांना विचारात घेतले पाहिजे. येथे महानगरपालिका मतदार संघातून निवडून आलेले श्री.अरविंद सावंत सारखे लोकप्रतिनिधी आहेत त्यांना तरी तुम्ही विचारात घ्यावे. आम्ही जे विधेयक आणतो आहोत ते योग्य आहे की अयोग्य आहे असे महानगरपालिका मतदार संघातून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना विचारा. या सभागृहात अनेक सन्माननीय सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून आलेले आहेत. सभापती महोदय, त्यात आपला देखील समावेश आहे. यात ठाणे महानगरपालिकेचा समावेश अजून झालेला नाही. मुंबई महानगरपालिकेत बदल झाला म्हणजे इतरही महानगरपालिकेत बदल होऊ शकतात. या सदनाचे वेगवेगळे कायदे बनविणे हे ध्येय आहे. आम्ही सध्या मॅगी न्यूडल्स सारखे कायदे बनवित आहोत. सगळे रेडीमेड एका प्लॅस्टीकच्या पॅकेटमध्ये तयार असते. आपण सदनात येऊन ते पॅकेट तोडावयाचे आणि त्यात पाणी घालावयाचे,त्यानंतर विधेयक तयार होत असते. परंतु न्यूडल्स तयार करताना निश्चित पाणी कोणते वापरणार आहोत, शेवया कोठून आणणार आहोत, फोडणी कोठून घालणार आहोत पोहे कोठून आणणार आहोत, या गोष्टीशी आपण काहीही संबंध ठेवत नाही. पॅकेट उघडल्यानंतर आपल्याला दिसते की, त्यात कोणता पदार्थ आहे. आपण गाजावाजा करीत पुन्हा वाहिन्यांवर मुलाखती देतो. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्रतिनिधींचे प्रशिक्षण घेतो. मंत्रालयात नगरपालिका आणि महानगरपालिकेतून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीसाठी प्रशिक्षण ठेवले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांचे महापौर, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करणारे आयुक्त त्यांचे मत एकदाही विचारात न घेता त्यांच्या डोक्यावर अशी विधेयकामागे विधेयक थोपविता. त्यानंतर तुम्ही सांगता लोक सहभाग असला पाहिजे. पुढे मात्र काहीच होत नाही. विधेयकामध्ये बदल करावयाचा असेल तर हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे अन्यथा हे विधेयक संपूर्णत: रद्द करावे. मी विरोधी पक्षाचे सदस्य आहे म्हणून रागारागाने बोलते आहे अशातला भाग नाही. तुम्ही बहुमताच्या जोरावर हे विधेयक मंजूर करुन घ्याल. तुम्ही बहुमताचा जोरावर जमवा जमवी करुन सत्तेवर येऊ शकता. तुम्ही सत्तेतील एक प्रतिनिधी आहात. हे विधेयक तुम्ही बहुमताचा जोरावर मंजूर घेतले तर प्रत्येक महानगरपालिकेमध्ये तुमच्या नावाने शिमगा झाल्या शिवाय राहणार नाही. या स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी खूप नाराज होणार आहेत. या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

प्रत्येक नगरसेवकास तुम्ही अडचणीत आणता आहेत. या विधेयकामुळे प्रत्येक नगरसेवकास योग्य प्रकारे काम करण्यास अडचणी निर्माण करीत आहात. या विधेयकाच्या माध्यमातून कोणते निर्णय लोकप्रिनिधीपुढे नेणार आहात ? या गोष्टीचा माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा. जालना विधानसभा मतदार संघात क्षेत्रसभा प्रतिनिधी का नको ? विधानसभेमध्ये क्षेत्रसभा प्रतिनिधी का नको ? खासदारांना क्षेत्रसभा प्रतिनिधी का नको ? सरपंचाना क्षेत्रसभा प्रतिनिधी का नको ? केवळ आमदारांना स्वत:कडे सत्ता केंद्रित करावयाची आहे. महानगरपालिकांमध्ये समाजाचा सहभाग पाहिजे मात्र आपण आपल्या मताने निर्णय घ्यावयाचे हे बरोबर नाही. इतर राज्यांनी हा कायदा स्वीकारला असेल किंवा नसेल याची मला माहिती नाही. केवळ निधीसाठी तुम्ही स्वीकारले असेल तर या निर्णयांचा नंतर चुथडा झालेला असेल याची मी तुम्हाला जाणीव करुन देत आहे. शासनाने या विधेयकाचा पुनर्विचार करावा. या क्षेत्रातील जाणते लोक आहेत, या क्षेत्राशी निगडीत अनेक संस्था आहेत, त्या संस्थांनी यासंबंधीचे वेळोवेळी काम केले आहे. अनेक महानगरपालिकेतील लोकप्रतिनिधी असे आहेत की, त्यांनी लोक सहभागातून काम केले आहे. ही योजना योग्य आहे यासंबंधीची त्यांच्याकडून माहिती घ्यावी. हे विधेयक दिल्ली येथून आले म्हणून ते स्वीकारले पाहिजे असे नाही. आज महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था पुढे आहेत असे लोकांना वाटते. दिल्लीतील निर्णय तुम्ही येथे होयबा सारखे स्वीकारले तर वेगळे चित्र दिसेल. कर्नाटक, तामिळनाडू, राजस्थान ही राज्ये म्हणतील की, आम्ही हे मान्य केले नाही. जवाहर नेहरु अर्बन रिनिव्हलचे किती तरी पैसे थांबविले याची तुम्ही तुलना करा. त्या राज्यांनी अतिशय बरोबर केंद्राचा निधी मिळविला असेल आणि आपल्याला हवे असतील तसे निर्णय घेतले असतील. आपण होय, होय म्हणून नको त्या गोष्टीला मान तुकवितो आणि लोकांचे नुकसान करुन घेतो. या विधेयकाच्या बाबतीत पुनर्विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते.

यानंतर श्री. कानडे... ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापी नाही

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, मैं इस विधेयक का स्वागत करना चाहती हूँ. पॉजिटिव एटीट्यूड के साथ इस बिल की तरफ देखा गया तो इसमें विकेंद्रीकरण, समान रुप से विकास और लोक सहभाग इन तीन चीजों का फोकस नजर आ रहा है. एरिया रिप्रजेन्टेटिव की वजह से उस क्षेत्र के हिसाब से प्लानिंग में सुविधा होगी और लोगों की तरफ से उनकी डिमांड सामने रखने का मौका मिलेगा. कई जिलों में हमने देखा है कि एक विशेष क्षेत्र का विकास किया जाता है. जो नगरसेवक ज्यादा ताकतवर है, वह ज्यादा पैसा खींचकर लाता है. इस विधेयक के द्वारा अगर समान रुप से विकास होता है तो लोगों को इसका जरुर फायदा होगा. माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे की एक बात से मैं सहमत हूँ कि एरिया रिप्रजेन्टेटिव सलेक्ट करने का निर्णय जनरल बॉडी करेगी तो मेरे मन में शंका है कि वह जनरल बॉडी से अलग तो नहीं होगी तो इसमें दूसरों का मत कैसे आएगा ? इसलिए इस बात पर फिर से विचार होना चाहिए. आप एरिया रिप्रजेन्टेटिव को इसलिए ला रहे हैं कि वहां से आपको सही मत मिले, वहां से सही प्लानिंग आए. अगर ऐसा हुआ तभी यह विधेयक कामयाब हो सकता है.

सभापति महोदय, मैं एक और बात कहना चाहती हूँ कि आज नगरपालिका हो या जिला परिषद हो, स्थानिक स्वराज संस्थाएं ही आज विकास का माध्यम है और इन संस्थाओं के पास एक बहुत बड़ी निधि आती है. इसमें से कितनी निधि आम मतदार तक पहुंचती है और उसका कितना सही उपयोग होता है, इस बात पर सोचने की आवश्यकता है. कम से कम जिला परिषद के ऊपर विधानमंडल की पंचायत राज कमेटी कुछ नियंत्रण रखने का काम करती है. लेकिन नगरपरिषद और महानगरपालिका के लिए ऐसी कोई कमेटी नहीं है. इस विधेयक के माध्यम से मैं यह बात आपके सामने रखना चाहती हूँ कि इस तरह की एक नियंत्रण समिति होनी चाहिए. वहां पर कितनी अनियमितता होती है, कितने अध्यक्ष बर्खास्त किए गए हैं और कितने नगरसेवक बर्खास्त किए गए हैं. ऐसी अनियमितता कई जगह पर हो रही है और हम अपनी आँख बंद करके स्वीकार कर रहे हैं. ये सब चीजें न हों, इसके लिए हमें इस विधेयक के माध्यम से कदम उठाने होंगे. यह बात जरुर है कि आज महानगरपालिकाओं और नगरपालिकाओं के वित्तीय मामलों पर नियंत्रण रखना आवश्यक है. इतना कहते हुए मैं अपना भाषण पूर्ण करती हूँ.

- - - - - - - - - (भाषण पूर्ण)

. . . 3X 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मला सदनाला एकच गोष्ट सांगावयाची आहे की, क्षेत्र समिती स्थापन केली जाईल ती जनरल बॉडीने केलेली असेल. त्यामध्ये व्होटर्स आहेत. ग्रामसभेच्या धर्तीवरच एरिया कमिटी केली जाईल. क्षेत्रीय प्रतिनिधी निवडले जातील. किती प्रतिनिधी असावेत याचा आकडा निश्चित करता येईल. परंतु ग्रामसभेत जसे निर्णय होतात तशाच पध्दतीने येथेही केले जाईल. अनेक गोष्टी ग्रामसभेतून घेतो. तशाच पध्दतीने निर्णय घेतला जाईल. शहरामध्ये ग्रामसभा नाही. म्हणून एरिया कमिटी आहे. ग्रामीण भागातील संकल्पना शहरातून लोकसहभागाच्या माध्यमातून वाढविण्याचा हा प्रकार आहे. कमिटी आहे ती जनरल बॉडी नॉमिनेट करील. कमिटी मत व्यक्त करील ते लोकांचे म्हणणे ऐकूनच व्यक्त करील. याठिकाणी मतदानाचा विषय येत नाही.

यानंतर भारवि

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता (अमरावती स्थानिक प्राधिकरण संस्था) : सभापती महोदय, या विधेयकाला विरोध करण्यासाठी मी उभा आहे. सदर विधेयक आणून लोकप्रतिनिधींवर अविश्वास दाखविण्याचे काम शासन करीत आहे. आपण स्थानिक लोकांच्या कामासाठी स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण केलेल्या आहेत. त्यामुळे स्थानिक संस्थांमधील लोकप्रतिनिधींना आपल्या विभागामधील नाल्याची कामे, लाईटस्ची कामे करावयाची असतात व तेच आपण या बिलामध्ये मेन्शन केले आहे. तो सक्षम नाही म्हणून समिती नेमायची असा आपला हेतू आहे काय ? लोकप्रतिनिधीवर विश्वास नाही असे या विधेयकाच्या माध्यमातून प्रदर्शित होत आहे. त्याच्या विरोधात समितीला शिफारस करण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे यासंबंधीचा निर्णय आम सभेमध्ये घेण्यात येईल. सक्षम लोकप्रतिनिधी हे त्या विभागातील लोक निवडून देतात. त्या लोकांच्या बुद्धीवरच आपण प्रश्नचिन्ह निर्माण करीत आहात काय ? असा प्रश्न या विधेयकाच्या माध्यमातून माझ्या समोर उभा राहिला आहे. या विधेयकाच्या माध्यमातून आपण आदर्श सांगितला आहे. पण वास्तविक जीवनामध्ये त्या गावामध्ये, शहरामध्ये कोणत्या पद्धतीने राजकारण चालते, समाजजीवन कसे चालते याचा विचार केला आणि त्यानंतर विधेयकाकडे बघितले तर अधिक सोयीचे होईल. लोकांचा सहभाग वाढविण्याच्या आपल्या अपेक्षा आहेत. पण तेथे त्यापेक्षा जास्त भांडणे झाल्याशिवाय राहणार नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. आपण सर्वजण सामाजिक जीवनामध्ये वावरत असताना आपल्यावर जर समिती निर्माण झाली तर अहंकार दुखावल्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. लोकप्रतिनिधी किंवा तेथील नगरसेवक आणि समिती यांच्यामध्ये कामासंबंधी वेगळे मत आले तर दोघांमध्ये निश्चितपणे मतभेद झाल्याशिवाय राहणार नाही. नेमका याचा फायदा प्रशासन घेईल. प्रशासनाला वाटले की, नगरसेवकाने सुचविलेले काम योग्य नाही, तर त्या समितीचा उपयोग करून त्याच्या निर्णयाच्या विरोधात गेल्या शिवाय राहणार नाही. हा प्रचंड मोठा धोक आहे. मुंबइ, पुणे येथील मोठ्या महानगरपालिका सोडून अन्य लहान महानगरपालिकांमध्ये आधीच कमी कर्मचारीवर्ग आहे. या विधेयकामुळे त्यांच्यावर अधिकचे काम येणार आहे. या कर्मचाऱ्यांना वाचन करावे लागणार आहे, त्यावर मत व्यक्त करून ते सभेमध्ये ठेवावे लागणार आहे. यामुळे विकासाच्या कामाला अधिक खीळ बसणार आहे. यामुळे कामे उशिरा होणार आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता...

आमच्या महानगरपालिकेत नगरसेवक हा त्याच्या विभागात सकाळपासून फिरत असतो. कुठे साफसफाईची व्यवस्था, लाईटची व्यवस्था नाही हे त्याला पहावे लागते. साडे चार हजार लोकवस्तीचा वॉर्ड असतो. मोठ्या महानगरपालिकेचे अपवाद आपण सोडून द्यावेत. परंतु, महाराष्ट्रातील बहुतांश महापालिकेचे वॉर्ड हे साडेचार हजार लोकवस्तीचे आहेत. त्यामुळे पुन्हा महानगरपालिकेतील लोकप्रतिनिधींवर समिती नियुक्ती करीत असाल, बंधन घालत असाल तर तेथे अधिक भांडणे होतील. एखाद्या नगरसेवकाने निधी अभावी पुढच्या वर्षी किंवा नंतर काम करू असे म्हटले तर लोक त्या समितीकडे जातील. या समितीची शिफारस करून घेतील आणि वर्तमानपत्राचा आधार घेऊन त्या नगरसेवकांवर राजकारण करून दबाव आणण्याचा प्रयत्न करतील. या समितीवर सदस्यांची नियुक्ती राजकीय लोकच करणार आहेत. त्यामुळे राजकीय क्षेत्रातील लोकच या समितीवर सदस्य म्हणून नियुक्त होणार असल्यामुळे राजकारण होणारच नाही असे छातीठोकपणे सांगता येणार नाही.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदिश गुप्ता ....

या सगळयांची नियुक्ती राजकीय माध्यमातून होणार आहे. ज्या ठिकाणी ज्या पक्षाचे बहुमत आहे त्या पक्षाचे लोक या समितीमध्ये येणार आहेत. पक्षांतर्गत चढाओढ मोठया प्रमाणात असते त्यामुळे कार्यकत्यांमध्ये संघटनेपेक्षा वेगळयाच पध्दतीची चुरस वाढेल. हा लोकप्रतिनिधी योग्य काम करीत नाही म्हणून या समितीच्या माध्यमातून दुसरे लोक त्याचा फायदा घेतल्याशिवाय राहणार नाहीत हे आपल्याला सांगण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. मी माननीय मंत्रीमहोदयांना या विधेयकाच्या संदर्भात इशारा देऊ इच्छितो की, आपण फार मोठे घातक विधेयक या ठिकाणी आणलेले आहे. ग्रामसभेत ज्या प्रकारे भांडणे होतात तशाच प्रकारची गुंडगिरी, ज्यांच्या मनगटात जोर राहील त्यांची कामे लवकर होतील आणि ज्या एरियातील लोक शांत आहेत त्यांची कामे मागे पडतील. नगरसेवक, लोकप्रतिनिधींची या विधेयकामुळे कुचंबणा झाल्याशिवाय राहणार नाही. आम्ही या ठिकाणी जे विचार मांडीत आहोत त्यासंदर्भात आपण कितीही नाही म्हटले तरी ते सत्य आहे. आपल्या सगळयांना राजकारण माहीत आहे. या ठिकाणी प्रश्न पदाचा नाही. आपण या विधेयकामुळे राजकारण करण्यास रोखू शकणार नाही, ते प्रेसमध्ये जातील, काडया करतील, राजकारण कशा प्रकारे चालते हे मी आपल्याला सांगणे योग्य नाही. मतदानाच्या माध्यमातून जे लोकप्रतिनिधी निवडून आलेले आहेत त्यांचा आवाज या विधेयकामुळे दाबला जाईल, या विधेयकामुळे त्यांच्यावर आपण एक प्रकारचा अविश्वास दाखवणार आहात. ज्या लोकांनी ज्या प्रतिनिधींना निवडून दिलेले आहे अशा लोकांच्या बुध्दीवर आपण या विधेयकाच्या माध्यमातून प्रश्नार्थक चिन्ह लावत आहात. त्यामुळे माझी माननीय मंत्रीमहोदयांना, माननीय सभापती महोदयांच्या माध्यमातून एकच विनंती आहे की, आपण जे विधेयक येथे आणले आहे ते तातडीने परत घ्यावे. या क्षेत्रात काम करणा-या लोकप्रतिनिधी बरोबर बसून या विधेयकाच्या संदर्भात सखोल चर्चा करावी आणि भविष्यात या विधेयकाच्या संदर्भात निर्णय घ्यावा अशी कळकळीची विनंती करतो व या विधेयकाबद्दल पुन्हा एकदा विचार करावा अशी विनंती करतो. आपण महाराष्ट्राकडे तंटामुक्त महाराष्ट्र म्हणून स्वप्न बघत आहोत परंतु या विधेयकामुळे प्रत्येक भाग, प्रत्येक नगरपालिका, महानगर पालिका तंटा मुक्त होण्यापेक्षा तंटाग्रस्त महाराष्ट्र झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून या विधेयकाचा मी विरोध करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदय श्री. राजेश टोपे हे अशा प्रकारचे विधेयक या सभागृहात आणतील अशी अपेक्षा मला त्यांच्याकडून नव्हती. ते एक सर्वसाधारण विचार करणारे गृहस्थ आहेत, न्याय्यीवृत्ती बाळगणारे गृहस्थ आहेत, सज्जन आहेत, चांगल्या कामाचा ठसा त्यांनी उमठवलेला आहे असे मला वाटत होते पण नेमके त्यांनी टोपी घालणारे विधेयक आणले आहे. हे विधेयक वाचल्यानंतर हे विधेयक आणण्यामागे शासनाचा हेतू काय आहे हे न कळण्याजोगे राहिलेले नाही. सन्माननीय मंत्री महोदय बसून असे म्हणत होते की, आम्ही ग्रामसभा जशी होते तशाच प्रकारे या विधेयकाच्या निमित्ताने जनतेचा सहभाग घ्यावयाचा आहे. यासंदर्भात मी एकच सांगू इच्छितो की, श्री. नाना चुडासामा हे उद्बोधक चिमटा काढणारे वाक्य नेहमी लिहीत असतात. लोकशाहीची चेष्टा आपण कशा प्रकारे करीत आहोत त्याचे उदाहरण देणारे हे विधेयक आहे. लोकशाही म्हणायचे परंतु लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींना डमी करायचे, नगरसेवकाच्या पायात खोडा घालून गोंधळ कसा घालावयाचा यासाठी हे विधेयक आणलेले आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ...

सभापती महोदय, या विधेयकाचे उद्देश वाचले तर ते मजेशीर आहेत असे आपल्या लक्षात येईल. या विधेयकाचा उद्देश आणि बिल यातील फरक मी आपल्याला प्रथम सांगतो . यु.एल.सी. कायदा रद्द करण्याचे विधेयक ज्यावेळी मांडण्यात आले होते त्यावेळी असे सांगण्यात आले होते की, केन्द्राकडून जे.एन.आर.यु.एम.चे पैसे राज्य सरकारला मिळाले पाहिजेत त्यासाठी यु.एल.सी.चा कायदा प्रथम रद्द करावा लागेल. आता हे विधेयक मांडण्यात आलेले आहे त्या विधेयकाच्या उद्देश आणि कारणांमध्ये असे म्हटलेले आहे की, " जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान ही केन्द्र पुरस्कृत योजना राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेअन्वये राज्याच्या अनेक महानगरपालिकांमधील विविध पायाभूत सुविधास प्रकल्पांसाठी राज्य शासनाला भारत सरकारकडून वित्तीय सहाय्य मिळत आहे " म्हणजे वित्तीय क्षेत्रात आम्ही अपंग आहोत हे यावरुन दिसून येते. भारत सरकारकडून वित्तीय सहाय्य मिळविण्यासाठी आम्ही वाट्टेल ते करण्यास तयार आहोत. त्यानंतर पुढे असेही म्हटलेले आहे की," .भारत सरकार आणि राज्य शासन यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार इतर गोष्टीबरोबरच,महानगरपालिकेच्या कार्यामध्ये नागरिकांच्या सहभागाचा योग्य वापर करुन घेणे आवश्यक झाले आहे." म्हणजेच जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानामध्ये कोठेही यासबंधीचा क्लॉज टाकण्यात आलेला नाही. असे असतांना राज्याचा आणि केन्द्राचा वेगळा सामंजस्याचा करार झाला होता. त्या करारान्वये नागरिकांचा सहभाग असावा म्हणून हे विधेयक आणले जात आहे. उद्देश आणि कारणाच्या निवेदनात पुढे असे म्हटलेले आहे की, " या प्रयोजनासाठी नागरी कार्य व दारिद्रय निर्मूलन मंत्रालय, भारत सरकार यांनी आदर्श नगर राज विधेयक सर्व राज्यांच्या विचारार्थ पाठवले आहे." दारिद्रय निर्मूलन असा उल्लेख येथे करण्यात आलेला असल्यामुळे तेथेपर्यंत ठीक आहे परंतु विचारांचे दारिद्रय मात्र न परवडणारे आहे.शासनाच्या विचारांचे दारिद्र असणारे हे विधेयक आहे.माननीय मंत्रिमहोदयांवर कठोर टीका करीत असतांना मला खूप वेदना होत आहे. हे शासन आदर्श नगर उभे करण्यास निघालेले आहे तेव्हा या आदर्श नगरामध्ये शांतता प्रस्थापित व्हावी, लोकांनी तेथे आनंदाने रहावे, गुण्या गोविंदाने रहावे असे शासनाला वाटते की नाही ? याबाबतीत शंका निर्माण व्हावी अशा प्रकारचे हे विधेयक आहे. या विधेयकाच्या उद्देश आणि कारणांच्या निवेदनात पुढे असे म्हटलेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ...

आहे की, उक्त आदर्श नगर राज विधेयकावर काळजीपूर्वक विचार केल्यानंतर.. " अशा प्रकारची काळजी घेणारे कोण अधिकारी आहेत ? हे मला माहीत नाही.त्यानंतर पुढे असे म्हटलेले आहे की," महानगरपालिका आणि नगरपरिषदामध्ये अधिकारश्रेणी अनुसार निम्नतम स्तरावर असेल अशा क्षेत्र सभांची स्थापना करण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,1965 यामध्ये योग्य त्या सुधारणा करुन, तरतुदी करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते. क्षेत्र सभा प्रतिनिधी 1 ते 5 मतदान केन्द्राचे प्रतिनिधित्व करेल." सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या एका क्षेत्रात 30 ते 40 हजार मतदार आहेत त्यामुळे तेथे किमान 50 मतदान बुथ लागतील. 1 ते 5 मतदान केन्द्राचा यामध्ये उल्लेख जरी करण्यात आला तरी त्यामध्ये कोणताही आकडा निश्चित करण्यात आला नाही.एक ते पाच मध्ये एक मतदान केन्द्र असू शकेल किंवा दोन असू शकतील वा तीनही असू शकतील. त्या ठिकाणी भौगोलिक दृष्टया सलगता कशी असेल याबाबतीत काहीही माहिती नाही. त्यामुळे एक ते पाच मतदान केन्द्राचा उल्लेख केलेला असल्यामुळे क्षेत्र प्रभाग प्रतिनिधी हा एक मतदान केन्द्राचे प्रतिनिधित्व करील असे जर शासनाला वाटले तर तसे होईल किंवा क्षेत्र प्रभाग प्रतिनिधी हा पाच मतदान केन्द्राचे प्रतिनिधित्व करील असे जर शासनाला वाटले तर त्याप्रमाणें क्षेत्र प्रतिनिधी हा पाच मतदान केन्द्राचे प्रतिनिधित्व करील .त्यातून 10 क्षेत्र सभा निर्माण होतील. या क्षेत्र सभामध्ये कोण निवडून जाणार आहेत ? या सदर्भात कायद्यात त्रृटी आहे. कदाचित शासनाचा हेतू उदात्त असू शकेल. महात्मा गांधीजीचे आशीर्वाद घेऊन आपले काय काय हेतू असतील हया बाबतीत मला भरवसा वाटत नाही. कलम 66 ब (1) मध्ये असे म्हटलेले आहे की, " प्रत्येक प्रभागाची ज्या क्षेत्रामध्ये विभागणी करण्यात येईल अशी क्षेत्रे निर्धारित करील " हे कोण निर्धारित करणार आहे ? या बाबतीत मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की जनरल बॉडी निर्धारित करणार आहे. परंतु जनरल बॉडी ही कोणाची राहणार आहे ? या बाबतीत या विधेयकात कोठे उल्लेख केलेला आहे हे आपण मला दाखवा. जनरल बॉडी म्हणजे ती कोणाची राहणार आहे ? पाच लोकांची निवड कोण करणार आहे ? मुंबई महानगरपालिकेचे

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ...

"जी साऊथ,एफ साऊथ, एफ नॉर्थ" असे काही प्रभाग आहेत आणि दहा बारा नगरसेवकांचा एक प्रभाग राहणार आहेत त्यामुळे अशा प्रकारचा जर हिशोब केला तर 10 गुणिले 10 म्हणजे 100 क्षेत्र सभा होणार आहेत तेव्हा हे दहा बारा नगरसेवक क्षेत्र ठरविणार आहेत, की उप आयुक्त ठरविणार आहेत, की आयुक्त ठरविणार आहे ? हे क्षेत्र नक्की कोण ठरविणार आहे ? तर जनरल बॉडी क्षेत्र ठरविणार आहे परंतु जनरल बॉडी म्हणजे नेमके कोण ? हे आम्हाला देखील माहीत नाही. ही जनरल बॉडी म्हणजे कोणाची राहणार आहे याचा विधेयकामध्ये कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. क्षेत्र निर्धारित करणारी ॲथॉरिटी कोण आहे याचा उल्लेख कोठेही दिसून येत नाही. त्यानंतर कलम 66 ब (दोन)मध्ये असे म्हटलेले आहे की, " प्रत्येक क्षेत्राच्या प्रादेशिक सीमा निर्धारित करील ज्यामध्ये, अशा प्रदेशातील, मतदान केन्द्राच्या मतदारयादीमध्ये नमूद केलेल्या सर्व व्यक्ती या सर्वसाधारण रहिवासी असतील अशा कोणत्याही मतदान केन्द्राच्या किंवा शासनाने ठरविल्यास " म्हणजे या ठिकाणी देखील पळवाट ठेवलेली दिसते . त्यानंतर पुढे असेही म्हटलेले आहे की, " त्या क्षेत्रातील अशा दोन किंवा अधिक (जास्तीत जास्त पाच) सलग मतदान केन्द्राच्या, संपूर्ण भौगालिक प्रदेशाचा अनिवार्यपणे समावेश असेल "

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

तुम्हाला त्यांना खरोखरी द्यायचे आहे ना ? ही लोकशाही आहे ना ? ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे ना ? मग हे सारे शासन का ठरवित आहे ? हे क्षेत्र शासन का ठरवित आहे ? तुम्ही हे ठरविणार म्हणजे तुमचा निवडणूक आयोग तयार झाला. म्हणजे मग तुम्हीच ठरविणार की, यातील कोणते क्षेत्र घ्यायचे, आपल्याला कोणते क्षेत्र सोयीस्कर आहे, आपण अडचण कोठे निर्माण करू शकतो, आपण त्रास कोठे देऊ शकतो ? करा मग तसे क्षेत्र तयार. 'किंवा' हे यामध्ये कशासाठी घातले आहे ? यामध्ये 'जनरल बॉडी' कोण हेही कळलेले नाही. त्यात पुन्हा मतदान केंद्राच्या सीमा... मग त्या सीमा आहेतच की. प्रत्येक बूथचे स्वत:चे क्षेत्र आहेच. त्या सीमा तुम्ही कशा काय निर्धारित करणार ? पुन्हा त्या सीमा निर्धारित करण्याचा अधिकार देखील तुम्हालाच. 1 ते 5 म्हटले तर मी समजू शकतो. कोठले तरी 4 बूथ भौगोलिकदृष्ट्या घेतले. आता 'सीमा निर्धारित करील' म्हणजे काय निर्धारित करणार ? सभापती महोदय, मी या विधेयकातील अगदी शब्दन् शब्दाचा कीस पाडणार आहे. यात आपण म्हटले आहे की, '... या पद्धतीने शासनाने ठरविल्यास ....' याला माझा आक्षेप आहे. मुळात या पूर्ण विधेयकालाच माझी हरकत आहे. यामध्ये कोणते क्षेत्र आहे ते शासन ठरविणार आहे. हे बरोबर मला वाटत नाही.

सभापती महोदय, पुढे 50सब मध्ये म्हटलेले आहे की, '(1) प्रत्येक क्षेत्रासाठी एक क्षेत्र सभा प्रतिनिधी असेल.' म्हणजे तो एक बूथचा असेल वा 5 बूथचा असेल. पुढे (2) मध्ये म्हटले आहे की, '..महानगरपालिका, विहित करण्यात येईल अशा रीतीने, प्रत्येक क्षेत्राकरिता क्षेत्र सभा प्रतिनिधी म्हणून कार्य करण्यासाठी एक व्यक्ती नामनिर्देशित करील.' यामध्ये विहित काय करणार आहेत ते परमेश्वरालाच ठाऊक. हे मला कबूल आहे की, एक व्यक्ती नामनिर्देशित करील. पण हे कोण करणार ? तर महानगरपालिका. म्हणजे हे जनरल बॉडी ठरविणार आहे का ? सर्वसाधारण सभा ठरविणार आहे का ? मग त्या सर्वसाधारण सभेचे सभासद कोण ? हे कोण ठरविणार ? कोण मेजॉरिटीने ठरविणार ? मग हा प्रतिनिधी कोण ? नामनिर्देशित केला जाईल, पण तो कोण करणार ? नॉमिनेशन बाय व्हर्च्यू ऑफ व्हॉट ? बाय मेजॉरिटी, मग जनरल बॉडी कोणती, कोणाची? म्हणूनच मी म्हणतो की, हे सारेच संदिग्ध आहे. म्हणूनच मी माननीय राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मी आपला खूप आदर करून म्हणतो की हे इतके भयानक अशा स्वरूपाचे विधेयक कोणी ड्राफ्ट केले आहे ? हे विधेयक ड्राफ्ट करणाऱ्याला महानगरपालिकेचे

..... 4बी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

काही माहिती आहे की नाही ? हा प्रश्न पडतो आहे, त्याची मला कीव येते. मुंबईत अगोदरच लोक इतके व्यापलेले आहेत, त्यात पुन्हा आपण नवीन गोंधळ निर्माण करता आहात. सभापती महोदय, पुढे तर आणखी भयानक आहे. आमचे मित्र मघाशी बसूनच म्हणाले की, शेवटी नगरसेवकच ठरवतील घ्यायचे की नाही ते. म्हणजे आणखी राडा. आम्ही शिफारस केली की, तुम्ही घेणार नाही. हेही पुढे आहेच, त्या मुद्यावर मी येणारच आहे.

सभापती महोदय, पुढे '50सक' मध्ये आपण म्हटले आहे की, एखाद्या क्षेत्रातील कोणताही नोंदणीकृत मतदार ... आता हा नामनिर्देशित होण्यासाठी कोण पात्र आहे ? त्यात म्हटले आहे की, तो तेथील मतदार असला पाहिजे, त्याचे वय अमुक इतके असले पाहिजे वगैरे सगळे काही मान्य आहे. आता आपल्याकडे अनेक पराभूत उमेदवार आहेत. ते या साऱ्या गोष्टींवर इच्छुक उमेदवार होणार. अनेक पक्षांचे असे उमेदवार असणार आहेत. ते मग त्रास द्यायला सुरूवात करणार. म्हणून नामनिर्देशित होण्यास पात्र होणारा जो उमेदवार असेल, जो क्षेत्र सभा प्रतिनिधी असेल, तो निवडायचा कसा ? तो नामनिर्देशित कोणी करायचा ? कोठल्या पद्धतीने करायचा ? तो नॉमिनेटेड असेल तर तो निवडून कसा येऊ शकतो ? तो इलेक्टेड कॅंडिडेट कसा होऊ शकतो ? जनरल बॉडी डिसाईड करणार आहे, जनरल बॉडी म्हणजे व्हर्च्यू ऑफ इलेक्शन्स म्हणजे निवडणूक घेऊन जनरल बॉडी डिसाईड करणार असेल .... तर सर्वसाधारण सभा ... त्या सर्वसाधारण सभेचे सभासद कोण ? सगळे सभासद म्हणतील की, आम्ही आमचा प्रतिनिधी निवडतो, तुम्ही निवडणारे कोण टिकोजीराव ? लोकसहभाग असेल तर मग आमचा सहभाग त्यात असला पाहिजे. आम्ही पाच क्षेत्रातील सगळे मतदार एकत्र येऊ आणि आम्ही आमचा प्रतिनिधी कोण ते ठरवू. पाच बूथचा प्रतिनिधी कोण हे आम्ही ठरवू असे उद्या लोक म्हणाले तर तुम्ही काय करणार ? तेव्हा तुम्ही लोकशाहीच्या मुळावर घाला घालणारे विधेयक येथे आणले आहे हे लक्षात घ्या.

सभापती महोदय, पुढे या प्रतिनिधींचे काम काय राहणार आहे ते आपण पहा. या ठिकाणी 50सई मध्ये आपण म्हटले आहे की, " .. क्षेत्र सभेस, त्या सभेची व्यवस्थापकीय, तांत्रिक, आर्थिक आणि संघटनात्मक क्षमता लक्षात घेऊन आणि महानगरपालिका क्षेत्रात असलेली प्रत्यक्ष परिस्थिती विचारात घेऊन पुढील कार्ये पार पाडता येतील आणि कर्तव्यांचे पालन करता येईल ..." आता आपण एकीकडे म्हणता आहात की, क्षेत्र सभेला एकच प्रतिनिधी, पाच बूथची एक क्षेत्रसभा त्या

..... 4बी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

क्षेत्रसभेचा प्रतिनिधी कोण तर जो नॉमिनेटेड आहे तो, ही क्षेत्रसभा आणखी कोठल्या सदस्यांची होणार आहे ? म्हणजे नगरसेवक हा बाजूलाच पडणार आहे. ...

(यानंतर सौ.रणदिवे.... 4सी 1 ..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मग ही क्षेत्र सभा आणखी कोणत्या सदस्यांची होणार ? मग ते कोण ?

श्री.राजेश टोपे (खाली बसून) : व्होटर्स्.

श्री.अरविंद सावंत : म्हणजे आता नगरसेवक बाजूला गेले. तुम्हीच उत्तर देत आहात हे एका अर्थी बरे आहे. व्होटर्स्ची सभा होणार. पाच बुथ असतील तर काय होणार ? ग्राम सभा ठीक आहे. एक छोटसे गाव आहे. पाच बुथ म्हणजे पाच हजार मतदार झाले. त्यांची क्षेत्रसभा होईल. पान क्र.3 वर "50सई" मध्ये असे म्हटलेले आहे की, "क्षेत्र सभेस, त्या सभेची व्यवस्थापकीय, तांत्रिक, आर्थिक आणि संघटनात्मक क्षमता लक्षात घेऊन" म्हणजे काय ? ते मला कळलेच नाही. त्या क्षेत्रसभेची व्यवस्थापकीय, तांत्रिक, आर्थिक आणि संघटनात्मक क्षमता कसली ? या शब्दांचे अर्थ काय आहेत त्याची माहिती द्यावी. "क्षेत्र सभेस, त्या सभेची व्यवस्थापकीस, तांत्रिक, आर्थिक आणि संघटनात्मक क्षमता लक्षात घेऊन" म्हणजे तुम्ही त्यांची क्षमता पहाणार आहात. पुढे असे म्हटलेले आहे की, "आणि महानगरपालिका क्षेत्रामध्ये असलेली प्रत्यक्ष परिस्थिती विचारात घेऊन" म्हणजे काय ? तेथे कसली परिस्थिती असणार आहे ? तेथे भयावह आहे, आतंकवाद आहे, गडबड आहे ? काय आहे? पुढे म्हटलेले आहे की," पुढील कार्ये पार पाडता येतील व कर्तव्यांचे पालन करता येईल." सभापती महोदय, हे विधेयक कशा प्रकारे मुळावर घाव घालणारे आहे ही गोष्ट आपल्या लक्षात येईल. पुढे (एक) मध्ये म्हटलेले आहे की, "क्षेत्र सभेच्या क्षेत्रात राबवावयाच्या योजना व विकास कार्यक्रम यांचा प्राथम्यक्रम सुचविणे" हे क्षेत्रसभा सुचविणार आहे आणि नगरसेवकांनी मम् म्हणावे, आत्मन: म्हणा, श्रुती-स्मृती म्हणा, पुढे गोंविंदाय नम:, माधवाय नम: असे काय असेल ते म्हणा. हे सगळे ते करायवयास लावतील. पुढे म्हटलेले आहे की,"आणि अशा योजना व कार्यक्रम प्रभाग समितीच्या किंवा यथास्थिती, महानगरपालिकेच्या विकास योजनांमध्ये अंतर्भूत करण्यासाठी प्रभाग समितीकडे पाठविणे." ते ठरविणार आणि मग ते त्यांच्याकडून प्रभाग समितीकडे येणार. पुढे आणखी मजेशीर बाब आहे. पुढे असे म्हटलेले आहे की, "क्षेत्र सभेच्या क्षेत्रामध्ये दिवे लावण्यासाठी, रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी पाण्याचे नळ बसविण्यासाठी, सार्वजनिक विहीर बांधण्यासाठी, सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधण्यासाठी आणि अशा इतर सार्वजनिक सुखसोयींविषयक योजनांसाठी जागा सुरविणे." हे जागा ठरविणार. पाच हजार लोक एकत्र येणार आणि जागा सुचविणार. त्यांनी मघाशी सांगितले की, बाग कुठे पाहिजे, टॉयलेट कुठे पाहिजे ?

. . . .4 सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (खाली बसून) : जागा शिल्लक आहे काय ?

श्री.अरविद सावंत : सभापती महोदय, आमचा बेलापूरचा किल्ला गिळंकृत केला आहे. मग तुम्ही कसल्या जागा सुचवित आहात ? मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये तर ही अशक्यप्राय गोष्ट आहे. आधीच उल्हास त्यातून फाल्गुनमास. हे त्यांनी करावयाचे, त्यांनी जागा सुचवावयाच्या आणि जर ते नगरसेवकांनी किंवा प्रभाग समित्यांनी मान्य केले नाही तर मग त्या माणसाची किंमत काय राहिली ? असा प्रश्न आहे. गावामध्ये सार्वजनिक विहिर बांधणे हा आणखी एक वेगळा विषय आहे. मुंबईमध्ये तर सार्वजनिक विहिरी नाहीत. खरे म्हणजे या दुष्काळाच्या परिस्थिती पाहिल्यानंतर मुंबई शहरातील सर्व विहिरी बुजवून टाकण्यात आल्या, याचा आम्हाला पश्चाताप होत आहे. आम्ही देखील स्वत:विहिरीवर जाऊन पाणी आणलेले आहे. सार्वजनिक स्वच्छतागृह बांधण्यासाठी देखील जागा सुचविणार. याबाबतीत सांगावयाचे तर कोणत्याही माणसाला आपल्या घराच्या शेजारी स्वच्छतागृह आवडेल काय ? झोपडपट्टीतील लोकांनी अनधिकृतपणे त्या बांधल्या पण जेव्हा त्यांना नागरी सुविधा देण्याचा विषय पुढे आला, तेव्हा प्रत्येकाने सांगितले की, येथे बांधावयाचे नाही. म्हणजे स्वच्छतागृह हवे आहे, पण ते माझ्या दारामध्ये नको. दुसरीकडे बांधावे ही परिस्थिती आहे त्याचा आपण विचार करीत नाही. पुढे (तीन) मध्ये असे म्हटलेले आहे की,"क्षेत्रसभेच्या क्षेत्रामधील पाणीपुरवठा व्यवस्थेतील व रस्त्यांवरील दिव्यांच्या व्यवस्थेतील त्रुटी शोधून काढणे आणि त्या त्रुटी दूर करण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविणे." आता मुंबई सारख्या शहरांमध्ये रस्त्यावरील दिव्यांची व्यवस्था, पण हे महानगरपालिकांचे क्षेत्र आहे. तेथे दिव्यांच्या व्यवस्थेतील त्रुटी शोधून काढणे, त्या नजरेस आणणे" नगरसेवकांना म्हणावे, तु निवडून आलेला आहेस, आता तू पाच वर्षे शांतपणे झोप, तुला त्रास नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

ही क्षेत्र सभा सर्व चालवील. पाच वर्षानंतर सांगावयाचे की, खूप चांगले काम केले आहे, मला पुन्हा निवडून आणा. त्यांनी पाच वर्षे फक्त निवांत झोपावयाचे. यामध्ये पुढे (चार) मध्ये असे म्हटले आहे की, "क्षेत्र सभेच्या क्षेत्रातील सार्वजनिक आरोग्य केंद्रांमध्ये राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमांना विशेषकरुन रोग प्रतिबंधक कार्यक्रमांना तसेच कुटुंबकल्याण कार्यक्रमांना सहाय्य करणे आणि साथीचे रोग व नैसर्गिक आपत्ती याबाबतच्या घटनांची माहिती कळविण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे." या सगळ्याची काय गरज आहे ? आरोग्य कोणाचे बिघडले आहे ? हे बिल म्हणजे नवीन साथीचा रोग आहे. हे बिल आले की, क्षेत्र सभेवर कोणी जावयाचे यासाठी संपूर्ण मुंबईमध्ये साथीचा रोग लागलेला असेल. त्यानंतर पुढे (पाच) मध्ये असे म्हटले आहे की, "कराची पध्दतशीर आखणी करण्याचे काम हाती घेणे..." सामाजिक काम तर राहिलेच पण आता कराची आखणी करण्याचे काम हाती घेणे, असे म्हटले आहे. म्हणजे स्टँडींग कमिटीची वगैरे काही गरजच नाही. यामध्ये असे म्हटले आहे की, " कराची पध्दतशीर आखणी करण्याचे काम हाती घेणे व त्यास सहाय्य करणे आणि क्षेत्र सभा सदस्यांना महापालिका कर व चापर आकार भरण्याबाबतच्या त्यांच्या कर्तव्याची आठवण करुन देणे." सभापती महोदय, याबाबत काय बोलावयाचे ? माझ्याकडे शब्द नाहीत. माननीय मंत्रिमहोदय गुजरात राज्याने हे मंजूर केले आहे असे सांगत आहेत. दुसऱ्याने शेण खाल्ले म्हणून आपण खाल्ले पाहिजे का ? आपण तुलना करु नका. हे आपले राज्य आहे. आपल्याला स्वत:चा आचार आहे, विचार आहे, कृती आहे, स्वत:ची दृष्टी आहे. डोळे असूनही दृष्टी नसेल तर काही फायदा नाही. दृष्टी असलीच तर आणखी दूरदृष्टी असली पाहिजे. परंतु यामध्ये दूरदृष्टीचा सुध्दा अभाव आहे.

सभापती महोदय, मघाशी मी क्षेत्र सभेची कार्ये व कर्तव्ये याबाबत सांगितले. यानंतर क्षेत्र सभेचे हक्क व अधिकार याबाबत काय म्हटले आहे ते सांगतो. यासंदर्भात (एक) मध्ये असे म्हटले आहे की, "महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून, महानगरपालिकेकडून देण्यात येणाऱ्या सेवांची आणि पार पाडण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांची माहिती मिळवणे" म्हणजे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या मागे आणखी काम लागेल. या सगळ्या क्षेत्र सभा, त्यांचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

प्रतिनिधी, एका वॉर्डला किमान आठ ते दहा प्रतिनिधी असतील. एका प्रभागामध्ये 15 ते 17 नगरसेवक आहेत. म्हणजे 100 क्षेत्र सभा प्रतीनिधी एका प्रभाग समितीच्या कार्यालयात सगळी माहिती मिळवत राहणार. ही माहिती द्या, ती माहिती द्या असे सांगणार. म्हणजे त्यांचे काम वाढणार. यानंतर (दोन) मध्ये असे म्हटले आहे की, "प्रभाग समितीकडून (अ) क्षेत्र सभेच्या अधिकारितेच्या संबंधात प्रभाग समितीने किंवा महानगरपालिकेने घेतलेल्या निर्णयाची माहिती मिळवणे". म्हणजे मघाशी जी कर्तव्ये सांगितली ती त्यांनी कळविल्यानंतर प्रभाग समिती ते मान्य करील की नाही हे माहीत नाही. ती मान्य केली की नाही, तरतूद केली की नाही याची माहिती पुन्हा क्षेत्र सभेच्या प्रतिनिधींना कळवावी लागेल. आपण जे दिले होते ते पुण्यकर्म झालेले आहे, आपल्या घराशेजारी स्वच्छतागृह बांधतो असे जे काही असेल ते त्यांना ताबडतोब कळवावे लागेल. म्हणजे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या मागे आणखी एक काम लावून टाकले आहे. पुढे (ब) मध्ये असे म्हटले आहे की, "क्षेत्र सभेच्या अधिकारितेसंबंधातील निर्णयांचा पाठपुरावा करण्यासाठी केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मिळवणे." म्हणजे पुन्हा नगरसेवक विरुध्द क्षेत्र सभा अशी परिस्थिती आली.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

The bill is not going to lead to concensus but confrontation. कन्फ्रण्टेशन वाढविणारे विधेयक आहे. यामध्ये जे क्लॉज समाविष्ट केले आहेत ते मी जसेच्या तसे वाचत आहे. यातील एका क्लॉजमध्ये असे म्हटले आहे की "स्वच्छता राखणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि प्रदूषणास आळा घालणे यासारख्या सार्वजनिक हिताच्या बाबींविषयी लोकांमध्ये जागरुकता निर्माण करणे....

तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव) : मी मंत्रिमहोदयांना विचारु इच्छितो की, हे विधेयक आजच संमत करावयाचे आहे काय ?

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आमची उशिरापर्यंत बसण्याची तयारी आहे.

तालिका सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवरील कामकाज पाहता हे विधेयक आज संमत करावे लागेल असे दिसते.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, या महत्वाच्या विधेयकावर अनेक सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, सभागृहाची बैठक आता स्थगित करुन उद्या सकाळी 9.30 वाजता कामकाज सुरु करावे. सभागृहाच्या नियमित वेळेमध्ये हे विधेयक चर्चेसाठी ठेवले तरी आमची हरकत नाही. आता सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांचे अपूर्ण राहिलेले भाषण ते उद्या पुन्हा सुरु करतील.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत हे अपूर्ण राहिलेले भाषण उद्या सुरु करतील. परंतु हे अधिवेशन सुरु झाल्यापासून बरेच कामकाज शिल्लक राहिलेले आहे. ब-याच अर्धा तासाच्या चर्चा राहिलेल्या आहेत, नियम 93 वरील निवेदने राहिलेली आहेत. शनिवारी हे अधिवेशन संपणार आहे. याचा अर्थ सर्व कामकाज गुंडाळले जाणार आहे. आतापर्यंतचे राहिलेले सर्व कामकाज पूर्ण केले जाईल असे मंत्रिमहोदयांनी आश्वासन द्यावे. सभागृहामध्ये पुरवणी मागण्यांवर सन्माननीय सदस्यांना 2-2 मिनिटांचा वेळ दिला जातो, नियम 93 च्या निवेदनावर सूचना देणा-या सदस्यांनी केवळ एकच प्रश्न विचारावा असे सांगितले जाते, लक्षवेधी सूचनेवर एकच प्रश्न विचारता येतो, म्हणजे सदस्यांनी कोणत्याही बाबीवर चर्चा करावयाची नाही. अर्ध्या तासाच्या चर्चेसाठी वेळ दिला जात नाही. मग आम्ही हे अधिवेशन घरीच चालवितो...

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना मी खात्री देऊ इच्छितो की, माझ्याकडून असे होणार नाही. या विधेयकावर सविस्तरपणे चर्चा होईल. सभागृहाचे जे मत असेल त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल. सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन आपण अनेक विधेयके चिकित्सा समितीकडे पाठविली आहेत. केंद्र सरकारच्या कायद्याच्या मसुद्यामधील योग्य अयोग्य तरतुदी पाहून आपल्याला दुरुस्त्या करता येतील. मी एवढे वचन देतो की, हे विधेयक घाईगडबडीने संमत केले जाणार नाही.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांना विधेयकावर बोलताना मर्यादा घालता येत नाही आपण आपले भाषण आटोपते घ्यावे अशी त्यांना विनंती करतो. सभागृहासमोरील राहिलेले कामकाज पाहता कदाचित उद्याचा वेळी कमी पडण्याची शक्यता आहे.

श्री.जगदीश गुप्ता : हे विधेयक मंजूर करण्याची घाई नाही असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. ते या विधेयकासाठी अधिक वेळ देण्यास तयार आहेत.

तालिका सभापती : हे जरी खरे असले तरी आपल्याकडे जेवढा वेळ असतो तेवढया वेळेमध्ये कामकाज पूर्ण करावयाचे असते.

ॲड.अनिल परब : पुढील अधिवेशनापर्यंत हे विधेयक पुढे ढकलावे.

तालिका सभापती : या विधेयकावर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना या विधेयकावर बोलावयाचे आहे. परंतु या विधेयकावरील चर्चा उद्या घेण्यात यावी अशी सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांचे मत आहे. यासंबंधी माननीय संसदीय कार्यमंत्र्यांचे काय मत आहे ?

नंतर श्री.शिगम

अशुद्धीरित प्रत / शुद्धीपत्रीयाची नाही

श्री. जगदीश गुप्ता : हे विधेयक संमत करण्याची आम्हाला घाई नाही असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : केन्द्र सरकारकडून या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनुदान मिळते. हे विधेयक विधानसभेने संमत केलेले आहे. सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता हे विधेयक उद्या चर्चेला घ्यावे.

श्री. मधुकर चव्हाण : योजनांसाठी भारत सरकारचा निधी मिळणार आहे आणि त्यासबंधातील हे विधेयक आहे असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. सामंजस्य करारासंबंधी केन्द्राने हे विधेयक राज्याकडे विचारार्थ पाठविलेले आहे. त्यामुळे हे विधेयक पुढच्या अधिवेशनामध्ये जरी संमत झाले तरी चालेल. या विधेयकामुळे विपरित परिणाम होणार आहेत. यामध्ये त्रुटी असतील तर त्या दूर करण्याच्या संदर्भात सूचना केल्या पाहिजेत. हे विधेयक आज संमत झाले नाही तर त्यामुळे महानगरपालिकांचा कारभार थांबेल अशातला भाग नाही. अतिशय भयानक बाबी या विधेयकामध्ये आहेत. तेव्हा हे विधेयक पुढच्या अधिवेशनामध्ये घ्यावे अशी माझी सूचना आहे. विधेयकावर भाषण करणारे सन्माननीय सदस्य ऑन लेग राहातील.

श्री. हर्षवर्धन पाटील : या विधेयकावर विस्ताराने चर्चा होण्याची आवश्यकता आहे असे सन्माननीय सदस्य मधुकर चव्हाण यांनी सांगितले. हे विधेयक धाई-गडबडीने संमत करण्याची शासनाची भूमिका नाही असे नगरविकास राज्यमंत्र्यांनी सांगितलेले आहे. हे विधेयक आज कामकाजपत्रिकेवर असल्यामुळे उद्या देखील ते कामकाजपत्रिकेवर दाखवावे लागेल. एकदम पुढील अधिवेशनामध्ये ते आपणास घेता येणार नाही. तेव्हा उद्याच्या कामकाजपत्रिकेवर हे विधेयक आपण दाखवू, ते उद्या मंजूर करु असे मी म्हणत नाही, परंतु याबाबतीत उद्या सभागृहाने निर्णय करावा असे मला वाटते.

तालिका सभापती : या विधेयकावर भाषण करणारे सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत हे ऑन लेग राहातील. उद्याच्या कामकाजपत्रिकेमध्ये हे विधेयक दाखविण्यात येईल आणि उद्या त्याबाबतीत निर्णय होईल.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कामकाज सल्लगार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करणे.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

" विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक गुरुवार, दिनांक 24 जुलै, 2008 रोजी दुपारी 4.00 वाजता विधानभवन, मुंबई येथे झाली, सदरहू बैठकीत समितीने विचार-विनियम करुन शुक्रवार, दिनांक 25 व शनिवार, दिनांक 26 जुलै, 2008 रोजीचे सभागृहाचे कामकाज पुढीलप्रमाणे असावे असा निर्णय घेतला.

<u>जुलै, 2008</u>

शुक्रवार, दिनांक 25	1) शासकीय विधेयके.
	2) अशासकीय कामकाज-विधेयके (गत सत्रातील प्रलंबित)
शनिवार, दिनांक 26	अंतिम आठवडा प्रस्ताव.

राज्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने विद्यमान सत्राचा कालावधी एक आठवडयाने कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याऐवजी नागपूर येथील आगामी सत्र तीन आठवडयाचे घेण्यात येईल.

महाराष्ट्रात दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली असल्याने सर्व सन्माननीय सदस्यांनी जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आपापल्या मतदार संघात जावे अशी माझी विनंती आहे.

तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव) : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : अधिवेशनाचा कालावधी एक आठवडा कमी करण्यासंबंधीचा निर्णय कामकाज सल्लागार समितीमध्ये एकमताने झाला आहे काय ?

तालिका सभापती : कामकाज सल्लागार समितीच्या निर्णयावर आपल्याला चर्चा करता येणार नाही. आता आपण विरोधी पक्षाकडून देण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा सुरु करु.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, हा प्रस्ताव उद्या चर्चेला घ्यावा अशी आमची आपणास विनंती आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सदरहू प्रस्ताव विरोधी पक्षाकडून देण्यात आलेला आहे. उद्या शासकीय विधेयके घेण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे अशासकीय कामकाज सुध्दा आहे. हा प्रस्ताव आज चर्चेला घेतला तर बरे होईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, हा प्रस्ताव जरी विरोधी पक्षाकडून देण्यात आलेला असला तरी या प्रस्तावावर सखोल चर्चा होणे आवश्यक आहे. म्हणून तो प्रस्ताव उद्या चर्चेला ठेवावा अशी माझी आपणास पुन:श्च विनंती आहे.

तालिका सभापती : ठीक आहे. या प्रस्तावावरील चर्चा उद्या घेण्यात येईल. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 25 जुलै, 2008 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 06 वाजून 13 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 25 जुलै, 2008 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------X----------

अशुधारित प्रत / शिपीसाठी नाही